

# मराठी
# …ङ्मय दर्शन १

… कोल्हटकर

अ. वि. गृह प्रकाशन पुणें

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
ग्रं. क्र. १२४५
REFBK-0011482

नो.क्र. ३१४२३

क्रमांक — १३४९
दिनांक — १३/१०/८१

31423
१३४९
१३/१०/८१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वाकृत.
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों: दि: ........................

अ. वि. गृह प्रकाशन

# मराठी साहित्य-दर्शन

पुष्प नववें

कै. अच्युतराव कोल्हटकर

संपादन व प्रस्तावना

प्रा. भीमराव बळवंत कुलकर्णी
एम्. ए.
स. प. महाविद्यालय, पुणें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११४८२

REFBK-0011482

जून ] किंमत दोन रुपये पन्नास नये पैसे [ १९६१

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें २.

: प्रकाशक :
दि. दा. गांगल, एम्. एस्सी.
अ. वि. गृह प्रकाशनासाठीं,
१७८६, सदाशिव पेठ, पुणें २

*

प्रथमावृत्ति, १५ जून १९६१
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

*

: मुद्रक :
दि. दा. गांगल, एम्. एस्सी.
लोकसंग्रह छापखान्यासाठीं,
१७८६ सदाशिव पेठ, पुणें २

# प्रकाशकाचें निवेदन

मराठी साहित्य-दर्शनाचें हें पुष्प वाचकांच्या हातीं देण्यांत आम्हाला धन्यता वाटत आहे. मराठी साहित्यांतील थोर लेखकांच्या वाङ्मयाचा परिचय थोडक्यांत करून द्यावा असा त्याच्या मागचा हेतु आहे. मराठींतील नामवंत साहित्यिकांचें विपुल लेखन अनेक ग्रंथांच्या द्वारें, मासिकें, साप्ताहिकें, वृत्तपत्रें व रेडिओ इत्यादि विविध माध्यमांच्या द्वारें प्रकाशित होत असतें. ग्रंथालयांत किंवा ग्रंथागारांत पाऊल टाकलें की, एखाद्या लेखकाचींसुद्धा असंख्य पुस्तकें आढळून येतात. तेव्हा अशा स्थितींत कोणतें पुस्तक वाचूं व कोणतें नको, याचा संभ्रम माणसाला पडतो व त्यामुळे तो थोडासा गोंधळूनहि जातो. याशिवाय एखाद्या लेखकाच्या सर्व ग्रंथांचें वाचन व परीक्षण करणें प्रत्येक व्यक्तीला शक्य नसतें—निदान सध्यांच्या यांत्रिक-युगांत तेवढी सवडहि सर्व व्यक्तींना मिळतेच असें नाही. परंतु नामवंत लेखकाच्या सर्व वाङ्मय-प्रकारांचें दर्शन घडावें, ही इच्छा मात्र व्यक्तीच्या ठिकाणीं असते. अशा इच्छेची पूर्ति या मालेच्या द्वारें होईल अशी आम्हांस खात्री वाटते.

मराठींतील कांही नामवंत साहित्यिकांचा या दृष्टीने परिचय करून द्यावा, अशा हेतूने मालेचा प्रारंभ करण्यांत आला आहे. नामवंत साहित्यिकांच्या विपुल वाङ्मय-भांडारांतून निवडक व उत्कृष्ट, शिवाय त्यांत साहित्यिकाने लिहिलेले शक्यतों सर्व तऱ्हेचे वाङ्मय-प्रकार यावेत या हेतूने आम्ही संपादकांना विनंती केली व ती त्यांनी मान्य केली, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. मराठी साहित्यप्रेमी वाचकांना ही माला अर्पण करून हें निवेदन पूर्ण करतों.

जून १९६१

व्यवस्थापक,
अ. वि. गृह प्रकाशन, पुणें २.

जय चोखोबा

# 'साहेबां'ना अभिवंदन आणि 'दादां'ना अभिवादन

माझे श्रेष्ठ गुरुवर्य आणि मराठी वृत्तपत्रसृष्टींतील अद्वितीय प्रकाण्ड-पंडित पत्रकार कै. अच्युत बळवंत तथा 'साहेब' कोल्हटकर व माझे परममित्र व श्रेष्ठ समाजसेवक कै. विष्णु गंगाधर तथा 'दादा' केतकर या दोन महा-पुरुषांच्या पुण्यस्मृतींना एकाच वेळीं वंदन करण्याचा सुयोग आज मला 'दादां'च्या वारसांच्या कृपेनें लाभत आहे ही परमेश्वराची कृपाच होय. 'साहेब' आणि 'दादा' हे परम स्नेही आणि तसेच जनताजनार्दनाचेहि आदर्श सेवक होते. त्यांतील एकाचें वाङमयऋण दुसऱ्याच्या वारसांनी प्रेमाने व आपुलकीच्या भावनेने फेडावें हा अपूर्व योगच होय.

गु. अच्युतराव दि. १५ जून १९३१ रोजीं कैलासवासी झाले व त्यांचा एक नम्र भक्त या नात्याने मी पुढील तीन वर्षांत, दर पुण्यतिथीला एक या प्रमाणें, त्यांच्या वाङमयाचे सारांशभूत असे ७५० पृष्ठांचे तीन भाग '**अच्युतराव कोल्हटकर स्मारक ग्रंथ**' या नांवाने प्रसिद्ध केले. आज त्यांच्या प्रती दुर्मिळ झाल्या असून त्या पुन: प्रसिद्ध करणें, आज तरी, जवळजवळ अशक्य झालें आहे. अशा वेळीं प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशकांस, साहेबांच्या सारांशभूत ग्रंथांचेंहि अति संक्षिप्त रूपांत प्रकाशन करून पुढील-विशेषत: तरुण-पिढ्यांना वाङमयदर्शन घडविण्याचें पुण्य घ्यावें अशी मीं विनंती केली व त्यांनीं ती तत्काल मान्य केल्यानें हें छोटें पुस्तक प्रसिद्ध होत आहे. आधींच संक्षिप्त स्वरूपांत असलेल्या वाङमयाचें अतिसंक्षिप्त स्वरूपांत दर्शन घडविणें फार कठिण काम, पण तें प्रा. भी. ब. कुलकर्णी यांनी या पुस्तकांत फार सुंदर रीतीनें केलें असून अच्युतरावांच्या वाङमयाच्या विविध पैलूंचें चांगलें दर्शन घडविलें आहे याबद्दल मी प्रकाशक व संकलक या दोघांसहि धन्यवाद देतों. या पुस्तकामुळें वाचकांना अच्युतरावांच्या लेखनाची चमत्कारपूर्ण व तशीच चमत्कृतिजनक शैली कळून येण्यास सोपें झालें आहे.

या पुस्तकप्रकाशनानें मला तर आनंद झालाच आहे पण माझ्यापेक्षांहि शतपट अधिक आनंद अच्युतरावांचे सध्या आफ्रिकेंत असलेले थोर सुपुत्र श्रीमान् कुसुमाकरपंत व तेथेंच असलेल्या साहेबांच्या सहधर्मचारिणी मातुःश्री इंदिराबाई यांस होईल यांत शंका नाहीं. आपल्या पित्याचें नांव जनतेच्या स्मरणांत चिरकाल रहावें म्हणून कुसुमाकरपंतांनीं दहा हजार रुपयांची रक्कम पुणें विद्यापीठाच्या स्वाधीन केली असून, त्या रकमेंतून पत्रपांडित्याचें शिक्षण देण्याची योजना पुणें विद्यापीठ आंखीत आहे. ही योजना लौकरच कार्यवाहींत येवो आणि कुसुमाकरपंतांच्या हातून आणखी अशींच प्रशंसनीय कामें होवोत असें मी इच्छितों.

या पुस्तकाच्या बाबतींत ज्यांनीं ज्यांनीं परिश्रम केले त्यांस धन्यवाद देऊन मी ‘साहेब’ आणि ‘दादा’ यांच्या पुण्यस्मृतींना पुनः एकदां अभिवादन करतों.

झुणका-भाकर-<br>समता संघ कार्यालय,<br>मुंबई ४.<br>दि. २८–५–६१

जनताजनार्दनाचा नम्र सेवक,<br>**अनंत हरि गद्रे**

अनुक्रम 37723 दि.
नों. दि. 13/7/

# प्रस्तावना

१८७४ ते १९२० हा कालखंड मराठी वाङमयाच्या दृष्टीने अत्यंत अपूर्व असाच म्हणावा लागेल. ह्या कालांत महाराष्ट्रांत जें विचारमंथन झालें, जी स्वातंत्र्याकांक्षा अत्यंत ज्वलंत भावनेने सामान्य माणसापर्यंत पोचली आणि बुद्धिवादाच्या प्रखर भूमिकेवरून ज्या समाजस्थितींतून समाजाला कात टाकावयाला लावलें, त्याला मराठी वाङमयांत तोड नाही. केवळ वाङमयीन दृष्टचाच नव्हे तर जीवनाच्या सर्व क्षेत्रांत केवळ एवढ्याच काळांत इतकीं मोठमोठीं हिमालयी माणसें निपजलीं की, चिपळूणकर–आगरकर–टिळक ह्या एव्हरेस्ट—गौरीशंकर-कांचनगंगेपुढे बाकीचीं अनेक मोठमोठीं शिखरें त्यांच्या प्रभेपुढे क्षणकाळ झाकोळलीं गेलीं. किंबहुना ह्याच काळांत जीवनांतील सर्व क्षेत्रांतील विचार—मग तो सामाजिक, धार्मिक वा राजकीय असो–वाङमयविशेषांनी युक्त अशा नित्य नव्या मनोहर रूपाने आविष्कृत झाला आणि त्याने मराठी भाषा आणि वाङमय यांवर पसरलेला तमोयुगाचा पडदा मोठ्या त्वेषाने टराटर् फाडून टाकला. विश्वविद्यालयाचे संस्कार झालेल्या पंडितांना इंग्रजी भाषा ही इतकी सरावाची झालेली होती, आणि तीहि एका विशिष्ट पराभूत मनोवृत्तींतून की, न्या. रानडे–भांडारकर–तेलंग सारख्या अवघ्या विश्वांत ज्यांच्या बुद्धीचें कौतुक व्हावें, अशा महाराष्ट्राच्या सुपुत्रांनी आपला महत्त्वाचा ग्रंथसंभार लीलेने इंग्रजींतून हाताळला आणि बिचारी त्यांची मायबोली उपेक्षेच्या शरमेने खाली मान घालून हें त्यांचें कौतुक बघत राहिली. १८६० पासून १८७४ पर्यंतच्या महाराष्ट्रांतील एकंदर सामाजिक स्थितीचा विचार करतांना एक स्पष्ट चित्र डोळ्यांपुढे उभें राहतें. त्यामध्ये इंग्रज हे विजिगीषु आणि सर्वसामर्थ्यवान असे प्रभु आहेत. त्यांच्या प्रभुत्वाने दिपून त्यांच्या अनुकरणेच्छेने लीन झालेली रानडे–भांडारकरांसारखी तेजस्वी मंडळी सरकारी नोकरीची सोनेरी बेडी सांभाळून स्वतःच्या ऐहिक उन्नतीचा विचार करीत आहेत. दीर्घोद्योग आणि चिकाटी ह्या इंग्रजांच्या नवीन गुणांनी स्वतःचें उत्थापन करण्यासाठी तन-मन-धन वेचणारी ही मंडळी महाराष्ट्रास केव्हांहि वंदनीय अशीच आहेत;

कारण ह्याच काळांत द्वितीय-बाजीरावी दुर्गुणांचा भस्मासुर मध्यमवर्गीय नोकरशाहींत थैमान घालीत असतां चारित्र्याच्या दृष्टीने अत्यंत पवित्र व निर्मळ वर्तन असलेल्या ह्या मंडळींतूनच प्रथम हळूहळू महाराष्ट्राची लोपलेली अस्मिता जागी होऊं लागली होती. परंतु वरील दोन्ही वर्ग आणि एकंदरींत मध्यमवर्गीय सामान्य जनता (ह्या कालखंडांत जी जागृति झाली असें आपण म्हणतों ती मध्यमवर्गीयापुरतीच मर्यादित होती. त्याच्या खाली ती जाऊंच शकली नाही आणि जाणें शक्य नव्हतें.) ह्यांमध्ये एक फार मोठी दरी निर्माण झाली होती. थोडा विचार केला तर मध्यमवर्गीयांच्या मनामध्ये पाश्चात्य राज्यकर्त्यांबद्दलची जी परकेपणाची आणि त्याहिपेक्षां जी एक दरारा, भय निर्माण होण्याची भावना होती तीहि ह्या लोकांबद्दल होती. फरक एवढाच की, ती आदरमिश्रित होती. म्हणजेच सामान्य जनता आणि राज्यकर्ते यांमध्ये जो दुरावा होता तोच सामान्य जनता आणि विचारवंत यांमध्ये होता. कारण ह्या विचारवंतांना जरी सामान्य जनतेच्या उद्धाराची कळकळ असली तरी त्यांचा ओढा मूलतः राज्यकर्त्यांकडेच होता.

हा दुरावा पहिल्या प्रथम विष्णुशास्त्र्यांनी दूर केला आणि सामान्य जनतेमध्ये आत्मविश्वासाचीं बीजें पेरलीं. तसें पाहिलें तर बुद्धिवादाच्या कसोटीवर घासून पाहतां विष्णुशास्त्री आणि वर उल्लेखिलेले विद्वान् यांमध्ये विष्णुशास्त्र्यांकडे बुद्धिवादाचा तीव्र वारसा आलेला आहे असें वाटत नाही. बुद्धिवादाच्या दृष्टीने रानडे—भांडारकर—तेलंग ह्यांपेक्षा विष्णुशास्त्र्यांचें कर्तृत्व क्षीण आहे. परंतु विष्णुशास्त्र्यांनी निर्माण केलेलें नवें चैतन्यदायी व स्फूर्तिप्रद वातावरण हें इतकें महत्त्वाचें आहे की, डॉ. केतकरांनी त्यांना 'अर्वाचीन पुण्याचे जनक' असें कां म्हटलें आहे हें ताबडतोब लक्षांत येतें. खरोखर 'आधुनिक महाराष्ट्राचे जनक' हीच उपाधि त्यांच्या बाबतींत अधिक सार्थ ठरेल. स्वदेश, स्वभाषा आणि स्वधर्म यांच्या अभिमानाचे सर्व पैलू केवळ विष्णुशास्त्र्यांच्या लेखणीने उजळून टाकले आणि त्यांतूनच टिळक, आगरकर हीं परिणामतः परस्परविरुद्ध वाटणारीं आणि वस्तुतः एकाच विष्णुशास्त्र्यांच्या व्यक्तित्वांतून साकार होऊन विष्णुशास्त्र्यांपेक्षाहि मोठा पल्ला गाठणारीं दोन तेजस्वी टोकें होत. चिपळूणकर, टिळक, आगरकर यांच्या एकंदर कार्याचें थोडक्यांत अवलोकन केलें असतां स्वार्थत्याग, निष्ठा,

धडाडी आणि चारित्र्यसंपन्नता या बाबतींत महाराष्ट्रांत फार मोठी परंपरा निर्माण करण्याचें श्रेय ह्या त्रयीला देण्यांत येतें, परंतु त्याहिपेक्षां ज्या एका डोळस योजकतेने राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांत गोठलेली दूषित वाफ त्यांनी उडवून लावली ती अधिक परिणामकारक ठरली व त्यांतूनच सर्व भारताचें महाराष्ट्र हें तत्कालीन आकर्षण ठरलें. अशा या काळांत मराठी वाङ्मय-क्षितिजावर आणि विशेषत: वृत्तपत्र व्यवसायांत देदीप्यमान अशी प्रभा पसरली असतां कित्येक मोठमोठ्या विद्वानांचें लेखन जनसमुदायाचें फारसें आकर्षण बनूं शकलें नाही. दोनच व्यक्तींनी मात्र अल्पावधींत लोकप्रियतेच्या बाबतींत टिळकांच्या लेखणीलाहि कांही काळ मागें टाकलें. शिवरामपंत परांजपे व अच्युत बळवंत कोल्हटकर ह्या त्या दोन व्यक्ति होत.

चिपळूणकरांनी रुजविलेली आणि टिळकांनी वाढविलेली पारतंत्र्याबद्दलची अपार चीड आणि स्वातंत्र्याबद्दलची नितान्त निष्ठा परांजप्यांनी काव्य आणि कल्पकतेच्या सहाय्याने अधिक तीव्र केली, तर चटकदारपणाची चुरचुरीत फोडणी देऊन अच्युत बळवंतांनी सहजासहजी याच गोष्टी लोकांच्या गळीं उतरविण्यांत फार मोठें यश संपादन केलें. एकाने उपहास, उपरोधाच्या शस्त्राने प्रतिपक्षाला घायाळ केलें, रक्तबंबाळ केलें आणि काव्यकल्पनांच्या कारंजांतून इंद्रधनुष्याच्या सप्तरंगाची बेसुमार उधळपट्टी करून मराठी जनतेला चकित करून सोडलें; तर दुसऱ्याने उपहासाच्या माफक गुदगुल्यांनी आणि अतिशयोक्तीच्या रंजक कलागुणांनी चटकदार कल्पनांच्या नंदनवनांतून मराठी वाचकांना फेरफटका मारावयास लावलें. एकाने 'काळ सूड सूड म्हणून ओरडला' अशी तारस्वरांत गर्जना केली आणि ही गर्जना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत कंपित होत होत अंत:करणें छेदून उसळत्या रक्ताच्या तरुणांचीं माथीं भडकलीं आणि सशस्त्र क्रांतीच्या ज्वालाग्राही विचारांनी क्रांतीचा जयजयकार गर्जवीत ते बेहोष झाले, तर दुसऱ्याने चहा-चिवडा-चिरुटांचा आस्वाद घेतां घेतां 'संदेश'च्या रकान्यांतून स्वच्छंदपणे त्यांच्या गळीं स्वदेश आणि स्वातंत्र्यप्रीति उतरविली. एकाने भाषेंतील सर्व प्रकारच्या वक्रतेचा परिणामकारक प्रयोग करून सरकारच्या वक्रदृष्टींत सापडूनहि ह्या चक्रव्यूहाची किल्ली न चालवितां आल्यामुळे सरकारला हैराण केलें; तर दुसऱ्याने कधी वक्रता, कधी सरलता, कधी सामोपचारता

तर कधी उघड उघड चिथावणी यांमुळे सरकारचा रोष ओढवून घेऊन कधी तुरुंगवास तर कधी जामीनकी यांसारख्या कटकटींतून वारंवार जाऊनहि आपली ईर्ष्या किंचितहि हटूं दिली नाही.

आणि म्हणूनच मराठी गद्याच्या वैभवरूपी दालनांत शिरतांना आपणाला परांजपे-कोल्हटकरांच्या दालनामध्ये अधिक काळ थांबावें लागतें. मराठी लेखणीची अधिकाधिक कलाकुसर निबंध-प्रांतांत याच दालनांतून बुद्धया घडविलेली आहे आणि ही कलाकुसर आपापल्या दालनांत या दोघांनी केवळ आपल्याच हातच्या लेखणीने केली. हें आठवलें म्हणजे क्षणभर मराठी माणूस नतमस्तक होतो. या दालनामध्ये दुसऱ्या कोणाचा फारसा हातभार नाही आणि तरीहि त्यांच्या लेखणीची जिद्द इतकी हटवादी की, तिने वाग्देवीला फारच थोडी उसंत घेऊं दिली. तसें पाहिलें तर लेखणीचेंच या दोघांना मोठें व्यसन. चिपळूणकरांना महाराष्ट्रांतील मराठी भाषा आणि संस्कृति यांतील अनवस्था पाहून अगदीच राहावलें नाही म्हणून त्यांनी लेखणीरूपी छिन्नी हातांत घेतली आणि मराठी संस्कृतीवर चढलेला चौपदरी गंज छेदून काढला. अत्यंत उपेक्षेच्या काळांत 'अमृतातें पैजा जिंके' अशा प्रतिज्ञेने सिद्ध झालेल्या मराठी भाषेंतील मनोहरविलास त्यांना दाखवावयाचा होता म्हणून त्यांनी लेखनासाठी वाचनाचे अपार परिश्रम घेतले, त्यामुळेच की काय गैरसमजाने गंगाधर गाडगिळांसारख्यांनी "चिपळूणकरांना मराठी लिहितांना फार कष्ट होत असले पाहिजेत" असले विचित्र उद्गार काढले. टिळक-आगरकरांना देखील मराठी वृत्तपत्रसृष्टींत आपद्धर्म म्हणूनच उतरावें लागलें. परंतु परांजपे-कोल्हटकर तर या प्रांतांत लेखणीच्याच व्यसनापायीं उतरले. कोल्हटकरांच्या बाबतींत तर 'स्वातंत्र्य, निर्भेळ स्वातंत्र्य, संपूर्ण स्वातंत्र्य, आपल्या परंपरेचे अभिमानी पाईक असे भारतीय स्वातंत्र्य' हा त्यांचा छंद खरोखर दुय्यम होता. लेखणी, लेखणी हाच त्यांचा खरा छंद होता. ह्या लेखणीच्या छंदांत अच्युत बळवंतांना हटविणारा व्यसनी लेखक महाराष्ट्रांत कोणीहि झाला नाही असें म्हटलें तर अतिशयोक्ति होऊं नये. एकदा लेखणी हातांत घेतल्यानंतर अच्युत बळवंतांनी तिच्याशीं कधीच प्रतारणा केली नाही. तिला क्षणभरहि अंतरणें त्यांना सहन होत नसे. या लेखणीच्या छंदापायीं त्यांनी स्वास्थ्याची, संसाराची, खुद्द जन्मदात्या पित्याची आणि लेखणीने

मध्यंतरीं वाकडें वळण घ्यावयाचें मनांत आणल्यानंतर ज्यांच्याबद्दल नितान्त निष्ठा आहे अशा लोकमान्य टिळकांची देखील पर्वा केली नाही. अच्युतरावांनी सरकारने बंद केलेलें 'संदेश' दैनिक पांच वेळा चालू केलें आणि सहाव्यांदा चालू करण्याची धडपड चालू असतांनाच काळाने त्यांच्यावर झडप घातली. 'संदेश' बरोबरच दैनिक 'मेसेज' नांवाचें इंग्रजी दैनिक सुरू केलें. 'श्रुतिबोध' मासिक तर इंग्रजी, मराठी, गुजराती, हिंदी या चारहि भाषांतून चालविलें. याशिवाय साप्ताहिक देशसेवक, मासिक उषा, दैनिक इंदूप्रकाश, साप्ताहिक युगांतर, साप्ताहिक चाबूक, साप्ताहिक चाबूकस्वार, साप्ताहिक संदेश, दैनिक राष्ट्रमत इत्यादि नियतकालिकांचें त्यांनी संपादन केलें. तसेंच जवळजवळ डझनभर निरनिराळ्या नियतकालिकांचे ते मुख्य लेखक होते. नाटकें, कादंबऱ्या, गोष्टी आणि इतर विषयांवरचीं पांच-सहा पुस्तकें हा त्यांच्या फावल्या वेळचा प्रपंच. खरोखर अच्युत बळवंतासारखा लेखणीचा व्यसनी अच्युत बळवंतच.

म्हणूनच अच्युत बळवंतांकडे पाहातांना त्यांच्या चरित्राच्या सनावळी–भाकडकथा विस्ताराने सांगण्यांत अर्थ नाही. त्यांनी लिहिलेल्या शिवरामपंतांवरील लेखाप्रमाणेच त्यांचें कर्तृत्व आणि त्यांचें व्यक्तिमत्व यांचाच अधिक ऊहापोह करणें उपयुक्त ठरेल. त्यांच्या वैचित्र्यपूर्ण व नाटचपूर्ण जीवनांतील कांही महत्त्वाचीं वैशिष्टचें नमूद करण्यानेच त्यांच्या लेखनामागचें व्यक्तिमत्व समजूं शकेल. अच्युतरावांनी अनेक वर्तमानपत्रें काढलीं व आणि तीं आपल्या डोळ्यांसमोर बुडतांना पाहिलीं. याचें कारण वर्तमानपत्रें चालविण्यासाठी जो व्यवहार लागतो त्याचें त्यांच्याशीं वैर होतें. त्यांच्या बालपणचें चरित्र पाहिलें तर 'श्रीगणेशायनमः' यांतील सुरुवातीचें 'श्री' हें अक्षर त्यांना कित्येक दिवस काढतां येत नसे असें दिसून येतें. खरोखर श्रीने अच्युत बळवंतांच्या कार्यांत अनेक अडचणी आणि मानहानीचे प्रसंग निर्माण केले. आपल्या चुलतबंधूबद्दल लिहितांना चिंतामणराव कोल्हटकरांनी लिहिलें आहे, 'लग्न झाल्यानंतर तो एल्एल्. बी. च्या अभ्यासासाठी मुंबईला गेला. सर्वजण त्याला एक भोळाभाबडा, साधा, जगाच्या व्यवहाराचें पूर्ण अज्ञान असणारा असें मानीत असत—आणि उगाच मानीत नसत, या स्वारीचें वागणेंच तसें असे. हा अभ्यासाला बसला असतां याला पिण्याकरितां दुधाचा

पेला पुढे नेऊन ठेवला तरी हा आपल्या अभ्यासांत इतका मग्न असे की, मांजर येऊन तें दूध पिऊन गेलें तरी त्याची याला दाद नसे. एखादा शब्द घोकायला सुरुवात केली की, त्याचें इतकें पीठ पडे की, दादांना शेवटीं सांगावें लागे, 'बग्या आता पुरे कर. त्या खांबाचा सुद्धां तो शब्द पाठ झाला...', व्यायाम करायला गेला म्हणजे व्यायामच करी. फिरायला गेला म्हणजे पांचसात मैल सहज जाऊन येई. थोडक्यांत म्हणजे परमहंस साधूची त्याची वृत्ति होती."[1] शिक्षक म्हणून अच्युतरावांनी साताऱ्च्या न्यू इंग्लिश स्कूल मध्ये दोन वर्षे काढलीं. लांब, काळा कोट, जरीचा तांबडा रुमाल आणि पायांत जोडे असा त्यांचा पोषाख; परंतु हा पोषाख अर्धा अधिक तास खपून व्यवस्थितपणे त्यांच्या अंगावर चढविण्याचें काम घरच्या मंडळींना करावें लागे. नंतरच्या काळांत देखील अच्युतरावांनी कधी आपल्या शरीराकडे, पोषाखाकडे लक्ष दिलें नाही. वि. ह. कुलकर्ण्यांनी लिहिलें आहे[2], "त्यांच्या मनाची प्रसन्नता अगदी बिकट प्रसंगींहि कधी ढळली नाही. शेकडो संकटांना तोंड देऊनहि त्यांची उल्हसित वृत्ति कायम टिकली होती. त्यांचा स्वभाव निसर्गतःच आनंदी होता. आपत्तींचे अनेक तडाखे सहन करून त्यांचें मन घट्ट बनलें होतें. त्यांच्या स्वभावाप्रमाणे त्यांची मूर्ति व वागणूकहि विनोदी होती. त्यांचा शरीराचा बांधा, त्यांचें बसकें व चपटें नाक, दांत कांहीसे पुढे आल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर विलसणारें एक प्रकारचें मिष्किल हास्य, त्यांचें टक्कल पडलेलें शिरस्त्राण-रहित डोकें, त्यांची केसांची झुलपें ठेवण्याची कांहीशी जगावेगळी तऱ्हा, चालतांना व व्याख्यान देतांना खिशांमध्ये हात घालण्याची सवय, पायमोजे घालूनहि केव्हां केव्हां जोडे वापरण्याची त्यांची पद्धत व कोटाचीं बटणें लावल्यामुळें पोटाचा आकार दर्शविणारें त्यांचें जाकिट हीं सर्व एक समयावच्छेदेकरून दिसलीं म्हणजे कोणालाहि हंसू कोसळल्याशिवाय राहात नसे."

कोल्हटकरांच्या जीवनांतील या आणि अशा आणखी कांही पैलूंचें निरीक्षण केलें असतां त्यांच्या लेखनांतील अनेक वैशिष्ट्यांचें मर्म लक्षांत येतें. कोल्हटकरांच्या लेखनांतील नावीन्य, चटकदारपणा व वैचित्र्य यांमागे त्यांची बहुश्रुतता हात जोडून उभी असलेली दिसते. संस्कृत आणि इंग्रजी

१. बहुरूपी पृ. ३४.
२. अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक प्रथम खंड, पृ. १८४.

वाङ्मयांचा त्यांचा व्यासंग अगदी लहानपणापासूनच समृद्ध असल्याने योग्य तो परिणाम करण्यासाठी योग्य तो काव्यसंदर्भ, कथासंदर्भ, शब्दसंदर्भ त्यांना चटकन् सुचतो. केवळ व्यासंग असता तर त्यांचें लेखन अतिशय जड झालें असतें. या व्यासंगामागे एक प्रकारचा अवखळ, खेळकर मिष्किलपणा आहे. साताऱ्यामध्ये विक्षिप्तपणा आणि मिष्किलपणा या बाबतींत त्यांनी तरुणपणींच मोठें नांव कमाविलें होतें. जुन्या जमान्यांत भर रस्त्यांतून दिवसाढवळ्या ते आपल्या पत्नीसह हिंडत असत. कोटेश्वराच्या मंदिरांत प्रयोग म्हणून त्यांनी कथेचा कार्यक्रम ठरविला व सातारकरांना त्यांनी एकापेक्षा एक आश्चर्याचे धक्के दिले. 'अंगरखा, पागोटें, उपरणें असा पोषाख न करतां त्यांनी कोट व पगडी असाच पोषाख केलेला होता. उपरणेसुद्धां घेतलें नव्हतें. मग कथेकरीबुवांनी नमन वगैरे संस्कृत श्लोकांनी करून हरदासाच्या मूळ पदाला अशी सुरुवात केली की, श्रोते विस्मयचकित झाले! नेहमी कथेकऱ्यांच्या कथा ऐकणारे श्रोते या हरदासबुवाच्या मूळपदाच्या पालुपदाच्या श्रवणाने चाटच झाले. 'हजरत अल्ला, सब दुनिया पालनवाला' अशी त्या पदाची सुरुवात होती.' * 'सातारला न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक असतांना देखील तेथील 'शाहू' या वृत्तपत्रांत 'न्यू इंग्लिश स्कूल'च्या सर्व शिक्षकवर्गाची झडती घेणारा एक खूप मोठा निनांवी लेख प्रसिद्ध झाला. गांवभर खळबळ उडाली. त्या लेखकाने एकाहि शिक्षकाला दयामाया दाखविली नव्हती. 'मिशा काढणारे व बायकोला घेऊन रस्त्याने हिंडणारे एक शिक्षक विलायतेहून आले असल्याचा आभास उत्पन्न करण्याचा प्रयत्न करतात वगैरे प्रकारची चुरचुरीत व खरमरीत विनोदगर्भ टीका अच्युतरावांसह सर्वांवरच होती. कित्येक दिवस या टीकालेखाच्या लेखकाचा कोणाला मागमूस लागला नाही. पुढे बरेच दिवसांनी हा अच्युतरावांचाच पराक्रम होता ही गोष्ट लोकांना कळली.*' मुंबईंत एकदां एका कीर्तनाला लावणीने सुरुवात व शेवट करून अशीच श्रोतृवर्गाची त्यांनी भंबेरी उडविली होती. 'थोडीशी चूकभूल करावयाची, त्याचा आनंद घ्यावयाचा आणि मग त्याचा स्फोट करावयाचा ही त्यांच्या स्वभावाची चुणूक पुढें 'संदेश' च्या रकान्यांतून आणि वक्तृत्वकलेंतून पराकोटीला पोचलेली आढळून येते.

*बहुरूपी पृ. ४२–४३.

'पुणेरी जोडा' अशा प्रकारचें शीर्षक देऊन अच्युतरावांनी 'जोडा' ह्या शब्दावर कसा कुशल कोटिक्रम लढविला आहे हें पाहाण्यासारखें आहे. 'वत्सलावहिनी' या टोपण नांवानें त्यांनी वृत्तपत्रसृष्टींत अशीच कुतुहलजनक खळवळ उडविली होती. त्यांच्या या अशा मिष्किलपणामुळे माधवाश्रमांत शिवाजी आल्याचे समजल्यानंतर जशी खळबळ उडाल्याचें वर्णन आहे तशीच खळबळ त्यांनी अक्षरश: मवाळांच्या गोटांत उडविली आहे. परंतु ह्या मिष्किल व्यक्तिमत्वामागे अत्यंत उदात्त, ध्येयाकांक्षी व सुसंपन्न असें भावविश्व दडलेलें आहे हें विसरून चालणार नाही. अच्युतरावांचें सगळेंच लेखन निर्मत्सरी व खेळकर अशा देशभक्ति व देशाभिमानावर आधारित आहे. त्यांना मिळमिळीत, साधेंसुधें व हलकेंफुलकें असें फारसें आवडायचें नाही. छत्रपति शिवाजी महाराज, रामदास व लो. टिळक यांच्यावर त्यांचें जें अलोट प्रेम आहे तें उगीच नव्हे. जीवनांत जें जें 'उत्कट आणि भव्य' आहे त्याच्या प्राप्तीसाठी या त्रिमूर्तींनी जो देह कष्टविला त्याचेंच त्यांना अतिशय प्रेम आहे. जें जें भारतीय आणि विशेषत: महाराष्ट्राच्या अभिमानाचें आहे त्याचा अच्युतरावांना भारी सोस. शिवाजी, रामदास, टिळक यांना तर त्यांनी चिरंतन आदरानें वंदन केलें आहे; परंतु न्या. रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, भांडारकर, शिवरामपंत परांजपे, गोखले, दाजीशास्त्री खरे यांसारख्या प्रत्येक कर्तृत्ववान पुरुषाचें त्यांनी गुणगान गाइलें आहे. पानिपतची शंभरी त्यांच्यांतील स्वातंत्र्यप्रेम उफाळून सोडते, तर दुसऱ्या बाजीरावाची दुर्दैवी कन्या कुसुमबाई हिच्या निधनानें अत्यंत करुण व अंत:करणाला पाझर फोडील अशी ते दु:खाची तार छेडतात. लो. टिळकांचें अनुयायित्व पत्करून त्यांनी शिवरामपंतांप्रमाणें मवाळांना हैराण केलें आहे; परंतु त्यांच्या लेखनांत शिवरामपंतांप्रमाणे आत्यंतिक तुच्छता किंवा मनाची खोल अढी दिसून येणार नाही. 'सत्तेशिवाय जीवित व्यर्थ आहे', या लेखांत त्यांनी रँग्लर परांजपे यांना हास्यास्पद ठरविण्याचा प्रयत्न केला तरी इतरत्र त्यांनी त्यांचा मनसोक्त गौरव केला आहे. मध्यंतरी कांही प्रकरणांबाबत त्यांच्या लेखणीनें लो. टिळकांच्यावर व न. चिं. केळकरांवर प्रखर टीकास्त्र सोडलें व त्यापायीं जनतेचा रोष ओढवून घेतला. परंतु टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांनी एकट्यानें एकटाकी पुस्तकाचीं सत्तर पानें भरतील इतका मजकूर एक

प्रकारच्या समाधींत लिहून काढला आणि आपलें टिळकांवरचें अलोट प्रेम व्यक्त केलें. नरसिंह चिंतामण केळकरांवर खास 'केळकर गौरव अंक' काढून त्यांनी अमाप स्तुतिसुमनें उधळलीं व 'दोन तात्या' या लेखाद्वारें त्यांना अविस्मरणीय केलें. 'पहिली रात्र', 'दुसरी रात्र' 'चोरून चुंबन', 'गुलाबी विधवा', 'विस्कटलेली वेणी' किंवा 'चोरी कशी करावी' अशा प्रकारचे आकर्षक मथळे देऊन लेख किंवा छोटेंसें पुस्तक प्रसिद्ध करावें. नांवावरून लोकांना तें रगेल, रंगेल किंवा श्रृंगारिक वाटावें; परंतु लेखकाने मात्र त्यांच्या अवधानाची चोरी करून त्यांतून ध्येयवादित्वाचे स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म यांच्या अभिमानाचे झलक दाखवावे हें नेहमींचेंच. राम, कृष्ण, शिवाजी, रामदास आणि टिळक यांच्याकडे पुरुषोत्तम म्हणूनच त्यांनी पाहिलें. त्या दृष्टीने अच्युतरावांची ही विभूतिपूजा अत्यंत कडवी होती. टिळकांवरील त्यांच्या नितान्त भक्तीमुळे त्यांच्या हयातींत व त्यांच्या मृत्यूनंतर जवळ जवळ २०–२५ वर्षें अच्युतरावांनी आपल्या वडिलांचें (वामनराव कोल्हटकरांचें) मवाळ व मिळमिळीत धोरण पसंत न पडल्यामुळे त्यांचें नांव टाकून देऊन पितृपदीं बळवंतरावांचें म्हणजे लोकमान्यांचें नांव लावलें, असा महाराष्ट्रांतील सगळ्यांचाच समज झाला होता. प्रा. श्री. म. माटे व चिंतामणराव कोल्हटकरांनी हा गैरसमज दूर केला. अच्युतराव वर्ष दीड वर्षाचे असतांनाच त्यांची मातोश्री निवर्तली व त्यांचे मोठे चुलते श्री. बळवंतराव कोल्हटकर यांनी त्यांचा मोठ्या कौतुकाने सांभाळ केला. लहानपणापासून शाळेंत अच्युतरावांचें नांव अच्युत बळवंत कोल्हटकर असें होतें. टिळकांशीं संबंध येण्यापूर्वी वयाच्या पंधराव्या वर्षीं ते अच्युत बळवंत कोल्हटकर या नांवाने मॅट्रिक पास झाले होते. अच्युतरावांच्या कडव्या टिळकभक्तीने महाराष्ट्राला जवळ जवळ ४० वर्षें कसें चकविलें होतें हें यावरून लक्षांत येईल.

अच्युतरावांच्या तोफखानी लेखनसंभारांत त्यांनी लिहिलेलीं ११ प्रकाशित–अप्रकाशित नाटकें व ५ प्रकाशित-अप्रकाशित कादंबऱ्या ह्या विस्मरणाच्या गर्तेंत गडप झाल्या. कारण वृत्तपत्रीय धावपळींत फारशा कलागुणांची बूज राखून अथवा त्यांतील तंत्रमंत्राचा बडिवार सांभाळून त्यांना

ह्या वाङ्मयप्रपंच संभाळतां आला नाही आणि जीं कांही थोडीबहुत नाटकें-कादंबऱ्या उपलब्ध आहेत त्यांचें वाचन केलें असतां खरे अच्युतराव त्यांमधून दिसत नाहीत असेंच म्हणावें लागतें. अच्युतरावांचें खरें दर्शन त्यांनीं वेळोवेळीं लिहिलेल्या लेखांतूनच होतें. त्यांतहि मिष्किल आणि खेळकर भूमिकेवरून जेथें ते लिहावयास बसतात, तेथें अच्युतरावांच्या लेखणीला निराळें तेज येतें.

एकंदरींत त्यांच्या लेखांचे तीन किंवा चार भाग करावे लागतात. त्यांतल्या त्यांत आध्यात्मिक, वेदान्तिक किंवा पौराणिक भूमिकेवरून लिहि-लेल्या लेखांतून हिंदुधर्म व भारतीय परंपरा व प्रगति यांबद्दलचा त्यांचा अभिमान सारखा ओसंडत राहातो. वैचारिक भूमिकेवरून साध्या, सोप्या रीतीने अत्यंत गूढ किंवा क्लिष्ट विषय समजावून देऊन त्यांतल्या महत्त्वाच्या अंगावर प्रकाश पाडणें, हें अशा प्रकारच्या लेखांतून काम साधलेलें आहे. श्री. विष्णु सखाराम घाटे यांच्या ' भस्मासुर ' या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्ताव-नेंतील कांही भाग ' हिंदुधर्म आणि स्वातंत्र्य ' या लेखांत दिलेला आहे. त्या प्रस्तावनेवरून अच्युतरावांच्या अशा प्रकारच्या लेखांचें स्वरूप कळून येईल.

शिवाजी, रामदास, टिळक, आगरकर, चिपळूणकर, परांजपे यांच्या-बद्दलचें मूल्यमापन आणि राष्ट्रकार्यामध्यें त्यांचें असलेलें अद्वितीय स्थान यांबद्दलचे अच्युतरावांचे विचार नंतरच्या लेखांतून दिसून येतील. इतर अनेक व्यक्तींबद्दलहि अच्युतरावांनी दाखविलेली गुणग्राहकता हा त्यांच्या दृष्टिकोनाचा महत्त्वाचा भाग होय. विशेषत: टिळकांच्या हयातींत आणि टिळकांच्या निधनानंतर महात्मा गांधींचें नेतृत्व महाराष्ट्राला पचण्यास जड गेलें. भारतांतील वृत्तपत्रांमध्यें आणि पुढाऱ्यांमध्ये महाराष्ट्रांतील वृत्तपत्रांनी व पुढाऱ्यांनी महात्मा गांधींच्या कार्याकडे उपहासाने आणि उपेक्षेने पाहिलें. अच्युतरावांनी मात्र अगदी टिळकांच्या हयातीपासूनच महात्मा गांधींचें द्रष्टेपण ओळखून त्यांच्या एकंदर कार्याचें मूल्यमापन १९१८ पासूनच केलेलें आहे. टिळकांचें कार्य जेथून खुंटलें तेथूनच पुढे म. गांधींचें सुरू होतें, अशी आपली श्रद्धा त्यांनी वारंवार संदेशमधून बोलून दाखविलेली आहे.

अच्युतरावांचे वाङ्मयीन लेख अतिशय मौलिक आहेत. विशेषत: ' मराठी काव्याची प्रभात ' या त्यांच्या लेखांतून प्राचीन व अर्वाचीन कवितेच्या

संदर्भांत त्यांनी शाहिरी व लावणी वाङमयाचें मोठ्या मार्मिकतेने रसग्रहण केलें आहे. संतवाङमयाबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन अत्यंत विचारप्रवर्तक व त्यांच्या वैशिष्ट्यांवर अचूक बोट ठेवणारा आहे. विनायक लक्ष्मण भाव्यांसारख्या प्राचीन मराठी वाङमयाच्या चिकित्सक व रसिक अभ्यासकाने 'जे टाळ कुटीत बसले आणि मृत अशा संस्कृताच्या छंदाला अनुसरून भारत-रामायणांतल्याच कर्मकथांचीं पुराणें पुन्हा पुन्हा सांगत सुटले, जे श्लोक-आर्यादिकांच्या उसन्या कसरतींत बांधले राहिले, त्यांना देश तरला काय आणि बुडला काय!! तो हसला काय आणि रडला काय!! एकच! त्यांचीं तीं पुराणें संथपणें चालूच होतीं. त्यांच्या वाग्देवीला सगळेच सारखे होते' अशा प्रकारचा त्यांचा अतिशयोक्त अधिक्षेप केला आहे. संतांच्या कार्याबद्दल अनेक प्रकारें चिखल उडविणारें विवेचनहि नंतरच्या काळांत निर्माण झालें आहे; परंतु कोल्हटकरांनी ह्याच संतांबद्दल किती गौरवयुक्त व अभिमानी उद्‌गार काढले आहेत ते पहा—"ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव अथवा तुकाराम ह्यांपैकी कोणताहि कवि घ्या. ज्या दृष्टीने कवि काव्यें रचतात तशी दृष्टि एकाहि कवीची नव्हती. काव्यें रचण्यापेक्षा ह्या सर्व महापुरुषांचा फारच उदात्त उद्देश होता. त्यांना कालिदास म्हणवून घेण्याची मुळीच हाव नव्हती. ह्यांची मुख्य तृष्णा परमेश्वराने आपणास आपले 'दास' म्हणावें एवढीच होती. त्यांना कालिदास म्हणून कोणी कितीहि मान दिला असता तथापि जर ईश्वराने त्यांना आपलें म्हटलें नसतें तर त्यांच्या मनाचें समाधान झालें नसतें. अशा थोर विभूतींना कवि म्हणणें ही एक प्रकारें त्यांची योग्यता कमी करण्यासारखेंच आहे. ते तत्त्वज्ञ, धर्मकर्ते व समाजोद्धारक होते. ते समाज-नियमनाची गंगा होते. त्या गंगेंत लोकांना आपलीं पातकें, आपलीं दुःखें, आपले मनःस्ताप बुडवून टाकण्याची परवानगी होती; परंतु आपली काव्यस्पृहाहि त्यांत खळवळून घ्यावी, इतक्या हीन प्रतीचे ते नव्हते."

अर्वाचीन कवितेसंबंधींचे त्यांचे उद्‌गार हे अधिक्षेपाचे निदर्शक नव्हेत. 'सत्य सदा बोलावें, सांगे गुरु आणि आपला बाप' अशा प्रकारची ही नीरस, निपट, निर्बुद्ध व कळकटलेली कविता खरोखरच 'हाडुकबहाद्दर' या पदवीस पात्र होती.'प्राचीन कवींच्या तुलनेने खरोखर अर्वाचीन कवींची स्फूर्ति म्हणजे

विजेचें तळपणें अथवा काजव्याचें चमकणें होय ' या उद्गारांत चपखलपणे अर्वाचीन कवितेचें मर्म सांगितलेलें आहे. रे. टिळकांच्या कवितेवर लिहितांना देखील, ' आधुनिक कवितेचें एखादें लक्षण बांधावयाचें असेल तर तें गर्विष्ठ-पणाच्या मुद्द्यावर मात्र बांधतां येईल ' असें त्यांनी जें म्हटलें आहे, तें अतिशय अन्वर्थक आहे. कवींच्या काव्यसामर्थ्याबद्दल व कविप्रतिभेचें स्वरूप व कार्य यांवर पुढे मराठींत इतक्या मोठ्या प्रमाणांत पिंजण झालें आहे की, संत कवींची शालीनता आणि नम्रता आणि अर्वाचीन कवींचें औद्धत्य यांतला फरक आपल्या विनयशील संस्कृतीला अधिक जाणवणें अपरिहार्य होतें. ' उत्कट भव्य ' यापासून सर्वस्वी अलिप्त असलेलें अर्वाचीन काव्य अच्युतरावांच्या उपहासाला पात्र होणें साहजिकच होतें; परंतु असें असूनहि अच्युतरावांची वाङमयीन दृष्टि दुराग्रहजन्य नव्हती, हें त्यांच्या रे. टिळकांच्या कवितेवरील लेखाने सिद्ध केलें आहे. ' टिळकांच्या कवितेंत सहजपणा, गोडी, सुलभता, मोकळेपणा, विषयानुवृत्तित्व हे गुण असतात, हें कोणीहि कबूल करील आणि ह्या गुणामुळे टिळकांची कविता जी जन्म पावली ती वरिष्ठ पदवीस पात्र होण्याकरितांच जन्म पावली असें कोणीहि म्हणेल ' हे त्यांचे उद्गार किती निराग्रही आहेत, हें सांगण्याची आवश्यकता नाही. ' महाराष्ट्र नाट्यकलेचा शृंगारसाज ' या लेखाद्वारें त्यांनी मराठी रंगभूमीचा जो आढावा घेतला आहे, त्या द्वारां मराठी रंगभूमीबद्दलचा त्यांचा अभिमान, त्यांचा व्यासंग व श्रेष्ठ टीकाकाराची त्यांची अचूक दृष्टि व्यक्त होते. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि खाडीलकर, गडकरी यांच्या नाट्य-कौशल्याचें त्यांचें विवेचन त्या काळामध्यें अपूर्व होतें यांत शंका नाही. अच्युतरावांनी ' नारिंगी निशाण नाटक मंडळी' काढून अनेक नाटकें लिहिलीं. स्वत: रंगभूमीवर त्यांनी कामें केलीं आणि अनेक नाटक मंडळ्या त्यांनी जवळून पाहिल्या आणि ' संदेश ' मध्ये नाट्यकृति व प्रयोग यासंबंधीं प्रोत्साहनपर असे लेख लिहून रंगभूमीची अपूर्व सेवा केली. खडतर शिक्षेंतून सुटून आल्यानंतर लो. टिळकांनी प्रथम किर्लोस्कर मंडळीचें कुशल विचारलें होतें. त्यांचा ह्या पट्टशिष्याने प्रथम ' संदेश ' मधून नाट्यवाङमयाबद्दल अपूर्व उत्साहाने रकानेच्या रकाने लिहून नट-नाटककारांना खांद्यावर नाचविलें. ' राक्षसी महत्त्वाकांक्षा ' ह्या नाट्यकृतीचें परीक्षण म्हणूनच अच्युतरावांना इतक्या सहजतेने, अधिकार-वाणीने करतां आलें.

अच्युतरावांच्या नावीन्यपूर्ण आणि चविष्ट लेखनाचे निरनिराळे पैलू पुढच्या लेखांतून आढळून येतील. चिपळूणकरांच्या राष्ट्रवादी परंपरेंतील लेखकांपैकी दैनिकासारख्या अत्यंत तापदायक वृत्तपत्राची धुरा वाहणारे अच्युतराव हे पहिले पाईक. दैनिकाचा प्रचंड व्याप सांभाळून अच्युतरावांच्या लेखणीने इतकी अमाप लोकप्रियता मिळविली आणि पैसे टाकून महाराष्ट्रांतल्या फुकटचा व खाष्ट वाचकांना आपलें दैनिक विकत घ्यावयास लावलें, विरोधकांना चोरून वाचावयास लावलें व लो. टिळकांनाहि ' संदेश ' वाचल्या-विना चैन पडू नये असा एक नवा विक्रम केला तो अशासारख्या कल्पक लेखन-सामर्थ्यावर.

अच्युतरावांसारखा कल्पक, प्रतिभावान व विनोदी वक्ता महाराष्ट्रांत झाला नाही. तासनतास श्रोत्यांना हसवून ते बेजार करीत. वक्तृत्वकले-मध्यें प्रश्नांची फार मोठी मालिका उभी करून, श्रोत्यांची उत्सुकता शिगेस नेऊन, एखाद्या नकारात्मक वाक्याने स्फोट करून, वाचकांना विस्मयाचे धक्के देणें, हें त्यांचें प्रमुख वैशिष्टच होतें. भावनेची तार छेडीत छेडीत काव्यमय आर्त स्वरांत ते पाहातां पाहातां श्रोत्यांना स्वातंत्र्यविचारांनी बेहोष करून सोडीत. असें करतांना कधी प्रौढ, वीरगंभीर, भारदस्त वाणीने, कधी अनेक उपमा-दृष्टान्तांच्या चौफेर कारंज्यांनी तर कधी एकाद्या अत्यंत प्रचलित अशा इंग्रजी शब्दाच्या उपयोगाने ते एकदम श्रोत्यांच्या अवधानाचा कबजा घेत. हीं सर्व वैशिष्टचें मोठ्या प्रमाणांत त्यांच्या या लेखांतूनहि व्यक्त झालेलीं दिसतील.

तीक्ष्ण बुद्धिमत्ता, गाढ व्यासंग आणि सहज सुबोध अशा तऱ्हेची भाषा यांमुळेच अच्युतरावांना हें शक्य झालें. अच्युतरावांच्या लेखणीने आपल्या वाणीचेहि बरेच गुण हस्तगत केले होते.

वैचारिकदृष्टचा शिवरामपंतांनी काय किंवा अच्युतरावांनी काय, फारसें गहन, गूढ असें वाचकांच्या गळीं बांधलें नाही. वृत्तपत्रासारख्या लोकरंजनाचें वाण पत्करलेल्या नियतकालिकांतून अशा प्रकारच्या लेख-नाला वावहि नव्हता आणि तशा प्रकारची बैठक मारण्यास कालावधीहि नव्हता. अलंकारिता आणि माधुर्य, सहेतुक कलात्मकता किंवा कला-कुसर, कल्पनाचमत्कृति व वैचित्र्य, पांडित्य, आणि मिष्किलपणा, भावनेला

चटकन् आवाहन करणारे, व बुद्धीला पटकन गुंगविणारे यांसारख्या अनेक गुणांनी युक्त असलेल्या स्वैर निबंधांतून ' ध्येयात्मकता आणि देशाभिमाना '-सारख्या गोष्टी अच्युत बळवंतांच्या लेखांनी जनसमुदायास शिकविल्या. तेल्या-तांबोळ्यांचे पुढारी म्हणून सार्थ ठरलेल्या लोकमान्यांच्या या अनुयायाने तेल्या-तांबोळ्यांपर्यंत 'संदेश' पोंचविला. चटकदार, चतुर, चतुरस्र गुणांनी युक्त असलेलीं, चलाख, चपखल, चेष्टेखोर आणि लेखणीच्या चंचलतेचे विविध गुण दाखविणारीं, अशा प्रकारचीं 'च'कारी सगळीं विशेषणें फक्त अच्युत-रावांच्या निबंधांसच लावतां येतील. आजच्या लघु-निबंधांतील अनेक गुणांनीं तीं युक्त आहेत आणि त्याहिपेक्षा अधिक कितीतरी वैशिष्टचें त्यांत असल्यामुळे शिक्षणखात्यापेक्षां अच्युतरावांच्या लेखणीनेच त्या काळीं अधिक साक्षरता-प्रसार केला, असे उद्गार निघाले. अच्युतरावांच्या सर्व गुणावगुणांनी युक्त असलेला, आचार्य अत्र्यांसारखा महान पत्रकार अच्युतरावांच्या लेखणीने निर्माण केला, यांतच अच्युतरावांच्या प्रतिभेचें श्रेष्ठत्व सिद्ध होतें.

चिपळूणकर, आगरकर, परांजपे इत्यादिकांचें निबंध-वाङमय या ना त्या तऱ्हेने शालेय व विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांपुढे सतत येत राहिलें; परंतु मराठी गद्याच्या विकासांतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असलेलें अच्युतरावांचें लेखन मात्र विद्यार्थ्यांना हव्या त्या स्वरूपांत आतांपर्यंत उपलब्ध होऊं शकलें नाही. अच्युत-वाङमयाचे परमभक्त श्री. अनंत हरि गद्रे यांनी मोठ्या परिश्रमाने प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या वाङमयाच्या तिन्ही खंडांतून निवडक आणि प्रातिनिधिक अशा ह्या संग्रहाने ही गरज थोडक्या प्रमाणांत का होईना भागूं शकेल असा विश्वास वाटतो.

—भीमराव बळवंत कुलकर्णी

# अच्युत-वाङ्मय

## प्रकाशित

### नाटकें

विवेकानंद
नारिंगी निशाण
सौख्यसोपान
मस्तानी

### कादंबऱ्या

इंग्रजांचा पराभव
लोकमान्यांच्या समाधीपुढें

### गोष्टी

पहिली रात्र
दुसरी रात्र
विस्कटलेली वेली
रंगीला रसूल
कोल्हापूरच्या अक्कासाहेब
गुलाबी विधवा
भोळा सांब

### इतर

चोरी कशी करावी ?
संक्रांतीचा तिळगूळ उर्फ सर्व धर्मांची परिषद
सौ. वत्सलावहिनींचीं पत्रें
भगतसिंगाचें चरित्र
बाबू गेनू चरित्र
नाना फरारीचा पोवाडा

## अप्रकाशित

### नाटकें

ताई तेलीण
बट्टयाबोळ
चांदबिबी
देवी अहिल्या
तिनें काय सांगितलें
नूतनचंद्र
इश्श मेलं पुणं ! (अपूर्ण)

### कादंबऱ्या

साधु कीं सैतान (अपूर्ण)
चोरून चुंबन (अपूर्ण)
नर्सची करुण कहाणी (अपूर्ण)

• • •

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | विसरूं नको | १ |
| २. | हिन्दुधर्म म्हणजे स्वातंत्र्य | ८ |
| ३. | ॐ भवति भिक्षां देहि | १५ |
| ४. | मराठी काव्याची प्रभात | १९ |
| ५. | संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षा | ३४ |
| ६. | टिळकांची कविता | ४४ |
| ७. | महाराष्ट्र नाट्यकलेचा शृंगारसाज | ५३ |
| ८. | हे तात्या आणि हे तात्या | ६१ |
| ९. | विष्णुशास्त्री, आगरकर, टिळक | ६९ |
| १०. | दादाभाई बना | ७९ |
| ११. | राजाला माकड चावलें | ८३ |
| १२. | न कर्त्याचा वार शनिवार | ८६ |
| १३. | शेवटची वेल सुकली | ८९ |
| १४. | सौ. वत्सला-वहिनींचें पत्र | १०१ |
| १५. | सत्तेशिवाय जीवित शून्य आहे! | १०६ |
| १६. | पुणेरी जोडे | ११२ |
| १७. | नवरा-बायकोमधील नोटीस | ११८ |


● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 37723 दि:
क्रमांक 1375 नों. दि:



# विसरूं नको

[ श्रीशिवछत्रपतींच्या पुण्यतिथिनिमित्त लिहिलेला हा लेख जसा उत्स्फूर्त, स्फूर्तिदायक व चमत्कृतिपूर्ण आहे, तसाच मवाळांना बोचकारणारा आहे. छत्रपतींच्या पुण्यतिथीचें महत्त्व ज्या प्रकारें ग्रंथ रंगविलें आहे, तो प्रकार नमुनेदार आहे.]

ग्रंथालय ठाणे
क्र. 99483

## आहे देह खळींत हेतु सगळा बाहेर मी ठेविला

तुम्हांस वाटतें काय की, ज्या महापुरुषानें दोन-तीन शतकांपूर्वी महाराष्ट्रांत विलक्षण शौर्य व धाडस उत्पन्न करून हिंदु लोकांचें साम्राज्य स्थापित केलें, त्याची जन्मतिथि जवळ आलेली आहे? तुम्हांस वाटतें काय की, दोनतीन शतकांपूर्वी महाराष्ट्र हा शब्द सर्वत्र इतक्या अतुल प्रशंसेचा विषय होऊन गेलेला होता की, स्वदेशाभिमान, ऐक्य, मुत्सद्देगिरी, पराक्रम, दृढनिश्चय व जीवाविषयीं बेफिकीरपणा ह्या सर्वांबद्दल त्या वेळच्या राजधोरणाच्या कोशांत महाराष्ट्र हा एकच शब्द वापरीत असत? तुम्हांस वाटतें काय की, साम्राज्यसूर्य हिंदुस्थानच्या उलट टोकाला पोचलेला असतां त्यास तेथून खेचून आणून, त्याची इच्छा नसतांनाहि मातुःश्री जिजाबाईच्या विख्यात पुत्रानें—अहाहा! धन्य, धन्य त्या माउलीची कूस—त्यास रायगडावर तळपावयास लावलें? तुम्हांस वाटतें काय की, प्रतापरवि मावळून जात असतांना मावळप्रांतांतच त्यास पायबंद देऊन दादोजी कोंडदेवाच्या अतुलविक्रमी शिष्यानें खुद्द मावळ्यांच्या हातूनच त्याचें मावळणें बंद करविलें? तुम्हांस वाटतें काय, आधुनिक महाराष्ट्रीयांनो, तुम्हांस आठवतें काय? अंतःकलहाच्या पंकांत बुड्या मारीत त्यांतच धन्यता मानणाऱ्या महाराष्ट्रीयांनो, तुम्हांस आठवतें काय की दोन तीन शतकांपूर्वी ह्या महाराष्ट्राचा उज्ज्वल इतिहास लिहिण्याकरितां मुसलमान तवारिखकार, मराठी बखरकार, इंग्रजी

इतिहासकार, आणि इटालियन वृत्तकार महाराष्ट्राच्या प्रत्येक कृत्याकडे आश्चर्याने टक लावून पहात बसलेले होते? महाराष्ट्रीयांनो, तुम्हांस काय सांगावें? पण महाभारताच्या घनघोर संग्रामानंतर ह्या पृथ्वीशीं ‘गडी फू’ करून स्वर्गातच आनंद मानीत वसणारे सुरवृन्द, रामदासांच्या मंत्र-स्फुल्लिंगाची सर्व महाराष्ट्रभर जीवनज्योति लावीत सुटणाऱ्या त्यांच्या ‘शिवबा’ची बिरुदावलि अवलोकन करीत, स्वर्गातील जन्मसार्थक्य कल्प-वृक्षाचीं यशोरूपी पुष्पें त्याच्या भाग्यावर अहमहमिकेने ओतीत होते? महाराष्ट्रीयांनो, शिवराजांच्या चरित्रांतील देवी भवानीच्या आशीर्वादाचे प्रसंग कविकल्पना म्हणून अश्रद्धेय मानूं नका. त्यांत अश्रद्धेय कांही नाही. शिवाजीमहाराजांच्या चरित्रांतील अश्रद्धेय भाग भवानीचे आशीर्वाद हा नव्हे, तर शिवाजीमहाराजांचें चरित्र हाच त्यांचे चरित्रांतील ‘अश्रद्धेय’ भाग आहे!! बापाने टाकलेल्या व अनुत्तेजक स्थितींत वाढलेल्या एका पंधरा-सोळा वर्षें वयाच्या अजाण बालकाने साम्राज्य-स्थापनेची महत्त्वा-कांक्षा धरली; ज्यांना लंगोटी उलटी की सुलटी घालावयाची हें माहीत नव्हतें, अशा अडाणी लोकांकडून त्याने द्रोणाचार्यांना आश्चर्य वाटेल अशीं असिधाराव्रताचीं कृत्यें करविलीं; अफझलखान, शाहिस्तेखान, दिल्लीची कैद, वगैरे अनर्थकारक प्रसंगांनी गळयास तात लावली असतांना, ज्या-प्रमाणे एखादा जादूगार आपल्या शरीराभोवती आवळलेले लोखंडी दोर सहजलीलेने तोडून टाकतो, त्याप्रमाणे ह्या बहाद्दराने त्यांतून अत्यल्प प्रयासाने आपली मुक्तता करून घेतली; त्याने साम्राज्यस्थापनेचा आपला संकल्प थोडक्याच अवधींत पुरा करून साम्राज्याभिषेकाचा सुखसोहळा ‘याच देहीं, याच डोळां’ अनुभविला, आणि त्याने त्या वेळीं हयात असलेल्या सर्व श्रेष्ठ पुरुषांत आपलें मूर्धवर्तित्व गाजवून दुर्गुणांचा, दुर्वासनांचा, अथवा दुरभिमानाचा स्पर्शहि आपल्या मनास होऊं दिला नाही. ह्यांपैकी एकेक गोष्ट, एकेकाच्या चरित्रांत घातली तरी ती अश्रद्धेय भासावयास लागण्या-इतकी लोकोत्तर आहे. मग ह्या सर्व गोष्टी एकाच चरित्रांत संकलित झाल्यावर हें चरित्र अश्रद्धेय कोण म्हणणार नाही? आणि ह्या असल्या अश्रद्धेय चरित्राची वाहवा करण्याकरितां जगन्माता भवानीला–पार्वतीला, ह्या अत्यंत दुष्ट जनतेशीं एक पळभर संसर्ग घडला तरी हरकत नाही,

पण तो शिवाजी आहे कसा तो तरी पाहूं या, ह्या विचाराने ह्या जगांत प्रकट होण्याकरितां अधीरता वाटली असेल, ह्यांत कांही एक नवल नाही. महाराष्ट्रीयांनो ! तुम्हांस आठवतें काय की, ह्या महाराष्ट्रभूमींत दोन अडीचशे वर्षांपूर्वीच एका मराठ्याच्या नांवाचीं नाणीं पाडलीं गेलीं ? तुम्हांस आठवतें काय की, भाग्योदय आणि पवित्रता, कांचन आणि गंगा, भगवाझेंडा आणि जरीपटका हीं दोन-अडीचशे वर्षांपूर्वी सर्व भरतखंडावर फडफडण्याकरितां ह्या महाराष्ट्रांतून समारंभाने निघालीं ? तुम्हांस आठवतें काय ? हें सारें तुम्हांस आठवतें काय ? तुमची स्मृति इतकी जिवंत राहिली आहे काय ? पण तुम्हांस हें कोठून आठवणार ? शिवाजीची आठवण ठेवण्याइतकी तुम्हांस फुरसद आहे कुठे ?

यंदा बंडूचें लग्न कर्तव्य आहे, त्याच्याकरितां कुलशीलवान् मुलगी पाहिली पाहिजे. लग्न वैशाखांतच होईल तितकें चांगलें. कारण मग साहेबांबरोबर दूरवर जावें लागल्यास लग्न ठरवावयास कोणी नाही. शिवाजीला जन्माला यावयाचें होतें तर तो वैशाखांतच कशाला जन्मला ? लग्नसराईवाचून, मे महिन्याच्या सुट्टीवांचून, इतके महिने पडलेले होते, मग दुष्काळांत तेरावा महिना हा कशाला उत्पन्न झाला ? शिवाजीचें स्मरण आजच करावयाची कांही जरूर नाही. चन्द्री वाढीला लागलेली आहे, ह्या हुंड्याची भरती करतां करतां घरांतील सरी व तोडे गहाण ठेवावे लागतील, त्याकरितां शिवाजीचा तोरणा किल्ला कांही उपयोगी पडावयाचा नाही.

शिवाजीमहाराज, शिवाजीमहाराज करूनच आमचा देश अधःपाताला गेला आहे. सध्या शिवाजीमहाराज आम्हांला तारावयास येणार नाहीत; आमची समाजस्थिति आम्ही सुधारूं, त्याच वेळीं आम्हांला उर्जितदशा येईल आम्हांला त्या जुन्या गोष्टी आणि त्या वेळचें तें ' गो-ब्राह्मण-रक्षण ' आज कशाला ? गाईला ' माता ' म्हटल्यानेच आमचे लोक बैलोबा निघाले. आणि ब्राह्मणांचें प्रस्थ वाढविल्यामुळेच देश ऐदी बनला. आम्हीं ह्या बिघडलेल्या समाजाच्या सुधारणेलाच आतां लागलें पाहिजे. देशांतील सोवळ्या-ओवळ्यांचें बंड मोडून टाकलें पाहिजे, वर्णाश्रमधर्माचें निर्मूलन केलें पाहिजे, विधवांच्या केशवपनावर हत्यार चालविलें पाहिजे, पुनर्विवाहावर भर दिला पाहिजे, मिश्र विवाहावर झोड उडविली पाहिजे, मुलांमुलींची विवाहमर्यादा

वाढविली पाहिजे, स्त्रीशिक्षणाचीं कॉलेजें काढलीं पाहिजेत, खाद्यपेयांचे निर्बंध तोडून टाकले पाहिजेत, सर्वत्र सुधारणा गजवजवून दिली पाहिजे. शिवाजीचें नांव कशाला काढतां ? शिवाजीकरितां रडण्यापेक्षा आमच्यापुढे जास्त महत्त्वाच्या चळवळी आहेत, शिवाजीच्या साम्राज्याची गोष्ट आम्हाला कशाला ? शिवाजी आणि त्याचें साम्राज्य खुशाल समाधिस्थ असो, आमच्यापुढें कार्यांचा डोंगर पडलेला आहे. आम्हांला जागोजागीं गिरण्या काढावयाच्या आहेत. आम्हांला साखरेचे कारखाने उघडावयाचे आहेत. आम्हांला प्रत्येक खेड्यांत शाळा स्थापावयाच्या आहेत वसंत-व्याख्यान-मालेंत माझें भाषण आहे. मला पतपेढ्यांच्या कॉन्फरन्सला जावयाचें आहे. मला पैसाफंडाकरितां जागृति करावयाची आहे. मला जिल्ह्याजिल्ह्यांतून व तालुक्यातालुक्यांतून कार्यकारी संस्था निर्माण करावयाच्या आहेत, कॉंग्रेसच्या नियमावलीवर मला लोकमताचा अंदाज घ्यावयाचा आहे. संयुक्त-कॉंग्रेसकरितां आमचा प्रयत्न आहे, आम्हांला साहित्य-परिषदेस जावयाचें आहे, आम्हांला विवेकानंदांप्रमाणें धर्मावर व्याख्यानें देत फिरावयाचें आहे, आम्हांला मागासलेल्या जातींकरितां फंड गोळा करावयाचा आहे. शिवाजी व त्याचा इतिहास याची 'पीडा' आमच्या मागे कशाला ?

खरेंच, तुम्ही इतक्या विविध उद्योगांत गुंतलेले असतांना, शिवाजीमहाराजांची 'पीडा' तुमच्या पाठीमागे असणें योग्य नाही.

परंतु तुमची चूक होते आहे, ती येथेंच. शिवाजीमहाराजांचें स्मरण सद्य:-स्थितींतील उद्योग टाकून देण्याकरितां नव्हे, ते जास्त चांगले चालावेत म्हणून आहे. शिवाजीमहाराजांचें स्मरण हा प्राकृत व्यवसायांतील अडथळा नव्हे, तर प्राकृत व्यवसायांचें हें उत्तेजन आहे. ज्या शिवाजीमहाराजांनी जन्माला आल्यापासून तों चितेवर शयन करीपर्यंत स्वदेशप्रीतीच्या परि-मलाने हा सर्व महाराष्ट्र देश सुगंधित केला, त्यांच्या त्या सुगंधाच्या परागांनी आपल्याहि व्यवसायांना चारुता यावी ह्याकरितां आपणांस शिवाजी-महाराजांचें स्मरण करावयाचें आहे. शिवाजीमहाराजांचें स्मरण शिवाजी-महाराजांचें अनुकरण करण्याकरितां हल्लीच्या लोकांनी करावयाचें नाही हें आम्हीं मागील एका अंकांत स्पष्टपणें सांगून ठेवलेलें आहे. शिवाजीमहा-राजांची कृति, शिवाजीमहाराजांची परिस्थिति आणि शिवाजीमहाराजांचें

ध्येय ह्यांपैकी एकहि आपल्या कामाला पडावयाचें नाही. शिवाजीमहाराजांचा काळ आणि हल्लीचा काळ ह्यांत जमीन-अस्मानचें अंतर पडलेलें आहे. काळ बदलला म्हणजे नुसतीं माणसें बदलतात. एवढेंच नव्हे, तर काळाबरोबर कृति, परिस्थिति आणि ध्येय ह्या सर्वांत फरक पडत असतो. शिवाजीमहाराजांचें ध्येय साम्राज्य-संपादन करणें हें होतें, आमचें ध्येय वसाहतीचें स्वराज्य (Colonial Self-government) मिळविणें हें आहे. शिवाजीमहाराजांना 'महाराज' म्हणवून घ्यावयाचें होतें, आपणांस 'नामदार' म्हणवून घ्यावयाचें आहे. परकीयांचा द्वेष हें शिवाजीमहाराजांचें धोरण होतें, परकीयांवर प्रेम हें आमचें धोरण आहे. मुसलमानी सत्तेचें उच्चाटन हें शिवाजीमहाराजांना आपलें कर्तव्य वाटत होतें. इंग्रजी सत्तेवर अत्यंत प्रेम हें आपलें कर्तव्य आपण समजत असतों. क्रांति हा शिवाजीमहाराजांचा उद्योग होता, शांति हा आपला उद्योग आहे. शिवाजीमहाराजांना मुसलमानांचा पाडाव करावयाचा होता, आपणांस मुसलमानांशीं सहकार्य करावयाचें आहे. मुसलमान लोक हे शिवाजीमहाराजांचे दुश्मन् होते, मुसलमान लोक हे आपले प्रिय बंधु आहेत. युद्ध हा शिवाजीमहाराजांचा पेशा होता, राजनिष्ठा हा आपला पेशा आहे. शिवाजीमहाराज हे विजिगीषेच्या मार्गानें गेले; आपणांस सनदशीर कार्यकर्तृत्वाच्या मार्गानें जावयाचें आहे. शिवाजीमहाराज व आपण ह्यांच्यांत इतकी तफावत असल्यावर शिवाजीमहाराजांच्या कृतीचें अनुकरण करा असा आपणांस कोण उपदेश करील ?

शिवाजीमहाराजांच्या कृतीचें अनुकरण करा, असा जो कोणी उपदेश करील त्यास शिवाजीमहाराजांच्या कृतींतील मर्मच समजलें नाही असें म्हणावें लागेल. थोर पुरुषांचें अनुकरण त्यांच्या कृतींत करावयाचें नसतें, तर त्यांच्या वृत्तींत (Soul) करावयाचें असतें. रामचंद्राचें अनुकरण करावयाचें म्हणजे धनुर्बाण घेऊन माकडें गोळा करावयास लागावयाचें नाही. कृष्णाचें अनुकरण करावयाचें म्हणजे गावांतल्या गौळणींवर हात टाकावयाचा नाही. परशुरामजयंति करावयाची म्हणजे शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या अंगावर कुऱ्हाड चालवावयाची नाही. मारुती-उत्सव करावयाचे म्हणजे शेपूट विकत आणून चिकटवावयाचें नाही, किंवा भीष्माष्टमी करावयाची म्हणजे म्हाताऱ्या बापाची तलफ भागविण्याकरितां तरुण तरुण मत्स्यगंधा शोधीतहि बसाव-

याचें नाही. त्यांचें अनुकरण करणें म्हणजे त्यांची वृत्ति (Soul) काय होती, ह्याचा शोध करून ती आपल्या अंगांत वाणेल अशा तऱ्हेचा प्रयत्न करणें होय. महाभारतांतील व्यक्ति-चरित्रें वाचून शिवाजी झाला. शिवाजीचें चरित्र वाचून हल्लींच्या काळाला योग्य अशीं माणसें उत्पन्न झालीं पाहिजेत.

थोर माणसें जातात तीं आपली परिस्थिति आपले बरोबर घेऊन जातात पण त्यांचे हेतु त्यांच्या मागे तसेच राहिलेले असतात. त्यांची कुडी मर्त्यलोक सोडून गेल्यास कितीहि वर्षें गेलेलीं असलीं तथापि, त्यांचे हेतु देशांत चिरंजीव होऊन बसलेले असतात व त्या हेतूंचा निवास देशांतून कधीहि उठत नाही. ह्या हेतूंची स्वारी, ह्या हेतूंनी भारून ठेवलेलें वातावरण ह्या हेतूंनीं पवित्र झालेले आकाशरेणु देशांत निरंतर वावरत असल्यामुळें मूर्त अनुकूल व्यक्ति त्यांना सापडल्याबरोबर ते परकायप्रवेश करून स्वरूप धारण करीत असतात. पवित्र हेतूंची जी परंपरा एखाद्या देशांत पिढ्यान् पिढ्या चालू असलेली आपल्या दृष्टीस पडते, त्याचें कारण हेंच होय. शरीर नसतांनाहि थोर पुरुषांचें जें वास्तव्य होत असतें तें ह्याच प्रकाराने होय व ह्याच प्रकाराने थोर पुरुष मृत होऊन कितीहि वर्षें झालेलीं असलीं, तथापि ते हाकेसरशीं अवतीर्ण होत असतात. वास्तविक पाहातां श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण, श्रीबुद्ध, श्रीव्यास, ह्या विभूति स्वेच्छेने अथवा कालेच्छेने अन्तवश होऊन इतका काल लोटलेला आहे की, त्यांची गणती करतांकरतां भांडारकरांचे टाके ढिले झालेले आहेत. इतका काळ लोटून गेल्यामुळे राम अथवा कृष्ण, ह्यांना हाका मारणें, वास्तविक पाहतां योग्य नव्हे; परंतु हे महात्मे जगांतून कितीहि अदृश्य झाले तरी आपल्या पवित्र हेतूंच्या रूपाने त्यांचें ह्या देशांतील अस्तित्व इतके अबाधित झालेलें आहे की आणखी दुप्पट शतके मध्यंतरी गेलीं तरी श्रीरामचंद्राच्या चरणीं विनीत होऊन केव्हाहि श्रीरामप्रभूस आळवाल तर तो भक्तवत्सल देव आपल्या भक्ताच्या संकटीं उडी घातल्यावाचून कधीहि राहाणार नाही.

श्रीशिवाजीमहाराजांचें तसेंच आहे. श्रीशिवाजीमहाराज, त्या वेळचा त्यांचा मुसलमानांविषयीं द्वेष, त्या वेळची त्यांची परिस्थिति हीं सर्व अदृश्य होऊन गेलेलीं आहेत, तथापि ह्या महाराष्ट्रांत त्यांचे हेतु चिरस्थायी होऊन बसलेले आहेत. "आम्हीं स्वर्गवासास जावयास सिद्ध झालों, पण आमचा

उत्कट हेतु होता तो असिद्ध राहिला" असें शिवाजीमहाराजांचे अखेरचे शब्द होते. हा श्रीशिवाजीमहाराजांचाच हेतु असिद्ध राहिलेला आहे असें नसून जे महात्मे देशांत होऊन जातात त्या त्या सर्वांचा हेतु असाच असिद्ध राहून गेलेला असतो. त्रिभुवनांचाहि अतिक्रम करणारे थोर पुरुषांचे हेतु, त्रिभुवनांचीहि अत्योन्नति होऊन गेली तरी असिद्धच राहणार, व हेतु असिद्ध राहतात म्हणूनच ते तेजोरूपाने देशांत वास्तव्य करून पुढील पिढयांना मार्गोपदेशक होत असतात. पुढील पिढयांना सत्त्वोपदेश करण्याकरितां श्रीशिवाजीमहाराजांचे हेतु त्याचप्रमाणे सर्व महाराष्ट्रभर प्रसृत होऊन बसले आहेत. प्रत्येक गडावर आणि प्रत्येक पहाडावर श्रीशिवाजीमहाराजाचे हेतु विराजमान होऊन बसलेले आहेत. प्रत्येक नदीचे काठीं आणि प्रत्येक कार्यवेदीचे प्रत्यंतरभागीं प्रत्येक वृक्षपल्लवावर आणि प्रत्येक पुष्पदलावर, प्रत्येक सूर्यरश्मीवर आणि प्रत्येक वायु निःश्वासावर, प्रत्येक पुष्करणीवर आणि प्रत्येक वीथि-सरणीवर, प्रत्येक काननांत आणि प्रत्येक उपवनांत श्रीशिवाजीमहाराजांचे हेतु विराजमान झालेले आहेत. जिवंत असतां श्रीशिवाजीमहाराजांनी सर्व महाराष्ट्र देश भारून टाकलेला होता. मृत्यूनंतरहि श्रीशिवाजीमहाराजांनीं सर्व महाराष्ट्र देश भारून टाकलेला आहे. श्रीशिवाजीमहाराजांचा हेतु सर्व ठिकाणीं आहे, सर्व स्थळीं आहे, महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत आहे. श्रीशिवाजीमहाराजांच्या पवित्र हेतूंनी अनुग्रहित झालेलें नाही असें महाराष्ट्रांत एकहि वातावरण नाही. श्रीशिवाजीमहाराज म्हणजेच सर्व महाराष्ट्र होय. म्हणून शिवाजीमहाराजांस विसरूं नका. श्रीशिवाजीमहाराजांचें ह्याचकरितां स्मरण ठेवा. श्रीशिवाजीमहाराजांच्या कृति नामशेष होऊन गेलेल्या आहेत. त्या कृतींची आता गरजहि नाही; परंतु श्रीशिवाजीमहाराजांच्या हेतूंचें तसें नाही. ते आपल्या पवित्रपणाने जागरूक आहेत आणि जर तुमचेहि हेतु पवित्र असतील तर त्यांचे तुम्हांस प्रेमपूर्वक आशीर्वाद प्राप्त होतील. प्रत्येक सत्कार्य हें श्रीशिवाजी महाराजांचें कार्य आहे. आणि जर तुम्ही त्यांचें स्मरण ठेवाल तर त्याच्या हेतूंचा जोर त्यांची अप्रतिबंध इच्छाशक्ति तुम्हांस प्राप्त होऊन तुम्हीं आपल्या सत्कार्यांत जास्त लौकर यश पावाल.

● ● ●

२

# हिंदुधर्म म्हणजे स्वातंत्र्य

[ श्री. सखाराम विष्णु घाटे यांच्या 'भस्मासुर' या ग्रंथाला लिहिलेली ही प्रस्तावना आहे. हिंदुधर्म म्हणजें स्वातंत्र्य, सहिष्णुता हें सिद्ध करण्यासाठी त्यांनी अनेक कल्पना लढवून मुख्य मुद्दा वाचकांच्या गळीं उतरविला आहे.]

* * *

आपणा हिंदू लोकांना या जगांत 'प्रमाण' असें कांहीएक नाही! इंग्रजी कायदा कुणाचीहि मुर्वत ठेवीत नाही, Law is no respecter of persons असें म्हणतात! पण हिंदुधर्म इंग्रजी कायद्यापेक्षाहि सडेतोड आहे! "प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु" हें लोकमान्य टिळकांनी हिंदुधर्माचें लक्षण बांधलेलें होतें! पण हें लक्षण कोणासहि प्रमाण वाटणार नाही! तें अप्रमाण म्हणूनच एके बाजूस ठेवावें लागेल. कारण हिन्दुधर्माच्या एकनिष्ठ भक्तांनी व प्रवर्तकांनीहि वेदांचें आत्यंतिक श्रेष्ठत्व उडवून लावलेलें आहे.

"वेद आम्हांसी रूसला
आम्ही धरिलें त्याच्या बाला।"

असे उद्गार काढणारे तुकाराममहाराज हिंदुधर्मांतीलच होते!

"त्रयो वेदस्य कर्तार:।
धूर्तभाण्डनिशाचरा:॥"

असें म्हणणारा बृहस्पति हिंदुधर्मांतीलच होता! आणि

"त्रैगुण्यविषया वेदा:।
निस्त्रैगुण्यो भवार्जुन॥"

असा अर्जुनास उपदेश करणारा श्रीकृष्णहि जेथे वेदांपेक्षा ज्यास्त उंच दृष्टि ठेवण्याचा उपदेश करीत होते तेथे 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' टिकणार कोठून?

एवढेंच नव्हे तर आपल्या पवित्र धर्माच्या ग्रंथांतून असेंहि वर्णन आहे की, ज्या वेळीं भृगु ऋषींचा परमेश्वराशीं प्रसंग आला त्या वेळीं त्याने परमेश्वराच्या छातीवर लाथ मारायलाहि मागेंपुढें पाहिलें नाही! आणि त्याचा परिणाम काय झाला? परमेश्वर भृगूवर रागावला काय? त्याने भृगूला हिंदुधर्मांतून हाकलून दिलें काय? यूरोपमध्यें रोमन कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट ह्या लोकांनी ज्याप्रमाणे एकमेकांना 'पाखंडी' ठरवून जाळलें, त्याप्रमाणे भृगूला जाळण्यांत आलें काय? स्पेनमधील 'इन्क्विझिशन' प्रमाणे भृगूला भिंतींत चिणलें काय? छे: छे:, ह्यांपैकी कांहीएक करण्यांत आलें नाही! धर्मप्रसारासाठी छळणें ही गोष्ट हिंदुधर्माला कधींच माहीत नाही! प्रत्येक व्यक्तीस हिंदुधर्म पूर्ण मतस्वातंत्र्य देत असतो! तुम्ही द्वैत माना किंवा अद्वैत माना; तुम्ही एकच जन्म माना किंवा पुनर्जन्म माना; तुम्ही मूर्तिपूजा माना किंवा अमूर्तिपूजा माना; तुम्ही जातिभेद माना किंवा सवगोलंकार माना; इतकेंच काय, तुम्ही परमेश्वर आहे असें माना किंवा नाही असें माना तरी तुम्ही हिंदु आहांत—पूर्ण हिन्दु आहांत!

तेव्हां हिंदुधर्माची व्याख्या करावयाची म्हणजे 'स्वातंत्र्याचा धर्म' अशी त्याची व्याख्या करतां येईल. सर्व मतांत मतस्वातंत्र्य जर कोठे असेल तर तें हिंदुधर्मांत आहे. Toleration म्हणजे धर्मसहिष्णुता अथवा मतस्वातंत्र्य हें तत्त्व हिंदुस्थानांतच प्रथम अवतीर्ण झालें. त्यास हजारों वर्षें होऊन गेलीं. षड्दर्शनें ही हिंदुधर्मांतील जुनी चीज आहे, आणि ती हिंदुधर्मांतील मतस्वातंत्र्याची पताका आहे. दर्शन म्हणजे दृष्टि! आणि दृष्टि म्हणजे दृष्टिकोण! धर्माकडे पहातांना प्रत्येकास आपला दृष्टिकोण स्वतंत्र ठेवण्याचा पूर्ण अधिकार आहे, हें यावरून स्पष्ट दिसून येतें. सहाच काय, पण साठ किंवा सहाशें दृष्टिकोण झाले तरी हिंदुधर्म त्यांचा तिरस्कार कधीहि करीत नाही! उलट त्यामध्ये विचारांची वृद्धि व तर्क वितर्कांची विशुद्धि आहे असेंच तो मानतो! आणि त्यामुळेच एका कुटुंबांत एक रामोपासक असतो, एक दत्तोपासक असतो व एक गणपतीचा उपासक असून चतुर्थी करतो! अशा प्रकारचें मतस्वातंत्र्य किंवा मतसहिष्णुता सर्व जगांत कोठेहि आढळणार

नाही! हिंदुस्थानांतच त्याचा उगम, प्रसार व विजय आहे! इंग्लंड सर्व सुधारणांचें आगर आहे, असें आपण मानतों; पण रोमन कॅथॉलिक मताच्या माणसांनी लंडन शहराच्या आसपास पांच मैलांच्या आंत येतां कामा नये, असला विचित्र कायदा इंग्लंडमध्ये अगदी थोड्या वर्षांमागे होता! रोमन कॅथॉलिक लोकांना सरकारी नोकरीहि मिळत नसे व त्यांना पार्लमेंटच्या निवडणुकींत मतें देण्याचाहि अधिकार नव्हता! आज अमुक एका मनुष्याचें मत अमुक पंथाचें आहे, म्हणून त्यास लंडन शहराच्या आसपास पांच मैल येण्याचा अधिकार नसावा, असली विचित्र गोष्ट कोणाच्या कानांवर गेली तर त्यास हसूंच येईल! पण थोड्या दिवसांपूर्वी इंग्लंडमध्ये धडधडीत असले कायदे होते! एवढेंच नव्हे तर आयर्लंडची धामधूम जी एकसारखी शंभर वर्षें चालली तिचें कारण जितकें राजकीय होतें तितकेंच तें धार्मिक छळाचेंहि होतें!

असे प्रकार हिंदुस्थानांत कधीहि झाले नाहीत! एखादा मनुष्य गणपतीचा भक्त आहे व चतुर्थीचा उपवास करतो म्हणून त्याला उज्जयनीच्या किंवा काशीच्या पंचक्रोशींत यायला मनाई, असले प्रकार हिंदुस्थानांत घडले नाहीत. तुम्ही सख्खे भाऊ असून व एकाच घरांत राहून खुशाल एकजण विष्णूला भजा, एकजण देवीचे उपासक व्हा, एकजण पार्थिवपूजा करा अथवा एकजण रामाची पूजा केल्याशिवाय तोंडांत पाणीहि घालणार नाही असा निश्चय करा, त्यांत दुसरा कधीहि ढवळाढवळ करणार नाही आणि माझ्याच मताचा स्वीकार करा किंवा माझाच उपासनामार्ग पत्करा, असेंहि त्यास कधी सांगणार नाही! हिंदुस्थानांत धर्माच्या बाबतींत जर कांही तंटे माजले असतील तर ते वैष्णव व शैव यांच्यांत माजले होते! पण त्यांची व्याप्ति यूरोपप्रमाणे एकमेकांना जाळण्यापर्यंत गेली नाही! त्यांची अतिशय मजल म्हणजे वादविवादापर्यंत, आडवें-उभें गंध लावण्यापर्यंत अथवा शिवरात्रीच्या दिवशीं 'चापून जेवण्या' पर्यंतच गेलेली होती! राजकीय बाबीपर्यंत त्यांची ज्वाळा कधीहि भडकली नाही! एकमेकांना जाळण्याची असुरी वृत्ति तर हिंदुस्थानांत कधीच आली नाही! हिंदुस्थान ही धर्मस्वातंत्र्याची भूमि आहे! ही मतस्वातंत्र्याची भूमि आहे!

अनुक्रम 37823 दि:
क्रमांक 9385 नों: दि:

येथे एकच धर्मपुस्तक नाही, एकच धर्मगुरु नाही, एकच धर्मग्रंथ नाही किंवा धर्माचें एकच एक पीनल कोडहि नाही !

पण ह्याच्यावरून अशी मात्र कोणी कल्पना करूं नये की, हिंदुस्थानांत धार्मिक अनवस्था (Chaos) अथवा अराजक स्थिति ( Anarchy ) माजलेली आहे ! अनेक पक्ष असणें म्हणजे अनवस्था मुळीच नव्हे ! इंग्लंडांत राजकीय बाबतींत कांही शतकांपूर्वी एकच पक्ष होता ! पुढे कॉंझर्व्हेटिव्ह (टोरी) व लिबरल ( व्हिग ) असे दोन पक्ष झाले ! व आतां तर कॉंझर्व्हेटिव्ह, लिबरल व लेबर असे तीन पक्ष झालेले आहेत ! पण ह्यावरून राजकीय बाबतींत इंग्लंडची अधोगति होत चाललेली आहे, असें कोणी मानील काय ? नाही. उलट ह्यांत ज्यास्त मतस्वातंत्र्य व राजकीय बोलबाला आहे असेंच सर्व लोक मानतील ! ह्यापुढें इंग्लंडमध्ये आणखीहि नवे राजकीय पक्ष उत्पन्न होण्याचा संभव आहे व कम्युनिस्ट पक्ष तर आजहि पार्लमेंटच्या दरवाजांतून डोकावूं लागला आहे ! पण ही अनवस्था आहे, असें समजून जर उद्या इंग्लंडमध्ये कोणी असा कायदा पास केला की, इंग्लंडमधील सर्व लोकांनी एकाच पक्षाचें असावें, त्यांनीं एकाच राजकीय मार्गानें जावें व सर्वांनी एकच राजकीय पुढारी करावा तर ती गोष्ट स्पृहणीय आहे असें कोणीतरी मानील काय ?

आता जर कोणी असें म्हणेल की, एकच मत सर्वांनी धारण करावें आणि इतर मतें जे धारण करतील त्यांना जिवंत जाळण्यांत यावें तर तें किती अन्यायाचें होईल ! जो गांधी टोपी वापरील तोच खरा, जो महंमदअल्लींना पुढारी मानील तोच खरा, जो सप्रूंचा अनुयायी होईल तोच खरा किंवा जो सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीला गुरु मानून ना. श्रीनिवासशास्त्री ह्यांच्या निशाणाखाली नाचेल तोच खरा—बाकीच्या सर्वांना तोफेच्या तोंडीं द्यायला पाहिजे—असें म्हणणारास लोक वेडयांतच काढणार नाहीत काय ?

मतमतांतरें यांना पूर्ण वाव देणें, एकच पुस्तक प्रमाण न मानणें, एकाच व्यक्तीवर सर्व भर न ठेवणें व एकाच मार्गाला सर्वस्वीं प्राधान्य न देणें ह्यांत अनवस्था ( Chaos ) किंवा अराजकता ( Anarchy ) नसून त्यांतच स्वातंत्र्य साठविलेलें आहे ! ठाकुरद्वारीं यायचें म्हणजे धोबी तलाव-

कडून, गिरगावच्या नाक्याकडून, चर्नीरोडकडून व माधवबागेकडून असे चार मुख्य मार्ग आहेत! उपमार्ग तर अनेक आहेत किंबहुना प्रत्येक इमारती-पासून एक एक उपमार्ग आहे! ह्याशिवाय अमुकच माणसाच्या मोटारी-मधून ठाकुरद्वारला गेलें पाहिजे, जो दुसऱ्याची मोटार करील त्यास शिक्षा केली जाईल, असाहि नियम करतां यायचा नाही! ठाकुरद्वारला नेणारे हुपार मोटारवाले पुष्कळ निघतील! कोणाकोणास दुसऱ्याची मोटार घेण्याची आवश्यकताहि लागायची नाही! ते स्वतःचीच मोटार घेतील व ती स्वतःच हाकतील! त्यांचेवर दुसऱ्याची मोटार घेण्याची सक्ति करणें म्हणजे भयंकर जुलूम करण्यासारखें आणि त्यांचें व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेण्यासारखें आहे!

हिंदुधर्माने हें स्वातंत्र्य कधीहि हिरावून घेतलेलें नाही! आणि ह्यांतच हिंदुधर्माची प्रौढी आहे! इंग्लंडच्या किनाऱ्यावर जरी एखाद्या गुलामाने पाऊल ठेवलें तरी तो स्वतंत्र होतो! कारण इंग्लंडच्या कायद्याने गुलामगिरी बंद केलेली आहे! त्याप्रमाणें हिंदुधर्माच्या बंदरावर पाऊल ठेवलें की, गुलामगिरीचे बंद तावडतोब तुटून जातात. हिंदुधर्माच्या ह्या बंदरावर तुम्ही अमुक पंथ मानला पाहिजे असें नाही, अमुक व्यक्ति मानली पाहिजे असेंहि नाही, हिंदुधर्माच्या ह्या बंदरावर तुम्हांला कोणताहि निर्बंध मानावा लागणार नाही! येथें प्रत्येक व्यक्तीला आपल्या मतांचें, समजुतींचें व विचारांचें पूर्ण स्वातंत्र्य आहे!

म्हणूनच हिंदुधर्माची व्याख्या 'स्वातंत्र्य! अगदीं पूर्ण स्वातंत्र्य!' अशीच केली पाहिजे कारण हिंदुधर्मांत खरोखरच प्रत्येक प्रकारचें पूर्ण स्वातंत्र्य आहे. कोणत्याहि विशिष्ट गोष्टींत हिंदुधर्म कोंडून ठेवलेला नाही. मूर्तिपूजा म्हणजे हिंदुधर्म काय? नाही! हिंदुधर्म म्हणजे स्वातंत्र्य! पुनर्जन्मावर विश्वास ठेवणें म्हणजे हिंदुधर्म काय? नाही! हिंदुधर्म म्हणजे स्वातंत्र्य! श्राद्धें किंवा श्रावण्या म्हणजे हिंदुधर्म काय? नाही! हिंदुधर्म म्हणजे स्वातंत्र्य! गणपतिउत्सव म्हणजे हिंदुधर्म काय? नाही! हिंदुधर्म म्हणजे स्वातंत्र्य! यज्ञोपवीत म्हणजे हिंदूधर्म काय? नाही! हिंदुधर्म म्हणजे स्वातंत्र्य! श्रीरामचंद्र किंवा श्रीकृष्ण म्हणजे हिंदुधर्म काय? नाही! हिंदुधर्म म्हणजे स्वातंत्र्य! भगवद्गीता म्हणजे हिंदुधर्म काय? नाही! हिंदुधर्म म्हणजे

स्वातंत्र्य ! वेद म्हणजे हिंदुधर्म काय ? नाही ! हिंदुधर्म म्हणजे स्वातंत्र्य! परमेश्वराच्या अस्तित्वावर विश्वास म्हणजे तरी हिंदुधर्म काय ? नाही ! हिंदुधर्म म्हणजे स्वातंत्र्य ! परमेश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवा, इतकीहि सक्ति हिंदुधर्मांत नाही. परमेश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवण्याचें तुम्हांला हिंदुधर्मांत जितकें स्वातंत्र्य आहे, तितकेंच परमेश्वर नाही असें म्हणणें, नास्तिक मत स्वीकारणें व सर्व जग सृष्टीच्या किंवा कुद्रतीच्या नियमाप्रमाणें चालतें असें प्रतिपादन करणें–हाहि तुम्हांला पूर्ण अधिकार आहे ! भृगूने परमेश्वराच्या छातीवर लाथ मारली–बृहस्पतीने नास्तिक-दर्शन काढलें, कपिल-महामुनींनी परमेश्वराचें अस्तित्व जवळ-जवळ नाकबूल केलें व कणाद ऋषींनी तर ह्या सर्वांवर ताण केली ! त्यांचें असें मत होतें की, जग परमेश्वराने निर्माण केलेलें नसून निरनिराळ्या कणांच्या संयोगापासून हें सर्व विश्व उत्पन्न होत असतें ! आणि ज्या वेळीं हे कण पुन: एकमेकांपासून वेगळे होतात त्यावेळीं ह्या जगांतील वस्तु नाश पावतात ! जेव्हा मनुष्याच्या शरीरांतील कण वेगवेगळे होतात, त्यावेळीं मनुष्य मरतो ! ज्या वेळीं प्राण्याच्या शरीरांतील कण वेगवेगळे होतात त्यावेळीं प्राणी मरतात ! व ज्या वेळीं डोंगर, वृक्ष, नद्या किंवा मेघ ह्यांच्यांतील कण वेगवेगळे होतात, त्या वेळीं त्यांचा नाश होतो !

ह्या कणांना ते 'पीलु' असें म्हणत असत ! ज्या वेळीं कणाद ऋषींचा अंतकाळ आला त्या वेळीं आपल्या शरिरांत एकत्र असलेले 'पीलु' आता निरनिराळे होऊं लागलेले आहेत अशी त्यांची कल्पना झाली ! इतक्यांत त्यांचे आप्त त्यांच्या शय्येभोवती गोळा झाले व त्यांना म्हणूं लागले, "इतके दिवस आपण नास्तिक मत धारण केलें, हें ठीक झालें ! त्याबद्दल आम्हीं आपणांसारख्या विद्वानास कांही म्हणावें असें नाही ! आपणांस जें योग्य दिसलें तें आपण केलें. पण आता आपला अन्तकाळ आलेला आहे–आता तरी देवाचें नांव घ्या."

"एवढेच ना ? " कणाद मुनींनी विचारलें ! "ज्याने ही सृष्टि निर्माण केली त्याचें नांव मी घ्यावें एवढाच आपला हेतु ना ? ऊंः मग त्यांत काय आहे ? हें घेतलें त्याचें नांव !–ऐका–"

असें म्हणून त्यांनी " पीलवः, पीलवः, पीलवः,"–"पीलु, पीलु, पीलु" असा उच्चार केला !

सारांश, हिंदुधर्मास कशाचें बंधन म्हणून नाही ! हिंदुधर्म चोहो बाजूंने स्वतंत्र आहे. त्यास ग्रंथाचें बंधन नाही, व्यक्तीचें बंधन नाही, कोणत्याहि विशिष्ट मार्गाचें बंधन नाही, अथवा कोणत्याहि विशिष्ट मताचें बंधन नाही !

सर्वदेवनमस्कारः केशवं प्रतिगच्छति ।

ह्याप्रमाणें कोणतेंहि मत असलें तरी त्यास हिंदुधर्मांत स्थान आहे ! हिंदुधर्म हा विविध मतांचा, विविध व्यक्तींचा व विविध ग्रंथांचा सर्वांग-सुंदर बगीचा आहे, ह्यांत निषिद्ध फळ (Forbidden Fruit) कोणतेंहि नाही ! ज्याचा जसा हात पोंचेल त्याप्रमाणें ह्या बगीच्यांतील फळ त्यानें तोडावें व तृप्त व्हावें. तृप्ति हें हिंदुधर्माचें ध्येय आहे. अमुक एका फळाचा पक्षपात हें त्याचें ध्येय नाही !

● ● ●

३

# ॐ भवति भिक्षां देहि

(धर्म आणि राजकारण यांची अपूर्व सांगड घालणाऱ्या महापुरुषाच्या–रामदासांच्या मुत्सद्देगिरीच्या आणि धर्मस्थापनेच्या कार्यांतील एका महत्त्वाच्या वैशिष्टचाचें हें एक मार्मिक विश्लेषण.)

* * *

पर्वा सातारा शहरानजीक सज्जनगड येथे, रामदासनवमीची जी जत्रा भरली, तशी जत्रा कोणत्याहि राष्ट्रांत फार क्वचित् भरत असते. कारण ह्या जत्रेच्या योगाने केवळ राष्ट्राच्या धर्म–स्थापनेकडेच लक्ष जातें असें नव्हे तर राष्ट्राच्या राजकारणाकडेहि लक्ष जातें. धर्म आणि राजकारण ह्यांचें एकीकरण करून धर्मांतून राजकारण व राजकारणांतून धर्म हें अपूर्व तत्त्व शिकविणारा जो महापुरुष रामदास, त्यांच्या स्मरणासाठी ही जत्रा असल्याकारणाने ह्या जत्रेस एक असाधारण महत्त्व आलेलें आहे. ह्या जत्रेचें मूळ, त्याचा हेतु, त्याचा उपयोग, त्यांतील ध्येय ह्यांपैकी प्रत्येक गोष्ट, जत्रेंतील प्रत्येक मनुष्याच्या आता लक्षांत आहे असें मात्र नाही, इतर जत्रा आणि ही जत्रा आता सारखीच झालेली आहे. खावें, प्यावें, हिंडावें, रमावें आणि शून्य स्मृतीने रामदासाच्या नांवाचा गजर करून ऊरमोडी नदींतून परत यावें एवढेंच आता ह्या जत्रेंत उरलेलें आहे. परंतु लोक जरी रामदासांना विसरले तरी आपणांस विसरतां येत नाही. आपणांस त्यांचें स्मरण केलेंच पाहिजे आणि रामदासांचें विशिष्ट कार्य आपल्या हृदयावर बिंबवलें पाहिजे.

रामदासांचें कार्य अनेकविध होतें. त्या समग्र कार्यांत आज आपणांस शिरायचें नाहीं. आज आपणांस त्यांच्या कार्यांपैकी एका विशिष्ट भागाकडे बघावयाचें आहे, आणि तो भाग म्हणजे त्यांची भिक्षा हा होय.

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागीतली पाहिजे भिक्षा ॥
ॐभवति ह्या पक्षा । रक्षिलें पाहिजे ॥

ह्याप्रमाणे भिक्षेची तरफदारी करून श्री रामदासांनी जगापुढे एक कोडें ठेवून दिलेलें आहे. आता ह्या कोडयाचा उलगडा करणें फार कठीण आहे, कारण भिक्षावृत्ति ही फार नीच वृत्ति मानण्यांत आलेली आहे. आणि

भिक्षापात्र अवलंबणें, जळो जिणें लाजिरवाणें ॥

ह्या शब्दांत श्री तुकाराम महाराजांसारख्यांनी सुद्धा भिक्षेचा निषेध केलेला आहे. तेव्हा अशा निषिद्ध वृतीचा रामदासांनी गौरव करावा, हें फार विचित्र होय. आणि ह्याकरितांच ह्या प्रश्नाचा अतिशय खोल दृष्टीने विचार केला पाहिजे.

अशा रीतीने विचार करीत असतां आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे की, रामदासांनी एक अत्यंत अवघड कार्य आपल्या शिरावर घेतलेलें होतें, आणि तें कार्य म्हणजे श्रीशिवाजी महाराजांच्या राजकारणाचा प्रसार हें होय. श्रीरामदास आणि श्रीशिवाजी महाराज ह्याची भेट कधी झाली हा वादग्रस्त प्रश्न एके बाजूला ठेवला, तरी त्यांची भेट होण्यापूर्वीच श्रीशिवाजी महाराजांचे ध्येय त्यांनी ओळखलेलें होतें, हें निर्विवाद आहे; व त्या ध्येयास मदत करण्याचें त्यांनी ठरविलेलें होतें, ह्यांतहि संशय नाही. 'तुमचे देशीं वास्तव्य केलें' ' वगैरे वाक्यांवरून रामदास आणि शिवाजीमहाराज ह्यांची भेट होण्याचे अगोदरच श्रीशिवाजी महाराजांचें कार्य त्यांना पटलें होतें हें स्पष्टपणे सिद्ध होतें. पण तें कार्य पटून उपयोग काय? तें कार्य त्यांना जितकें आवडलें होतें तितकेंच तें कठिण होतें. कारण श्रीशिवाजीमहाराज हे क्रान्तिकारक होते, बंडखोर होते, 'राजद्रोही' होते—श्रीशिवाजीमहाराज हे शस्त्रास्त्रें घेऊन राष्ट्राचें स्वातंत्र्य संपादन करण्याकरितां सिद्ध झालेले होते.

अशा स्थितींत प्रत्येक ठिकाणीं शिवाजीमहाराज व त्यांचे लोक ह्यांना मज्जाव असावा हें उघड आहे. ते शहरांत आले तर त्यांना पकडायला बादशहाचे लोक बसलेले होते. त्यांच्या पाळतीवर डिटेक्टिव्ह लोक फिरत होते. त्यांचा सुगावा लावण्याकरिता चहाडखोर लोक संधि बघत होते.

स्वयंस्फूर्तीचे "राजनिष्ठ" लोक ते केव्हा हातीं लागतात ह्याची वाट पहात होते. अशा स्थितींत श्रीशिवाजीमहाराजांचें कार्य लोकांना समजायचें कसें? लोकांचा आदर त्यांच्याविषयीं कसा वाढवयाचा? शिवाजी हा लुटारू नाही, हा राष्ट्रोद्धारक आहे--ही त्यांची समजूत कशी पटायची?

कारण त्या वेळीं वर्तमानपत्रें नव्हती, त्या वेळीं लेक्चरें देण्याची पद्धति नव्हती, त्या वेळीं दाणाबंदरावर सभा भरत नव्हत्या, त्या वेळीं असोसिएटेड प्रेसच्या तारा नव्हत्या, त्या वेळीं मुद्रणकला नव्हती--विचारविनिमयाचें एकहि साधन त्या वेळीं नव्हतें. श्रीशिवाजीमहाराज ह्यांना तर किल्ले, डोंगर, रानेंवनें ह्यांच्याशिवाय कुठें वस्तीच करतां येत नव्हती. अशा वेळीं जनतेची आणि त्यांची गाठ कशी पडायची? त्यांचा स्वातंत्र्याचा संदेश जनतेला कसा पोंचायचा?

पण हें काम रामदासांना साध्य होतें. शिवाजीमहाराजांच्या शिपायांना प्रत्येक ठिकाणीं मज्जाव होता, पण ह्या फकीराला कोण मज्जाव करणार? विरक्त वृत्ति, संचय काडीचा नाही, मुखांत रामनाम, पवित्र आचरण-- अशा पुरुषाला शहरांत येऊं नको असें कोण म्हणणार? मुसलमान शिपाई, मुसलमान अधिकारी, "राजनिष्ठ" लोक, डिटेक्टिव्ह व चहाडखोर ह्यांपैकी ह्या फकीराला नको म्हणायला कोण तयार होणार? त्यांतहि रामदासांची राहणी फार तुटक! कुणाशीं संबंध यायचा नाही- कुणाशीं लफडीं उत्पन्न व्हायचीं नाहीत. रामदास म्हणजे गांजेकस साधु नव्हते, की त्यांच्या धुमीपाशीं व्यसनी लोकांचा तांडा जमेल! त्यांचें पावित्र्य हें त्यांचें कवच होतें. त्यांना मज्जाव करण्याची बुद्धि कुणाला होणार?

अशा वेळीं श्रीरामदासांनी भिक्षेची तोड काढली. त्यांचें वैराग्य हें त्यांचें कवच होतें. हें कवच अंगावर घालून श्रीशिवाजी महाराजांच्या पवित्र हेतूंची जनतेला ओळख करून देण्याचें त्यांनी ठरविलें. त्यांनी शिष्य-समुदाय गोळा केला. त्यांना आपल्या पवित्र आचरणाचा निर्बंध घातला. एकान्तवासाचें महत्त्व त्यांचे चित्तावर त्यांनी बिंबविलें. रघुपतीची भक्ति त्यांचे मनावर त्यांनीं ठसविली, आणि त्यांना गावोगावीं आणि प्रांतोप्रांतीं स्वातंत्र्याचा संदेश फैलावण्याकरितां पाठवून दिलें.

हा स्वातंत्र्याचा संदेश ज्या भिक्षेच्या मिषानें त्यांना फैलावावयाचा होता, ती माधुकरीची भिक्षा होती. ज्या भिक्षेंत पवित्रपणा आहे, ज्या भिक्षेंत संग्रह नाही, ज्या भिक्षेंत कडकडीत वैराग्य आहे, ज्या भिक्षेंत ईश्वरसेवा आहे, ती भिक्षा रामदासांनी आपल्या शिष्यांना सांगितली. ह्या भिक्षेचा हेतु भिक्षा मागणें हा नव्हता, स्वातंत्र्याचा संदेश पोचविणें हा त्या भिक्षेचा हेतु होता. ह्या भिक्षेचा हेतु अन्नसंग्रह नव्हता; लोकसंग्रह हा ह्या भिक्षेचा हेतु होता. ही भिक्षा हें त्या वेळचें "क्रॉनिकल" होतें, त्या त्यावेळच्या "असोसिएटेड प्रेस"च्या तारा होत्या, ही त्यावेळचीं लेक्चरें होतीं, ह्या त्यावेळच्या रे मार्केटवरील सभा होत्या.

आणि ह्यांना कोणत्याहि गोष्टीची बाधा नव्हती. ह्या क्रॉनिकलचे हॉर्निमन "रिपोर्ट" होण्याची भीति नव्हती–त्या लेक्चरांचा "रिपोर्ट" येणें शक्य नव्हतें. ह्या सभाबंदीच्या कायद्याखाली उधळून लावण्याची काळजी नव्हती. ह्या असोसिएटेडच्या तारा प्रतिपक्षाच्या तावडींत सापडण्याची भीति नव्हती. कारण रामदासांचा हा स्वातंत्र्याचा संदेश, थेट स्वयंपाकघरापर्यंत धडाक्यानें जात होता. घरांतील गृहिणी, घरांतील स्वामिनी, घरांतील कुटुंबिनी–ह्यांच्यापर्यंत थेट हा स्वातंत्र्य-संदेश पोचत होता. रामदासांचे शिष्य घरांत जे जात ते थेट घरमालकिणीजवळ जाऊन 'ॐ भवति ' करीत. राजांचे शिपाई झाले तरी बाहेर, चहाड-खोर झाले तरी बाहेर, डिटेक्टिव्ह झाले तरी बाहेर–पण इथे हे रामाचे दास, थेट स्वयंपाकघरांत जाऊन उभे रहात. अशा स्थितींत त्यांचा संदेश जनांचे अंतरंगापर्यंत जाऊन पोचल्याशिवाय कसा राहील?

रामदासांचें कार्य जें यशस्वी झालें, श्रीशिवाजी महाराजांचें ध्येय जें लोकप्रिय झालें स्वातंत्र्याचा संदेश जो जनतेच्या अंत:करणांत फोफावला त्याचें कारण हें होय. ही रामदासांची भिक्षा ही पोटभरू वृत्ति नव्हती. ही राष्ट्राची उन्नति होती. ही गुलामगिरीवरची कुऱ्हाड होती आणि श्रीसमर्थ रामदास अभिमानानें सांगत की–

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा। मागीतली पाहिजे भिक्षा।
ॐ भवति ह्या पक्षा। रक्षिलें पाहिजे ॥

● ● ●

# ४

# मराठी काव्याची प्रभात

[ मराठी टीकावाङ्मयांतील हा एक अतिशय महत्त्वाचा लेख. संत-पंत वाङ्मय, लावणी वाङ्मय आणि त्यानंतर अर्वाचीनत्वाचा दिमाख मिरविणारें तमोयुगांतील निपट, कळकट काव्य यांचें यथायोग्य मूल्यमापन करून अच्युतरावांनी आपल्या चौफेर, रसिक वाङ्मयीन दृष्टिकोनाची आल्हादकारक ग्वाही दिली आहे. ह्या लेखाने सोज्वळ मराठी मनाला लावणी वाङ्मयाकडे पहाण्याची डोळस दृष्टि दिली. लावणी वाङ्मयांतल्या उच्च कवित्वाचा निर्देश करतांना संतांच्या कार्याकडे कुत्सायुक्त अनादर दृष्टीने पाहिलें नाही, हा त्याचा दुसरा मोठा विशेष.]

* * *

" घनश्याम सुंदरा, श्रीधरा । अरुणोदय झाला ।
उठि लवकर वनमाळी । उदयाचळीं मित्र आला " ।।

मराठी कवितेसंबंधाने अलीकडे जे तंटे उपस्थित झालेले आहेत ते पाहून कोणालाहि दुःख वाटल्यावाचून रहाणार नाही. महाराष्ट्रांतील लोकांचा मुख्य दोष कलह-प्रियता हा आहे असें कित्येक वेळां दृष्टोत्पत्तीस आलें आहे आणि मराठी कवितेसंबंधाने जेव्हा वाद उत्पन्न झालेला आपण पाहतों त्यावेळीं ह्या कलहप्रियतेचीच आणखी एकदा ओळख पटते. वास्तविक पहातां "मवाळ" आणि "जहाल" असल्या पक्षांचा मराठी कवितेच्या सदनांत उच्चारसुद्धा होतां उपयोगी नाही. परंतु अलीकडील अनुभव अगदी निराळा येत असून एकमेकांचा पाडाव करण्याची भावना मराठी काव्य-सदनांतहि इतकी प्रबल दिसते की महाराष्ट्राच्या कलहप्रियतेची पाठच थोपटावी लागते. मराठी कवितेसंबंधाने जो वाद माजत चाललेला आहे, तो प्राचीन कवि चांगले की, अर्वाचीन कवि चांगले अशाबद्दल होय. वस्तुतः पहातां, प्राचीन आणि अर्वाचीन कवि हा वाद इतका क्षुल्लक आहे की, महाराष्ट्राशिवाय

इतर ठिकाणीं तो कधीहि चिरडीवर जाणार नाही. परंतु महाराष्ट्राचें भागधेयच असें आहे की, क्षुल्लक प्रश्न असला तरीहि त्यावर रणें माजून परस्परांत वितुष्ट उत्पन्न व्हावें. या वितुष्टाचें पर्यवसान एक तर सरसकट सर्व जुन्या कवींना शिव्या देण्यामध्ये होतें अथवा उलट पक्षीं सर्व स्तुतीचा भर आधुनिक कवितेवर आदळून अलीकडील कवींसारखे कवि मागे झाले नाहीत आणि पुढे होणार नाहीत इतक्या अप्रयोजक कोटीपर्यंत जातें. वास्तविक पहातां प्राचीन व अर्वाचीन कवि हा भेदच अगोदर असमंजसपणाचा आहे. जो आजचा अर्वाचीन तोच उद्याचा प्राचीन असें जर ढळढळीत आपल्या डोळ्यांपुढे दिसत आहे तर कालाचा काल्पनिक पडदा उभा करून कविवर्गांत दोन तट उपस्थित करणें अत्यंत असमंजसपणाचे आहे. प्राचीन कवि व अर्वाचीन कवि असे भेद जर कोणत्याहि एखाद्या विशिष्ट काव्यगुणामुळे करावयाचे असतील तर तेंहि अनवश्यक आहे. कारण त्यामुळे कित्येक अर्वाचीन कवींना प्राचीन म्हणावें लागेल, आणि प्राचीन कवींस अर्वाचीन ही पदवी लावावी लागेल इतका हा भेद अनवश्यक व चमत्कारिक आहे आणि या भेदांत मराठी काव्याच्या खऱ्या हितचिंतकानें शिरूंच नये हें चांगलें.

कवितेचें खरें लक्षण म्हटलें म्हणजे हृदयांतील तरंगाचें रूप व्यक्त करून दाखविणें होय. कवितेस ह्याशिवाय दुसरें कांहीएक लागत नाही. कवितेस काल लागत नाही, चाल लागत नाही अथवा अलंकारांची शालहि लागत नाही. "वाटुली पाहतां शीणले डोळुले" ही शब्दरचना किती साधी आहे, परंतु ह्या साध्या शब्दप्रयोगांत जितकें काव्य भरलेलें आहे, तितकें काव्य सामावण्यास कैसर बादशहाचें सर्व कल्पना-साम्राज्यहि पुरणार नाही. मानवी अन्तःकरणाच्या किनखापी पिशव्या रसिक-समाजापुढे भरभरून ओतून दाखविणें म्हणजेच काव्य, मग तें अर्वाचीनांनी केलेलें असो अथवा प्राचीनांनी केलेलें असो. कविता करण्याचा अधिकार प्राचीनांना होता व अर्वाचीनांनाहि तो आहे. प्राचीनांनी तो गाजविला आणि अर्वाचीन तो गाजवीत आहेत, ह्यांत कोणी कोणास हसावयाचें अथवा कोणी कोणाची चेष्टा करावयाचें कांहीच कारण नाही. अर्वाचीन झाले तरी ते प्राचीनांचींच मुलें-लेंकरें आहेत व प्राचीन झाले तरी ते अर्वाचीनांचेच वडील आहेत. मग अमुक प्राचीन म्हणून त्यांचीच एकसारखी नांवाजणी अथवा आम्ही अर्वाचीन म्हणून आप-

लीच एकसारखी प्रशंसा करण्यांत काय अर्थ आहे? बापाला महामूर्ख म्हटल्याने कोणताहि लेक शहाणा ठरत नाही. अथवा हल्लीच्या पिढीला कमी लेखल्याने प्राचीन पिढीच्या नांवलौकिकांत भर पडते अशांतलाहि भाग नाही. आम्हांला एवढेच वाटतें की, प्राचीन-अर्वाचीन, गद्य-पद्य, अथवा सयमक-निर्यमक असले वाद उकरून काढणें म्हणजे केवळ वाऱ्याशीं भाण्डत बसणें होय. कलहाग्नीने चेवलेल्या ह्या महाराष्ट्ररूपी होमकुण्डांत कवितादेवीच्या नेत्रज्वालांची भर पडण्याचें कांहीच कारण नाही. कवितादेवी म्हणजे कल्पना-कल्पवनांतील सुंदर गुलाबाचें फूल आहे. तिला तिच्या दासांनी रणकल्लोळापासून दूर ठेवावयास नको काय?

अर्वाचीन कवींचा प्राचीन कवींवर असा एक मोठा आक्षेप आहे की त्यांनी अध्यात्मविचाराचाच चुना घेऊन तो एकसारखा कुटला आहे. मुकुन्दराज घ्या, दासोपंत घ्या, अवचितसुत काशी घ्या अथवा मुक्तेश्वर घ्या, अध्यात्मविचार हा त्यांचा खरा विषय आणि ह्या विषयाच्या अनुषंगाने त्यांना जेवढी सुचेल तेवढी कविता! अध्यात्मविचारांच्या शृंखलांनी जखडलेलें असतां स्वतंत्र कल्पना सुचणें दुरापास्तच, तथापि त्यांतल्या त्यांत स्वतंत्र मनोभावनेची एखादी झुळूक लागली तर तेवढ्यापुरतेच प्राचीन वृत्त-जनिते (versifiers) हे कवि! नाहीतर खऱ्या कवितेच्या नांवाने त्यांचेजवळ आवळ्याएवढे पूज्यच! ही विचारसरणी उत्पन्न होण्यास खरोखर पुष्कळच कारणें घडलेलीं आहेत, आणि त्या सर्वांत मुख्य कारण हें की रम्यरमणीवर्णनाला ज्यांत स्थान नाही ती कधींच 'कविता'च च होऊं शकणार नाही ही कल्पना होय. रमणीवर्णनाची इतकी अनिवार तृष्णा अलीकडे कां उद्भवली असावी ह्यांचें कारण ठरवीत बसण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु अध्यात्मविचारांत कविता उत्पन्न होणार नाही असें कधीहि म्हणतां यावयाचें नाही. अन्तःकरणाची प्रत्येक स्फूर्ति ही कवितेस सर्वथैव लागू आहे आणि भगवत्सेवेचा उगम जर खरोखर अन्तःकरणांतून होत असला तर अध्यात्मविचार करणारे कवि हे कवि नव्हेत असें म्हणणें कोणाहि 'कविपुंगवा'स अशक्यच होईल.

प्राचीन कविसंबंधाने एक मुख्य जी अडचण असते ती ही की, त्यांतील बहुतेक कवि संस्कृत संस्कृतीच्या कडेवर बसलेलीं लेकरें आहेत. संस्कृत

संस्कृति ज्या कल्पना देईल त्या बोलावयाच्या, ती ज्या उपमा सुचवील त्या घ्यावयाच्या, ती जी तत्त्वविद्या शिकवील ती शिकावयाची आणि तिने ज्या कथा संग्रहीत केलेल्या असतील त्यांचेवर कवनें रचावयाचीं, अशी बहुतेक प्राचीन कवींची रीति असल्यामुळे प्राचीन मराठी कवि हे संस्कृत कवि अथवा संस्कृत तत्त्वज्ञ ह्यांचेपासून वेगळे आहेत असें भासतच नाहीत. ज्याप्रमाणे एखाद्या स्त्रीस भेटावयास बोलावलें म्हणजे तिच्या बालकाला निराळें आमंत्रण द्यावें लागत नाही, त्याचप्रमाणे संस्कृत विद्या व ग्रंथभाण्डार ह्यांचा परिचय करून घेतला म्हणजे त्यांत नावीन्य वाटेनासें होतें. ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, तुकाराम, वामन, मोरोपंत वगैरे महाकवींच्या काव्यांत शेकडो नवीन दृष्टान्त, शेकडो नवीन दाखले, शेकडो नवीन रूपकें नाहीत असें नाही, परंतु ज्याप्रमाणें नेकटायबूट कितीहि चढविला पण डोक्यास मात्र माभळभटी पागोटें घातलें तर मनुष्य जसा जुन्या राहणीचाच ठरेल त्याप्रमाणें मराठी महाकवींनी संस्कृत वाङमयाच्या साखरभातांत नवीन कल्पनांचे बदाम घातले तथापि त्याचे संस्कृताश्रि-तत्व नाहीसें होत नाही. तुकारामाच्या कल्पना व उपमा वाचीत असतां आपण अगदी भक्तिरसाच्या रंगात यावें आणि तितक्यांत तीच उपमा व तोच दृष्टांत नामदेवाच्या काव्यांत आहे असें आढळल्याबरोबर ज्याप्रमाणे आपला पहिला आनंद नाहीसा होतो त्याचप्रमाणे प्राचीन मराठी काव्यांवर आपण कितीहि डोलूं लागलों तथापि त्यांत संस्कृत कल्पनांचा सर्वव्यापी परिमल अनुभवास येऊं लागल्याबरोबर आपलें लक्ष मराठीवरून संस्कृत संस्कृतीकडे उडून जातें. शिवाय संस्कृत संस्कृतीचीहि गोष्ट घेतली तथापि त्यांत 'कविता' म्हणून एक औरच प्रकार आहे. ह्या प्रकाराचें जरी मराठी कवींनी अनुकरण केलें असतें तरी आधुनिक कवींचें त्यांच्या कवित्वाबद्दल समाधान झालें असतें. परंतु तसें कांहीएक न होतां ज्या अर्थी "मना सज्जना भक्तिपंथेचि जावें," अथवा 'नतावनधृतव्रतज्वलन तूंचि बाधावनीं" असल्या प्रकारचें आधुनिक कल्पनांप्रमाणें रुक्ष कवित्व मराठी कवि करूं लागले तेव्हा आधुनिक कवींचा त्यांच्याविषयींचा आदर सर्वतोपरी ढासळून "हे हो कवि कसले ?" असा त्यांचेकडून प्रश्न होऊं लागला हें साहजिकच आहे.

संस्कृतांत वेदान्त अथवा 'घटपट' जरी हवें तितकें असलें तथापि काव्याचाहि भरपूर पुरवठा आहे. संस्कृतांतील काव्याइतकें विपुल आणि विविध काव्य दुसऱ्या फारच थोडया भाषांत असेल. संस्कृत काव्यांत कांही नाही असें नाहीच. संस्कृत काव्यांतील सुभाषितांचा भरणा पाहूनच एखाद्याला संस्कृत भाषेविषयीं अत्यंत आदर वाटावयास लागेल. संस्कृत काव्यांत नाटकें आहेत, भाण आहेत, चम्पू आहेत, छेकापन्हुति आहेत, अन्तर्लापिका आहेत, बहिर्लापिका आहेत, भ्रमर आहेत, सखीजन आहेत, पान्थ आहे, वसन्त आहे, व स्त्रीलावण्याचीं तर इतकीं तऱ्हेतऱ्हेचीं वर्णनें आहेत कीं तीं ऐकून खरोखर लोहपिष्ट भक्षण करणाऱ्या तापसाचेंहि चित्त चलित होऊन जाईल. संस्कृतांत इतिहासपुराणें व गोष्टी तर अनंतच आहेत. ह्याखेरीज नुसतीं अध्यात्मपर जरी काव्यें हवीं असलीं तथापि तीं संस्कृतांत मुळींच उणीं नाहीत. "प्राप्ते संनिहिते मरणे" असल्यासारख्या खडचा तात्त्विक बोलांपुढें कबीर तरी काय करील अथवा तुकाराम तरी काय बोलेल?

असलें विशाल संस्कृत वाङमय पाहिलें आणि त्याचेपुढे प्राचीन मराठी वाङमय तुलनेकरितां ठेवलें म्हणजे मराठी गिरा ही अजून कोमल कन्यका आहे व ती संस्कृत जननीच्या स्तनांतील दुग्धपान करीत आहे ह्याविषयीं आधुनिक कवींस तिळमात्र संशय वाटत नाही. प्राचीन मराठी कवि हे मुळीं कवीच नव्हेत, संस्कृत काव्यसरोवरांतील जलांशाचे फवारे आपल्या मुखांतून सर्व महाराष्ट्रभर उडविणारे हे जलयंत्रोद्‍गार आहेत असें जें आधुनिक कवींना वाटतें तें ह्यामुळेच होय. प्राचीन मराठी कवींनी काय केलें? तर जग हें नश्वर आहे की चिरस्थायी आहे ह्या सिद्धांताचा शोध लावला. परंतु अर्वाचीन कवि असें म्हणतात की संस्कृत कालीं विद्वान् लोकांच्या घरच्या साळुंक्यामैनासुद्धां जर जग हें ध्रुव आहे कीं अध्रुव आहे असा पक्ष–प्रतिपक्ष करीत असत तर ह्यांत ज्ञानेश्वर–एकनाथांनी असा कोणता पुरुषार्थ केला? रामदासांनी मोठ्या आवेशानें रामायणीय युद्धाचें वर्णन केलें असेल, परंतु संस्कृत काव्योदधींत जर अस्सल वाल्मिकि–रामायणचाच समावेश आहे तर त्यापुढे रामदासांच्या काव्याचा अट्टाहास कोण वाचील? आधुनिक कवींचा प्राचीन मराठी कवींवर जो मुख्य आक्षेप आहे तो हाच

की, मराठी कवि साधारणत: नीरस विषय काव्याकरितां निवडतात आणि ह्या विषयांतहि ते आपली स्वत:ची बुद्धि कांहीच चालवीत नसून संस्कृत वाङ्मयाच्या अवाढव्य छत्राखाली ते कोणत्या कोपऱ्यांत लपून बसलेले असतात तें दिसतहि नाही !

जे विषय आधुनिक कवींच्या काव्यांत येतात ते विषय प्राचीन मराठी कवींच्या काव्यांत येत नव्हतें हें प्रांजलपणे कबूल केलेंच पाहिजे. "आतां कोण्या वसंताचें ?" "कुणास्तव कुणीतरी," "गुलाब," "मधमाशीला,"—"माझें झाड," "कन्यादान" असले विषय प्राचीन मराठी कवींत सांपडणें प्राय: अशक्य आहे. त्यांचे विषय म्हणजे ॐकारवर्णन, अनुभवामृत, अहिल्यास्तवन, उमारमासंवाद, मनोबोध, मार्कण्डेयाख्यान, रुक्मिणीपत्रिका, आणि, शृंगाराचा अतिरेकच झाल्यास रासक्रीडा, चन्द्रावळी इत्यादि होत. ह्यांपैकी एकहि विषय असा नाही की जो आधुनिक कवि हौसेने घेतील. आधुनिक कवींचेहि विषय असे नाहीत की जे प्राचीन कवींनी हौसेने घेतले असते. 'छत्री' ला पाहून कोणाहि प्राचीन मराठी कवीची प्रतिभा उद्दीपित झालीच नसती. 'वीण्याची तुटलेली तार' पाहून कोणाहि प्राचीन मराठी कवीला आपल्या प्रतिभेची तार तोडण्याची बुद्धि झाली नसती. प्राचीन मराठी कवि आज हयात नाहीत म्हणूनच अर्वाचीन मराठी कवींस त्यांना अप्रतिबंधपणे शिव्या द्यावयास सापडत आहे. परंतु ते जर आज हयात असते तर त्यांनीहि अर्वाचीन मराठी कवींची भयंकर निर्भर्त्सना केली असती. तुकाराम तर असेंच म्हणाला असता की "सुपा टोपलीचे कवि। आम्ही सुधा हे काकवी."

असला हा भयंकर विषयभेद व स्वभाव-परिच्छेद पाहून साधारण वाचकाचें मन खरोखरच भांबावून जातें आणि तो प्राचीन कवींचा तरी भाट अथवा अर्वाचीन कवींचा तरी अभिमानी बनतो. आपल्या महाराष्ट्र-वाङ्मयांत जे विनाकारण तट पडत चाललेले आहेत व ज्यांचे पर्यवसान नि:पक्षपातित्वाच्या वादविवादांत न होतां महाराष्ट्राच्या नेहमीच्या सवयी प्रमाणे द्वेष, मत्सर, विडंबना, आणि विपदिग्ध भाषा ह्यांत होऊं लागलेलें आहे, त्यांच्या मुळाशी प्राचीन कवि चांगले की अर्वाचीन कवि चांगले हें ठरविण्यांत झालेला मनाचा गोंधळ हेंच आहे. परंतु प्राचीन मराठी कवींचें

विशिष्ट लक्षण पाहतांना ज्याप्रमाणें आपण संस्कृत संस्कृतीचा बळकट आश्रय हें त्यांचें मुख्य स्वरूप निवडून काढलें, त्याचप्रमाणे अर्वाचीन मराठी कवींचेंहि विशिष्ट लक्षण काय आहे हें पाहून त्यांचेंहि खरें स्वरूप निवडून काढलें पाहिजे. त्या लक्षणाचा शोध करतांना आपल्या लक्षांत जी गोष्ट एकदम येते, ती ही की, ज्याप्रमाणें प्राचीन मराठी कवि हे संस्कृत संस्कृतीच्या कडेवरचीं अर्भकें होते त्याप्रमाणे अर्वाचीन मराठी कवि हे आंग्लसंस्कृतीच्या कडेवरील अर्भकें आहेत. दोन्ही मुलेंच, दोन्हीहि दुग्धपान करणारीच, दोन्हीहि मातृभुजाश्रितच, दोन्हीहि स्वतंत्रपणें चालण्यास असमर्थच परंतु ह्या दोहोंत एक मात्र ढळढळीत फरक असा आहे की, प्राचीन कवि हे आपल्या स्वतःच्या आईचे अंगावर पीत असलेले असल्यामुळे बाळसेदार, तजेलदार, हूड, हसरे असे होते. उलटपक्षीं अर्वाचीन मराठी कवींना खऱ्या आईचें दूध कधींच न मिळाल्यामुळे त्यांच्यांत नैसर्गिक जोरदारपणा फारसा आढळून आला नाही. अर्वाचीन मराठी कवींची कविता त्रोटक असते व प्राचीन मराठी कवींची कविता दीर्घप्रवासी असते असें कित्येक मार्मिक निरीक्षक विधान करीत असतात. हें विधान जितकें खुबीचें तितकेंच मनास पटणारेंहि आहे; तथापि त्यांतील तत्त्व वर जें सांगितलें तेंच आहे. हल्लीचे मराठी कवि जी क्षुल्लक कविता रचीत असतात त्याचें कारण त्यांचा विनय नव्हे, तर त्यांच्या अंगांत प्राचीन मराठी कवींच्या इतकी रग नाही हेंच आहे. मोरोपंताने एकशे आठ रामायणें रचलीं; ह्याबद्दल मोरोपतांचीं वाटेल तितकी टवाळी करा. तथापि प्रचंड रामकथेंत निरनिराळे व्यूह रचून त्या व्यूहांतून एकशें आठ वेळां वाट काढण्याची हिंमत त्याचे अंगीं होती ही गोष्ट अगदी निर्विवाद आहे. एकपत्नीव्रताची प्रौढी वाळगावी हें खरें आहे, पण ती कोणी? तर कृष्णाप्रमाणें सोळा सहस्र अंगना करण्याची पात्रता असूनहि सीता नाहीशी झाल्याबरोबर ज्यांनी "हा सीते हा सीते" अशा एकनिष्ठतेच्या विलापांनी दंडकारण्य दणदणून सोडलें त्या रघुकुळ-टिळकांनी. क्षयाचा विकार झालेला आहे, दूध पचत नाही, डॉ. रावकडे सारखे खेटे चाललेले आहेत, (Bed-Diet) शय्यापथ्यावर सर्व जीविताची मदार आलेली आहे, अशा शेंदाड शिपायांनी एकपत्नीव्रताच्या लांबलांब गप्पा मारल्या म्हणून त्यांत फायदा कोणता?

अलीकडील कवींची स्थिति बरेच वेळा काडीपैलवानांसारखी असते. ज्याप्रमाणे असले एखादे हाडूकबहाद्दर बाहेर ऐटीने यावयास निघाले म्हणजे आपल्या शरीरांतील मांसलपणाची उणीव शिंप्याने शिवलेल्या पोषाखाच्या फुग्यानेच भागवून नेतात, त्याप्रमाणे अलीकडील कवीहि आपल्या कवनांचा क्षुद्रपणा निर्णयसागर छापखान्याच्या फाउंडरींतील बॉर्डरींनी व डॅशेसनीच पुष्कळ वेळां दडपून नेतात. एक पाव शेट तीन पाव दाढी ही म्हण त्यावेळीं अगदी सार्थ होते. अलीकडील अलंकार-विभूषित मासिक पुस्तकें पहावीं तो एखादें पान चित्रविचित्र वेलींनी व पुष्पांनी अगदी खचून गेलेलें असतें व आंत एक लहानशी कविता उगीच कोठे टुकूटुकू करीत बसलेली दिसते. त्यावेळीं असें सहज मनांत येतें की एवढ्या गुड्याएवढ्या न्हाणवलीला ह्या मासिकपुस्तककाराने एवढें मखर कशाला बांधलें आहे? परंतु कविता रचण्यापेक्षां त्या प्रसिद्ध करण्याचीच अलीकडील कवींना घाई असल्यामुळें कविराज जें चिटोरें अंगावर फेकतील तेंच शिरसावंद्य मानून त्यालाच होईल तितक्या "उठावा"ने दाखविणें मासिक पुस्तककारांना भाग पडतें. अलीकडील कवितांत जो क्षुद्रपणा आढळतो त्याचें कारण हेंच की कवींची काव्यप्रतिभा बऱ्याच अंतरापर्यंत अव्याहत सुरू राहील इतकी ती ताकदवान नसते. अर्वाचीन कवींची स्फूर्ति म्हणजे विजेचें तळपणें अथवा काजव्याचें चमकणें होय. त्याच्यापासून सूर्यप्रकाशाच्या उज्ज्वल, स्थिर व चिरप्रभावी तेजाची अपेक्षा करणें व्यर्थ आहे.

एका दृष्टीने असें म्हणतां येईल की प्राचीन 'कवि'हि कवि नव्हते व अर्वाचीन 'कवि'हि कवि नव्हेत. ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव अथवा तुकाराम ह्यांपैकी कोणताहि कवि घ्या, ज्या दृष्टीने कवि काव्यें रचतात तशी दृष्टि एकाहि कवीची नव्हती. 'काव्यें' रचण्यापेक्षा ह्या सर्व महा-पुरुषांचा फारच उदात्त उद्देश होता. त्यांना 'कालिदास' म्हणवून घेण्याची मुळीच हाव नव्हती. ह्यांची मुख्य तृष्णा परमेश्वराने आपणास आपले "दास" म्हणावें एवढीच होती. त्यांना कालिदास म्हणून कोणी कितीहि मान दिला असता तथापि जर ईश्वराने त्यांना आपलें म्हटलें नसतें तर त्यांच्या मनाचें समाधान झालें नसतें. अशा थोर विभूतींना 'कवि' म्हणणें ही एका प्रकारें त्यांची योग्यता कमी करण्यासारखेंच आहे. ते

तत्त्वज्ञ, धर्मकर्ते व समाजोद्धारक होते. ते समाजनियमनाची गंगा होते. त्या गंगेंत लोकांना आपलीं पातकें, आपलीं दुःखें, आपले मनस्ताप बुडवून टाकण्याची परवानगी होती, परंतु आपली काव्यस्पृहाहि त्यांत खळवळून घ्यावी इतक्या हीन प्रतीचे ते नव्हते. ह्या थोर पुरुषांनी आपले सर्व दिव्य उद्गार काव्यरूपांत काढलेले आहेत हें खरें, तथापि ह्यांचे काव्यरूपांतील उद्गार निघण्याचें कारण त्यावेळीं मराठी भाषेंत गद्य लिहिण्याची पद्धति फारशी नव्हती हेंच आहे. गद्य लिहिण्याची त्यांचे वेळीं जर अलीकडच्याप्रमाणे पद्धति असती तर ज्ञानेश्वरांनी आपली "ज्ञानेश्वरी" व वामनपंडितांनी आपली "यथार्थदीपिका" काव्यांत लिहिली असती की नाही हा प्रश्नच आहे. प्राचीन मराठी कवींपकी 'कवि' असे मुख्यतः फारच थोडे होते. बहुतकरून सर्व तत्त्वज्ञ, संत व साधुच फार होते. जगाला शिकविणें हा त्यांचा उद्देश होता, तें काव्यांत शिकविणें हा हेतु त्यांच्या अंतःकरणापासून फारच दूर असेल!

प्राचीन कवींप्रमाणे अर्वाचीन कवींनाहि वास्तविक रीत्या 'कवि' म्हणतां यावयाचें नाही. परंतु प्राचीन कवींप्रमाणे ते तत्त्वज्ञ आहेत म्हणून त्यांना 'कवि' म्हणावयाचें नाही असें नव्हे; तर 'कवि' म्हणवून घेण्याइतका ह्यांचेजवळ स्फूर्तीचा साठाच नाही. अर्वाचीन कवींपैकी बरेचसे कवि आंग्लोपजीवी आहेत हें वर सांगितलेंच आहे. ह्यांचें बहुतेकांचें असें असतें की इंग्रजी वाचतां वाचतां एखादा चांगला मजकूर ह्यांना आढळला तर ते लगेच तो कवितेंत आणण्याचा प्रयत्न करतात. परंतु इंग्रजी कवि जेवढे ढोचतील तेवढेंच पाऊल पुढें टाकावयाचें, हा अर्वाचीन कवींचा क्रम त्यांना काव्यकीर्तीत कितीसें अंतर पुढे नेणार? अर्वाचीन कवींची कविता म्हणजे एखाद्या सुंदर पैठणीवर काढलेली जरीची बुटी आहे. ती लहान लहान प्रमाणांत सर्वत्र चमकत असावयाची; परंतु बुटी म्हणजे कांहीं पैठणी नव्हे. ती एखाद्या महावस्त्रावर सुंदर दिसते; परंतु ती स्वतः कांही महावस्त्राप्रमाणे नेसावयाच्या उपयोगी नाही.

प्राचीन कवि इतर व्यावहारिक विषय जरी घेत नसले तथापि ते जे विषय घेत असत त्यांतच ते इतके तन्मय होत असत की त्यामुळे उत्पन्न झालेल्या मनःस्थितींतून काव्यनिर्झर उगम पावणें शक्य असे. आधुनिक

कवि इतक्या आकुंचित, इतक्या भीरु, इतक्या अरुंद परिस्थितींत उत्पन्न झालेले आहेत की, त्यांच्या स्फूर्तीचीं बन्धनें तटातट तुटून ती स्वच्छंदपणें खिदळत जाईल असें शक्यच नाही. प्राचीन कवींना परमेश्वराचे गुण आठवून आनंदाच्या उकळ्या येत, त्यांना परमेश्वर भेटलासें वाटून त्याचें वर्णन केल्याशिवाय रहावत नसे, त्यांना भीम हा दुःशासनाचे उरावर बसलेला प्रत्यक्ष दिसे, अंबरीषाची स्थिति पाहून त्यांना खरीखुरी अनुकम्पा उत्पन्न होई व भीष्माची निःपाण्डवी पृथ्वी करण्याची प्रतिज्ञा ऐकून त्यांना खरोखरच द्रौपदीइतकेंच भय वाटत असे. आपल्या भोवती चाललेला आक्रोश पाहून तिकडे प्राचीन मराठी कवींनी कां लक्ष दिलें नाही आणि अभिमन्यूचें प्रेत घेऊनच ते कां रडत बसले, हें पूर्णपणें समजणें खरोखरच कठीण आहे; तथापि त्यांतील एक कारण वर सांगितलें तेंच होतें. म्हणजे हें की, प्राचीन मराठी कवि तत्त्वज्ञानी होते. कवि नव्हते; परंतु प्राचीन मराठी कवींची काव्यप्रतिभा उज्ज्वलित होण्यास ईश्वराच्या "वेड्यावाकड्या" भक्तीचेंच कां होईना, पण सबळ कारण होतें. आधुनिक कवींच्या संबंधानें हेंहि कारण नाहीसें झालें आणि "सत्य सदा बोलावें सांगे गुरु आणि आपुला बाप" असल्या प्रकारची नीरस, निर्बुद्ध, निपट व कळकटलेली कविता जन्म पावली. अर्वाचीन कवींची प्रतिभा जागृत व्हावयास प्रबल कारण तरी कोणतें आहे? कविता उत्पन्न होण्यास अत्यन्त तुफान अशी मनोवृत्ति उत्पन्न व्हावी लागते. प्राचीन कवींच्या समोर अफजलखानाचा वध, राजारामाचा जिंजीवास, पानपतची लढाई, वगैरे घनघोर प्रसंग नित्यशः घडून त्यांनी त्यांचेकडे पाहिलें नाही हें खरें, तथापि सीतेचा वनवास, द्रौपदीचा अपमान अथवा अभिमन्यूचा चक्रव्यूह, इत्यादि प्रसंगहि सत्यवत् करण्याइतकी त्यांची मानससृष्टि जबरी असल्यामुळे त्यांना उत्कट प्रसंगांची कधी कमतरताच पडली नाही, परंतु सध्यांच्या शतकांत असे प्रसंग कोणते आहेत? आता भिलटीच्या बोरांवर तुमच्या हातून एक "ओलें" अक्षर निघावयाचें नाही. कारण त्यावर तुमचा विश्वास नाही. मराठे, रजपूत अथवा क्षत्रिय ह्यांच्या पराक्रमांनी तुमचें चित्त थरारून जावयाचें नाही. कारण त्यांची तुम्हांला माहिती नाही. मग तुम्हीं कविता रचणार कशावर? नाण्यांच्या प्रश्नावर? इनाक्युलेशनवर? शाळांच्या बक्षिस समारंभावर? कर्झनसाहेबांनी मिठाचा

कर माफ केला त्यावर? की मिण्टोसाहेबांनी मोर्लेचा खलिता आणला त्याचेवर? विषय नसतां रचण्यास बसलेले कवि दहा-पांच कडव्यांच्या आंतच रडकुंडीला येतात ह्यांत कांही नवल नाही. मग ह्यांची कविता इंग्रजी कवींतून चोरलेल्या उष्टया कल्पनांवर, पहिल्याच बाळंतपणांत आटपलेल्या क्षयरोगी "प्रिये" वर, अथवा दृष्टीपुढे जो कोणता विषय असेल, मग ती छत्री असो, दऊत असो, चहाचा कप असो अथवा तीन बत्तींची सिगारेट असो, तिच्यावर चालावयाची. काय हे कवि आणि काय ह्यांची कविता !

प्राचीन कवि हे 'कवि' नव्हते. कारण ते श्रेष्ठ तत्त्वज्ञानी होते, आणि अर्वाचीन कवि हे कवि नाहीत. कारण 'कवि' म्हणण्याइतकी त्यांची स्फूर्तीच नाही हें वर दाखविलेंच आहे. मग हा महाराष्ट्र देश कवीवांचूनच सुना गेला काय, असा प्रश्न साहजिकच उपस्थित होईल. त्याचें एक उत्तर आम्ही असें देतों कीं, ह्या महाराष्ट्रदेशाचा नैसर्गिक स्वभावच असा आहे की, येथें (Sentimental) भावनापीडित लोक उत्पन्न होत नाहीत. येथे सर्व रोखठोक हिशेबी काम. मुसलमानी अमदानींत कवितेला फार वाव होता. कारण त्या वेळचे इतिहास जर वाचले तर करुण प्रसंग त्यावेळीं फार उत्पन्न होत असत असें दिसतें. परंतु त्यावेळीं महाराष्ट्रांतील कवि रडगाणें लावीत बसले नाहीत. त्यांतील जे संत अथवा तत्त्वज्ञानी होते ते मुसलमानी धर्मापासून हिन्दुधर्माचाच बचाव कसा करावा ह्या नादाला लागले व जे वीर अथवा राजकारणी होते ते मुसलमानी सत्तेपासून स्वदेशाचा बचाव कसा कसा करावा ह्या विचाराला लागले. ह्या दोहोंच्या झपाट्यांत रडण्याचे लांबलांब सूर काढणाऱ्या कवींना जागाच मिळाली नाही. तथापि महाराष्ट्रांत कवि झालेच नाहीत असें मात्र नाही. ज्यावेळीं मराठी राज्य स्थिरस्थावर होऊन लोकांच्या शृंगारवृत्ति थोड्याशा रंगल्या, ज्यावेळीं वैभवाची खूप भरती होऊन "पंचकल्याणी घोडा अबलक" घरोघर दिसूं लागले, ज्यावेळीं भगवद्भक्त व वीर ( Heroes ) [ 'शूर' नव्हे, कारण ह्या महाराष्ट्रांतून शूर लोक कधी नाहीसे झालेच नाहीत] ह्यांच्या पिढ्या मोरोपंत व बाजीराव ह्यांचेबरोबर संपल्या आणि ज्यावेळीं सक्त मेहनतीबरोबर सुखाचाहि थोडासा झुरका घेण्याइतकी ऐपत महा-

राष्ट्राचे अंगीं आली त्याच वेळीं महाराष्ट्रांत खरे 'मराठी' कवि निर्माण होऊं लागले. ह्या कवींपैकी प्रमुख कवि म्हणजे रामजोशी, अनंतफंदी, होनाजी-बाळ, परशुराम वगैरे होत. अमृतराय वगैरे कवींचीहि गणना ह्यांतच केली तरी चालेल, कारण हे थोडे बहुत दोन्ही पिढ्यांमधील आहेत. त्या कवींचा जो काल तीच खरी मराठी काव्याची प्रभात होय. त्या प्रभातीचें द्योतक म्हणूनच की काय, होनाजी बाळानें "घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला" हें अत्यंत मधुर पद रचलेलें आहे.

मराठी काव्याच्या प्रभातकाळाचे हे कवि अगदी स्वतंत्र प्रतिभांचे आहेत. ह्यांचीं काव्यें वाचूं लागलें म्हणजे खरोखर पहाटेच्या गुलाबी थंडींत समुद्र-किनारची गोड झुळूक उपभोगीत हिंडावयास गेल्याचा भास होतो. खरा "कवि" पेशा ह्यांचाच होता. "काव्य" रचण्याचा संकल्प करूनच ह्यांनी आपले छंद रचले. हे स्वतःसहि 'कवि' म्हणवीत असत व एकमेकांच्याहि कवित्वकीर्तीची तारीफ करीत. होनाजी बाळाने तर अनंतफंदीच्या कवनेची मोकळ्या अंतःकरणाने तारीफ करून "कवन बहुत उदरामधिं भरलें फणस जसा मोठा कापा" असें त्यांचें फार मजेदार वर्णन केलें आहे. हे कवि संस्कृत संस्कृतीच्याहि पदराखालीं झाकले गेले नव्हते, आंग्ल संस्कृतीच्या कडेवरचें बाहुलें नव्हतें व जें काय होतें तें त्यांचें स्वतःचें होतें. त्यांच्या कल्पना निराळ्या, त्यांचीं वृत्तें निराळीं, त्यांचे विषय निराळे, त्यांची हातोटी निराळी, त्यांचें सर्व निराळें होतें. खरी मराठी कविता काय ती ही होती. ह्यांनीं शृंगाराचीं वर्णनें केलीं म्हणजे 'महाराष्ट्रां'तल्या लावण्यलतिकांचीं हीं वर्णनें आहेत असें चट्दिशीं मनाला पटतें. ह्यांनीं प्रेमविद्ध पुरुषांचीं केलेलीं वर्णनें ऐकलीं म्हणजे मराठे शिलेदार हुबेहुब डोळ्यांपुढे उभे येऊन राहतात. त्यांच्या कवितांनी त्या वेळचा महाराष्ट्र कल्पनेपुढे चित्रित होतो. त्या वेळचें वैभव, त्यावेळचे विलास, त्या वेळच्या कामगिऱ्या, त्या वेळचे पराक्रम, त्या वेळचीं संकटें, त्या वेळचे दुर्धर प्रसंग, हे सर्व बरोबर रीतीने त्यांच्याच कवितांनीं पुन्हां दिसावयास लागतात. त्या वेळचे सद्गुण, त्या वेळचे दुर्गुण त्या वेळच्या चांगल्या चाली, त्या वेळच्या वाईट चाली, हें सर्व, कांहीएक सत्यापलाप न करितां, आपणांस कळविणारे जर कोणी खरे जासूद असतील तर हेच 'कविराय' होत. "सहज मनामधिं आलें साजणी कधीं स्वामीचा एकान्त-

घडे। तों जासूदें येऊन सांगितलें मुक्काम गंगे अलीकडे।।" हें एका विरहिणीचें सोत्कण्ठविचारप्रदर्शन जसा त्या वेळचा प्रेममय पण मर्द तरुणवर्ग वाचकांच्या दृष्टीसमोर उभा करतो आणि त्यांपुढे हल्लीचे सेकंड क्लासांत बसून प्रियकरिणीची शाल सावरणारे प्रेमवीर लुंगेसुंगे दिसूं लागतात. महाराष्ट्राची प्रथमपासून जर एखाद्या गुणाबद्दल प्रसिद्धि असेल तर ती मर्दपणाबद्दल आहे. दक्षिणचा घोडेस्वार पुरातन कालापासून शूरांच्या कर्णपथावर घोड्यांच्या टापा घालवीत आलेला आहे. असा शिलेदार जेव्हा कोठे तरी तरवार गाजवून आपल्या प्रियकरिणीला भेटावयास घाईघाईने कूच करीत जात असेल तेव्हां शृंगाररसाला आलेलें भरतें तो काय तो खरा 'मराठा' शृंगार! नाहींतर मिस्टरला डिसपेपशिया झालेला व मिसेस्‌ची गालफडें बसलेलीं, अशा स्थितींत कॉलेजमध्यें शिकलेले रोमिओ आणि ज्यूलिएटचे अथवा पुंडरीक–महाश्वेतेचे शृंगार जबरदस्तीने आठवून एखाद्या मासिकाकरितां मुद्दाम दळलेली माकडचेष्टा हा कसला शृंगार? पन्नास रुपड्यांवर एखाद्या फर्ममध्ये खरडेघाशी करतां करतां कम्बरेचे टांके ढिले झालेले 'प्राणपति' व चाळीमध्ये जुनेर नेसून नळाचें पाणी भरतां भरतां नको जीव झालेली 'प्राणसखी' ह्यांच्या शृंगारांत स्वाभाविकपणा तो काय येणार व रसोत्पत्ति कशी होणार?

संस्कृत कविता अतिशय ढंगवाली कविता आहे हें मागे सांगितलेंच आहे. संस्कृत कवितेमध्ये जितकी विविधता आहे तितकी दुसऱ्या कोणत्याहि काव्यांत असेल की नाही हेंहि मागे सुचविण्यांत आलेलेंच आहे. परंतु संस्कृत कवितेंतील हे सर्व ढंग काव्याच्या प्रभातकाळीं मराठी कवितेंत येत चाललेले होते. त्या प्रभाताच्या पुढे जर लगेच दिवस वरवर येत गेला असता तर पेशवाईपासून आजपर्यंत गेलेल्या शंभर वर्षांत मराठी काव्याने बहार करून सोडली असती ही आम्हांस पक्की खात्री आहे. परंतु एकोणिसावे शतकांत एक ट्रॅन्स्फर सीन झाला व समाजस्थितींत जो एकदम पालट पडला त्याच्या योगाने नुकतीच पल्लव फुटत चाललेली मराठी कविता एकदम "सत्य सदा बोलावें, सांगे गुरु आणि आपुला बाप" असल्या वृत्तांवर येऊन बसली. ही मराठी कविता पूर्वीप्रमाणे विठ्ठलाचे पायांवर जरी पडली असती तरी मुक्त होऊनहि गेली असती. परंतु आतां त्याबद्दल विचार करून काय

उपयोग ? सध्यां हातांतल्या 'काठी'वरच्या कविता नशीबीं आलेल्या आहेत त्या खऱ्या !

मराठीचे आद्य वाङ्मयाचार्य "कवि" न बनतां लोकोद्धारकर्ते होऊन गेले त्याबद्दल आम्हांस अत्यन्त अभिमान वाटतो. लोकोद्धाराचें कार्य पुढे उभें राहिलें असतां काव्य-रचना सुचणें हें अधःपाताचेंच लक्षण होय आणि मराठी राष्ट्राच्या ऐन सुरुवातीस त्यास जो गडबडीचा काळ आला त्यावेळीं लोकोद्धाराचें पवित्र कार्य टाकून जर आमचे ज्ञानोबा, आमचे एकनाथ, "मम जिवाची प्रियकरिणी" करीत बसले असते तर राष्ट्राची भयंकर हानि झाली असती ह्यांत संशय नाही. एकनाथ, तुकाराम, ज्ञानेश्वर ह्यांना हातांतल्या काठीवर अथवा एखाद्या तरण्याताठीवर कविता करतां आली नसती असें जर कोणाचें म्हणणें असेल तर ती चूक आहे. कारण ज्या महापुरुषांना अध्यात्मासारख्या गूढ विषयांवरसुद्धां छन्दोरचना करून वाचकांचें अन्तःकरण गदगद हालवितां आलें त्यांना जोराने वाहणाऱ्या ओढ्यावर अथवा मुसळधार पडणाऱ्या सरीवर काव्य रचतां आलें नसतें असें म्हणणें अत्यंत असमंजसपणाचें आहे. हे गूढ ज्ञानाचे दीप, हे राष्ट्रकर्तव्यांचे मेरुमणि, हे अगाध विश्वप्रेमाचे सागर, कवितांची जुळणी करूं शकले नसते असें कसें म्हणतां येईल ? परंतु 'कवि' होण्यापेक्षा फार उदात्त कर्तव्यक्षेत्र त्यांनी आपलेपुढे ठेविलें. त्यांनी राष्ट्राचा संसार अंगावर घेतला. त्यांनी राष्ट्राची चिंता पाठीवर वाहिली. ह्यांच्यापुढे कवींचे अल्पतेज तें किती ? कवि हे कितीहि थोर असले तथापि ते राष्ट्राचे अलंकार होत, राष्ट्राचे प्राण नव्हत हें कबूल केलेंच पाहिजे. विचारकर्ते, उद्धारकर्ते, सुस्थितिकर्ते हे देशाचे प्राण होत. आमचे ज्ञानेश्वर–तुकाराम ह्याच कोटींपैकी होते. राष्ट्र आपल्या पायांवर उभें असलें म्हणजे त्यास अलंकार जास्त शोभा देत असतात. परंतु राष्ट्रास अलंकार चढविणाऱ्यापेक्षा राष्ट्रास त्याच्या पायांवर उभे करणारे महात्मे हे निःसंशय श्रेष्ठ ठरलेच पाहिजेत. शेक्सपियरविषयीं इंग्लण्डमधील लोकांना अत्यंत अभिमान आहे. एकाने एकदम असेंहि म्हटलेलें होतें की प्रसंग आला तर आम्ही साम्राज्यसुद्धां गमावूं; परंतु आपला शेक्सपियर कधीहि गमावणार नाही. शांततेच्या वेळच्या त्या गर्वोक्ति बेजबाबदारीच्या असतात हें सध्याच्या प्रसंगी

उत्तम रीतीने दिसून येणार आहे. सध्या इंग्लंडचे लोकांना जर असा प्रश्न विचारला की, बोला, तुम्हांला तुमचा शेक्सपियर-मिल्टन पाहिजे, की लॉर्ड किचनेर आणि लॉइड जॉर्ज पाहिजे ? तर ते म्हणतील की पहिली जोडी जरी आणखी दोन शतकांनी आम्हांला मिळाली तरी हरकत नाही; परंतु आमचे किचनेर व लॉइड जॉर्ज ह्यांना आमचेपासून दूर नेऊं नका. उद्यां जर्मन् लोकांच्या तीस मैली तोफा सुटूं लागल्या असता त्यांचेपुढे जर रोमिओ आणि ज्यूलियटच्या पुस्तकांची रास घातली तर शत्रु पळून जाईल काय ? अशा वेळीं शेक्सपियर काय उपयोगी पडेल ? अशा वेळीं लॉइड जॉर्ज व किचनेरच उपयोगी पडतील व त्यांच्या बत्तीस मैली तोफाच शत्रूचें धाबें दणाणून टाकतील. कवि श्रेष्ठ झाले म्हणून त्यांच्या गुणांची अतिशयोक्ति गाण्यांत कांही अर्थ नाही. कवि हे नाकांतील नथा आहेत, खुद्द नाक नव्हेत. राष्ट्रकर्ते पुरुष हेच राष्ट्राचें नाक होत आणि ज्या राष्ट्रांत राष्ट्रकर्ते पुरुष जास्त उत्पन्न होतात त्याच राष्ट्राचें नाक वरती रहातें. आम्हांस अत्यंत अभिमान वाटतो की महाराष्ट्राच्या संकटयुगांत तुकाराम–ज्ञानेश्वर–रामदासादिकांनी राष्ट्रोद्धार करण्याचा विडा उचलला, 'कवि' म्हणवून घेण्याचा अट्टहास केला नाही. त्यांच्या हातून काव्य निर्माण झालेंच असेल तर तें सहज लीलेने झालें, हेतुपूर्वक झालें नाही. ते ज्ञानी ह्या अर्थाने 'कवि' होते, काव्य-विरचक ह्या हेतूने कवि नव्हते. महाराष्ट्राचे खरे कवि, रामजोशी, परशुराम, अनंतफंदी इत्यादिक होत. मराठी काव्याची प्रभात म्हणजे त्यांचाच काल होय. त्या प्रभाताचा अजून दिवस व्हावयाचा आहे; अजून महाराष्ट्राचा कीर्तिसूर्य मध्यान्हीं चढावयाचा आहे. त्या कीर्ति-सूर्यास आम्ही आगाऊच वन्दन करतों व अशी अपेक्षा करितों की—

ध्वान्तं क्वापि निलीनमम्बरमणिर्व्योमाग्रमारोहति ।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे शाखा
अनुक्रम....37523...... वि: ..1.9.4.5...
क्रमांक .....23.25........ नों: दि: 23.1.9.7

५

# संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षा

[ इंग्रजीमध्ये ज्याला ' Polite essay ' म्हणतात, तशा प्रकारच्या मेकॉले छाप ग्रंथपरीक्षणाचा हा मराठींतील एक उत्तम नमुना. नांवापासून अच्युतरावांनी कोटयांची फैर झाडली आहे. " केशव ", " नॉर्टनसाहेब ", " तबलजीच्या 'थापा' ", " विमा कंपनी " इत्यादि तत्कालीन संदर्भांनी त्या काळच्या वाचकांना चांगल्याच गुदगुल्या झाल्या असतील ! ]

★ ★ ★

वरील जंगी ' मालगाडी ' नांवावरूनच पुष्कळ लोक भेदरले जाण्याचा संभव आहे. कारण ललितवाङमयाची हृदयभूत अशी जी नाटयकला तिला अशा लांब लांब नांवाचे हिसके बसलेले पाहून कोणाकोणाच्या नेत्रांत अश्रु उभे रहाणें अगदी साहजिक आहे. इतके दिवस संगीत नाटकांचीं नांवें कशीं नाजूक असत. ' सौभद्र, ' ' शारदा ' अशा गुळगुळीत, चिमुकल्या, मृदु व मधुर नांवांवरून इतके दिवस कला ओळखली जात असे. संगीत कलेनें जास्त उडी मारिली तर ' शाकुंतल, ' ' प्रेमगुंफा, ' असे चौखांवी पूल ती ओलांडीत असे व कोणी ' शाप ' दिल्यामुळे ती ' संभ्रमां 'त पडलीच तर पंच अक्षरांपुढे तिने सहसा धाव मारली नाही. संगीत नाटकें कशीं नाजूकच असलीं पाहिजेत. संगीताचा-काव्याचा-असा गुणच आहे की त्याने परम कठोर विकारसुद्धा विरघळावयासच लावले पाहिजेत. कर्कश भावनांना लवचिक बनविणें हेंच काव्याचें-संगीत काव्याचें-काम. मग काव्यांतल्या महत्त्वाकांक्षेंत तरी राक्षसीपणा कोठून येणार ? काव्यांतली महत्त्वाकांक्षा ' बदमाष ' ' बदफैली ' ' खुनी ' ' अवदसा ' जर व्हावयाची असेल तर तिने संगीतांतल्या ' द्रव ' रूप आलापांचा आश्रय कशाला करावा ? आणि जर तिने तो तसा केला तर तो काव्याच्या मृदुत्वावर जुलूम तरी होईल

अथवा त्याच्या योगानें महत्त्वाकांक्षा तरी जितकी राक्षसी वठावयास पाहिजे तितकी न वठतां तिच्यांत विशोभित कमजोरपणा यावयास लागेल.

संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षेंत ह्या दोन्ही गोष्टी झाल्या आहेत. संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षेचा विषय संगीतास अनुकूल नसल्यामुळे एखाद्या अस्दलाचें रूप पाहून एखादी मुग्धकलिका जशी भयभीत होऊन जावी त्याचप्रमाणे ह्या नाटकांतील कविता धास्तीनें पांढरी फटफटीत पडली आहे व राक्षसी महत्त्वाकांक्षेला अष्टौप्रहर मृदु कवितेच्याच संगतीत ठेवल्यामुळे तिच्यांतील पहिला पीळ पुढे पुढे शिथिल होऊन नाटकाच्या शेवटीं-शेवटीं ती एखाद्या शीघ्रवश कामिनीप्रमाणे 'प्रेमाच्या रंगिं रंगें ही', असे भोळसट नाच नाचूं लागली आहे. संगीत नाटकास कोणते विषय योग्य आहेत व कोणते अयोग्य आहेत ह्याची अजून महाराष्ट्र कवींनी फारशी तीव्र चिकित्सा केलेली नाही व महाराष्ट्र नाटकांनी संगीत वेष घेतल्यास अजून फारसे दिवस लोटलेले नसल्यामुळे तसें होणें अगदी साहजिकहि आहे. त्याचप्रमाणे नाटकवाल्या लोकांनीहि अजून संगीत तर संगीत व प्रोज तर प्रोज असा आडमुठेपणा धारण केलेला असल्यामुळे एखाद्या 'केशवा' ची प्राप्ति करून घेणें असेल तर त्याच्या सुराशीं सूर मिळविल्यावाचून दुसरें गत्यंतरच नसतें. महाराष्ट्रांतील नटवर्गातील एकांगीपणा जाऊन ते जर कधी काळीं 'सव्यसाची' होतील तर किती तरी तबलजींचे भलत्या वेळीं 'थापा' देण्याचे श्रम वाचतील !

संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षा हें नाटक एखाद्या नटाप्रमाणे आहे. ज्याप्रमाणें कंपनींत गाणारें स्त्रीपात्र कोणी नसले म्हणजे एखादा पाणचट तोंडाचा पुरुषच मोठ्या जुलुमानें शालू नेसून 'त्या मेल्यानें पदर कि गे धरिला' असें आळवून आळवून म्हणूं लागतो, त्याप्रमाणे राक्षसी महत्त्वाकांक्षेनें आपल्या कपाळावर काव्याचें कुंकूं लावून मोठ्या जबरदस्तीनें संगीताचें रूप धारण केलें आहे. वास्तविक हें नाटक प्रोजच आहे व तें प्रोजच असावयास पाहिजे होतें. ह्या नाटकांतील येथून तेथून सर्व विषय प्रोजला अनुकूल आहे. ह्यांत थोडीबहुत जी कविता आढळते ती जशी पुरुषनटाच्या डोक्यावर मुद्दाम 'वेणी' ठेवावी, त्यासारखी आहे. ही 'वेणी' काढून टाकली तरी नाटकांतील 'पौरुष' यत्किंचित्सुद्धा कमी

झालेलें दिसणार नाही. उलट या 'वेणी'ने नाटकाच्या मर्दानी चेहेऱ्याची जी खराबी झालेली आहे ती मात्र खात्रीने दुरुस्त होईल.

संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षा या नाटकानें त्या नाटकांतीलच सरोजिनी-प्रमाणें आपल्या कपाळास मुद्दाम डकविलेलें संगीताचें कुंकू जर पुसून टाकलें तर तें नाटक बहुतेक मराठी नाटकांत अत्यंत परिणामकारक गणलें जाईल यांत संशय नाही. रंगभूमीवर या नाटकाचे प्रयोग चालले असतां प्रेक्षकगण स्तिमित होतो, रोषास चढतो, क्षुब्धता पावतो व आवेगाने बेभान होऊन 'शाबास विक्रांत' 'शाबास विक्रांत' असे स्वयंस्फूर्तीने उद्गार काढूं लागतो. विक्रांत हाच नाटकांतील नायक आहे व जरी त्याच्या सेवेला कधी देवांगना तर कधी मृणालिनी व कधी प्रत्यक्ष मदालसा दिलेली आहे तथापि त्या सर्व ह्या वीरापुढे 'हतप्रभ' होऊन नाटकाच्या अव्वलपासून अखेरपर्यंत त्याचेंच तेज काय तें शिल्लक रहातें. 'सरोजिनी' हा या नाटकांतील आणखी एक नायक आहे; व जरी त्याच्या नांवावरून हा स्त्री असावा असें वाटतें तरी त्याची कृति मनःस्थिति व भाषणें ह्यांवरून हा पक्का पुरुष असला पाहिजे यांत तिळमात्र संशय रहात नाही. सरोजिनी ही जर खरी स्त्री असली—आणि रंगभूमीवरचें पात्र स्त्रीच्या वेषांत दिसतें हें आम्हांस कबूल आहे—तथापि 'जो भेद विधिने स्त्रीपुरुषीं केला' त्यामुळे इलाज खुंटल्याकारणाने ती स्त्री राहिली असावी असेंच आम्हांस वाटतें. नाहीतर कुंकवाच्या अपवर्जनानंतर 'भिकार रमणी वस्त्रें' फेकून द्यावयास तिने कधींहि कमी केलें नसतें! विक्रांताप्रमाणेच सरोजिनी ही प्रेक्षकवर्गास आपल्याबरोबरच जोराने ओढून नेते. सरोजिनीच्या स्वभावांत स्त्री व पुरुष ह्या दोघांचेंहि चमत्कारिक मिश्रण असल्यामुळे विक्रांतापेक्षाहि हें पात्र वाचकांस कांही कांही प्रसंगीं जास्त जोराने दवडावयास लावतें. सरोजिनी हें पात्र नाटकांत ओढूनताणून न आणतां जर स्वतःच्याच पायांनी आलें असतें तर विक्रांतापेक्षा तेंच फार उठावदार दिसलें असतें ह्यांत कांही संशय नाही.

या नाटकांत प्रमुखत्वाने नर्तन करणारी आणखी एक व्यक्ति म्हणजे मदालसा होय. हिच्याच अत्याचारामुळे विक्रांताचा पराक्रमीपणा कसोटीस लागला व हिच्याच अत्याचारामुळे सरोजिनी आपला स्त्रीस्वभाव सोडून

देऊन 'पुरुष' बनली. मदालसा या नाटकांत अगदी आरंभींच प्रवेश करते व हिच्याच राक्षसी महत्त्वाकांक्षेमुळे नाटकास आपलें ठसठशीत नांव प्राप्त झालें आहे. हिचीं अनन्वित कृत्यें राक्षसांनासुद्धा लाजविणारीं आहेत व ब्रिटिश कोर्टांत आपली अब्रू 'सफा' करून घेण्याची राक्षसांना जर परवानगी असती तर मदालसेच्या महत्त्वाकांक्षेला, 'राक्षसी' म्हटल्याबद्दल त्यांनीं ग्रंथकाराविरुद्ध, अगदी नॉर्टनसाहेबांना 'एंगेज' करण्याइतका मोठा दावा आणला असता. हिचें प्रेमसुद्धा 'प्राण घेणारें' आहे. पांचव्या अंकांत विक्रांताचे गळचास 'प्रेमाने' मिठी मारून जेव्हा ही 'या अप्सरेच्या गोंडस बाहूंचा हा पाश तूं कसा सोडवितोस तें मी पहातें,' असा धाक दाखवूं लागते तेव्हा 'अप्सरा'हि नकोत आणि 'गोंडस हात'हि नकोत असें प्रेक्षकांस वाटावयास लागून थिएटरमधून पळून जावयास पुरेशीं दारें आहेत की नाहीत, हें ते शोधूं लागतात. ही 'माथेफिरू,' ही 'दगलबाज,' ही 'कवटाळीण,' ही 'हरामखोर,' जोपर्यंत रंगभूमीवर आपलें सैतानी सामर्थ्य प्रकट करीत असते, तोपर्यंत प्रेक्षकांचा जीव मुळीच सुचित न रहातां आपण आपल्या आयुष्याचा विमा उतरून आलों असतों तर फार चांगलें झालें असतें असें त्यांना वाटूं लागतें. खरोखर या 'कैदासणी'च्या अघोर कृत्यामुळें विमेवाल्या लोकांचें काम वाढूं लागलें असें कोणी सांगितलें तर त्यांत मुळींच आश्चर्य वाटण्याजोगें नाही. मुंबई इलाख्यांत एक विमा कंपनी जी गतवर्षीं स्थापित झालेली आहे तिचा व या 'अवदसे'च्या आगमनाचा कांही संबंध आहे की काय, ह्याचीहि विचारपूस करण्याजोगी आहे.

संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षेंत जीं तीन मुख्य पात्रें आहेत त्यांपैकी जरी दोन स्त्रिया असल्या तरी त्या स्त्रिया पुरुषांपेक्षासुद्धा पुरुष कशा आहेत, हें वर दाखविलेंच आहे. म्हणजे 'प्रामाणिकपणा'ने बोलावयाचें असल्यास राक्षसी महत्त्वाकांक्षेंतील हीं मुख्य पात्रें पुरुषच आहेत असें म्हणावयास हरकत नाही. जेथे सर्व मुख्य पात्रें पुरुष व जेथे मुख्य भावना उन्मादाची तेथे काव्याला—मृदुतम कवितेला—संगीताच्या रुणझुण नादाला—अवसर कोठून मिळणार? आणि म्हणूनच हें नाटक संगीत नसता 'प्रोज' असतें तर जास्ती निसर्गानुगामी झालें असतें असें आमचें म्हणणें आहे.

आता संगीतामुळे हातचा 'केशव' गमावला असता यांत संशय नाही; पण दुसरी एखादी मार्दवविशिष्ट नाटचकृति उत्पन्न करून 'केशव' ची समजूत घालणें कितीसें कठिण होतें? संगीताच्या नादाला लागल्यामुळे ह्या नाटकांत मदालसेच्या दणकट स्वभावाचा बांक वर उल्लेख केलेल्या एका ठिकाणीं उगीचच्या उगीच मोडून गेलेला आहे व त्यामुळे प्रेक्षकांच्या कल्पनासातत्याचा मध्येच विच्छेद होऊन नाटकसूत्राच्या संगतीचा लोप होतो. संगीताच्या नादामुळेच मृणालिनी हें जें एक 'नाटपेट' पात्र आणलें आहे त्याचीहि केवळ मुर्वतीस्तव संभावना केली गेली असल्यामुळे त्याचें संगीत जरी कानास गोड लागतें तरी मदालसेच्या हक्काची पायमल्ली करून ही मृणालिनी उगीच कोण गात बसणार असें 'पदोपदीं' वाटल्या-वाचून रहात नाही. काव्यदृष्टचा मृणालिनीचे सर्वच प्रवेश फारच प्रशंसनीय आहेत; परंतु कोकिलेने आपलें गायन पानपतच्या संगरांत कां सुरू करावें? तिच्या आलापांचें चीज करण्यास प्रशांत सुंदर असें उपवन उरलेंच नाही काय?

कोकिळा असली तरी रणसंग्रामावर गावयास लावीन अशी जी एक उद्दाम रुधिरप्रियता ह्या नाटकांत सरसहा दिसून येते त्यामुळे ह्या नाटकां-तील कोकिळा तर रडकुंडीस आलेल्याच आहेत; परंतु 'क्रूरेषु क्रूर' अशा मदालसेचीसुद्धा अगदी घामाघूम स्थिति झालेली आहे. अगदी मदालसा झाली तरी तिने पाय आपटायचे तरी किती वेळ? ती मोठी शिवराळ झाली तरी 'डिक्शनरी' च्या बाहेर ती तरी नवीन अपशब्द कोठून तयार करणार? शत्रूचीं आतडीं सोलल्यावाचून तिला चैन पडत नसलें म्हणून तिच्याहि हाताला कांही थकवा म्हणून आहेच की नाही? पण या गोष्टीचा, या मानवी दुर्बलतेचा, या नाटकांत मुळीच विचार केला गेला नसून येथून तेथून सर्व पात्रांचीं कातडीं सोलण्याचें त्रासदायक काम मदालसेस देण्यांत आलें आहे. एकाच व्यक्तीचें कातडें किती वेळां सोलावें, ह्याचाहि विचार नाटकांत राहिलेला नाही, आणि ह्यामुळे मदालसेला जेवढे रासा-यनिक अथवा क्लृप्तिजन्य प्रयोग माहीत होते त्या सर्वांचा ती प्रत्येक वेळीं शत्रूची कातडी सोलण्याकडे उपयोग करीत बसलेली आहे. 'मदालसे' ची महत्त्वाकांक्षा राक्षसी असेल; पण तिचे हातपाय कांही राक्षसी नव्हते. मग

हा जो निष्कारण खटाटोप तिच्या पाठीमागे लाविला आहे तो प्रेक्षकांस अनावश्यक वाटला तर मदालसा त्यांचेवर ' एवढाले डोळे ' करील काय ?

ह्या नाटकांतील दुसरी एक त्रासदायक गोष्ट म्हटली म्हणजे पात्रांच्या नांवांची ' उसनवारी. ' हा शब्द जितका ' राक्षसी ' असावयास पाहिजे तितका नाही, पण वाङ्मयव्यवहारांत चोरी हा शब्द अप्रतिष्ठित गणला गेल्यामुळे आम्हांस ' उसनवारी ' हाच शब्द वापरावा लागत आहे. वास्तविक म्हटलें म्हणजे या नाटकांत इतक्या नव्यानव्या व ताज्या ' शिव्या ' आहेत की, हीच कल्पनाशक्ति नवीन नांवें शोधण्याकडे कां खर्च झाली नाही, ह्याबद्दल कांहीच 'कल्पना ' चालत नाही. 'शारदा' पाहिलें की, घे त्यांतला ' कोदंड ', ' देवकन्या ' पाहिली की, घे त्यांतील ' देवांगना ', ' मदालसा ' पाहिली की, घे त्यांतली ' मदालसा', ' मूकनायक ' पाहिलें की, घे त्यांतली ' विक्रान्त-सरोजिनी ', अशा याचकी वृत्तीमुळें संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षेची बरीच शोभा बिघडून गेली आहे असें आम्हांस वाटतें. पात्रांचीं नांवें ठेवायचीं, त्याला इतकें दैन्य कशाला ? संस्कृत, महाराष्ट्र, बंगाली, हिंदी व उर्दू एवढा साहित्यसागर आपल्या उच्च तरंगांनी एवढा आंदोलन पावत असतां जुन्या उष्ट्या नांवांनी आपली कृति विटाळण्याची यत्किंचित् तरी आवश्यकता आहे काय ? संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षेंत जीं दुसऱ्या नाटकांतील पात्रें कान धरून आणलेलीं आहेत त्यांनी जर उद्या पुंडावा केला व आपापल्या मूळ नाटकांत जाऊं म्हटलें तर राक्षसी महत्त्वाकांक्षेमध्ये सरदार व सेवक ह्यांचेवाचून काय शिल्लक राहील ? व मुख्य पार्टीच अशा तऱ्हेने फिरल्यानंतर सरदार व सेवक तरी कितीसा टिकाव धरून राहतील ?

राक्षसी महत्त्वाकांक्षेंतील आणखी एक चमत्कारिक प्रकार म्हणजे पात्रांची बेसुमार खोगीरभरती हा होय. पात्रें आणायचीं किती, याचा ह्या नाटकांत मुळीच हिशोब न राहिल्यामुळें जसा प्रसंग पडला त्याप्रमाणे ह्या नाटकांत पात्रांनी शिरकाव केलेला आहे. आपल्यामुळे कथानकाला शोभा येईल किंवा न येईल ह्याचा त्यांनी तिळमात्र विचार केलेला नाही. हा पात्रांचा जंगी तांडा पाहून भरतमुनी तर ' रामरक्षा ' म्हणावयास लागतीलच लागतील; पण कदाचित् प्रो. छत्र्यांना सुद्धा आपल्या सर्कशींत 'प्राण्यांचा भयंकर संग्रह'

असल्याबद्दलची फुशारकी सोडून द्यावी लागेल. पात्रांच्या अव्यवस्थेचा दोष या नाटकांत इतका विकोपाला गेलेला आहे की, इतर नाटकांतलीं सर्व नांवें संपूनहि 'सरदार' 'सेवक' अशा मोघम नांवांनी पात्रांचा उल्लेख करण्याची पाळी आलेली आहे. शिव शिव ! काय दशा ही !

अव्यवस्थित ग्रथन, आटोकाट आततायीपणा, निष्कारण याचकवृत्ति, उग्रतम उद्दमत्व व विसंगत संगीत एवढे शब्द वापरले म्हणजे संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षेंतील सर्व दोषांचें सविस्तर वर्णन झालें असें आम्हांला वाटतें. परंतु ज्यास नाट्यग्रंथनाचा फारसा सराव नाही त्याचे हातून पहिला दोष हा हटकून व्हावयाचाच, तेव्हा त्याबद्दल एखाद्यास दोष देणें म्हणजे पावसाच्या पहिल्या सरीनंतर पाण्याच्या गढूळपणास नांवें ठेवण्यासारखेंच आहे. आम्हांस आनंद ह्याच गोष्टीचा होतो की, वामन गोपाळ जोशी यांची ही पहिलीच कृति असूनहि वरीलपेक्षा जास्त दोष त्यांचे हातून झालेले नाहीत. नूतन नाटककारांना असभ्य शृंगाराने आपलें कल्पनान्यूनत्व झाकून टाकण्याचा नेहमी मोठा मोह पडत असतो व परवांच्या वसंत व्याख्यानमालेंत चाफेकर या विद्वान वक्त्यांनी सांगितल्याप्रमाणें विनोदाच्या नांवाखाली कांही तरी 'वाह्यात' चावटपणा करून प्रेक्षकांच्या दंतपंक्तीचें उद्‌घाटन करण्याची वेडी हौसहि नाटककारांची पाठ सोडीत नाही. परंतु ह्या दोन प्रकारच्या मोहापासून जोशी यांनी आपलें अंग फारच चतुरपणाने 'चोरून' घेतलें आहे. शृंगाराला मोकळीक न देतां प्रेक्षकवर्गाचे पांचपांच तास मनोरंजन करणें खरोखर फार कठीण आहे. पण जोशी यांनी तें मोठ्या खुबीने घडवून आणलें आहे ह्याबद्दल त्यांची पाठ कोण थोपटणार नाही ?

संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षेंतील अप्रतिम गुण म्हटला म्हणजे त्यांत भरून राहिलेला ओतप्रोत स्वाभिमान हा होय. राक्षसी महत्त्वाकांक्षा हें नाटक अशा थोड्या नाटकांपैकी आहे की, जीं कांही तरी उच्च हेतु पुढे ठेवून लिहिलेलीं असतात. आता एखाद्या नाटकांत प्रत्येक पृष्ठावर मांडूक्योपनिषद् भरून राहिलेलें असूनहि तें अगदी बेचव होईल, व अलीकडील संतविषयक निर्म्मीं नाटकें अशींच असतात असें म्हणावयास कांही हरकत नाही. उलट पक्षीं 'कमला' नाटकासारखीं कित्येक नाटकें कोणत्याहि विशेष उद्देशाने लिहिलेलीं नसूनहि लोकांचें मनरंजन करण्यास समर्थ असतात. नाटकांचा

नेहमींचा अनुभव लक्षांत घेतला असतां हेतुविशिष्ट नाटकेंच अहेतुसिद्ध नाटकापेक्षा लिहिण्यास जड जातात असें कबूल करावें लागतें. परंतु राक्षसी महत्त्वाकांक्षा हें नाटक पहिल्या वर्गातील असूनहि लोकरंजन करण्यांत अग्रगण्य झालें आहे, हें ग्रंथकाराच्या उच्च हेतूचें नशीबच नव्हे काय ?

स्वाभिमान हा सद्गुण असा आहे की, तो सर्वांस पटतो. ज्याचे अंगीं स्वाभिमान आहे त्यास तर स्वाभिमान प्रिय असतोच; पण ज्याचे अंगीं स्वाभिमानाचा गंधहि नाही त्यासहि स्वाभिमानाचा विकास दृष्टीस पडल्याबरोबर प्रशंसापूर्वक टाळी वाजविल्यावाचून राहवत नाही. राक्षसी महत्त्वाकांक्षेचे प्रयोग रंगभूमीवर चालले असतांना टाळयांच्या कडकडाटाने सभागृह जें एकसारखें दुमदुमून जात असतें ह्याचें कारण तेथें जमलेले सर्वच लोक अगदी 'अभिमन्यू' चे अवतार असतात असें मुळीच नाही. किंबहुना स्त्रिया जशा पुरुषाच्या लावण्याचें कुतूहलपूर्वक अवलोकन करीत असतात त्याचप्रमाणें तेथें जमलेले नेभळटहि विक्रांताच्या अलौकिक स्वाभिमानाचें 'आपल्याजवळ नसलेली दिव्य वस्तु' ह्याच बुद्धीने अभिनंदन करीत असतील. तथापि विक्रान्ताचा असामान्य स्वाभिमानच असा आहे की, त्याचे कोणत्याहि काळीं, कोणत्याहि देशांत व कोणत्याहि परिस्थितींत, कोणासहि सानंद आश्चर्यच वाटेल. ही स्वाभिमानाची अत्यावश्यक मात्रा जोशी यांनी महत्त्वाकांक्षेच्या प्रत्येक पृष्ठावर वाचकास सेवन करावयास लावल्यामुळे राक्षसी महत्त्वाकांक्षेचें सध्याच्या नाट्यवाङ्मयांत फारच मोठें महत्त्व आहे हें आम्ही संतोषपूर्वक नमूद करितों.

दुष्ट महत्त्वाकांक्षा परिणामीं कशी संकटावह असते, हें दाखविण्याचा या नाटकाचा दुसरा उद्देश आहे, परंतु महत्त्वाकांक्षेचें हिडीस स्वरूप दाखविण्याचें अवघड काम जोशी ह्यांस चांगलेंसें झेपलेलें नाही. खूबसूरत बलेपेक्षासुद्धा ह्या नाटकांतील मदालसेचें चित्र कांही ठिकाणीं जास्त आततायी, तर कांही ठिकाणीं अगदी पुळचटपणाचें झालेलें आहे, हें आम्ही वर एके प्रसंगीं दाखविलेंच आहे. जास्त मार्मिकपणाने हें नाटक पाहिल्यास मदालसेच्या कृत्यांत अमानुष क्रूरपणाच भरला असून जिला 'महत्त्वाकांक्षा' म्हणतात त्या मनोभावनेचा अल्पांशहि नाही, असेंच कबूल करावें लागेल. परंतु मदालसेच्या चित्राच्या कमतरतेमुळे या नाटकाचें कांहीएक अडलेलें

नाही. विक्रान्त व सरोजिनी हीं दोन चित्रें या नाटकांत इतकीं उदात्त, इतकीं प्रबल मनोवृत्तीचीं, इतकीं 'वफादार,' इतकीं बेगुमान व उठावदार झालेलीं आहेत की, त्यांच्यापुढे मदालसेचें कांही महत्त्वच वाटेनासें होतें. विक्रांत व सरोजिनी या दोन व्यक्तींचे स्वभाव म्हणजे उदारनीतीशीं संलग्न असलेल्या शिक्षणाच्या एका प्रधान अंगाचे उत्तम निदर्शक आहेत. व्यक्ति, समाज, राष्ट्र अथवा साम्राज्य, ह्यांच्या अंगीं जर कधीं टिकाऊ-पणा यावयाचा असेल तर विक्रांत सरोजिनी ह्यांचा बहुमोल कित्ता रात्रंदिवस डोळ्यांपुढे ठेविला पाहिजे. आता आपल्या बायका जर 'सरो-जिनी' प्रमाणे निपजल्या तर आपली धडगत लागणें कठीण आहे असें कदाचित् कांहीं रडक्या नवऱ्यांना वाटण्याचा संभव आहे; पण 'पति' होणें ह्या पवित्र कल्पनेचा अर्थ बायकोपेक्षाहि 'काकणभर' धैर्यवान् निष्ठाशील, निश्चयी व कंटक असणें असा आहे. नुसतें 'कुंकवाला धनी होणें' असा नव्हे, हें ज्यास मान्य असेल त्यांना राक्षसी महत्त्वाकांक्षेमुळे आपली बायको हातची जाईल अशी कधीहि भीति वाटणार नाही.

राक्षसी महत्त्वाकांक्षेंत कोणते दोष आहेत ते आम्ही प्रथमत: दाखविले आहेत. परंतु या नाटकांत यापेक्षा शतावधी दुसरे दोष असूनहि जरी विक्रांत आणि सरोजिनी हीं दोन पात्रें असतीं तरी हें नाटक संग्राह्यच असें आम्हांस वाटलें असतें; परंतु आम्हीं मागे सांगितल्याप्रमाणे या नाटकांत अवगुणांचें माप परिमित आहे. प्रेमविषय प्रधान न करितां नाटकास गोडी आणण्याचा जो साहसाचा उपक्रम जोशी यांनी केलेला आहे त्याची तर वाखाणणी करावी तेवढी थोडीच आहे. ह्या कामांत त्यांना यशहि उत्तम मिळालें आहे, ही गोष्ट सर्व नाटकलेखकांनी मुद्दाम लक्षांत ठेवण्यासारखी आहे. या नाटकांतील भाषा प्रौढ, रस-विशिष्ट व मनोभावनांना प्रज्वलित करणारी आहे व नाटकांत जो सर्वत्र एक प्रकारचा बेफिकीर धैर्यवानपणा दिसून येतो त्यामुळे तर प्रेक्षकांस आल्हाद वाटतो. उर्दू नाटकांवरून मराठी नाटककारांस आजपर्यंत बरींच नाटकें सुचलीं आहेत पण त्या नाटकांतील साहजिक वीरविक्रम जसा ह्या नाटकांत दिसून येतो तसा इतरत्र क्वचितच दिसत असेल. ह्या नाटकांत संगीताला स्वाभाविक स्थळ नाही हें आम्ही वर सांगितलेंच आहे;

पण अशा अडचणींत असतांनासुद्धां जोशी यांची काव्यप्रतिभा आपलें तेज चांगलें व्यक्त करीत आहे! संगीत राक्षसी महत्त्वाकांक्षा व अलीकडील इतर संगीत नाटकें ह्यांची तुलना केल्यास ह्या नाटकांतील पदें फारच शुद्ध व सरस ठरतील. पदांतील शब्दांची ठेवणहि मनोरम आहे व कवि जर गायकी लोकांच्या फार मुठींत गेले नसते तर तालासुराच्या ज्या कित्येक अल्पस्वल्प चुका राहून गेल्या आहेत, त्या खात्रीने तशा राहिल्या नसत्या. नाटकांचे प्रयोग होऊन जरी फार काळ लोटलेला नाही तरी इतक्या अल्पावधींतच 'लावि चटक गुणगाना,' 'मजला प्रेम-सुरस-रस पीतां,' 'मी नवबाला,' 'प्रेम बाइ हें वेडें,' वगैरे सुंदर पद्यें प्रेक्षकांच्या कंठाग्रीं गुणगुण करूं लागलीं आहेत. नाटकांतील प्रेमप्रसंग जरी मुद्दाम आणल्यासारखे दिसतात तरी जेवढे असे प्रसंग आहेत तेवढे फारच कवित्वप्रदर्शक आहेत. नाटककर्त्यांनी परस्परविरुद्ध सर्व प्रसंग एकाच नाटकांत घालण्याची जर महत्त्वाकांक्षा धरली नसती तर घातलेल्या प्रसंगांतून निरनिराळ्या मनोवृत्तींचीं निदर्शक अशीं तीन नाटकें जोशी यास निर्माण करतां आलीं असतीं; आणि तसें त्यांनी केलें असतें तर एखाद्या रेल्वेच्या डब्यांत जसे फर्स्ट क्लासच्या एका डब्यांत युरोपिअन व पार्शी युवती, शेजारच्या सेकंड क्लासांत मद्रासी 'इडुगुडु' व लगेच सर्व्हंट्स् कंपार्टमेंटमध्ये घामट बबर्जी अशी जी विचित्र सृष्टि दिसते तशी न दिसतां जोशी यांच्या सर्वच कृति फार मनोवेधक झाल्या असत्या. उदाहरणार्थ, या नाटकांत पुतळीचा जो एक प्रवेश आहे तोच एखाद्या रम्य कथानकाचें मध्यसूत्र होण्याच्या लायकीचा नाही काय? पण तो मदालसेच्या धांगडधिंग्याखाली विनाकारण चेंगरून गेला आहे. नाट्यविषय भिन्नभिन्न केल्याने नाटकाच्या पुस्तकास आटोपशीरपणा आला असता, पण पहिल्या कृतींत मुद्धा असले दोप न राहते तर ती पहिली कृति कसली? ह्याकरितां ग्रंथकार जोशी यांस या सर्व दोषांचें माफीपत्र आम्ही अर्पण करितों व त्यांच्या विक्रांत–सरोजिनीमुळे रसिकांस त्यांचें नाटक फार आदरणीय झालें आहे, असें त्यांना आश्वासन देतों.

● ● ●

६

# टिळकांची कविता

['राक्षसी महत्त्वाकांक्षा'मध्ये अच्युतरावांची भूमिका अतिशय खेळकरपणाची आहे. या ठिकाणीं ते गंभीर पातळीवरून लिहीत आहेत. अच्युतरावांजवळ रसिकता व गुणग्राहकता भरपूर असली तरी त्यांचे समकालीन टीकाकार बाळकृष्ण अनंत भिडे यांच्यासारखे आधुनिक कवितेकडे पाहाताना अच्युतराव थोड्याशा तिरक्या नजरेनेच पाहातात. याकाळीं मराठी कवितेंत नवीनच आलेल्या आत्मपरतेचा (Subjectivity) आपण मोठा विशेष मानतों परंतु अच्युतरावांनी 'अत्युग्र गर्विष्ठपणा' म्हणून त्याला ठपकाविलें आहे.]

* * *

हात जोडितों, पदर पसरितों, दन्तीं धरितों तृण,
चुम्बितों चरणाला! नका शिवूं मम कवनाला

(कवीची विनवणी)

आधुनिक कवि रेव्हरंड श्रीयुत नारायण वामन टिळक ह्यांच्या काव्याचा प्रथम भाग 'टिळकांची कविता' या एकेरी नांवाने नुकताच प्रसिद्ध झाला आहे. ह्या भागांत टिळकांच्या कवितेचे ८७ गुच्छ प्रसिद्ध झालेले आहेत. असेच आणखी कांही भाग ह्या भागाचे प्रकाशक भास्कर कृष्ण उजगरे, हे महाराष्ट्र वाचकांपुढे मांडणार आहेत. प्रस्तुत भागांतील कवितांची निवड करतांना श्री. त्र्यंबक बापूजी ठोमरे ह्यांनी आपलें सहाय्य दिलें व प्रूफें तपासण्याचें काम श्रीयुत एकनाथ पांडुरंग रेंदाळकर ह्यांनी "सर्वस्वीं" आपणावर घेतलें. अमेरिकन मराठी मिशन ह्या ख्रिस्ती संस्थेने श्री. टिळकांस प्रोत्साहन देऊन त्यांचेकडून गद्यपद्यात्मक वाङ्मय तयार

करविलें. श्रीयुत टिळकांची कविता इंग्रजींतहि भाषांतरित होऊन 'बहुधा याच नांवानें' प्रसिद्ध होणार आहे. श्रीयुत टिळक ह्यांचे "विद्वान् मित्र" नरसिंह चिंतामण केळकर ह्यांनी या पुस्तकाचा उपोद्घात लिहिला व ह्याशिवाय जे चार शब्द राहिले ते श्रीयुत उजगरे ह्यांनी पुरते करून टिळकांची कविता करग्रहण योग्य केली आहे.

इतक्या शिफारसी घेऊन "टिळकांची कविता" जगापुढे आल्यामुळे एखादा साधारण वाचक गोंधळून जाऊन "मेलो रे बाप्पा" उद्गार काढील व कवितेचें गुणदोषनिरीक्षण करण्याचें त्यास भानच रहाणार नाही. काव्यवाङमयांत रे. टिळक हा शब्द इतका भीतिप्रद झालेला आहे की, तो ऐकल्याबरोबर सर्व टीकाकार आपापल्या लेखण्या कलमदानांत ठेवून दौत-वाळूदाणासकट पोबारा करतील. ज्युलिअस सीझर ज्याप्रमाणें I went, I saw,I conquered, "मी गेलों, डोळा टाकला, की चीत केलें" अशाच भरारीनें परकीय राष्ट्रांना चीत करीत असे, त्याप्रमाणें टिळकांची कविता एखाद्या मासिकांत अवतीर्ण व्हावयाचा अवकाश की तिच्यावर, "अहा कविते, अहा कविते," अशा प्रेमप्रशंसेच्या अंजलि येऊन पडावयाच्याच. ज्या कवीला विजय-संचाराची एवढी सवय त्यानें शिरोभागीं उद्धृत केलेल्या वृत्तखंडांत म्हटल्याप्रमाणें 'पदर पसरावयाची' व 'दातीं तृण धरावयाची' कोणती गरज? कवीच्या विनयशालित्वाच्याच स्फूर्तीची ही एखादी ठिणगी नसेल ना?

परंतु टिळकांच्या कवितेंतील 'कवीच्या विनवणी' पासून तों त्यांतील शेवटचा 'बोंबाबोंब' वाचीपर्यंत विनयशालित्वाची फारशी खूण सापडेल अशी जर कोणाची कल्पना असेल, तर ती मात्र चुकीची आहे. कवीनें विनयशालित्वाच्या मोहापासून स्वतःस फार विवेकानें आवरून धरलें आहे, आणि यामुळे ह्यांतील प्रदीप्ताग्नि कोळशावर कोणीहि पाऊल टाकलें तरी त्याच्या पायास चटके बसून शिवाय त्यामुळे काळे मिचकूट झालेले पाय धुवून काढण्यास तुकारामबोवांच्या 'आधुनिक वेदान्त' लीनतेचा बराचसा साबण खर्ची घालावा लागेल.

"प्राचीन कवि" व "अर्वाचीन कवि" असा जो अलीकडे तंटा सुरू झालेला आहे, व ज्यांतील एका पथकाचें धुरीणत्व रे. टिळक व पूर्वोक्त

"ठोमरे (बालकवि)" आणि "रेंदाळकर" ह्यांचेकडे आहे, व ज्यांतील दुसऱ्या पथकाचें पुरस्कर्तृत्व श्री. पांगारकर, आजगावकर, इत्यादि मंडळींनी आपल्याकडे घेतलें आहे, त्या तंटयांतील पहिल्या पक्षाची "विजय-पताका" म्हणून कित्येक लोक प्रस्तुत पुस्तकाचा उपयोग करीत आहेत. वास्तविक पाहता "प्राचीन कविता व अर्वाचीन कविता" हा भेदच अत्यंत चुकीचा आहे. कालगणनेचे लाकडी 'पार्टिशन' अथवा कूड मध्यंतरी घालून एक कविता दुसरीपासून भिन्न आहे, असें म्हणणें ह्यासारखा भेदकर्तृत्वाचा दुसरा कोणताहि दुरुपयोग नाही व हाच भेदविचार कडेलोटापर्यंत नेला म्हणजे कवितेच्या नूपुरांपुढे नाच घालण्याकरिता कंबर कसणारा प्रत्येक नवीन कवि रोजच्या रोज अर्वाचीन ठरून "काल" च्या कवीला प्राचीन म्हणूं लागेल. सर्व काल एकदम मोजता येत नाही. म्हणून कालाचे शतकांच्या अगर युगांच्या रूपाने तुकडे पाडीत असतात. ह्या तुकडयांच्या मिषाने कवितेच्या रमणीय रूपावर घाव घालून त्यांची "प्राचीन" व "अर्वाचीन" अशीं शकलें पाडणें हा कुठला, 'जर्मनपणा'? कवींचे, पंधराव्या शतकांतले कवि, अठराव्या शतकांतले कवि, असे वर्ग करण्याचा वाङमयव्यासंगी लोकांचा संप्रदाय आहे, पण त्याचें कारण त्यांच्यांत खराच 'जातिभेद' आहे असें नव्हे तर सर्व रत्नें एकाच थैलींत न मावल्या-मुळें त्यांस नव्या थैल्या खोलाव्या लागतात हें होय. परंतु ह्या एवढयाच वरून एकोणिसाव्या थैलींतलीं रत्नें अठराव्या थैलीपेक्षा जास्त किंमतवान असतात असा सिद्धान्त बांधणें अथवा ह्याच्या उलट अनुमान काढणें ह्या सारखी दुसरी प्रमादशील कल्पना कोणतीहि नसेल. काल हा अगाध आहे, काल हा अनुबंधी आहे. तो ही कविता वामनाने लिहिली किंवा वामनपुत्राने केली ह्याची कशाला व्यर्थ पंचाईत करील ?

आधुनिक कवितेचें एखादें लक्षण बांधावयाचें असेल तर गर्विष्ठपणाच्या मुद्द्यावर मात्र बांधतां येईल, कारण गर्विष्ठपणाच्या स्फूर्तीला जसा आधुनिक काळांत महापूर आलेला आहे तसा पूर्वी कधी तरी आला असेल की नाही याविषयीं शंकाच वाटते. गर्विष्ठपणा हा धार्मिक नीतिबंधनाप्रमाणे षड्रिपूं-पैकी एक रिपु गणलेला आहे, परंतु आधुनिक युगांतील कवि त्यास रिपु मानीत नाहीत. एवढेच नव्हे तर त्यांचें व गर्विष्ठपणाचें चांगलेंच सूत

असावेसें वाटतें. आधुनिक काळांतील कित्येक कवींना आपली स्फूर्ति अत्यंत ओजस्वी "मूकपणा"ची (हें originality चें भाषांतर आम्हीं एका आधुनिकाकडून घेतलें आहे.) दिव्य व अशंकनीय वाटतें व एवढ्या भावनेवर त्याची काव्यस्फूर्ति इतकी बेफामपणानें भरधाव धावत सुटते की त्याखाली समंजसपणाचा अगदी चुराडा होऊन जातो. गर्विष्ठपणाची व आधुनिक कवींची इतकी सोयरिक कां जमली हें सागणें फारसें कठीण नाही. जेथें गर्विष्ठपणाला आदरानें खुर्ची दिली जाते तेथें त्याच्या आगमनाविषयीं चर्चा करून तरी काय फायदा ?

अत्युग्र गर्विष्ठपणाचा असह्य गंध रे. टिळकांच्या कवितेंत पदोपदीं येत असल्यामुळे तिचें सौंदर्य फार महाग झालें हें टिळकांची कविता हातीं घेणाऱ्या प्रत्येक वाचकास आढळून येईल अशी आमची समजूत आहे. टिळक कवि नाहीत किंवा नसावेत असें आमचें मुळीच म्हणणें नाही. टिळकांनी कविराजत्वाचा बहुमान मिळवावा, आतांप्रमाणेच आणखी पुष्कळ कवित्वप्रबंध लिहावेत. त्यांच्या पांढऱ्या शुभ्र दाढीप्रमाणें त्यांचें शुभ्र यश महाराष्ट्रभर पसरावें व सर्वांनी त्यांच्या कवितेचें कौतुक करावें ह्यांत आम्हांला आनंद आहे. परंतु एखादा मनुष्य कवि असला तर त्यानें लगेच लोकांना दणके द्यावयास कशाला आरंभ करावा ? तुम्ही कवि असलांत तर खुशाल चांगली कविता करा. पण त्याची वर्दळ शेजाऱ्यापाजाऱ्यांना काय म्हणून ? तुम्ही कवि असला तर सत्काव्य हेंच तुमच्या काव्यशक्तीचें प्रमाण आहे. पण अशी काव्यें मोठ्या प्रमाणावर निर्माण करावयाची सोडून जेव्हा ह्याला ढोस, त्याला चिमटे घे, तिसऱ्याला अरसिक म्हण, चवथ्याला फालतूत काढ, अशा बेफाम रीतीनें तुम्ही सुंदर काव्योपवनांत धिंगाणा घालूं लागता त्यावेळी एखाद्या दर्पोद्धत दन्तीप्रमाणें प्रत्येक काव्यरसिकाला तुमच्या कवितेविषयीं भय वाटू लागून, काव्योपवन कमी फुललेलें पत्करलें, पण ही हेंगडमस्ती नको असें त्यास होऊं लागते.

अर्वाचीन कवितेंत रे. टिळकांना जें अग्रस्थान प्राप्त झालेलें आहे तें केवळ त्यांच्या काव्यगुणांमुळे नव्हे हें सहज कोणासहि कळून येणारें आहे. रे. टिळक हे चांगल्यापैकी कवि नाहीत असें आमचे मुळीच म्हणणें नाही. त्यांच्या कवितेसंबंधानें आमचें मनांत अत्यंत प्रेम व सन्मान आहे व हें

त्यांच्या " माझी भार्या" पासून तों त्यांच्या "वीररसप्रधान" "बोम्बाबोंवी" पर्यंत अक्षय टिकलेलें आहे. टिळकांच्या कवितेंत सहजपणा, गोडी, सुलभता, मोकळेपणा, विषयानुवृत्तित्व appropriateness हे गुण असतात हे कोणीहि कबूल करील आणि ह्या गुणांमुळे टिळकांची कविता जी जन्म पावली ती वरिष्ठ पदवीस पात्र होण्याकरितांच जन्म पावली ह्या संबंधानें आम्हांस कांहीएक संशय नाही. टिळक ब्राह्मणपणाचा त्याग करून ख्रिस्ती झाले नसते तरीहि त्यांची कविता महाराष्ट्रांत लौकिकास चढली असती आणि टिळक उद्या ख्रिस्ती धर्म सोडून एखादे मुसलमान मौलवी बनले तरीहि त्यांच्या कवितेस महाराष्ट्रभर सत्कीर्तिहि प्राप्त झालीच पाहिजे. परंतु टिळकांची कविता निसर्गतः कितीहि उज्ज्वल असली तथापि त्यांच्या ख्रिस्ती-धर्म-स्वीकारानें त्यांच्या कवितेच्या उज्ज्वलपणांत भर पडलेली नाही असें मात्र म्हणतां येणार नाही. ख्रिस्ती-धर्म स्वीकारानें त्यांच्या एकंदर परिस्थितीस जें एक प्रकारचें गौरव प्राप्त झालें व ज्यामुळे दुरभिमानाच्या घट्ट चावीनें बळकटपणें बंद केलेलीं सन्मानकपाटें त्यांच्याकरिता एकदम उघडलीं गेलीं, त्याचा परिणाम त्यांच्या काव्यउज्ज्वलतेवरहि कांहीएक झालेला नाही असें म्हणणें म्हणजे वस्तुस्थितीविषयीं अज्ञान प्रगट करणेंच होय. रे. टिळक हे ख्रिस्ती होण्याऐवजी जर ब्राह्मणच राहिले असते तर त्यांच्या कवितेस प्रकाशांत येण्यास सध्यांपेक्षां कितीतरी जास्त प्रयास पडले असते. रे टिळकांची कविता प्रकाशांत येण्याजोगी आहे याविषयीं कोणाचाच वाद नाही, परंतु त्यांच्या ख्रिस्तीपणानें, प्रकाशाचे किरण त्यांच्यावर फार लवकर व फार सौकर्यानें पडले हें निःसंशय आहे. आज प्रत्येक मासिककर्ता व प्रत्येक काव्यसंग्राहक रे. टिळकांचे उंबरठे झिजवीत आहेत. परंतु रे. टिळक रेव्हरंड असण्याच्या ऐवजीं जर महामहोपाध्याय अथवा वेदमूर्तीच राहिले असते तर त्यांचे उंबरठे झिजवावयाचे राहोच, पण प्रकाशांत येण्याकरितां त्यांनाच लोकांचे किती उंबरठे झिजवावे लागले असते ह्याची गणति करतां येणें कठीण आहे. रे. टिळक हे कवि आहेत हें तर खरेंच, पण ते ख्रिस्ती आहेत हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे, आणि हें सर्व लक्षांत ठेवूनच त्यांच्या काव्यकीर्तीचें प्रमाण बांधलें पाहिजे.

कांही कांही काळांत कांही कांही व्यक्तींना कीर्तिद्वार जास्त सुलभ होतें

हा कालाचा गुण आहे व ह्याबद्दल त्या कालाचें प्रसंगीं अभिनंदन करावें लागतें. सध्यांचा काळ असा आहे की, पुरुष असण्यापेक्षा स्त्री असण्याने जास्त लवकर कीर्ति पसरते, आणि हिंदु समाजांत जर कीर्ति हवी असेल तर हिंदु असण्यापेक्षा अहिंदु असल्याने ती जास्त लवकर प्राप्त होते. आपल्या बरोबरीच्या शिक्षणाच्या युवतींचे निबंध अथवा भाषणें लोकसमाजांत जास्त मान्य अथवा वाचनीय ठरलेलीं पाहून अथवा त्यांच्या वाचनावर मोठमोठे सन्मान्य वृद्ध विद्वानसुद्धा मिटक्या देत बसलेले पाहून कितीतरी अल्पवयी कुमारांना 'बाबांच्या पोटी मी कपाळकरंटा बन्या जन्मलों त्यापेक्षा एखादी सुंदर बबी जन्मलों असतों तर किती उत्तम झालें असतें' असें वाटत असेल. सजातीयासंबंधाने सुद्धा पाहता एखाद्या परजातीय ॲनी बेझंटच्या वचनाने जितके लोक प्रीति-भोजनाला उत्सुक होतात तितके रानडे अथवा भांडारकर ह्यांनी कानी कपाळी सारखी ओरड केली तर होत नाहीत असा अनुभव जास्त दिसून येतो. ह्या अनुभवाचा रे. टिळकांच्या कवितेला पूर्ण फायदा मिळालेला आहे आणि आमची खात्री आहे की रे. टिळकांचें 'ख्रिस्तायन' प्रसिद्ध होतें न होतें तो त्याच्यांतील काव्यरसाची इतकी वाहवा होईल की त्याचे पाट मुंबई-पुणें येथील मासिकांच्या पृष्ठांतून प्रचंड ओघाने वाहूं लागतील.

वास्तविक पाहिलें की, रे. टिळक जी जी कविता लिहितात त्यांत रसाचा इतका ओलावा असतो की त्यामुळे त्यांच्या कवितेंत जी जी मनोवृत्ति ग्रथित झालेली असेल तिला पाझर फुटून तिच्यामुळे वाचकांचें हृदय सद्‌गदित झाल्यावाचून रहात नाही. भक्तिरसाची भट्टीहि रे. टिळकांना अत्युत्तम साधते व "वेडा झालों खरा" वगैरे त्यांचीं जीं अत्युत्तम पद्यें आम्ही अवलोकन केलेलीं आहेत, त्यावरून भक्तिरसाने हृदयाचें काठिण्य सर्वथैव विरघळून टाकण्याचें अत्युत्कृष्ट सामर्थ्य त्यांच्या कवितेंत आहे हें आम्ही आनंदाने निवेदन करतों. परंतु टिळकांची ही भक्तिप्रभावता अनन्य (Exclusive) आहे व भक्तीच्या अतिरेकाने महाराष्ट्रांतील दुसऱ्या कोणाचेंहि हृदय भरून जात नाही असें मात्र नाही. महाराष्ट्रांत असे कित्येक कवि आहेत कीं एखाद्या एकान्तनिष्ठ ख्रिस्ती मनुष्यास ख्रिस्ती नामोच्चाराबरोबर जितकें प्रेमाचें

भरतें येईल तितकेंच त्यास 'पाण्डुरंग' अथवा 'रामचंद्र' ह्यांच्या नामोच्चाराबरोबरहि येईल; परंतु हिंदु समाजाची व हिंदु अभिरुचीची अशी विचित्र स्थिति झालेली आहे की, रे. टिळकांच्या ख्रिस्तायनाची प्रशंसा करण्याकरता ज्या मासिकाचीं पृष्ठें उत्कंठेने वाट पहात बसलेलीं असतील त्याच मासिकाकडे एखादे 'पांडुरंगाष्टक' जाऊं द्या म्हणजे त्यास गचांडी मिळेल. इतकेंच नाही, तर त्या मूर्खत्वाबद्दल त्यास दुष्ट उपहासाचें बक्षिस मिळाल्यावाचून कधीहि रहाणार नाही.

आमच्या म्हणण्याचा आशय इतकाच की, रे. टिळकांचें काव्यतेज स्वभावतःच जरी बरेच धवल आहे तरी त्याचा धवलिमा जास्त प्रखर करण्यास त्यांच्या ख्रिस्तीपणाचाहि चांगला उपयोग झालेला आहे. रे. टिळकांच्या कवितेचा विचार करतांना काव्यसुकीर्तींत त्यांच्या ख्रिस्तीपणाचा विचार अवश्य केला पाहिजे व काव्यगुणपरीक्षणांत ते ख्रिस्ती आहेत हें निखालस विसरलें पाहिजे. रे. टिळक हे कोणत्या प्रकारचे कवि आहेत हें पारखतांना ते ख्रिस्ती आहेत की मुसलमान आहेत ह्या गोष्टींचा शोध करणें अत्यंत अनुचित होय. परंतु रे. टिळक यांच्या प्रसिद्धीचा विचार करीत असतांना ते ख्रिस्ती आहेत हें कधीहि विसरून भागावयाचें नाही. आम्हीं टिळकांच्या कवितेचें जें परीक्षण केलेलें आहे तें टिळक हे ख्रिस्ती आहेत हें पूर्णपणें विसरून केलेलें आहे. परंतु टिळकांच्या कीर्तीची भराभर मापें पडतांना पाहून ज्या वाचकांना सानंद विस्मय वाटत असेल त्यांना आम्हीं एवढेंच सांगतों की, त्यांची कीर्ति अजमावतांना टिळक हे ख्रिस्ती आहेत हें कधीहि विसरूं नका.

बाळबोध सोपे शब्द, बाळबोध भल्या कल्पना, बाळबोध साधी रचना, आणि बाळबोध लाजाळू प्रतिभा हे रे. टिळकांच्या कवितेंतील विशेष गुण आहेत आणि ह्या गुणांमुळे फारसे ललित-नर्तन न करतांना सुद्धा टिळकांच्या कवितेवर रसिकांना लोभ करावासा वाटतो. टिळकांची कविता म्हणजे खेडेगांवांतील पाटलाचीच मुलगी होय. उच्च कुळ, परंतु फार श्रीमंत नाही; गावांत दरारा, परंतु फार अधिकार नाही; सर्व अवयव गोंडस, पण फार अंगराग नाहीत; यांत प्रेमळपणाने नेत्र डबडबलेले, परंतु फार तिरवे कटाक्ष नाहीत; हृदयांत मधुर विकार फार, परंतु फार वाक्चातुर्य नाही;

अशी साधी, देखणी, सशक्त, पाणीदार अशी रे. टिळकांची कविता आहे. रे. टिळकांची कविता म्हणजे कोणी राजकन्या नव्हे की मानवी कल्पनेने निर्माण केलेलीं सर्व भूषणें तिच्या अंगावर सापडतील. रे. टिळकांची कविता म्हणजे कोणी वसंतसेनाहि नव्हे की तिच्या केवळ नूपुरनादाने सद्गुणी चारुदत्तसुद्धा व्याकुळ होऊन जातील. रे. टिळकांची कविता ही पाटलाची मुलगी आहे. तिचा स्वीकार केला तर प्रेमाचें पारणें फिटेल, अनुराग सार्थ होईल, स्मृतीची धन्यता वाटेल व संसार सुखाचा होईल; परंतु राजकन्येशीं विवाह केल्याचा बडेजाव, कविकन्येशीं विवाह केल्याची बुद्धिकुशाग्रता अथवा वसंतसेना फिदा झाल्याचा आनंदकल्लोळ, तिच्या योगाने कधीहि प्राप्त होणार नाही.

आणि म्हणूनच टिळकांची कविता आपली खरी चारुता विसरून ज्यावेळीं गर्वाने नाक चढवूं लागते त्यावेळीं तिच्यापासून सौंदर्याधिक्य दिसून येण्याच्या ऐवजीं तिचें नाक मात्र वाकडे दिसतें. रे. टिळकांनी कविता लिहिलेली आहे व सत्कविताहि लिहिलेली आहे हें आम्हास मान्य आहे, परंतु ह्या कवितेने सौंदर्याचे कांही विशेष ध्वज लावलेले आहेत अथवा लावण्याची कांही विशेष ज्योति पाजळलेली आहे असें मात्र कधी म्हणता येणार नाही. किंबहुना, कल्पनाप्राधान्य हेंच कवितेचें सर्वस्व आहे असें मानणारा जो रसिकवर्ग आहे तो टिळकांच्या कवितेला 'कविता' म्हणावयास सुद्धा कबूल होणार नाही. आम्हांस हें मत अर्थात्च मान्य नाही. भावना-प्राधान्य (Depth of Sentiment) हें सुद्धां कविता होऊं शकतें; इतकेंच काय, परंतु आविष्करण-चारुता (Beauty of Expression) हें देखील एखाद्या पद्यावर कवित्वाचा शिक्का मारावयास पुरेसें होतें, ह्या म्हणण्यांतहि पुष्कळसा समर्पकपणा आहे आणि टिळकांचें काव्य त्यास जर काव्य म्हणवून घ्यावयाचें असेल तर, रसिकांच्या पहिल्या वर्गापेक्षा दुसऱ्या वर्गाकडेच त्यांना आपली शिफारस लावून घेतली पाहिजे, हें उघड आहे. परंतु एवढ्याने टिळकांची कविता आपल्या स्थानापासून कधीहि भ्रष्ट होणार नाही. पहिल्या वर्गातील रसिकांच्या निंदेमुळे रुसून जाऊन टिळकांची कविताकन्या जर माहेरीं जाऊं म्हणेल तर महाराष्ट्र-सरस्वती तिला तसें कधीहि

करूं देणार नाही. पाटलाची मुलगी झाली म्हणून 'तिजला पतिसुख नसेल का?' असे विचारण्याचा प्रत्येक मातेस अधिकारच आहे आणि हा अधिकार गाजवन महाराष्ट्रसरस्वती टिळकांच्या कवितेस आग्रहाने रसिक-मंदिरांत वसवील असा आम्हांस पूर्ण विश्वास आहे.

परंतु टिळकांची कविता ही ह्या मानधनत्वाच्या रुसव्याचे फार पलिकडे गेलेली आहे. तिला असें वाटूं लागले आहे की, मी सर्वतः परिपूर्ण आहे, मलाच काय तें सर्व समजतें आहे, माझ्याइतकें नाजूक कोणी नाही, आणि मी आज्ञा करीन ती सर्वांनी शिरसामान्य केली पाहिजे. आपल्या कन्येचा हा तोरा पाहून तिच्या म्हाताऱ्या बापाला—टिळकांनाहि भोळेपणाने असे वाटू लागले आहे की, ह्या माझ्या मुलीला मी कुठे ठेवूं आणि कुठे न ठेवूं ? मुलीच्या बापाला तिचें सौंदर्य म्हणजे रतीचें सौंदर्य वाटावें हें योग्यच आहे व त्यांत त्याच्या आंधळेपणापेक्षा प्रेमळपणाच जास्त व्यक्त होतो. परन्तु बापाला जरी आपली कन्या सेमिरामिस राणी वाटत असली तरी त्याने चारचौघांत तसले उद्‌गार काढावे आणि कोणी तिच्यासंबंधाने जरा भिन्न मत प्रदर्शित केल्याबरोबर प्रतिशब्द बोलावयास लागावें हें अत्यंत विचित्र आहे. " हात जोडितों, पदर पसरितों, दन्तीं धरितो तृण, चुम्बितों चरणाला नका शिवूं मम कवनाला" हे रे. टिळकांचे जे उद्‌गार आम्हीं आरंभींच उद्‌धृत केलेले आहेत ते ह्याच मासल्याचे होत, आणि असल्या निष्कारण बावचळलेल्या उद्‌गारांनी टिळकांच्या कवितेंतील रसोद्‌गमावर पाणी पडत आहे हें कोणासहि वाटल्यावाचून रहाणार नाही. कवीला आपल्या कवितेचा कितीहि अभिमान असला तरी तो प्रमाणांत असला तरच शोभतो, हें प्रमाण बिघडलें की कवीचे जितके गुण असतील तितके ते हास्यालाच पात्र होतात. आम्हीं पुन्हा म्हणतों की रे. टिळकांची कविता खरोखरच मनोरम आहे, परंतु हें मनोरमत्व एखाद्या विशिष्ट परिमितीचें आहे. टिळकांच्या कवितेचें सौंदर्य पाटलाच्या मुलीसारखे आहे. परंतु हें विसरून जर टिळकांची कविता गर्वाचा झणत्कार व आढ्यतेचा फणत्कार करूं लागेल तर, "पोरी तूं पाटलाची पोर आहेस" असे रे. टिळकांच्या कवितेला बजावल्यावाचून कोणीहि राहणार नाही.

● ● ●

७

# महाराष्ट्र नाट्यकलेचा शृंगारसाज

[ वृत्तपत्रसृष्टिइतकीच नाट्यसृष्टिहि अच्युतरावांना अधिक जवळची. अनेक नाटकें लिहून, नाटकमंडळ्या स्थापन करून, स्वत: व स्वत:च्या पत्नीलाहि रंगभूमीवर उभे करून अच्युतराव नाट्यसृष्टींत कमालीचे रमले. त्यामुळेच या लेखांत आपल्या पूर्वसूरींचें अचूक मूल्यमापन आदरबुद्धीने ते करताना दिसतात.]

* * *

महाराष्ट्रांत नाट्यकलेला सुरुवात कै. भावे यांनी केली ही गोष्ट सर्वश्रुतच आहे. ही सुरुवात सांगली येथे झाली व बरेच दिवस महाराष्ट्रांत अशी पद्धति पडून गेलेली होती की, नटाच्या धंद्यांत जीं माणसें शिरायचीं तीं सांगली, मिरज, कोल्हापूर, कुरुंदवाड इकडचीं असायचीं. अजूनसुद्धा ही पद्धति अजिबात मोडलेली नाही, पण अलीकडे गोवा हें नटांचें नवीन बंदर खोललें गेलेलें आहे, आणि जरी ह्याचीहि परंपरा कै. दत्तोपंत हल्याळकर ह्यांच्या गोवा संगीत मंडळीपर्यंत नेऊन भिडविता आली, तथापि आजकाल अशिक्षित आणि सुशिक्षित अशा दोन्ही प्रकारच्या लोकांचा ओढा नाट्यकलेकडे 'धंदा' या दृष्टीने जास्त सुरू झाल्यामुळे नाट्यव्यवसायी लोकांचें एकच मुख्य "सेण्टर" आता राहिलें नाही. सर्कशीच्या धंद्यांत मात्र अजून तासगांवकडेच अग्रमान आहे. हा अग्रमान हिसकावून घ्यायला अजून एकहि महत्त्वाचें शहर तयार झालेलें नाही.

कै. भावे ह्यांच्यापासून तो कै. अण्णासाहेब किर्लोस्कर ह्यांच्यापर्यंतचा मराठी रंगभूमीचा इतिहास जरी बराच मनोरंजक आणि महत्त्वाचा असला आणि ह्या काळांत रंगभूमीवर पराक्रम गाजवून गेलेले जरी अनेक महा-

राष्ट्रीय नट झालेले असले तथापि एक गोष्ट निर्विवाद आहे, ती ही की, कै. अण्णासाहेब किर्लोस्कर ह्यांनी मराठी नाटयकलेचा एक नवीन अंक सुरू केला. ह्यास नाटयसंगीताचा मोहनांक म्हणावें, महाराष्ट्र रंगभूमीचा वाङ्मयांक (Classical act of Marathi Drama) म्हणावे, रुचिरत्वाचा सुरुचिर अंक म्हणावें की, नाटयमाधुर्याचा मधुररसांक म्हणावें ह्याविषयीं बराच मतभेद होईल. कारण ह्यांत हे सर्व गुण होते, किंबहुना ह्यापेक्षाहि अनेक अधिक गुण ह्यांत होते. परंतु तूर्त आम्ही ह्यांस महाराष्ट्र-रंगभूमीचा शृंगारांक म्हणतों. कारण कै. अण्णासाहेबांनी जर कांही विशेष कामगिरी केलेली असली तर त्यांनी महाराष्ट्र रंगभूमीवर उदात्त शृंगाररसाची मनोहर छाया पसरविली असें म्हणावयाला हरकत नाही. संस्कृत नाटयदेवीचा जणू कांही विलासच असा जो कालिदास, त्या कालिदासाचें शाकुंतल नाटक कै. अण्णासाहेब ह्यांनी मराठी नाटयपेहेरावांत आणलें आणि "सौभद्र" नाटकाच्या योगानें "शाकुंतला" चीच जास्त सुंदर आवृत्ति काढली. त्यांचें 'रामराज्यवियोग' हें बऱ्याच निराळ्या प्रकारचें नाटक आहे व तें पूर्ण झालें असतें तर त्यांच्या तिन्हीं नाटकांत सर्वोत्कृष्ट गणलें गेलें असतें, परंतु त्यांतहि कै. अण्णासाहेबांची शृंगारसुधामय लेखणी दशरथकैकयीच्या महालांतल्या प्रवेशांत थोडीशीच का होईना, पण हिंडून आलेलीच आहे.

शृंगार हा मधुर रस आहे आणि माधुर्याचा अतिरेक झाला म्हणजेच एक प्रकारचें शैथिल्य मनास व शरिरास येत असतें. किर्लोस्कर संगीत मंडळी स्थापन होऊन बरींच वर्षें झालीं, तसें तें शैथिल्य महाराष्ट्रास जास्त जास्त जाणवूं लागलें व ही भेंड्यांची भाजी आता कांही उपयोगी नाही अशी भावना महाराष्ट्राच्या सामुदायिक मनांत उत्पन्न होऊं लागली. राष्ट्रास सामुदायिक इच्छा उत्पन्न होऊं लागल्या म्हणजे त्यांची पूर्तता करणारा कोणीतरी राष्ट्रपुरुष निर्माण होतो असा निसर्गाचा नियम आहे व त्या नियमाप्रमाणे महाराष्ट्राच्या तीव्र भावना तृप्त करणारा विख्यात नट कै. गणपतराव जोशी हा महाराष्ट्राच्या रंगभूमीवर आला. ह्या नटाने महाराष्ट्राच्या रंगभूमीवरील वीररसांक सुरू केला असे म्हणता येईल. गणपतरावांची कंपनी गावांत आली म्हणजे एकदातरी त्याचा "राणा भीमदेव" पाहिल्यावाचून प्रेक्षकांच्या मनाची शांति होत नसे. कालिदासकृत पंच-

अनुक्रम 37223 दि: 15.9.
क्रमांक 2325 नों. दि: 23/1

पक्वान्नाची मिठी बसल्यामुळे प्रेक्षकांच्या जिभेला थोडीशी तिखट चटणी लावावी व त्यांची क्षुधा पुन्हा प्रदीप्त करावी म्हणून कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी 'सौभद्र' नाटक रचायला घेतलें, पण ही चटणी कालिदासाच्या पंच-पक्वान्नापेक्षाहि मिष्ट झाली. ती खायला लागल्यापासून तोंडाला जास्तच मिठी बसली. प्रेक्षकांच्या या करुण स्थितींतून त्यांची सोडवणूक करणारे नट म्हणजे कै. गणपतराव जोशी हे होत. ह्यांचेइतका वीररस उठविणारा नट अजून दुसरा झालेला नाही आणि म्हणून कै. गणपतराव जोशी म्हणजेच महाराष्ट्र रंगभूमीचा वीररसांक असें अभिमानाने व आनंदाने म्हणता येते.

कै. अण्णासाहेब किर्लोस्कर ह्यांच्या शृंगाररसाची महाराष्ट्र रंगभूमीवर किती मिठी बसलेली होती ह्याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे किर्लोस्कर कंपनीचें "वीरतनय" नाटक होय. हें नाटक इ स. १८९५ सालीं म्हणजे किर्लोस्कर नाटक मंडळी निघाल्यापासून बारा पंध्रा वर्षांनीं गडकरीगुरु कवि श्री. श्रीपाद कृष्ण ह्यांच्याकडून किर्लोस्कर मंडळीने लिहून घेतलें. कारण रंगभूमीवर एकच एक रस एकसारखा सुरू राहिल्यामुळे व त्यांत कै. गोविंद बल्लाळ देवलांसारख्या कवींनी "शापसंभ्रम" वगैरे नाटकांतून शृंगाररसाचे आणखी प्रवाह वाहविल्यामुळे प्रेक्षकांना असें वाटायला लागलें की 'नको हा शृंगार रस !' वीरतनय नाटकांत खरा वीररस किती आहे ह्याविषयीं पुष्कळ वेळां वादविवाद उपस्थित होतो, परंतु त्यावेळीं वीररसाची भूक प्रेक्षकांना उत्पन्न झालेली असली पाहिजे हें त्यांच्या नांवावरून सुद्धां उत्तम रीतीने दिसून येतें. परंतु ती भूक तृप्त करण्याचा मान कै. गणपतराव जोशी ह्यांनीच संपादन केला. कै. गणपतराव हे ज्या प्रकारचीं नाटकें करीत तशा प्रकारचे प्रेक्षकांच्या मनोवृत्तींची खळबळाट उडवून देणारे वाक्यकटाक्ष (Paragraphs) 'वीरतनय' नाटकांत जागोजागीं आहेत हेंहि ह्या विवेचनाच्या वेळीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

श्री. श्रीपाद कृष्ण हे महाराष्ट्रीय नाटककारांतील अग्रमणी होत. ह्यांच्या लेखनांतील प्रसन्नता केवळ अवर्णनीय आहे. त्यांचें कल्पनाचातुर्य व कल्पकत्व (Originality) यांची सर तर कोणासहि येणार नाही. त्यांच्यावर श्री. खाडिलकर, खरे, गडकरी, वरेरकर हे अतिप्रसिद्ध नाट्यलेखक झाले व त्यांपैकी प्रत्येकाने श्री. श्रीपाद कृष्ण ह्यांना खो देता

देता शेवटीं नाट्यसृष्टींत वसायला श्रीपाद कृष्णांना स्थानहि उरविलें नाही. तथापि एक गोष्ट प्रांजलपणे कबूल केलीच पाहिजे की, नाट्यरण-रंगांतील हा नेपोलियन बोनापार्ट जरी जळगांव–जामोदच्या सेंट हेलेना बेटांत आपल्या उत्तर आयुष्याचे दिवस घालवीत असला आणि जरी एखादा गडकरी वळणावरील बाल अभिमन्यूहि त्याचा पराभव केल्याचें आज सुख उपभोगीत असला तथापि अजूनहि नाट्यलेखनांत श्री. श्रीपाद कृष्ण हेच सर्वांपेक्षा खास वरिष्ठ आहेत व त्यांचे तोडीस उभा राहणारा आधुनिक नाटककार अजून तरी एकहि नाही.

श्री. श्रीपाद कृष्ण ह्यांना महाराष्ट्र नाट्येतिहासांतील युगकर्तृत्व सहज मिळविता आलें असतें. किंबहुना युगकर्तृत्वाचा राजमुकुट त्यांचेकडे आपण होऊन चालत आलेला होता. परंतु संकोची स्वभाव, रंगभूमीपासूनची दूर-दूरता व त्यामुळे समरसतेंत आलेलें न्यूनत्व हे तीन दोष त्यांना बाधले व त्यांच्या हातीं आलेला राजमुकुट दिल्लीच्या वृद्ध बादशहाप्रमाणे त्यांना गडकऱ्यांसारख्या शूर महादजी शिंद्याकडे सोपवावा लागला. आपल्या उमद्या हयातींत श्रीपाद कृष्ण हे रंगभूमीपासून इतके दूर (Out of touch) राहिले की, अजूनहि ते २५।३० वर्षांपूर्वीचीच भाषा बोलतात व २५।३० वर्षां-पूर्वीच्याच सृष्टींत वावरतात. महाराष्ट्रांतील नाट्यसृष्टि इतर सृष्टीच्या हेलकाव्याबरोबर त्या २५।३० वर्षांत कुणीकडच्या कुणीकडे गेली! पण लहान गांवीं वास्तव्य केल्यामुळे व तिथल्या लहान परिस्थितींतच वावरल्यामुळे त्यांचे हेलकावे श्री. श्रीपाद कृष्णांच्या अचाट व अफाट कल्पनाशक्तीवर फारसे बसले नाहीत! ती जिथे होती तिथेच ती कमी-जास्ती प्रमाणांत राहिली.

अर्थातच इतर लेखक पुढे सरले. ह्यांत कै. गडकरी ह्यांनी महाराष्ट्र रंगभूमीवरील हास्यरसांक रसविण्याचें काम आपलेकडे घेतलें व तें पूर्णतेस नेलें. सुंदर, सोज्वल, सुरस व सोत्कट हास्यरस कै. गडकरी ह्यांनी जितका सजविला तितका तो कोणीहि सजविला नाही व तितका तो कोणांस सज-विताहि आला नाही. मराठी नाटकांत स्वतंत्र हास्यरस घालण्याची सुरुवात श्री. श्रीपाद कृष्ण ह्यांनी केली. पण ती पूर्णतेस नेण्याचें कार्य गडकरी ह्यांनी केलें. कै. गडकरी हास्यरसाचे बादशहा होते. "भावबंधन" नाटकांत

तर त्यांनी कमालीचा हास्यरस ओतलेला आहे. इतका हास्यरस मराठी भाषेंतल्याच काय, पण इतर हिंदी भाषेंतील नाटकांतून क्वचित्च सापडत असेल

पण कै. गडकरी हे नुसते हास्यरसाचेच बादशहा होते असें नाही. इतर रसहि त्यांना उत्कृष्ट रीतीने रंगविता येत असत. विशेषतः उदात्त रस रंगविण्यांत त्यांचा हातखंडा होता. करुणरसहि त्यांचा फार पटाईतपणाचा रस असे. भावना उदात्त झाल्या आणि पवित्रपणाच्या भरारींत अत्युच्च टोकाला पोचल्या म्हणजेच अंत:करणाला चटका बसतो व तें पाझरूं लागतें. करुणरस म्हणजे नुसता रडकेपणा नव्हे–तो अंत:करणाचा पाझर आहे. हें लक्षांत ठेवलें म्हणजे गडकरी ह्यांचा करुणरस व इतर नाटककारांचा करुण रस ह्यांच्यामधील अंतर लक्षांत येतें.

महाराष्ट्र नाट्यभूमि कसकशी सजत गेली व तिच्यांत शृंगाररस, वीररस, हास्यरस व करुणरस हे कसकसे येत गेले ह्याचें त्रोटक वर्णन आतापर्यंत केलें. आतां ह्यासंबंधीं श्री. खाडीलकर ह्यांची कामगिरी कोणती ह्याचा आपण विचार करूं. ह्याचा विचार करायला गेलें म्हणजे जी गोष्ट आपणांस प्रथम भासते, ती ही की, श्री. खाडीलकर हे एकच नाहीत, ते दोन तीन खाडीलकर आहेत. किंबहुना खाडिलकरांचा स्वभाव गंगोदकाप्रमाणे स्वच्छ असल्यामुळे आजूबाजूच्या परिस्थितींत ते इतके जाऊन मिसळतात की, त्या परिस्थितीचे रंग त्यांचे मन:स्थितीवर उमटूं लागतात. श्री. खाडीलकर ह्यांची ही वृत्ति नुसती नाट्यसृष्टींतच दिसून येत नसून राजकीय सृष्टींतहि दिसून येते व त्यामुळेच अनेक वेळा त्यांचें स्वतःचें अस्तित्व पार लोपून गेल्याचा भास होतो. श्री. खाडीलकर हे जोपर्यंत महाराष्ट्र नाटक मंडळीशीं संलग्न होते तोपर्यंत त्यांची नाट्यरचनेची धाटणी निराळी होती. ते किर्लोस्कर नाटक कंपनीशीं येऊन मिसळले त्यावेळीं ती निराळी झाली व ज्यावेळीं ते केवळ बालगंधर्वांच्याच अभ्युदयासाठी नाटकें लिहायला लागले त्यावेळीं त्यांची लेखनशैली आणखी निराळी बनली. ह्या भिन्न भिन्न लेखनशैलीचे महाराष्ट्रावर निरनिराळे परिणाम झाले व त्यांतच बालगंधर्वांच्या धंदेविषयक आवश्यकतांची फार चमत्कारिक भर पडली.

खाडिलकरांची मूळ नाट्यलेखनशैली फारच उत्कृष्ट आहे. त्यांचा अस्सल थाट म्हणजे अनेक मनोहर प्रसंग उत्पन्न करायचे, अनेक पात्रांच्या परस्परविरुद्ध जोड्या घालायच्या आणि नाटकांत विविध रस उत्पन्न करून त्या सर्वांचा परिपोष राष्ट्रोन्नति, राष्ट्रस्वातंत्र्य, स्वदेशाभिमान किंवा राष्ट्रासाठी स्वार्थत्याग अशासारख्या एखाद्या अत्युच्च मनोभावनेमध्ये करायचा! त्यामुळें ह्यावेळचीं खाडिलकरांची नाटकें म्हणजे एखाद्या श्रीमंत मालकाच्या कारखान्यासारखीं वाटत! त्यांत भिकारपणा नव्हता. दास-दासी-आश्रित,-पंडित-वीर-मुत्सद्दी-उच्च-नीच ह्या सर्वांचा श्रीमंती अजबखाना खाडिलकरांच्या नाटकांत असे व तीं करायला फार पात्रें लागत. पण नाटक कधीं "फेल" व्हायची भीति नसे. कारण पात्रें व प्रसंग ह्यांची खैरात, कोणालाच जीवापलीकडे ताण नाही व प्रत्येकाला कौशल्य दाखवायला वाटेल तितका वाव! खाडिलकरांचें अगदीं हलकें पात्र असलें तरी तें मन रमवून जायचें आणि त्यांत कांहीतरी विशेष खुबी असायची!

खाडिलकरांची नाट्यलेखनाची पद्धति जोपर्यंत अशा प्रकारची होती तोपर्यंत त्यांत खाडिलकरी वैशिष्ट्य होतें. विशेषतः पात्रांच्या तोंडचे वाक्यांतून राजकीय परिस्थितीला अनुलक्षून दुहेरी ध्वनि काढण्याचें जें अप्रतिम कौशल्य त्यांना साधलेलें होतें व ज्या कौशल्यामुळेच त्यांच्या "कीचक-वधास" सरकारचे रोषाला बळी पडावें लागलें, त्या कौशल्याचा जनसमाजाच्या मनावर विलक्षण परिणाम होत असे. खाडिलकरांना महाराष्ट्रीय जनसमाज कांही काळपर्यंत आपल्या डोक्यावर घेऊन नाचला तो ह्याच कौशल्यावर फिदा होऊन. शिवरामपंत परांजपे ह्यांनी वर्तमानपत्रें व व्याख्यानें ह्यांत ध्वनिकाव्याची चटकदार पद्धति आणली परंतु खाडिलकर ह्यांनी हें ध्वनिकाव्य प्रत्यक्ष रंगभूमीवर उभें केलें! ही हातोटी अगदी नवी होती व तिने कांही काळ महाराष्ट्रीय प्रेक्षकांना गुंगवून सोडलें.

परंतु ज्यावेळीं खाडिलकर ह्यांचा व किर्लोस्कर कंपनीचा संबंध जुळला त्यावेळीं खाडिलकरांनी आपली ही खाडिलकरी खुबी सोडून दिली व ध्वनिकाव्य सोडून ते चारु संगीतांत शिरले. किंबहुना किर्लोस्कर व खाडीलकर ह्यांच्या सहवासांत खाडिलकरांनी किर्लोस्कर संगीत मंडळीवर

आपली छाप बसविण्याचे ऐवजीं किर्लोस्कर मंडळीची छाप आपल्यावर बसूं दिली ! गंगोदकाचा ह्याच स्वभाव आहे. "पानी तेरा रंग कैसा ? तर जिसमे मिलावे वैसा !" 'मानापमान' नाटकांत खाडिलकरी वळण बिलकूल दिसत नसून किर्लोस्करी वळण मात्र पूर्ण आहे. उत्तम चाली, उत्कृष्ट ढंग, शृंगाराचा उठाव, व सौभद्राचे धर्तीवर आत्मगोपनयुक्त वधू-वरांचें संमेलन वगैरे किर्लोस्करी गुण 'मानापमानांत' पूर्ण आहेत, पण खाडिलकरी गुण मात्र नाहीत. अण्णासाहेब किर्लोस्करांप्रमाणे काव्यपद-लालित्याचा गुणहि खाडिलकरांचे अंगांत जर नैसर्गिकरीत्या असता तर 'मानापमानां'तील पदें रागरागिण्यांच्या माधुर्याप्रमाणें शब्दार्थरचनेच्या दृष्टीनेहि बहारीचीं झालीं असतीं, परन्तु नैसर्गिक शब्दसौष्ठवाचा गुण कै. अण्णासाहेब किर्लोस्करांबरोबरच मावळला. कै. देवलांचीं कांही पदें किर्लोस्करांच्या पदांपेक्षांहि गोड आहेत, पण त्यांत नैसर्गिक कल्पना-भरतीपेक्षा संस्कृताध्ययनापासून उत्पन्न झालेल्या कृत्रिम कुशलतेचीच जास्त झाक मारते.

खाडिलकर आणि किर्लोस्कर संगीत मंडळी यांच्या समागमापासून खाडीलकर किर्लोस्करी वळणावर कसे गेले हें यावरून दिसून येईल, पण ह्यानंतर दोनचार वर्षांच्या आंत किर्लोस्कर मंडळींतून बालगंधर्व हे फुटून निघाले व त्यांनी स्वतःची गंधर्व नाटक मंडळी काढली. त्यांतहि दोनचार वर्षांच्या आंत बालगंधर्वांचे भागीदार टेम्बे व बोडस ह्यांची आणि बालगंधर्वांची तेढ आली. अशा वेळीं जें नाटक केवळ बाल-गंधर्वांवरच अवलंबून आहे व ज्याचा उठाव केवळ त्यांच्याच गाण्यावर किंवा नटण्यामुरडण्यावर उभारलेला आहे अशा नाटकांची आवश्यकता बालगंधर्वांना भासूं लागली आणि त्यांची ही हौस पुरविण्यासाठी खाडी-लकर ह्यांनीं "स्वयंवर" नाटक लिहिलें. 'मानापमान' नाटकांत खाडी-लकर जर खाडिलकरी वळणापासून दहा मैल लांब गेलेले असले तर 'स्वयंवरांत' खाडिलकरी वळणाचा पत्ताहि नाही. 'स्वयंवर' नाटक हें 'नाटक' ह्या दृष्टीनें किती नंबराचे ठरेल ह्याविषयींहि मतभेदच होईल. मुख्यतः हा एकपात्री जलसा आहे व एकच पात्र एकसारखे गाऊन गाऊन दमूं नये म्हणून त्याला विश्रांति देण्यासाठीच इतर पात्रें घातलेलीं आहेत.

खाडिलकरांचीं हीं जीं स्थित्यंतरें झालीं त्यांस कारण त्यांचें मन म्हणजे 'गंगाजल पाणी' आहे हेंच होय. 'अग्नीपाशीं नवनीता'ची जशी स्थिति होते तशीच खाडिलकर व इतर विशिष्ट व्यक्ति ह्यांचा संबंध आला असता खाडिलकरांची होते. अशा वेळींहि कांही माणसें आपली खास गुणमालिका (आपली Personality) कायम ठेवूं शकतात. पण खाडिलकरांस ती कायम ठेवतां येत नाहींत. ते त्या दुसऱ्या व्यक्तींत विरघळून जातात व निःशेष होतात. पण खाडीलकर हे ह्याप्रमाणे परगुणलीन होण्याचे अगोदर त्यांचें खाडिलकरी वळण म्हणून एक खचित होतें. ह्यांतील विविधता, ओज, श्रीमंती, विपुलता व ध्वनिकाव्य ह्या सर्व गुणांचें आकलन करून आपण त्यास अद्‌भुत रस असें नाव देऊं व खाडीलकर ह्यांनी मराठी रंगभूमीवर अद्‌भुतरसाचा अंक सुरू केला असे म्हणूं.

याप्रमाणे किर्लोस्कर हे महाराष्ट्र नाटयवधूचें 'शृंगार' आहेत, गणपतराव जोशी हे 'वीररस' आहेत, गडकरी हे हास्य' व 'करुण' आहेत, आणि खाडीलकर हे तिचे 'अद्‌भुत' रसाचें लेणें आहेत. ह्या सर्व नाटयभक्तांनी महाराष्ट्र नाटयसुंदरीस निरनिराळा साज चढविलेला आहे व तिला शक्य तितकी भूषविण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. ह्या प्रयत्नामुळेच गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्र रंगभूमीचें इतके सौंदर्यसंवर्धन झालेलें आहे की, तिचा इतरांना हेवाच वाटायला लागेल. महाराष्ट्रीय रंगदेवतेची खरी सेवा यांनीच केली व महाराष्ट्रीय रंगदेवतेची कीर्ति ह्यांनीच वाढविली. तिची ह्यापुढे जास्त सेवा करण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनी तिचे अंगावर जास्त लेणीं चढविलीं पाहिजेत व तिचें लावण्य सर्वांच्या नेत्रांना जास्त दिपवील असे प्रयत्न केले पाहिजेत. महाराष्ट्र– रंगदेवता त्यांनाच प्रसन्न होईल व त्यांनाच यशाच्या कोंदणांत कायमचें स्थान प्राप्त होईल.

• • •

८

# हे तात्या आणि हे तात्या

[ १९२७ सालीं अध्यक्ष-स्वागताध्यक्ष म्हणून साहित्य संमेलनांत दोन तात्या एकत्र येताहेत ही संधि साधून अच्युतरावांनी मोठ्या गंमतीने त्यांच्यांतील साम्य-भेद दाखविण्याच्या निमित्ताने त्यांच्या व्यक्तित्वाला स्पर्श केला आहे. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षाबद्दल नेमाने दरवर्षी खूप लिहिलें जातें, परंतु या निमित्ताने मराठी साहित्यांत बहार उडविली फक्त अच्युतरावांनीच.]

* * *

यंदाच्या पुणें येथील साहित्य संमेलनास उद्यापासून सुरुवात होणार असून त्याची विशेष गोष्ट अशी आहे की महाराष्ट्रांतील दोन तात्या त्यांत प्रमुखत्वेंकरून चमकणार आहेत. ह्यांपैकी श्री. श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब कोल्हटकर हे साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष आहेत व श्री. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर हे साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत.

तात्या हें नांव महाराष्ट्रास अगदीच अपरिचित नाही. स्वतःच्या मुख्य नांवापेक्षा घरगुती नांवाने प्रसिद्ध असणाऱ्या पुरुषांत नाना फडणीस हे प्रमुखच म्हटले पाहिजेत! त्यांच्या घरगुती नांवाने ते एवढे प्रसिद्धीला पोंचले की नाना हें त्यांचें मूळ नांव नव्हे असें कोणाला सांगितलें तर पुष्कळ वेळा तें खरें देखील वाटत नाही. ह्या नाना फडणीसांच्या कारकीर्दीत व त्यांना अत्यंत सहाय्यभूत असे दुसरे पुरुष म्हणजे हरीपंत तात्या फडके झाले! महाराष्ट्राला अतिशय आवडते असे हे तात्या होते.

नानांत नाना फडणीस नाना
इतर नाना करिती तनाना

ह्याप्रमाणे खडबडित पण व्यावहारिक कवन करून नाना फडणीसांची स्तुति

गाणारा ज्यावेळीं एक गुणग्राहक निघाला, त्यावेळीं तात्यांचाहि एक गुण-ग्राहक त्यांची प्रसिद्धि करायला तयार झाला. त्याने हरिपंत तात्यांना उद्देशून म्हटलें की,

तात्यांत तात्या हरिपंत तात्या
इतर तात्या करिती चपात्या

आणि हरिपंत तात्यांसंबंधाने हें जें म्हणण्यांत आलें तें आजतागाईत श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब कोल्हटकर ह्यांच्यासंबंधानेहि खरें आहे. मराठींत आजपर्यंत अनेक नाटककार होऊन गेले व पुढेंहि होतील! पण ह्या सर्व नाटककारांतील श्रीपाद कृष्णांची श्रेष्ठता अजूनहि इतकी अबाधित आहे की, त्यांचेपुढे इतर सर्व नाटककार 'करिती चपात्या' असें म्हटलें तर तें अतिशयोक्तीचें होणार नाही!

कै. गडकरी ह्यांनी अलीकडे नाट्यसिंहासनावर उडी मारलेली आहे व राजकीय भाषेंत बोलावयाचें म्हणजे सध्या मराठी नाट्यकला गडकरी-राजवटींत आहे असें म्हटलें तरी चालेल! गडकऱ्यांनी नाट्यकलेंत पाऊल टाकलें त्या वेळीं किर्लोस्कर-युग संपलेलें होतें व श्रीपाद कृष्णांचें युग चालू होतें. पण गडकऱ्यांनी टिचकीसरशीं तें युग बंद केलें आणि त्याचे जागीं आपली शिक्के-कटयार सुरू केली. पण जरी ह्याप्रमाणे गडकऱ्यांची साम्राज्यसत्ता सुरू झाली व 'तात्यांच्या नाटकांचा मी सोमवार करीन' ही गडकऱ्यांच्या तोंडीं चिकटविलेली उक्ति खरी झाली तरी त्यामुळे श्रीपाद कृष्णांच्या श्रेष्ठतेस बाध आला नाही. किंबहुना ह्या पराभवामुळे श्रीपाद कृष्णांची श्रेष्ठता जास्तच वाढली! कारण गडकरी हे श्रीपाद-कृष्णांचे शिष्य होते. गडकऱ्यांचें युग म्हणजे एक प्रकारें पेशवाईची स्थापना होती. ह्या सत्तास्थापनेमुळे नाट्यराजकारणाचें केन्द्र जरी बदललें तरी गादी कायम राहिली, मुजरा कायम राहिला.

आणि मुजरा कायम राहिल्यामुळेच श्रीपाद कृष्णाचें नाट्याधिष्ठान अजून कायम राहिलेलें आहे! गडकरी पंथाचे ते प्रणेते आहेत—नावीन्याचे ते नायक आहेत—विनोदाचे ते विनायक आहेत! त्यांच्याइतका स्वाभाविक परिपोष कुणालाहि साधत नाही! डायऱ्या आणि टाचणें ह्यांच्या मुंडावळयांशिवाय लिहिता लिहिता सहज सुचलेल्या साहित्यसाजाने नाट्य-

भाषेला सजविणारा भाषासुवर्णकार जर कोणी असेल तर एकच श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे होत !

एवढेंच की श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे आज चलनी नाणें (Current coin) नाहीत. आजकालचें चलनी नाणें म्हणजे खाडीलकर, वरेरकर, शुक्ल हे होत ! श्रीपाद कृष्ण म्हटलें म्हणजे कांहीतरी जुनी मोहोर आपण वापरीत आहोंत, कांहीतरी जुनी बातमी आपण वाचीत आहोंत असें वाटतें. आबासाहेब म्हाळस, विनायक कोंडदेव, भालचंद्र कृष्ण वगैरे शब्द उच्चारल्याबरोबर जसा एकदम जुनेपणाचा भास होतो, त्याप्रमाणे श्रीपाद कृष्ण म्हटले म्हणजे मागें उलटलेलें पृष्ठ (Back Page) आहे असें आपल्याला वाटतें.

पण त्याचें कारण हेंच की तात्यासाहेब हे सध्यांच्या जगाशीं जितके समरस असायला पाहिजेत तितके नाहीत ! ते एल्. एल्. बी. होऊन वऱ्हाडांत शिरले ते जिथे होते तेथेच राहिले. त्यांची सृष्टि म्हणजे तीस वर्षांपूर्वीची सृष्टि ! ह्या ३० वर्षांत जी घडामोड झाली ती त्यांच्या अंगावरूनहि गेली नाही व त्यांना जाणवलीहि नाही ! निजकोशांत तल्लीन असलेला भ्रमर किंवा निजानंदांत निमग्न असलेलें परब्रह्म—ह्यांना ज्याप्रमाणे जगांतील वावटळीचा कांहीएक उपसर्ग पोंचत नाही त्याप्रमाणे श्री. तात्यासाहेब जगांतल्या वावटळीपासून अलिप्त आहेत !

एवढेंच काय, अजून त्यांच्या मनाभोंवतीं ३० वर्षांपूर्वींचीच सृष्टि आहे—३० वर्षांपूर्वींचेंच जग आहे ! त्यांचें संभाषण ऐकलें तरीहि पुराणयुगांतला हा पुराण-पुरुष आहे असेंच वाटतें ! अजूनहि विधवावपनावर बोलतांना ते आपल्या अस्सल कोटया काढतील व पुनर्विवाहाच्या प्रश्नावरून त्यांचा चेहरा जितका गोरामोरा होईल तितका असहकारी किंवा प्रतिसहकारी ह्या शब्दांवरून होणार नाही ! त्याबद्दलची फारशी माहितीहि त्यांना असणार नाही ! कारण तात्यासाहेबांचा आणि सध्यांच्या जगाचा फारसा संबंध नाही. ना. पटेल जेव्हा इकडे बादशहाची मुलाखत घेत असतील त्यावेळीं जिन्याच्या पायऱ्या लक्षांत रहायची सोपी युक्ति कोणती ह्याचा विचार तात्यासाहेब करीत असतील आणि ज्या वेळीं कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीने आपल्याला फसविलें म्हणून ऑल इंडियांतील माणसें धुसफुसत

असतील त्यावेळीं दोन पिढ्यांपूर्वी बाळासाहेब नातूंनी केलेली दंगल आठवून तात्यासाहेब मनांत चरफडत असतील कीं " हे दुरात्म्या बाळासाहेबा, विविधज्ञानविस्तारांत तर चल, म्हणजे तुला दाखवितों !"

श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब ह्यांची अशी अवस्था होण्याचें कारण म्हणजे त्यांचें खेडेगांवांतील राहणें ! त्यांना रहायला खेडेगांवेंहि अशी इरसाल मिळाली की तेथे चालू धामधुमीच्या फारशा लाटा उठूंच नयेत ! वऱ्हाडांतील अकोला गांवीं त्यांनी आपला वकिलीचा धन्दा सुरू केला व ते अखेरपर्यंत अकोला येथेंच असते तर कदाचित् अप- टु- डेट रहाते ! पण त्यांनी लवकरच आपले राहणें तेल्हारें गांवीं नेलें, व पुढे खामगावाचा सम्पर्क होतो न होतो तोच जळगाव-जामोद येथे रहायला गेले ! अर्थात् जळगाव-जामोद म्हणजे आधुनिक जगांतलें टिम्बक्टूच ! तें कुठें आहे म्हणून विचारलें तर कुणाला सांगता यावयाचें नाही ! फक्त केव्हांतरी व कुठेंतरी त्याचें नांव ऐकलेलें असायचें !

कुग्रामवासाविषयीं एका प्राचीन संस्कृत कवीने आपली नापसंती प्रदर्शित केलेली आहे. ही नापसंती किती सार्थ होती व कुग्रामवासाचें किती शोचनीय परिणाम होतात ह्याचें ढळढळीत उदाहरण बघावयाचें असल्यास श्री. श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब होत ! ते जगाच्या मागे राहिले ह्याचें कारण तें चालू जगांत कधी राहिलेच नाहीत. ध्रुवस्थान ज्याप्रमाणे जगाच्या गाड्या-भिगाऱ्यापासून अलिप्त राहून आपल्या श्रेष्ठ दर्जावर गुपचूप बसलेलें असतें, त्याप्रमाणे श्री. श्रीपाद कृष्ण हे जन-संमर्दापासून अत्यंत दूर अशा आपल्या श्रेष्ठ स्थानावर बसलेले आहेत. जगांत असूनहि आपण जगांत कसें नाही ह्याची त्याना जाणीवहि नाही.

दुसरे तात्यासाहेब म्हणजे श्री. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर. ह्यांची गोष्ट ह्याच्या अगदी उलट आहे. ते आधुनिकांतले आधुनिक आहेत. त्यांच्यात जुनेंपानें असें कांहीच नाही. व्यासंगाच्या अभावामुळे श्री. गंगाधरराव देशपांडे जितके मागे पडले किंवा व्यासंगाच्या एकदेशीयत्वामुळे श्री. शिवरामपंत परांजपे जितके मागे पडले तितकेहि तात्यासाहेब केळकर मागे पडलेले नाहीत ! ते अगदी आधुनिकांतले आधुनिक आहेत–, "मॉडर्नी" तले " मॉडर्न " आहेत !

ह्याचें एक कारण त्यांची चवकस बुद्धि व दुसरें कारण त्यांचा वर्तमानपत्राचा व्यवसाय! चवकस बुद्धि नसली तर वर्तमानपत्राचा व्यवसाय असूनहि खाडिलकरांसारखीं माणसें जुनींपुराणीं होऊं शकतात आणि वर्तमानपत्रासारखा व्यवसाय किंवा राजकारणाची रोजची उठाठेव नसली तर चिन्तामणराव वैद्यांसारख्या चवकस माणसावर देखील जुनेपणाची हिरवी छाया पडायला लागते! पण तात्यासाहेब केळकरांना दोन्ही आहेत! त्यांचेजवळ राजकारणाचा रोजचा प्रपंचहि आहे व चवकस बुद्धिहि आहे—आणि एखाद्या घासलेल्या तरवारीप्रमाणे त्यांची मेंदूची तरतरी चकचक चकाकणारी आहे.

आणि म्हणूनच साहित्यसमेलनांतील दोन तात्यासाहेबांचा संयोग म्हणजे प्राचीन युग व अर्वाचीन युग ह्यांचा संयोग आहे! कृतयुग जर कलियुगास भेटायला आलें किंवा अश्वत्थामा जर ब्रिटिश पलटणींत उभा राहिला तर ज्या प्रकारचा संयोग दिसेल तशा प्रकारचा संयोग ह्या दोन तात्यासाहेबांच्या योगानें साहित्यसंमेलनांत दिसणार आहे! कारण श्रीपाद कृष्ण म्हणजे प्राचीन जग आणि नरसोपन्त केळकर म्हणजे वर्तमानपत्राचा ताजा अंक! मौज पत्राच्या पहिल्या पानावर वेद छापावे किंवा वेदाच्या एखाद्या अध्यायांत बालगंधर्वाचें " लेटेस्ट " पद आढळावें त्यांतीलच हा संयोग होय!

दोघा तात्यासाहेबांत हा जसा एक मोठा फरक आहे तसा आणखीहि एक फरक आहे. दोघेहि तात्यासाहेब रसिक आहेत, प्रेमळ आहेत, रंगदार आहेत, रंगेल आहेत— तथापि एकाचे स्वभावांत भयंकर लाजाळूपणा आहे आणि दुसऱ्याचे स्वभावांत तितकाच ढकलबाजपणा ( Pushingness ) आहे! एकाच्यापुढे पक्वान्नांचें ताट वाढलेलें असलें तरी दुसरे काय म्हणतील या भीतीनें ते जपून खातील तर दुसरे खुलेपणानें पक्वान्नावर हात मारतील आणि पुन्हां वर असें म्हणतील की, ' कायहो, जिलब्याच जिलब्या झाल्यामुळें तोण्डाला कशी मिठी बसलेली आहे! ह्यावेळीं जर चार खुसखुशीत भजीं असतीं तर काय बहार झाली असती!"

किंबहुना तात्यासाहेब केळकरांच्या लोकप्रियतेचें हेंच बीज आहे! ते कुठेहि गेले तर मनमोकळेपणानें घरच्यासारखे वागतील आणि लहानांपासून थोरांपर्यंत आवडणाऱ्या प्रत्येक विषयांत लक्ष घालतील. तात्यासाहेब

कोल्हटकरांचें तसें नाही ! त्यांच्या भोवती नेमकीं ३-४ माणसेंच आहेत तोपर्यंत ते खुलेपणानें बोलतील; पण ज्यास्ती माणसें जमायला लागलीं की तात्यासाहेबांच्या तोण्डाला कुलूप बसलेंच. तात्यासाहेबांच्या या संकोचीपणाचें अनेक वेळां सभाभीरुत्वांत रूपांतर झालेलें आहे ! ते जेव्हां सभेंत बोलतात, तेव्हां फारच चांगलीं भाषणें करतात; पण ते सभेंत बोलायला येतातच कशाला? येतच नाहीत ! त्यांना संकोच वाटतो ! ते "अप्सेट" होतात !

साहित्यसभा ही एक शकुंतला आहे अशी जर कल्पना केली तर तात्यासाहेब केळकर व तात्यासाहेब कोल्हटकर हे शकुंतलेच्याबरोबर दुष्यंत राजाच्या राजवाड्यांत गेलेले दोन ऋषिकुमार आहेत असें म्हणायला कांही हरकत नाही ! ह्यांपैकी एकाला सभा आणि थाट व गर्दी म्हणजे अगदी कण्टाळा–दुसऱ्याला त्याची अतिशय हौस ! त्याला उलट हाच आनंद की शकुंतलेला पोचविण्याच्या डेप्युटेशनवर आपण आलों हें सर्व लोकांना समजावें आणि दुष्यंत राजाशी शेकहँड करायला आपल्याला मिळालें ह्याच्या तारा चोहोकडे जाव्या !

ह्या दोघांच्या स्वभावांतला हा जो फरक त्याचा परिणाम दोघांच्याहि आयुष्यावर झाला ! तात्यासाहेब केळकर व तात्यासाहेब कोल्हटकर हे डेक्कन कॉलेजपासून एकमेकांचे मित्र–एकमेकांचे अनुबन्धी ! दोघांचें सख्य फार, आपुलकीहि मोठी. तात्यासाहेब केळकर आणि तात्यासाहेब कोल्हटकर ह्या दोघांनीहि डेक्कन कॉलेजमधील संस्कृत मृच्छकटिक नाटकांत काम केलेलें ! तात्यासाहेब केळकर ह्यांनी मदनिकेचें काम केलेलें व तात्यासाहेब कोल्हटकर यांनीं शकाराच्या विटाचें काम केलेले! डेक्कन कॉलेजांतून सुटल्यावर वीरतनय नाटक लिहून तात्यासाहेब कोल्हटकर हे केळकरांच्या अगोदर जगाच्यापुढे आले ! अभ्यासाकडे लक्ष देऊन तात्यासाहेब केळकर हे कोल्हटकरांच्या अगोदर एल्एल्. बी. झाले. १८९७ सालीं केसरींत येऊन मिळण्याबद्दल केळकरांनी श्रीपाद कृष्णांना पत्रहि लिहिलेलें होतें.

पण श्रीपाद कृष्णांनी अकोल्याचा मार्ग धरला आणि तेव्हांपासून दोघांच्या आयुष्यक्रमांत फरक पडला ! श्रीपाद कृष्णांचा जगाशीं संबंध सुटत चालल्यामुळे एकएका पावलानें ते जगाच्या मागें पडत चालले

आणि रोजच्या जगांत धावण्याची आवश्यकता पडल्यामुळे एकएक पावलानें नरसोपन्त केळकर जगाच्या पुढें आले! आज सम्पत्ति, कीर्ति, प्रतिष्ठा, सत्ता, ह्या सर्व दृष्टींनी नरसोपन्त केळकर हे श्लाघ्य व श्रेष्ठ पदावर आहेत आणि श्रीपाद कृष्णांची खाजगी किंवा साम्पत्तिक स्थिति सोडून दिली तरी लढाईत दाणादाण झालेल्या एखाद्या सेनापतीप्रमाणे त्यांची स्थिति आहे! सी. आर्. दासप्रमाणे किंवा जोशी-खापड्यांप्रमाणे देखील वकील म्हणून त्यांची कीर्ति नाही—राजकारणांत ते कोणीहि नाहींत—सामाजिक बाबतींत कोणतीहि विशेष कृति त्यांच्या हातून झालेली नाही—"मूकनायका" शिवाय त्यांचें एकहि नाटक आज रंगभूमीवर नाही—एकाहि नाटक कंपनीवर त्यांचें वजन नाही—ते उत्तम गणिती किंवा ज्योतिषी आहेत हेंहि लोक विसरून गेलेले आहेत!

तेव्हां दोघा तात्यासाहेबांकडे पाहिलें म्हणजे हें चित्र पहा आणि हें चित्र पहा असें म्हणण्याची पाळी येते! केळकरांचें आयुष्य यशस्वी दिसतें—श्रीपाद कृष्णांच्या आयुष्यावर (Failure) निष्फळ असा एक मोठा 'फ' कार किंवा नकार दिसूं लागतो! आणि ह्याचें कारण काय, तर श्रीपाद कृष्णांनी चालू जगावर आपली पकड ठेवली नाही. नरसोपन्तांनी ह्याच्या उलट वर्तन ठेवलें! ते चालू जगांत राहिले—चालू जगांत पोहले—चालू जगाशीं लढले व चालू जगांत मिसळले! त्यांच्या ढकलबाज स्वभावामुळे प्रत्येक परिस्थितींतून ते सहीसलामत बाहेर पडले! त्यांना सातव्या मजल्यावर कोंडलें तरी ते पहिल्या मजल्यावरून बाहेर पडले व पहिल्या मजल्यावर कोंडलें तरी तळघरांतून निसटले! चालू जगाशीं संबंध आल्यामुळे त्यांची बुद्धि अत्यन्त कुशाग्र राहिली! बुद्धिमत्तेंत त्यांचा 'नम्बर' पहिला लागला. बुद्धीची कुशाग्रता, व्यापकता, सुपूर्तता व चपलता ह्या चारी गुणांनी त्यांची तुलना कै. महादेव गोविंद रानडे ह्यांच्याशींच करावी लागते. रानड्यांच्या वेळेपासून इतका बुद्धिमान् पुरुष महाराष्ट्रांत झालाच नाही म्हटलें तरी चालेल! अनेक प्रसंगीं कै. लो. टिळकांपेक्षा केळकरांनी सरस बुद्धिमत्ता दाखविलेली आहे! व्यासंगांत तर ते कोणापेक्षांहि खात्रीनें सरस आहेत.

ह्याचे उलट श्री. तात्यासाहेब कोल्हटकरांच्याकडे पाहिलें म्हणजे सेंट हेलेना बेटांतील तुरुंगवासांत एखाद्या खडकावर शून्य दृष्टीने बसलेल्या नेपोलियन् बोनापार्टच्या चित्राची आठवण होते! त्याचें राज्य गेलेलें आहे, त्याचें वैभव गेलेलें आहे, पंचवीस वर्षांपूर्वी असलेला त्यांचा दरारा गेलेला आहे–आणि आतां मूकभाषेंत समुद्राच्या लाटांना आपलें मनोगत सांगत तो एकान्तवासांत बसलेला आहे!

आणि इतकें असूनहि श्री. श्रीपाद कृष्ण हे नेपोलियन् आहेत, हें लक्षांत ठेविलें पाहिजे! जरी खाडिलकरांच्यापुढे त्यांचा पराभव झालेला असला, जरी गडकऱ्यांनी त्यांचीं नाटकें सोमवारावर नेलेलीं असलीं, जरी त्यांना "या बसा" म्हणायला बालगंधर्वांना वेळ नसला, किंवा जरी नरसोपंत केळकर हे ड्यूक ऑफ वेलिंग्टन्प्रमाणे यशस्वी वीर म्हणून संपत्ति मान-मरातब, कीर्ति किंवा सत्ता ह्यांनी अलंकृत असले तरी सेंट हेलेनामधील हा आधुनिक नेपोलियन महाराष्ट्राचा नेपोलियनच ठरेल. त्यांच्यापासून हजारो तरुणांना स्फूर्ति मिळेल, हजारो रसिक त्यांचे गुणांवर डुलतील, हजारो लेखक त्यांचें अनुकरण करायला लागतील व हजारों देशबांधव त्यांचेवर पुष्पवृष्टि करायला लागतील.

आम्हीहि सहस्रावधि सुरुचिर कल्पना प्रसविणाऱ्या त्यांच्या सहस्र-शीर्षावर आज प्रेमभावांची कुसुमवृष्टि करीत आहों! श्रीपाद कृष्ण हे आमच्या प्रेरणांचे जनक नव्हेत, त्यांच्या परपरेंत आम्ही कधीहि नव्हतों आणि तरीहि मराठी भाषेंत नावीन्यमय कल्पनांचे किती निसर्गसुंदर कालवे त्यांनी सोडलेले आहेत, हें पाहून आम्ही सरस्वतीच्या या लाडक्या सुपुत्रास आपली प्रणति अर्पण करीत आहोंत! त्यांचे अवगुण आम्हांस माहीत आहेत! त्यांचे अवगुण आम्हाला लक्षांत ठेवायलाच पाहिजेत पण त्या-मुळेच त्यांचे अनुपम गुण आम्हांस जास्तच अनुपम वाटतात आणि प्रेम-भावनांच्या वरचा ताबा नाहीसा होऊन त्या सर्वांच्या सर्व मराठी भाषेच्या ह्या शाहिराच्या गुणांस जाऊन बिलगतात!

● ● ●

१

# विष्णुशास्त्री, आगरकर, टिळक

[ आगरकर स्मृतिदिनानिमित्त हा लेख लिहून अच्युतरावांनी आगरकरांच्या शिष्य-प्रशिष्यांनी आपल्या कर्तव्यांत केलेली कसूर, मनोरंजनाने काढलेल्या खास अंकांतील स्थूल लेखांवरून, मृत्युलेखांतील साचेबंदपत्राचे उपहास व महाराष्ट्रांतील चैतन्यत्रयी म्हणून चिपळूणकर, आगरकर व टिळक यांच्या कार्याचें कृतज्ञतापूर्वक मूल्यमापन असें विविधकार्य साधलेलें आहे.]

* * *

Breathes there the man with soul so dead,
Who never to himself hath said,
This is my Country ?

प्रथम पेरी चिपळुणकर । देशभक्तीचे विचार ।।
मागे तूं मित्र शूर । पाळिसी व्रता ।।
धन्य थोर मित्रता । स्तुत्य हीच मित्रता ।।

आज आगरकर-डे (आगरकरांचा स्मृतिदिन) असल्यामुळे आगरकरांच्या चरित्राकडे लोकांचें विशेष लक्ष पोचलेलें असून आगरकर हा पुरुष होता तरी कसा, ह्यासंबंधाने जो तो जिज्ञासेने विचार करीत आहे. प्रथमतः आम्हांस हें सांगितलें पाहिजे की, गेली वीस-एकवीस वर्षे महाराष्ट्राने आगरकरांसंबंधाने जी विस्मृति दाखविली, त्या विस्मृतीच्या शिक्षेस आगरकर कधीहि पात्र नसून, आगरकरांविषयीं महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांनी ह्याचेपूर्वीच जागरूकता दाखवावयास पाहिजे होती. ही जागरूकता दाखवा-

वयाचें काम सर्व महाराष्ट्राचें तर होतेंच; पण त्यांतले त्यांत आगरकरांचा ज्यांच्याशीं विशेष संबंध आला व आगरकरांच्या गुणांचें ज्यांनी विशेष कौतुक केलें, त्यांचें तर ह्यासंबंधांत विशेष कर्तव्य होतें. आगरकरांच्या नंतर सुमारें पांच वर्षें कै. माधव गोविंद रानडे हे ह्यांत होते. ना. गोखले आगरकरांच्या नंतर वीस वर्षांनी वारले. ना. प्रि. परांजपे आजच्या समारंभाचे अध्यक्षच आहेत. त्यांवर आणि प्रो. वासुदेवराव पटवर्धन, सीताराम गणेश देवधर, वगैरे सुधारणा-सेनापतींवर एकाप्रकारें गोपाळ गणेश आगरकर यांच्याविषयीं कृतज्ञतेचें ओझें होतें; परंतु त्यांपकी कोणीहि आजपर्यंत आगरकरांचा जन्मदिवस विशेष रीतीनें साजरा केल्याचें दिसत नाही. त्यांपैकी रानड्यांची गोष्ट सोडून द्या, परंतु कै. गोखले हे आगरकरांना गुरु समजत होते व हें त्यांचें गुरुत्व वासुदेवराव पटवर्धनांना माहीत होतें; परंतु आगरकरांची स्मृति असल्याचें गोखले अथवा पटवर्धन ह्यांनी सार्वजनिकरीत्या कधीहि विशेष सोपस्कारानें दाखविलें नाही. ना. प्रि. परांजपे हे आज अध्यक्षाची खुर्ची सुशोभित करणार आहेत, व यंदा अहमदाबाद येथील सामाजिक सुधारणेचें "व्यासपीठ"हि तेच अलंकृत करणार! परंतु ह्यापूर्वी आगरकर-डे साजरा करण्याची त्यांनीहि कधी विशेष खटपट केलेली नाही. रानडे, गोखले, परांजपे, पटवर्धन ह्या महाशय-मालिकेच्या विशेष स्मरणांतून सार्वजनिकरीत्या अस्तित्वांत नसलेल्या गोपाळराव आगरकरांचें चीज करण्याची पाळी, सार्वजनिक कामांत नवीनच पडलेल्या तरण्याताठ्या व अल्प-"मिसू"-धर कोवळ्या सुशिक्षितांकडे यावी, हें आम्हांस मुळींच अभिनंदनीय वाटत नाही. आगरकरांच्या-संबंधी करावयाच्या राहिलेल्या कर्तव्यांत, रानडे, गोखले, परांजपे वगैरे मंडळी अजिबात चुकली असें आम्हांस वाटतें. आणि जरी ही चूक आज कोवळे जवान भरून काढीत आहेत, तथापि त्यासंबंधीचा विषाद कायम राहतोच.

आगरकरदिनोत्सवाचा जो स्पेशल अंक मासिक मनोरंजनने काढलेला आहे, त्यांत त्या सत्पुरुषाचें चरित्र आळतेकर, महाजनी, वर्दे, भाटे, देवधर इत्यादि कसलेल्या लेखकांनी गाइलेलें आहे. ह्या सर्व कसलेल्या लेखकांत 'त्रिनमुरलेलें लोणचें' म्हणजे आळतेकरांचाच लेख दिसतो.

आळतेकर हे उत्साही आहेत, तरतरीत आहेत, बाणेदार आहेत; परंतु ज्याप्रमाणें सोडावॉटरमधील फसफसणारा फेंस ग्लासापेक्षा जमिनीवरच ज्यास्त पडतो, त्याप्रमाणे आळतेकरांचे उचंबळणारे विचार मुद्द्यांपेक्षा भलत्याच भावनांवर जास्त वाहवलेले आहेत. यांत आळतेकरांचा विशेष आहे असें आम्हांस वाटत नाही. आम्हांस एवढेंच वाटतें की, हें लोणचें अजून पुष्कळ दिवस मुरलेलें नाही, "डिसिलिन"च्या बरणींत हें अजून पुष्कळ दिवस राहिलें पाहिजे आजच्या आगरकर-डेमध्यें विशेष पुढाकार आळतेकर ह्यांनीच घेतलेला आहे. किंबहुना आमची माहिती खरी असेल तर आळतेकर हे ह्या "आयडिया"चे जनक, संवर्धक व परिपोषक आहेत. आम्ही आळतेकरांच्या विचारांचें लोणचें अजून मुरलेलें नाही असें म्हणतों, तें एवढ्याचकरितां की, आगरकर-डेमध्ये आळतेकर ह्यांनी इतका पुढाकार घेतलेला असल्यामुळे मासिक मनोरंजनाच्या अंकांत आळतेकर ह्यांचा लेख भीष्माचार्य "महाजनी" ह्यांच्याहि अगोदर जो नाचला तो तसा नाचला नसता तर तें आमच्या दृष्टीने जास्ती विनयाचें व नेत्रमनोहर झालें असतें. यजमानाने भीष्मद्रोणांना जेवावयास बोलावून आपलाच पाट पहिला मांडणें योग्य दिसत नाही. आता हा दोष आळतेकरांचाच असेल असें आम्ही म्हणत नाही. ही मासिक मनोरंजनकारांचीहि चूक असेल; किंबहुना दोघांनाहि ही चूक वाटत नसेल! परंतु एकंदरींत आम्हांस जें वाटतें तें हेंच की अजून लोणचें मुरलेलें नाही.

मासिक मनोरंजनच्या "स्पेशल" अंकांत निरनिराळ्या लेखकांनी निरनिराळ्या तऱ्हेनें आगरकरांचें चरित्र गाइलेलें असल्याचें आम्ही वर सांगितलेंच आहे; परंतु हीं सर्व चरित्रें वाचूनहि आगरकरांच्या चरित्राचें मार्मिक रीतीने कोणी अवलोकन केलें असेल असें दिसत नाही. मृत पुरुषांचीं चरित्रें लिहिण्याची एक चमत्कारिक पद्धति मराठींत पडून गेलेली आहे. मेलेला मनुष्य जर अगदींच "ढ" असेल तर अमुक हे शांत आणि मनमिळाऊ होते असा शेरा त्यांचेवर आलाच! ते धनिक असले तर त्यांनी विशेष कांहीहि केलेलें नसो, पण अमुक अमुक हे 'सार्वजनिक कामांत बरेंच लक्ष घालीत असत,' हा शेरा त्यांना भूषविणारच. ते सरकारी

नोकरींत वारले तर "सरकारी नोकरींत राहूनहि सार्वजनिक कार्याविषयीं कळकळ वाळगणाऱ्यांपैकी हे प्रमुख होते" अशी त्यांची स्तुति व्हावयाचीच. ते सरकारी पदव्यांनी मंडित अथवा नामदार असले तर "नृपतिजन-पदानां दुर्लभः कार्यकर्ता" हा संस्कृत श्लोक आपल्या सर्व भारुडासह त्यांच्याकडे आलाच ! एखाद्या चरित्राचें कोणी मार्मिकपणे निरीक्षण करील व त्यांतून खरें महत्त्व हुडकून काढण्याची खटपट करील तर शपथ ! ज्याप्रमाणे वकिलीचे, हुकूमनाम्याचे, दरखास्तीचे वगैरे "नमुने" ठरलेले असतात त्याप्रमाणें " मृत्युलेखां "चेहि नमुने कोणी छापून ठेवील तर वर्तमान-पत्रांच्या धंद्यांत वर्ष दीडवर्षच पडलेल्या, कोवळ्या, बिनअनुभवी तरुणांना त्यांचा उपयोग झाल्यावाचून राहाणार नाही. मरणाऱ्या मनुष्यालाहि नमुने पाहिल्याबरोबर समजून जाईल की आपण 'शांत आणि मनामिळाऊ'-पैकीच आहोंत, 'दुर्लभ कार्यकर्त्यां'पैकी आहोंत, की 'सार्वजनिक कामांत लक्ष घालणाऱ्यां' पैकी आहोंत.

इतर मनुष्यांचीं चरित्रें लिहिण्याची पद्धति ज्याप्रमाणे ठरून गेलेली आहे, त्याचप्रमाणे एखादा सुधारणा-प्रवर्तक वारला तर त्याचेंहि चरित्र-लेखन ठरून गेलेलें आहे. ते सत्याचे फार अभिमानी होते, लोकनिंदेला त्यांनी कधीहि भीक घातली नाही. ते लोकछंदानुवर्ती नव्हते, लोकांनी त्यांचा छळ केला तरीहि ते त्याची पर्वा करीत नसत, ते आपल्या सदसद्विवेकबुद्धीचे गुलाम होते, सवंग लोकप्रियता संपादन करण्याचा त्यांनी कधीहि प्रयत्न केला नाही, इत्यादि चार नाटकी वाक्यें लिहिलीं की, त्या महात्म्याचें चरित्र आटोपलें. आपल्यांतील रानड्यांचें चरित्र घ्या, गोखल्यांचें चरित्र घ्या, राजारामशास्त्री भागवतांचें चरित्र घ्या, भांडार-करांचें चरित्र घ्या, अथवा वाटेल त्याचें चरित्र घ्या, एवढीं चार पांच वाक्यें निरनिराळ्या ठेक्यांवर व निरनिराळ्या सुरांत म्हटलीं की, चरित्रांत दुसरें कांही पहावयास नको. "सत्याचे" बिचाऱ्याचे इतके हाल चाललेले आहेत की त्याला इकडे तिकडे जाण्याची चोरीच आहे. प्रेस अ‍ॅक्टच्या लगामाने वर्तमानपत्रें गुदमरून गेलीं असें म्हणतात; पण त्यापेक्षा सुद्धा अलीकडील मराठी चरित्रलेखनाने 'सत्य' अगदी गुदमरून गेलेलें आहे. 'सत्या' ने अलीकडे इकडे तिकडे पाहाण्याची अगदी सोय नाही. 'सत्य

जर म्हणेल की मी डॉ. मुंजांचे चरित्रांत जाईन, धुंडिराज ठेंगडीच्या चरित्रांत घुसेन, आळतेकरांच्या चरित्रांत प्रवेश करीन, राजवाड्यांच्या चरित्राकडे पाहीन, लवाट्यांच्या चरित्रांत दडेन, शंकरराव देवांजवळ आसरा मागेन, अथवा निदानपक्षी गायकवाडवाडा मोठा आहे तेथे तरी कांही आश्रय मिळतो की काय, तें पाहीन; तर सत्याच्या ह्या गमज्या कांही एक चालावयाच्या नाहीत सत्याने निमूटपणें शंकरराव देवांचें चरित्र सोडून डॉ. देवांच्या चरित्रांत घुसलें पाहिजे, लवाट्यांना मोडून त्याने कर्व्यांच्या चरित्रांत खोली मागून घेतली पाहिजे. मुंजे–अळतेकरांना सोडून सत्याने निमूटपणे धनतोलीवर नटेशरावांच्या बंगल्याकडे निघालें पाहिजे आणि गायकवाडवाडा! अब्रह्मण्यं! सवंग लोकप्रियतेचा वाडा तो? सत्याने तिकडे ढुंकूनसुद्धा पाहतां उपयोगी नाही सत्याला आपल्या अब्रूची चाड असेल तर त्याने बिनतक्रार आगरकरांच्या चरित्राची वाट धरावी; नाहीतर खुशाल आक्रोश करीत रहावें. मराठी चरित्रकार कांही त्याला भीक घालणार नाहीत.

मासिक मनोरंजनमधील सर्व चरित्रें ह्याच मासल्याचीं आहेत. सत्य,सद्-सद्विवेकबुद्धि ह्यांच्याशिवाय ह्या चरित्रांमध्यें दुसरें कांही एक नाही. इतक्या पांच-सहा लोकांनी आगरकरांचीं चरित्रें लिहिलेलीं आहेत; पण त्या सर्वांत आलटून-पालटून एकच मजकूर आहे. निरनिराळ्या नाटक कंपन्यांनी हरि-भाऊ आपट्यांची 'संत सखूबाई' केली तरी ज्याप्रमाणे म्हाळसाबाई सखूचे गालगुच्चे घेत असलेली आढळावयाची त्याप्रमाणें प्रत्येक चरित्रांत, प्रत्येक लेखणी सत्य, सदसद्विवेकबुद्धि ह्यांचे गालगुच्चेच घेत असलेली दिसून येईल. आज संध्याकाळीं वुइल्सन कॉलेजमध्यें जीं वक्त्यांचीं व उपवक्त्यांचीं भाषणें होतील तीं सुद्धा सर्व ह्याच मासल्याचीं होण्याचा संभव आहे. "क" उठेल आणि म्हणेल की सत्याशिवाय आगरकरांनी कशाचीहि चाड केली नाही. "ग" पुन्हा तेंच सांगेल "घ" म्हणेल की, सत्याशिवाय कशाचीहि चाड आगरकरांनी केली नाही मिळून काय? विनोदकारांनी आपल्या "विनोद" नाटकांत विनोदी तऱ्हेने म्हटल्याप्रमाणे "अगबाई शेला!" व "अगबाई शेला!!" एका मुलाला ताकाशीं भात खावयाचा कंटाळा आल्या-

मुळे त्यानें आपल्या आईजवळ दुसरें कांही मागितलें. आईनें सांगितलें की, "ताकाशीं भात नको असेल तर भाताशीं ताक खात जा."

आगरकरांच्या आयुष्याचा विचार केला म्हणजे त्यांचे सहाध्यायी टिळक आणि त्यांचे गुरु विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांच्या चरित्राकडे सहज लक्ष जातें. अलीकडील लेखक दाखवितात त्याप्रमाणें गोपाळ गणेश आगरकर ह्यांचें चरित्र स्वतंत्र व तुटकें नसून महाराष्ट्राच्या इतिहासाच्या शृंखलेंतील तो एक भाग आहे. ही साखळी आगरकरांच्या चरित्रांत इतक्या स्पष्ट रीतीनें निबद्ध आहे की, ती लक्षांत न घेतां आगरकरांच्या चरित्राचा विचार करणें म्हणजे मेजवानीला बसलें असतां आजूबाजूच्या लोकांकडे लक्ष न देतां खीर ओरपूं लागण्यसारखें आहे. आगरकरांच्या चरित्राचा हिरा विष्णुशास्त्र्यांच्या चरित्राच्या सुवर्णांत इतक्या डौलदार रीतीनें बसविलेला आहे की, त्याच्या शोभेचें महत्त्व लक्षांत यावयास विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या चरित्राचेंहि कार्य लक्षांत घ्यावयास पाहिजे. विष्णुशास्त्री चिपळूणकर म्हणजे महाराष्ट्राची मूर्तिमंत स्फूर्ति होय. महाराष्ट्राची सेवा इतर पुरुषांनी इतर रीतींनी केली असेल; परंतु महाराष्ट्रास जर कोणी चालना दिली असेल तर ती विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीच होय. विष्णुशास्त्री व महाराष्ट्रांतील इतर नामांकित पुरुष हे महाराष्ट्राची प्रेरणा होते. विष्णुशास्त्र्यांपूर्वी केरोपंत छत्र्यांसारखे विद्वान्, महादेव गोविंद रानडयांसारखे ज्ञाते, कृष्णशास्त्री चिपळूणकरांसारखे पंडित, विष्णुशास्त्री पंडितांसारखे सुधारक, वामन आबाजी मोडकांसारखे प्रगतिकर्ते आणि महादेव मोरेश्वर कुटयांसारखे वक्ते पुष्कळ उत्पन्न झाले; परंतु असले पुरुष हे राष्ट्रास शोभा आणतात, राष्ट्रास जिवंत ठेवीत नाहींत. ज्यप्रमाणे कर्णफुलें, बिंदी, बिजवर, केतक, छंद हे दागिने म्हणजे सुंदर स्त्री नव्हे तर तिच्या कनकोपम शरीरांतून बिजलीप्रमाणें वावरून उच्छ्वास-परिमलाच्या योगानें भासमान होणारा पवन, हाच तिचा जीवनसर्वस्व होय त्याप्रमाणें विद्वान, गणिती, शास्त्रज्ञ, कवि हे राष्ट्राचे प्राण नसून त्यास स्फूर्ति देणारा पुरुष हाच त्याचा खरा प्राण होय. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे ह्याच दृष्टीने महाराष्ट्राचे प्राण होते. ज्याप्रमाणे शरीरांतून प्राणपवन स्फुरूं लागला म्हणजे दृष्टीस चमक येते, ओठावर लाली येते, दंतपंक्तींत स्फटिकपणा यतो, केशकलापांत भृंगता व

करचरणांत विभ्रम व गति येते, त्याप्रमाणे महाराष्ट्रांत विष्णुशास्त्री चमकूं लागल्याबरोबर, महाराष्ट्राच्या सार्वजनिक सेवेंत पडल्याबरोबर, महाराष्ट्र-भाषा सुरस झाली, वाङ्मयांत तेज आलें, निःस्वार्थतेला किंमत आली, स्वावलंबन संचरलें, शिक्षण स्वयंप्रेरित झालें, इतिहास नामांकित-पणास चढला, काव्य आनंदप्रद झालें, स्वाभिमान शिगेस चढला व स्वदेशभक्ति उल्लसित झाली. विष्णुशास्त्री प्रकाशमान झाल्याबरोबर काय काय उत्कर्ष पावलें नाही ? पण ह्याचें कारण हें की, विष्णुशास्त्री हे महाराष्ट्राचें चैतन्य होते, विष्णुशास्त्री हेच महाराष्ट्राचें जीवन व तपन होते.

विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांची योग्यता महाराष्ट्रांत अपूर्व आहे. शिवाजीमहाराज ह्यांच्यापासून जर स्वतंत्र महाराष्ट्राच्या इतिहासास प्रारंभ झाला असेल तर पारतंत्र्यांतील महाराष्ट्राच्या इतिहासास विष्णु-शास्त्र्यांपासूनच आरंभ झाला ह्यांत संशय नाहीं. विष्णुशास्त्र्यांपूर्वी महाराष्ट्रास इतिहास नव्हता. तर डोंगरावरील पाणी ज्याप्रमाणे जसें वळण मिळेल त्याप्रमाणे वाहात जातें, त्याप्रमाणे जसा येईल तसा दिवस विष्णुशास्त्र्यांपूर्वी महाराष्ट्र घालवीत असे. ज्याप्रमाणे एखादें मांजर खूप उंचावरून पडलें म्हणजे कांही वेळ चकित होऊन, इकडे तिकडे पहात पडल्या जागेवरच स्तब्ध असतें, त्याप्रमाणें आपल्या अत्युच्च वैभवगिरीवरून ढासळल्यापासून महाराष्ट्र कांही वेळ इतका चकित व स्तब्ध होता की, कोठे कसें चलनवलन करावें, हेंच त्यास समजेना. महा-राष्ट्राच्या ह्याच चकितपणाच्या काळांत गोपाळराव देशमुख, कृष्णशास्त्री चिपळूणकर, महादेव गोविंद रानडे, महादेव मोरेश्वर कुंटे वगैरे लोक उत्पन्न झाले. ह्या वेळीं महाराष्ट्रांत सर्व कांही होतें; पण महाराष्ट्र भाना-वर नव्हता. हा महाराष्ट्राचा बेभानपणा घालविण्याकरितां त्यास प्रेरणेचे धक्के, उपदेशाचे चाबूक, टीकाशास्त्राचे तडाखे देण्यास, जो जोमदार उत्साही, हौशी, तेजस्वी पुरुष झाला तेच विष्णुशास्त्री चिपळूणकर हे होत. त्यांनी महाराष्ट्रास चकचकीत सांगितलें की, "महाराष्ट्रा ! ऊठ स्वातंत्र्य गेलें म्हणून रडत काय बसलास ? चालायला लाग. जो चालतो तो मुक्काम गाठतो."

महादेव गोविंद रानडे, महादेव मोरेश्वर कुंटे, विष्णुशास्त्री पंडित ह्यांच्या वेळीं महाराष्ट्रांत सार्वजनिक बाबतींत प्रयत्न झाले नाहीत असें नाहीं; परंतु विष्णुशास्त्र्यांच्या प्रयत्नांचें मुख्य स्वरूप हें की, ह्या वेळेपासून महाराष्ट्रांत हेतुपूर्वक प्रयत्न (Conscious efforts) व्हावयास लागले. आपण राष्ट्र आहों, आपल्याला जगावयाचा अधिकार आहे, आपण जगलेंच पाहिजे, अशा जागत्यासवरत्या जागरूक कल्पनेने विष्णुशास्त्र्यांच्या वेळेपासून प्रयत्न व्हावयास लागल्यामुळेच विष्णुशास्त्री चिपळूणकर हे आधुनिक इतिहासाचे प्रवर्तक, प्रवृत्तीचे जनक, स्फूर्तीचे निर्झर व स्वदेशाभिमानाचे सागर गणलेले आहेत. विष्णुशास्त्र्यांनी सर्व प्रयत्नांना रुचि आणली, त्यांत व्यापक दृष्टि उत्पन्न केली, त्यांना ध्येय दाखविलें व त्यांत स्वदेशभक्तीचें झळझळीत जीवन ओतलें. शास्त्रीबोवांच्या पाठोपाठ त्यांचा जाज्वल्य अभिमान बाळगणारे व त्यांच्या तालमींत तयार झालेले त्यांचे दोन शिष्य उभेच होते. तेच बाळ गंगाधर टिळक व गोपाळ गणेश आगरकर हे होत. शास्त्रीबोवांनी देशकार्य पुरें केलें तोच तें ह्या दोघां शिष्यांनी उचललें. गुरुशिष्यांत परंपरेचा जो जिवंत संबंध लागतो तो विष्णुशास्त्री चिपळूणकर व टिळक-आगरकर ह्यांच्याइतका कोठेहि आढळून येणार नाही.

विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांच्या उपदेशाचें सार हेंच की, इतर लोकांना ज्याप्रमाणे घरें आहेत, त्याप्रमाणें महाराष्ट्र हेंच आमचें घर आहे व ह्याच घरावर आम्हीं निःस्सीम प्रेम केलें पाहिजे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या पूर्वी स्वदेशभक्तीचा दावा इतक्या शून्य अंशापर्यंत गेलेला होता की, कांही कांही लोकांना इंग्रजी ज्ञान ही आपली संस्कृति व इंग्लंड हें आपलें "होम" असें वाटावयास लागलें होतें. अद्यापहि कांही कांही पार्शी लोक इंग्रजी भाषेलाच आपली मातृभाषा समजण्याचा प्रयत्न करतात. विष्णुशास्त्र्यांच्या कडक उपदेशाने लोकांना समजूं लागले की, आपल्या राज्यकर्त्यांच्या ठिकाणी जरी आपली राजनिष्ठा असली पाहिजे, तरी ह्या राजनिष्ठेचा उत्तम विकास म्हणजे इंग्रजी राज्यकर्त्यांच्या अंमलाखाली आपल्या देशाची शक्यतर उन्नति करून घेणें हा होय. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं महाराष्ट्र हेंच आमचें 'घर' हें तत्त्व लोकसमाजाच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 37723 दि: 1-7-95
क्रमांक 9378 नों: दि: 23-9-90



मनावर पूर्णपणे बिंबविल्यानंतर जे लोक ह्या घराच्या व्यवस्थेस लागले त्यांतच टिळक आणि आगरकर हे प्रमुख होत. घराची व्यवस्था ठेवावयाची म्हणजे ती दोन तऱ्हांनी ठेवतां येते. एकतर घराच्या आसपास कोण शेजारी आहेत, घरावर कोणत्या राजाचा कर आहे, घरावर किती बोजे आहेत, घरास कोठून भय आहे, घर संपत्तिमान व्हावयास काय केलें पाहिजे आणि घराचा संसार कसा चालवावयाचा हें पाहणें घराची दुसरी व्यवस्था म्हणजे घराची साफसुफी करणें, तेथले सामानसुमान स्वच्छ ठेवणें, तेथील कपाटांना व्हार्निश देणें, घरांतील कपबशा नीट मांडणें, घराला सफेती देणें व घरांतील भांडीकुंडीं जवळ ठेवणें ही होय. घर चांगल्या अवस्थेंत ठेवावयास, घराची दोन्ही तऱ्हांनी व्यवस्था ठेवली पाहिजे. किंबहुना घर एक दिवस सारवावयाचें राहिलें तर हरकत नाही. परंतु घरखर्चाची नीट तजवीज करणें, शेजाऱ्या-पाजाऱ्यांची ओळख करून घेणें, राजाच्या कानापर्यंत आपलीं गाऱ्हाणीं घालणें व घर ज्या बाजूने निर्भय होईल अशी व्यवस्था करणें हें जास्त महत्त्वाचें आहे. सार्व-जनिक चर्चेच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे सामाजिक व राजकीय प्रयत्न हे दोन्ही राष्ट्रोन्नतीला आवश्यक असून एक वेळ एखाद्या विधवेचें लग्न व्हावयाचें राहिलें तरी हरकत नाही, परंतु राष्ट्रोन्नतीच्या ज्या परकीय बाजी आहेत त्याचा प्रवाह राष्ट्रोन्नतीस अनुकूल असाच व्हावयास पाहिजे. राजकीय सुधारणा आधी, ह्याविषयींचा जे लोक वाद घालतात त्यांनी हें मुख्यत. ध्यानांत ठेवलें पाहिजे वस्तुत: पाहता ह्या दोन सुधारणांत आधीं आणि मागाहून असें कांही नाहीच, कारण संसारांत गृहप्रपंचाकरितां तजवीज करणें हें जितकें अगत्याचें आहे तितकेंच घरीं आल्यावर तेथील टापटिपीने, स्वच्छतेने व घरांतील मंडळीच्या एकोप्याने आनंदित होणें हेंहि अगत्याचें आहे. परंतु प्रसंगच आला तर एकवेळ गृहसौख्याकडे कानाडोळा होवो. परंतु घर कायम राहो, अशीच प्रत्येक मनुष्याची इच्छा असली पाहिजे. महाराष्ट्र हें आपलें घर आहे, अशी दृढ जाणीव विष्णुशास्त्र्यांनी उत्पन्न केल्यानंतर त्या जाणिवेस दृश्य स्वरूप देण्याकरितां राजकीय दृष्टीने टिळक व सामाजिक दृष्टीने आगरकर हे उभे राहिले. परंतु राष्ट्रसेवा करणें हाच दोघांचा उद्देश होता व दोघेहि विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे

दिव्य तत्त्व अमलांत आणण्यासाठीं झटत होते. टिळक हे दिवाणखान्यांत होते तर आगरकर हे बगीच्यांत होते, टिळक हे दरबारांत होते, तर आगरकर हे देवघरांत होते, टिळक उत्पन्नाची चिंता वहात, तर आगरकर मितव्ययानें कसें वागावें हें पहात होते; टिळक खलिते लिहीत होते, तर आगरकर परटीचे कपडे मांडीत होते; टिळक जगावें कसें हें पहात होते तर आगरकर जेवावें कसे हे शिकवीत होते; टिळक शेजाऱ्या पाजाऱ्यांची घरांतील माहिती करून घेत होते, तर आगरकर बायकांचें स्वास्थ्य पहात होते; टिळक बाहेरचीं दुःखें निवारीत होते, तर आगरकर घरचीं गाऱ्हाणीं ऐकत होते; टिळक मुत्सद्द्यांना खेळवीत होते, तर आगरकर मुलांना खेळवीत होते; दोघांचें कार्य एकच, गुरु एकच, देव एकच. एकानें देवाकरितां बाजारांतून अलंकार आणले आणि दुसऱ्यानें घरांतल्या घरांत उपकरणींच खळबळलीं, म्हणून पूजा एकाच देवाची! टिळक-आगरकर एकमेकांशीं भांडले असतील, त्यांचा कधीं रुसवाहि झाला असेल; पण असा रुसवा कोणत्या घरीं होत नाहीं ? परंतु महाराष्ट्रभूमि हें माझें घर, हीच दोघांची भावना, त्याच देवतेच्यापायीं दोघांचीं लोटांगणें! विष्णुशास्त्र्यांनी त्यांना तसेंच शिकविलें होतें. विष्णुशास्त्र्यांनी असा उपदेश केला होता कीं प्रयत्न राजकीय असो, सामाजिक असो, सांपत्तिक असो अथवा भावनात्मक असो, त्याचा विनियोग राष्ट्रमातेच्याच चरणीं झाला पाहिजे.

● ● ●

१०

# दादाभाइ बना

[ सुरसमधुर कल्पनाकारंजांनी व मार्मिक अतिशयोक्तींनी ह्या लेखांत दादाभाईंच्या अमर जीवनाची गाथा गाइलेली आहे.]

* * *

परमपूज्य दादाभाई नवरोजी स्वर्गवासी झाल्यास आज आठ दिवस झाले. त्यांचें देहावसान अकालीं झालें, असेंहि म्हणण्याचें कारण नियतिदेवीने ठेवलें नाही. कारण दादाभाईसारखीं नररत्नें आपल्या देशाला सर्वकाल लाभावीं अशी जरी आपली प्रबळ इच्छा असली तरी "शतायुर्वैपुरुष:" या सृष्टिनियमाने तिला मर्यादा आलीच पाहिजे. आनंदाची गोष्ट एवढीच की, हा प्रश्न जगांतील आपणासारख्या सामान्य व्यक्तीसंबंधाने उत्पन्न होत नसून ब्याण्णव वर्षांनंतरहि "दादाभाई इतक्यांत कां मेले ?" असाच प्रश्न प्रत्येक हिंदुस्थानवासी मनुष्याच्या मनांत उभा रहात आहे. खरोखर हें भाग्य अवर्णनीय होय, आणि असलें हें अवर्णनीय भाग्य पाहिलें म्हणजे खचित दादाभाईंची माता दादाभाईनाच प्रसवली असें वाटूं लागतें. आपणासारखे जगांतील बहुतेक सामान्य मानवी जीव जिवंत असूनहि मेलेलेच असतात; पण मेलेले असून चिरंजीव असे दादाभाईसारखे कांहीतरी पुण्यात्मे ह्या पतित हिंदुभूमींत जन्म घेतात त्याबद्दल आपण नि:संशय गर्व बाळगिला पाहिजे. एखादा पेटविलेला दिवा वाऱ्याच्या झोताने जाऊं नये म्हणून ज्याप्रमाणे त्याला अंगणांतून उचलून दिवाणखान्यांत नेतात त्याप्रमाणे मानवी देहयातनांच्या वाऱ्याच्या झुळकी दादाभाईंच्या प्राणज्योतीस बाधूं नयेत म्हणून नियतिदेवीने हा दीप आता मृत्युलोकांतून उचलून चिरंतन स्वर्गमंदिरांत नेऊन ठेवलेला आहे. आणि आपल्या मानवी नेत्रांस त्यांचा

पुराण–पुरुष देह जर अदृश्य झाला असेल तर तें नश्वरत्वाचें लक्षण नसून त्याच्या रक्षणाकरितां पुढें केलेला तो नियतिदेवीचा भरजरी शालूचा पदर आहे. दादाभाई आता चिरंजीव झालेले आहेत. स्वर्गात पाऊल ठेवल्या-बरोबर त्यांना जेव्हा पूर्वींचे "सप्तैते चिरजीविनः" भेटतील, त्या वेळीं खरोखर अश्वत्थामा त्यांना शाबासकी देईल की. कौन्सिलें अथवा म्युनिसि-पल हक्क असल्या लाहय़ांच्या पिठाला दूध समजून त्यांनी जिभोळ्या चाटल्या नाहीत, अथवा त्यामुळे स्वराज्याच्या खऱ्या दुधाचा नाद त्यांनी सोडून दिला नाही. हनुमान् म्हणेल की, लक्ष्मणाला शक्ति लागली असतांना मी द्रोणागिरी पर्वत आणला खरा; पण सातसमुद्र ओलांडून ह्यांनी जी स्वराज्य–प्रियतेची मृत्युंजय मात्रा, मूर्च्छित हिंदुस्थानला पुन्हा सावध करण्या-करितां आणली तिची योग्यता माझ्या सऱ्या द्रोणागिरीलासुद्धा यावयाची नाही. व्यासमुनि म्हणतील की, मी पंचलक्षण पुराणें रचून, आज विष्णूची तर उद्यां गरुडाची अशी जी महति वर्णन करीत बसलों त्यापेक्षा स्वावलंबनाच्या एकाच लक्षणानें युक्त असलेल्या स्वराज्याच्या एकाच पुराणाचें कथन जर मी दादाभाईंप्रमाणे करीत बसलों तर ॲनी बेझंट व टिळक ह्या दोघांनीहि मला एकजुटीनें कॉंग्रेसचे अध्यक्ष निवडलें असतें. बिभीषण म्हणाला असेल की, आपल्या बांधवांचा गळा कापून व आपल्या भूपतीशीं राजद्रोह करून जो मला माराकुटीनें अंगांत "राम" आणण्याचा प्रयत्न करावा लागला, त्यापेक्षा अखिल भारतीयांशीं कधीहि बंधुद्रोह न करणारा व साम्राज्यांतर्गत स्वराज्य मागून स्वराज्य–प्रयत्नांत सुद्धा राजनिष्ठेला धक्का न पोचूं देणारा हा जो बहादूर, त्याच्या अंगांत माझ्यापेक्षा सुद्धा कांही विशेष "राम" आहे. परशुरामांना असा पश्चात्ताप झाला असेल की, आपण हातांत शस्त्र घेऊन व्यर्थ एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केली, त्यापेक्षा स्वतः निःशस्त्रत्वाचें व्रत घेऊन राष्ट्रांतील क्षात्रवृत्ति नष्ट न होऊं देण्याकरितां हत्यारांच्या कायद्याविरुद्ध भांडणारा हा पारशी–त्यालाच खरें राष्ट्रजीवनाचें बीज कळलें. दादाभाईंची निष्कांचन वृत्ति पाहून कृपाचार्यांना स्वतःच्या निर्लोभी पवित्र आयुष्याचें सार्थक झाल्यासारखें वाटलें असेल व बळिराजा मनांत पुटपुटला असेल की, माझ्या साम्राज्यांतील निष्कंटक नागरिकत्व मिळविण्याकरितां वाम-

नाला तीन वर तरी मागावे लागले, पण हा दादाभाई खरोखर त्या वामनाचाहि दादाच, त्याने कलोनियल स्वराज्याच्या एकाच पविऱ्यांत, एकाच पावलांत–एकाच "स्टेप" मध्ये–राष्ट्राला जें जें हवें तें तें सारें मागून घेतलेलें आहे. दादाभाईंना हा शहाणपणा कोणी शिकविला? त्यांना ही अक्कल कोणी दिली? त्यांना ही अक्कल परिस्थितीने दिली व अहोरात्र परिस्थितीच्याच विचारांत जे निमग्न असतात त्या सर्वांना ही अक्कल येते. परिस्थिति ही मोठी गुरु आहे. फंड उभा न करितां ती कॉलेजें घालते व भिक्षा मागत न फिरतां ती विद्यालयें चालविते. ज्या ह्या मिस् परिस्थितीने, ज्या ह्या कुमारी ठाकुरणीने, ज्या ह्या संस्कृतीपूर्ण गोदावरीने लोकमान्य टिळकांना शिकविलें, महात्मा गांधींना शिकविलें, भगिनी ॲनी बेझंटला शिकविलें, त्याच गुरूने दादाभाईंना हुशार केलें व ह्या सर्वांपेक्षाहि दादाभाई वयाने जास्त म्हणून तिने प्रथम त्यांचेकडून व त्यांच्याच तोंडून कलोनियल "स्वराज्याच्या" मधुर मागणीचीं मधुर अक्षरें वदविलीं. आमचा हा तीस वर्षांचे वार खाल्लेला, वरसोव्याचा काँग्रेसगडी, सारें झालें तरी कांहीच झालें नाही असें समजून लिकलिकणाऱ्या डोळ्यांतून नवीन हिंदुस्थान, न्यू इंडिया, पुढील हिंदुस्थान, कल्पनामय हिंदुस्थान, उदार इंग्रजाने आत्मतुल्य बनविलेला हिंदुस्थान पहात बसत होता. म्हातारा स्वतः पिकलें पान झालेला होता; पण त्याच्या कल्पनेपुढे भावी हिंदुस्थानची नवी पालवी दिसत होती. जीर्ण कालाच्या मळकट बरणींत मुरून तो स्वतः जुनें लोणचें बनून गेलेला होता पण ह्या लोणच्याच्या स्वादाने तरी नवीन विचारांचें अन्न आपल्या देशबांधवांच्या पोटांत शक्य तितकें जास्त कसें जाईल अशी म्हाताऱ्याला तळमळ लागलेली होती. स्वतः ऱ्याण्णव वर्षांचा अतिदूरचा प्रवास करून तो आलेला होता; पण मूर्ख वाटसरूप्रमाणे मी अमक्या बोगद्यांतून आलों व तमकीं रिव्हर्सिंग स्टेशनें ओलांडलीं, अशी वायफळ बडबड तो करीत बसलेला नव्हता; तर पुन्हापुन्हा टाइमटेबलें काढून पुढचें स्टेशन लवकर कसें येईल ह्या एकाच फिकिरींत तो पडलेला होता. स्वतःचे केस पांढरे झाल्याची त्याला पर्वा नव्हती. कारण ऱ्याण्णवाव्या वर्षी पांढरे केंस नसणें म्हणजे तोंडाला काळिमा आहे, हें त्याला माहीत होतें.

त्याला गर्व एवढाच आहे की काळाने इतके पाय आपटले; पण माझ्या शरीराबरोबर माझें मन तो म्हातारें करूं शकला नाही. दादाभाईंचा कोणताहि फोटो घ्या, त्यांत त्या नाकाच्या खुबीदार ठेवणीवरून व ओठाच्या मजेदार लकवीवरून विनोदी हास्याची नाजुक लकेर ओळखू येते. जणू काय ते अभिमानाने एकसारखें काळाला हिणवीत होते की, तुझी चेष्टा माझ्याशीं कोठपर्यंत चालेल! माझ्या डोक्यावरचे केस पांढरे करीपर्यंत! पण बच्चंपिल्ली लक्षांत ठेव की हा दादाभाई इतका खंबीर आहे की हा शेवटीं तुझ्याच डोक्यावरून हात फिरवून साऱ्या हिंदुस्थानाला तरुण बनवील!

• • •

११

# राजाला माकड चावलें

[ दैनंदिन घटना देखील अच्युतराव वाचकांच्या अंतःकरणांत ठसवीत त्याचा हा नमुना. 'संदेश'च्या लोकप्रियतेचे असे लेख म्हणजे मोठेच आधार (स्तंभ)].

* * *

ग्रीसच्या राजाला माकड चावल्यामुळे त्याची तब्येत आज बरेच दिवस अस्वस्थ होती. शेवटीं हें दुखणें विकोपाला जाऊन ग्रीसच्या राजाचा ह्यांतच अंत झाल्याची बातमी आली आहे. माकडाच्या दंशामुळे प्राण जाऊं नये म्हणून फ्रान्समधून मोठमोठे विषवैद्य मुद्दाम ग्रीसमध्ये नेण्यांत आलेले होते. ह्यांपैकी एक डॉक्टर त्याचा निरुपाय झाल्यामुळे पखालीभर पैसा घेऊन नुकताच ग्रीसमधून परत आला व दुसरा इतक्या जलदीनें पॅरीसमधून निघाला की वाटेंत ह्याची एका क्षणाची खोटी होऊं नये अशी मुद्दाम व्यवस्था करण्यांत आलेली होती. पण हा डॉक्टर राजवाड्यांत जाऊन पोंचला असेल नसेल तोंच राजाचें प्राणोत्क्रमण झाल्याची वार्ता आलेली आहे. एका माकडानें अशा रीतीनें एका राजाचा प्राण घेतल्याची हकीगत खरोखर अत्यंत करुणास्पद आहे! ग्रीसचा राजा तरुण होता. आपला बाप कॉन्सन्टाईन ह्याला लोकांनी पदच्युत केल्यानंतर हा गादीवर आलेला होता. त्याच्या थोरल्या भावानें गादीचा वारसा सोडून दिल्यामुळे ह्याला गादी मिळालेली होती. ह्याचें गतवर्षी नुकतेंच लग्न झालेलें होतें व तें झाल्याचें प्रजेला पुरतें समजलेंहि नव्हतें. संपत्ति, सौख्य, वैभव, राज्य, तरुणपणा ह्या सर्वांना एका माकडाच्या माकडचेष्टांमुळे ग्रीसचा राजा मुकला, ह्याबद्दल आम्हांला अत्यंत वाईट वाटतें व राजवाड्यांत तरी माकडाच्या चेष्टांना वाव मिळाल्याबद्दल

आम्हांस दुःख होतें. माकडचेष्टांची पुष्कळ विषादकारक उदाहरणें आम्हीं आजपर्यंत ऐकलेलीं आहेत; परंतु माकडानें राजाचा जीव घेतल्याचें हें पहिलेंच उदाहरण असावें, असें आम्हांस वाटतें! हें माकड जर एखादा सोशालिस्ट असता, एखादा निहीलिस्ट असता, एखादा बोल्शेव्हिक असता अथवा एखादा दुसरा कोणी माथेफिरू असता तर त्याला तावडतोब फासावर चढवा, अशी कोणीहि शिफारस केली असती. १२१, १२४, वगैरे जे राजाविरुद्ध भयंकर गुन्हे आहेत त्याला अनुसरून त्यावेळीं त्याला असें बजावतां आलें असतें की, असल्या निंद्य माकडचेष्टांबद्दल तुला फाशीचीच शिक्षा योग्य आहे! पण ह्या बाबतींत तेंहि समाधान नाही. कारण तेथे ही माकडचेष्टा करणारें खुद्द माकडच आहे. तेव्हा सर्व समाधानें खुंटल्यामुळे तीव्रता झालेल्या दुःखांत आम्ही ग्रीसच्या राजाला शुभ परलोक इच्छितों व इतःपर कोणताहि राजा अशा हृदयद्रावक माकडचेष्टांना बळी पडणार नाही अशी ईश्वराची प्रार्थना करतों.

ग्रीसच्या राजाला हें माकड कसें चावलें, हाहि एक मनोरंजकच इतिहास आहे. ह्या राजाचा एक आवडता कुत्रा होता! त्या कुत्र्याच्या मागे हें माकड लागलें व त्याचा चावा घेण्याचा त्यानें प्रयत्न केला! राजे साहेबांना हें अर्थातच पाहवलें नाही! कुत्रा माकडाच्या तावडींत सापडतो असें पाहातांक्षणींच राजेसाहेबांचें हृदय द्रवलें आणि कुत्र्याला सोडविण्यासाठी ते माकडाच्या पाठीस लागले! त्या माकडाला हें कसचें रुचणार? कुत्रा हातांतून निसटतो, हें पाहातांच त्या माकडानें आपलें चावण्याचें शौर्य राजेसाहेबांवर चालविलें. खरोखर माकडाच्या तावडींत सापडलेल्या कुत्र्याची करुणा आल्यामुळेच राजेसाहेब या भानगडींत पडले. राजेसाहेब केवळ दयाशीलपणामुळेच कुत्र्याला माकडापासून सोडवूं लागले; पण ह्या दयाळूपणाचा कांही उपयोग झाला नाही. हा दयाळूपणाच त्यांना भोवला. माकडाच्या तावडींत सापडलेल्या कुत्र्याविषयीं उत्पन्न झालेल्या दयाळूपणालाच ते बळी पडले. हर, हर, काय ही विधिघटना! काय ही नियति! काय हा बनाव! इतका दयाळू राजा शेवटीं माकडाच्या पाशांत सापडावा काय? एवढ्या दयाळू राजाचा एका माकडानें प्राण घ्यावा काय? कुत्रा, माकड आणि राजा ह्या तिघांच्याकडे ह्या संबंधांत पाहिलें

म्हणजे राजाविषयीं खरोखर अत्यंत वाईट वाटतें व तितकीच ह्या माकडाविषयीं संतापबुद्धि उत्पन्न होऊन करुणबुद्धीचा कडेलोट होतो.

कारण राजे लोकांना माकडापासून मरण यावें, ह्यापरती करुणास्पद गोष्ट दुसरी कोणतीच नाही. जे भाग्यवान् राजे आपल्या भाग्याच्या परिवेषांतच परलोकीं प्रयाण करतात त्यांची गोष्ट सोडून दिली व इतकें भाग्य सरासरी प्रत्येक राजाचें असतें तरी, धोक्यानें मरणाऱ्या राजांचींहि उदाहरणें नाहीत असें नाही. कोणी कोणी राजे समरांगणावर मेल्याचीं उदाहरणें आहेत ! कोणी नेपोलियनप्रमाणें बंदिवासांत मेलेले आहेत. कोणा कोणा राजाचा ज्युलीअस सीझरप्रमाणें खून झालेला आहे व दुसऱ्या विल्यमप्रमाणें कोणी राजे शिकारीच्या वेळीं लागलेल्या बाणांमुळे मेलेले आहेत; पहिल्या चार्लसप्रमाणें फांशी गेले तेहि प्रसंगानुसार आढळत असतात; पण माकडामुळे मेलेला हाच पहिला राजा असावा, अशी आमची समजूत आहे. राजे लोक वैभवांत गेलेले शोभतात ! शिकारींत गेलेले शोभतात, किंबहुना बंदीवासांत खितपत पडून मेलेले शोभतात पण एका राजाला माकडामुळे मरण यावें, याबद्दल खरोखर आमचें अंतःकरण तुटतें! ग्रीसच्या राजाला त्या कुत्र्याची व्यर्थ कींव आली ! ग्रीसचा राजा व्यर्थ त्या माकडाच्या भानगडींत पडला. राजे लोक कितीहि दयाळू अथवा दिलदार झाले तरी त्यांनी कुत्र्यांपासून आणि माकडांपासून जितकें लांब रहावें तितकें चांगलें ! कारण कितीहि दयाळूपणा दाखविला तरी बोलूनचालू[illegible]ीं कुत्रीं व माकडेंच. हीं कुत्रीं-माकडें जितकीं नोकरचाकरांच्या ताब्यांत रहातील तितकें चांगलें. राजे लोकांनी या कामांत पडून दयाळूपणा उत्पन्न होऊं देण्यापेक्षा होतां होईल तितका कुत्र्यांचा, माकडांचा व नोकरांचा संबंध येऊं न देणें दूरदर्शीपणाचें आहे. राजांनी चोवीस तास मुत्सद्दी, सैन्य, मंत्री, सभाजन, न्यायशास्त्री, राजकारणी ह्याच परिवारांत घालवणें हें इष्ट आहे. कुत्र्याच्या मागे लागणाऱ्या एका माकडाच्या भांडणांत पडून ग्रीसच्या राजाचा एखादा खिजमतगार मेला असता तर त्याचें इतकें दुःख वाटलें नसतें; पण दुर्दैवानें खुद्द ग्रीसचे राजेसाहेब वारले आहेत. ते ऐन तारुण्यांत वारले आहेत. ते माकडाच्या दंशानें वारले आहेत. खरोखर इथे आमचें मन करुण भावनेनें भडभडून जातें. ह्या दुःख वेगांत एक अक्षरहि आम्हाला ज्यास्ती लिहवत नाही.

● ● ●

१२

# न कर्त्याचा वार शनिवार

[ वृत्तपत्रीय चटकदारपणाचा आणखी एक नमुना. हा लेख वाचून राजाला माकड शनिवारीं चावलें असतें तर बरें झालें असतें असें उगीचच वाटून जाईल.]

★ ★ ★

शनिवार हा फार गोड वार आहे. कारण हा वार न कर्त्या लोकांचा आहे. एखादी गोष्ट करावयाची असली म्हणजे इतर वारीं तिची योजना ठरवावी, परंतु शनिवारीं अशा गोष्टीची योजना करावयाची असते की, जी करणें आपल्या मनांत नाही. चतुर लोकांना शनिवार फार उपयोगी पडतो. कारण अकर्तृत्व स्वतःच्या शिरावर न घेतां तें ह्या दिवशीं त्यांना शनिवारच्या माथ्यावर ढकलावयास सापडतें. ख्रिस्तीधर्मांत रविवार हा परमेश्वराच्या विश्रांतीचा दिवस म्हणून कथन केलेला आहे; हिंदुधर्मांत परमेश्वराच्या विश्रांतीचा दिवस असा विवक्षित नाही; परंतु ही उणीव मनुष्यांनीच शनिवारीं कांहीएक करावयाचें नाही, असें ठरवून भरून काढलेली आहे. हिंदुस्थानांतील माणसें अगोदर कोणतीहि गोष्ट करण्यास नेहमीच नाराज असतात; परंतु शनिवारीं त्यांच्या या कमजोरीला असा कांही जोर येतो की इतर पांच-सहा दिवशीं जर त्यांच्या अंगीं थोडीबहुत उष्णता चढूं लागली असेल तर तीहि ह्या दिवशीं अगदी गारठून जाते. शनिवारचा व ह्या गारठ्याचा अन्योन्यसंबंध काय आहे, ह्याची मीमांसा करणें फार कठीण आहे. तें काम आम्हीं आपल्या अंगावर न घेतां परवाच्या इतिहाससंशोधनकमिटी-कडेच दिलें पाहिजे, व त्यांनीहि त्या कामास शनिवारीं सुरुवात करून उपयोगी नाही. परंतु एवढी मात्र गोष्ट खरी की, ह्या शनिवारचा खुद्द

शनिराजांवरसुद्धा परिणाम होऊन तो आपली प्रगति शनैः शनैः म्हणजे मंद मंद करूं लागला. ज्योतिषशास्त्रवेत्ते असें सांगतात की, ज्याप्रमाणे आपल्या पृथ्वीला एकच चंद्र आलेला आहे, त्याप्रमाणे शनीला आठ चंद्र आहेत. आपल्या पृथ्वीच्या वाट्यास एकच चंद्र आलेला आहे, तर चंद्रमुखींनी व मुखचंद्रांनी पृथ्वीवर अनर्थ उडवून दिलेला आहे. मग एकदम इतके चंद्र घेऊन शनि काय करीत असेल बरें ? आम्हांला असें वाटतें की, इतर ग्रहांच्या मानानें अतिशयच मंद पावलें टाकतां टाकतां शनीला आपल्या प्रवासांत कोठे तरी रात्र होत असेल व त्याला किटसनच्या दिव्यांची युक्ति माहीत नसल्यामुळेच तो ह्या चार दिवट्या एकदम जवळ बाळगीत असेल.

वारांमध्ये शनिवार हा वार आपल्या सुज्ञ पूर्वजांनी घालून टाकलेला असल्यामुळे आपल्या हिंदुस्थानच्या लोकांवर फारच सोय झालेली आहे. आता आपल्याला कोणतीहि गोष्ट "आम्ही करणार नाही" असें स्पष्ट म्हणावयास नको . ती गोष्ट शनिवारवर टाकली की, झालें. वक्तृत्वोत्तेजक संस्था नवीन स्थापन कराव्या अथवा पूर्वीच्या वक्तृत्वोत्तेजक संस्था पुन्हा उज्जीवित कराव्या, असा कोणी आपल्या पाठीमागे लागला की, होय म्हणत म्हणत आपण शनिवारपर्यंत त्यास रेटीत न्यावें आणि शनिवार आला की, एकदम सुरुवातीला लागावें. म्हणजे तिला सुरुवात होण्याची मुळीच भीति बाळगावयास नको. नुसत्या शनिवारच्या वासानें ती आपोआप मरून जाईल. शनिवारचा दर्प हा असा मादक आहे. कोणत्याहि संस्थेच्या तो नाकापाशी नेला की, त्या संस्थेला क्लोरोफॉर्म देण्याची पुन्हा जरुरीच पडावयाची नाही. मद्यपाननिषेधाला खुशाल शनिवारीं आरंभ करावा. गोरक्षणाचें काम बेधडक शनिवारवर टाकून द्यावें. पैसाफंड शनिवारच्या अंगावर सोपविण्यास कांहीच हरकत नाही. औद्योगिक चळवळीचीं बोलणीं नेहमीं शनिवारीं काढीत जावीं, साहित्यपरिषदा शनिवारपासून सुरू करीत जाव्या. हुंडा न घेण्याचे निश्चय शनिवारीं करावे. आजन्म अविवाहित राहून समाजसेवा करीत राहण्याची शपथ घेण्यास कॉलेजांतील तरतरीत विद्यार्थ्यांना शनिवारसारखा मुहूर्त सापडावयाचाच नाही. स्वदेशी साखर शनिवारीं खावी. स्वदेशी धोतरें शनिवारीं विकत घ्यावयास जावें. मुलींना शिक्षण देण्याची कल्पना शनिवारीं काढावी. दानधर्माकरितां शनिवारीं पैसा

काढीत जावा. देणग्यांसंबंधीं मृत्युपत्र करावयाचें असेल तर तें शनिवारीं लिहावयास घ्यावें. नवीन कारखाने शनिवारीं काढावे. परदेशगमनाला शनिवारीं प्रस्थान ठेवावें. सचोटीचा निश्चय शनिवारीं करावा. बायऱ्यांचे हिशोब शनिवारीं तपाशीत जावे. मित्रांना लिहावयाचीं पत्रें शनिवारावर ठेवावीं. वर्गण्या भरावयाच्या असल्या तर शनिवारचे वायदे सांगावेत. अनाथाश्रम शनिवारीं उघडावे. गीता शनिवारीं पठन करण्यास घ्यावी. प्रवचनें शनिवारीं ऐकावीं. कीर्तनेंहि शनिवारावर ठेवावीं. तीं शनिवारीं रात्रीं ठेवल्यास अतिच उत्तम. कारण मग सखूबाईच्या धडाक्यापुढे बुवासाहेबांना श्रोतेजन मिळण्याची धास्तीच नको.

असा ह्या शनिवार अगदीं उत्तम वार आहे. "मासानां मार्गशीर्षोऽहं" असें म्हणावयाच्या वेळीं "वाराणां शनिवारोऽस्मि" हें सांगण्यास भगवान् श्रीकृष्ण कसे विसरले कोण जाणे ! कदाचित् हें वाक्य घालीत असतांना शनिवार उजाडला असेल व त्यामुळें श्रीकृष्णाचा हा निश्चय ढासळून गेला असेल. शनिवारचें हें माहात्म्य पुष्कळ दिवस हिंदुस्थानांत चालत आलेलें आहे, व असें हें माहात्म्य शतकानुशतकें अबाधित राहिलेलें आहे. म्हणूनच लोकांच्या कर्तृत्वाची सांप्रतची स्थिति "दृश्यमान" होत आहे. ह्या पूर्वपरंपरागत क्रमांत सध्यांच्या पिढीने एक जास्त सुधारणा केलेली ती हीच की, शनिवारचे व कार्यांचें "डेप्युटेशन" कायम राखून त्याशिवाय त्याच्या जोडीला हल्लीं त्या सुधारलेल्या पिढीने रात्रीं नाटकांची जोड दिलेली आहे. ह्या युक्तीने हिंदुस्थानचा दोन तऱ्हांनी फायदा झालेला आहे. एकतर दिवसभर "न करण्याचा" मंत्र जपल्याने रात्रीं जाग्रणाचा त्रास होत नाही व दुसरे असे की, रात्री जाग्रण केल्यानंतर पुन्हा संबंध रविवारभर झोपा ताणण्याचा गंधर्वप्राप्त हक्क उपभोगावयास सापडतो. एका तिकिटावर दोन दिवसांना मारण्याची ही किती नामी युक्ति !

● ● ●

१२

# शेवटची वेल सुकली

[ स्वाभिमानाने प्रेरित होऊन 'संदेश' मधून छेडलेलें हें करुण-काव्य प्रत्येक मराठी मनाला अस्वस्थ करील. या ठिकाणीं अच्युत-रावांच्या लेखणीचे ढंगदार विलास रसोत्कट व नाट्यमयतेने कमालीचें वेधक ठरले आहेत.]

* * *

चार वर्षांपूर्वी पुण्याच्या किर्लोस्कर थिएटरमध्ये 'तोतयाचें बंड' चाललेलें होतें, त्यावेळीं एक वयस्क व्यक्ति दुसऱ्या मजल्यावर बसून तो 'खेळ' पहात होती. ही व्यक्ति कोण बरें? आणि ही व्यक्ति काय पहात होती? ही व्यक्ति 'तोतयाचें बंड' पहात होती, आणि किर्लोस्कर थिएटरमध्ये बसून हें बंड ती पहात होती. हें किर्लोस्कर थिएटर म्हणजे पूर्वीचा माण-केश्वराचा वाडा होय. हे माणकेश्वर नाना फडणीस वारल्यानंतर नाना फडणीसांच्या जागीं मराठी राज्याचे झालेले मंत्रि होत. थोडेंसें पलीकडे गेलें व क्रिकेटचें एक दुकान, एक न्हाव्याचें दुकान, आणि एक चहाकॉफीचें दुकान मध्यें टाकलें म्हणजे तेथें फडणीसांचा वाडा लागतो. मराठींतील षष्ठीच्या प्रत्यया, असें कां खोटें बोलतोस? हा वाडा नाना फडणीसांचा कोठला? आता तेथे नाना फडणीस कोठे आहेत? त्यांच्या वंशजांची सुद्धा आता त्या वाड्यावर मालकी नाही!

त्या वाड्यांत—की ज्या वाड्यांत एके काळीं बारभाईचें कारस्थान रचलें गेलें, ज्या वाड्यांत राघोबादादाला कोठे कैदेंत ठेवावे ह्याचा प्रथम विचार झाला, ज्या वाड्यांत मराठी राज्याच्या सुरक्षिततेबद्दल अहोरात्र

चिंतन चाललें होतें व पलीकडे शनिवारवाड्याच्या कारंजावर, सवाई माधवरावांची उडी पडल्याबरोबर ज्या वाड्यांत कोणी न पहातां, कोणाला न कळवितां, सर्वांपासून दडवून अगदी एकान्त स्थानीं डोळ्यांतील अश्रु-धारांचें प्रथम कारंजें उडालें,–त्या वाड्यांत, नाना फडणीसां (च्या) वाड्यांत–षष्ठीच्या प्रत्यया ! तूं इतका खोटें बोलणारा, इतका निर्लज्ज, इतका बेशरम आहेस की, तुझें खोटें बोलणें चुकवावें म्हणून तुझ्या भोवतीं आम्हीं पाठी तरी किती वेळ धरूं ?—जा, नीचा, जा व खुशाल त्या फड-णीसांच्या वाड्यांत असें ठासून बोल—या नाना फडणीसांच्या वाड्यांत आता पन्नास रुपयांवर "तुनुमुनु तुनुमुनु" करणारीं मास्तरें, बारा वाज-ल्याची घंटा बडविणारे शिपाई व छडीच्या धाकाने खोटी सबब हुडकून काढण्यांत गर्क झालेलीं पोरें हींच आज वावरत आहेत !

कथानक तुटलें ! आम्हीं आपल्या वाचकांना आज जें कथानक सांगणार होतों तें कथानक तुटलें ! मध्येंच हीं न्हाव्याचीं दुकानें व मास्तरांचीं वाळ-कुडीं "देहें" निघालीं ! पण चला, आपण आज तुटकेंच कथानक लावूं या ! हें कथानक तुटकेंच आहे. कारण जें जरासंधाच्या वज्रदेहाइतकें एके काळीं बेमालूम सांधलें गेलें होतें तें तुटल्याचेंच हें द्योतक आहे ! होय, वाच-कांनो, तें तुटलें—तें तुटलें बरें ! तें तुटलें हें सांगण्याकरितांच आज हें कथानक लावलें आहे ! एक वयस्क मूर्ति, नाना फडणीसांच्या वाड्यापासून फार दूर नसलेल्या माणकेश्वरांच्या वाड्यांत चार वर्षांपूर्वी "तोतयाचें बंड" पहात बसलेली होती ! त्या नाटकांत पेशव्यांचा वाडा आलेला होता. पांच-पन्नास रुपयांवर तोंडाला रंग लावावयास कबूल असलेला एक माणूस त्या दिवशीं कानांत कुंडलें घालून 'नाना फडणीस" बनलेला होता, व तित-क्याच किंवा कांही कमीजास्त रुपयांवर लुगडें नेसावयाला कबूल असलेला एक पुरुष त्या दिवशीं "पार्वतीबाई" झाला होता—झालीं, त्या नाटकां-तलीं मुख्य पात्रें हीं दोनच. त्यांशिवाय एक विठाई होती, एक बगंभट होता, एक दौलतराव होता. त्यांच्याशीं आपल्याला काय करावयाचें आहे ? तीं पात्रें सर्व काल्पनिक—खोटीं ! आणि तो तोतया तर बोलूनचालून तोत-याच ! तो खरा कोठला ? त्या नाटकांत खरीं पात्रें अशीं मुख्यत: दोनच. एक पार्वतीबाई आणि दुसरे नाना फडणीस !

नाना फडणीसांच्या वाड्यापासून जवळच असलेल्या माणकेश्वराच्या वाड्यांत बसून नाटक पहाणारी ती वयस्क व्यक्ति हें सर्व पहात होती. ती नाना फडणीस पहात होती, ती पार्वतीबाई पहात होती, ती रॉकेलच्या पेट्यांचा व दीडदमडीच्या जर्मन रंगाचा बनविलेला शनिवारवाडाहि पहात होती ! शनवार वाडा ! शनवार वाडा ! नाना फडणीसांच्या वाड्या-पलीकडच्या चार पावलांवरचा तो शनवार वाडा—शनवार वाड्याची कल्पना आल्याबरोबर त्या व्यक्तीच्या अंतःकरणांत चर्रर झालें ! सांडसानें चरके द्यावे त्याप्रमाणे त्या व्यक्तीच्या स्मृतीला चरके बसले ! करवतीने चरचर कर्वतावे त्याप्रमाणे त्या व्यक्तीची स्मरणशक्ति करवतली गेली. डोळ्यांपुढे अंधेरी आली ! किटसनचे दिवे असतांना सुद्धा डोळ्यांना दिसेनासें झालें ! त्या व्यक्तीचे डोळे मिटले ! कुलूप लावलेल्या गेटाप्रमाणे त्या घट्ट झांकलेल्या डोळ्यांच्या आंत अश्रुबिंदूंचा घोळका बाहेर येण्यासाठी डळडळत होता. पण डोळे इतके घट्ट मिटलेले होते की, त्यांना बाहेर यायला मार्ग नव्हता.

इतर माणसेंहि नाटक पहातच होतीं ! एकदा नाना फडणीसांची तारीफ करावी, एकदा पार्वतीबाईची तारीफ करावी, एकदा त्या विठाबाईच्या 'अॅक्टिंगवर' खूष व्हावें, एकदा त्या बगंभटाकरितां दांत काढावे, असें त्यांचें चाललेलें होतें ! शनवारवाड्याचा 'सीन' काय हुबेहूब साधलेला आहे, असें तीं आपापसांत कुजबुजत होतीं ! त्यांना वाटत होतें की, फळकुटावर रंग दिला म्हणजे शनिवारवाडा होतो आणि कानांत कुंडलें घातलीं म्हणजे नाना फडणीस होतो ! शनिवारवाडे व नाना फडणीस इतक्या सोप्या युक्तींत जर होत असते तर मग आणखी काय पाहिजे होतें ? रॉकेलची प्रत्येक पेटी व मण्यांचा लोंबता लंबक एवढ्या तयारीनेच जर नाना फडणीस व त्यांचा वाडा निर्माण होते तर निदान त्यांच्या वंशजाकडे तरी तो कां न राहता व शनिवार वा–वा–वा–तुटलें, हें कथानक पुन्हां इथे तुटलें ! हें कथानक आज कांही तडीला जात नाही

ती व्यक्ति हें सारें पहात होती ! पण छेः, ती हें कोठून पहाणार ? तिने नाटक पहायला सुरुवात केली व फळकुट्यावरच्या शनिवारवाड्या-

पुढे तिनें आपले डोळे घट्ट मिटून धरले. तिला कांही दिसेना! तिनें मान खाली घातली, गुडघ्यावर हात ठेवले व रात्र जशी सूर्याच्या गोलकाला दडविते, त्याप्रमाणें आपल्या पदरांत तिनें आपला गोल चेहरा दडविला. ती आपलें सर्व अस्तित्व विसरली! आजूबाजूंच्या प्रेक्षकांचीहि तिला जाणीव नाहीशी झाली! नाटकांतला एकहि शब्द तिला ऐकूं येईना! सुम्म्, असा एकच आवाज, अंधार हें एकच अस्तित्व, व आयुष्य हें एकच ओझें तिला वाटूं लागलें! अशा स्थितींत तिला बाहेरचें नाटक कोठून ऐकूं येणार?

पण हें बाहेरचें नाटक तिला ऐकूं येत असतें तरच बरें झालें असतें. कारण हें बाहेरचें नाटक बंद झाल्याबरोबर तिच्या अंतःकरणांत जें एक नवें नाटक सुरू झालें तें फारच क्रूर होतें. त्या नाटकानें तिचीं आतडीं ओढलीं, त्यानें तिला स्मरणाच्या यमयातना दिल्या. बाहेर एक नाना फडणीस नरसोपंतांनी लिहिलेलीं मोजकीं वाक्यें बडबडत होता. पण आंत तिच्या अंतःकरणांत खरा नाना फडणीस आपल्या खऱ्या दिवाणखान्यांत बसला होता. आंत खरी पार्वतीबाई खऱ्या शनवारवाड्यांत बसून टिपें मोजीत होती, त्यावेळीं नानांच्या वाड्यांत न्यू स्कूल नव्हतें, नाना फडणीसच होते; त्यावेळीं शनवार वाड्याच्या नव्या इमारती झाल्या नव्हत्या, शनवारवाडा आपले सर्व मजले सायसंगीत उभे करून तिच्या स्मरणांत थाटलेला होता; आणि ते नाना फडणीस व ती पार्ववीबाई, त्या शनवार वाड्यांतून आपल्या खऱ्या भाषेंतून ह्या व्यक्तीला विचारीत होती की, "कुसुम, तूं एकटीच येथे कोठे?"

जिवंत माणसांनी जिवंत माणसांना प्रश्न विचारला म्हणजे त्यांत कांही विशेष नसतें. कारण जिवंत माणसें त्याची लगेच वाट लावूं शकतात; पण मेलेल्या माणसांनी जिवंत माणसांना प्रश्न विचारला म्हणजे तो फार वाईट. कारण त्या प्रश्नांतून कशानेच सुटका होत नाही. तो प्रश्न त्यांचा सारखा पाठलाग करीत असतो. जिवंत माणसें पाठीस लागलीं म्हणजे त्यांना सहज झुकांडी देतां येते. कारण एखाद्या अरुंद वाटेंत अथवा एखाद्या आडव्या घरांत शिरलें म्हणजे त्यांची चुकामुक पडते. परंतु मेलेल्या माणसांचा पाठलाग फार वाईट. कोणत्याहि गल्लींत शिरलें तरी तीं पाठीमागे असतातच!

आपण पळालों की तीं आपल्या मागे पळतात. आपण टांगा केला की तीं टांगा करतात. आपण मोटार केली तर तीं मोटार करून आपल्यामागे धावत येतात. आपण बाकावर बसावें तर तीं बाकावर बसतात. आपण खुर्चीवर टेकलों तर तीं आपल्याजवळ खुर्ची घेतात, व कड्याकुलपें घालून आपण एकान्तांत म्हणून बसलों, म्हणजे बिनपाय वाजवतां त्या कड्या–कुलपांतून आपल्याजवळ येऊन आपल्याला असें विचारतात की, 'आम्हांला तूं कसें टाळणार?' या त्या व्यक्तीचें–किर्लोस्कर थिएटर-मधील त्या व्यक्तीचें–त्या दिवशीं तसेंच झालें. तिने डोळे मिटल्यानंतर एकदम तीं सारीं मेलेलीं माणसें, तो ऊंच मानेचा नाना फडणीस, त्या झुरत असलेल्या पार्वतीबाई, तो पोटाचा कोथळा बाहेर पडलेला नारायणराव, तो 'भाऊ,' 'भाऊ,' करीत ऊर बडविणारा नानासाहेब, तो कफ दाट-लेला माधवराव–फार काय सांगावें? कारंज्यावर उडी टाकण्याच्या तयारींत असलेला तो सवाई पेशवा, हीं सारीं मेलेलीं माणसें तिच्याभोवती जिवत झालीं व तिला म्हणालीं 'कुसुम, तूं एकटीच येथे कोठे?'

पण एवढ्यावरच थांबलें नाही! ह्यापेक्षा आणखी पुष्कळ प्रकार झाले. पेशव्यांनी पुण्यापासून ब्रह्मावर्तापर्यंत प्रवास केला म्हणजे आपली त्यांची संगती तुटते. मग आपण दयाळू इंग्रज प्रभूंचा अंमल पहावयास लागतों. लहान मुलांच्या डोळ्यांपुढून एखादें प्रेत उचलून नेलें, म्हणजे त्यांची "आई" किंवा "बाप" किंवा "मामा" किंवा "काका" तेथे संपतो! पुढचे मसणवटींतील प्रकार त्यांच्या कोवळ्या डोळ्यांना सहसा दिसूं देत नाहींत. पेशवाईचें असेंच झालें. रावबाजी पुण्याहून ब्रह्मावर्ताला गेले की तेथेच आपणांस पेशवाई संपली! मग पेशवाईचें प्रेत तिकडे मसणवटींत किती दिवस पडून राहिलेलें होतें व त्याला जमिनींत गाडलें कीं कोल्ह्या-कुत्र्यांनीं फाडलें की तें तसेंच तेथें सडलें, ह्याची आपल्याला वार्ताहि नाही!

पण ती किर्लोस्कर थिएटरमधील त्या दिवशींची व्यक्ति आपल्या-इतकी सुखी नव्हती. किंबहुना ब्रह्मावर्ताच्या पुढील इतिहासाशींच तिचा संबंध जास्त जास्त आला. तिचा जन्म ब्रह्मावर्त येथे झाला व तिच्या जन्मापासून ती पदच्युत नृपतीची कन्या म्हणून मिरविली गेली. शहाजी राजाचें अपत्य असून पुढें अकबर होणेंहि बरें, एवढेंच नव्हे तर नेपोलियन-

प्रमाणें साम्राज्य-सिंहासनावर नाचून अंतकाळीं झोपडींत मरणेंहि पत्करेल. कारण त्यांत स्वतःचें वैभव मिळविलेलें असतें व तें स्वतःच घालविलेलें असतें; परंतु पदच्युत राजाच्या पोटीं येणें, वितळलेल्या सोन्याच्या पाळण्यांत झोके घेणें, डिस्मिस् केलेल्या नोकराकडून लाड केले जाणें, ह्या गोष्टीइतकी मानहानिकारक गोष्ट दुसरी कोणतीहि नाही. परंतु किर्लोस्कर थिएटरमधील ती व्यक्ति अशा अपमानांतच जन्माला आली. तिने जन्मापासून अपमान पाहिला, अपमान ऐकला व अपमान सहन केला. पूर्वीच्या राजवैभवाच्या हकीगती ऐकाव्या व ब्रह्मावर्तांत असावें. पूर्वीच्या अफाट सत्तेचीं वर्णनें ऐकावीं व स्वतः सत्ताहीनतेचा अनुभव घ्यावा. पूर्वीचा अटकेपासून रामेश्वरापर्यंत फडकलेला भगवा झेंडा पहावा, आणि स्वतः फक्त ब्रह्मावर्तांतच वेष्टिलेलें असावें, ही स्थिति अत्यंत शोचनीय, अत्यंत दुःखकारक व अत्यंत क्लेश देणारी होय! पण किर्लोस्कर थिएटरमधील त्या व्यक्तीने ही सर्व स्थिति प्रत्यक्ष सहन केलेली होती, एवढेंच नव्हे, तर तो भाग्यहीन बाजीराव, त्याचा तो भाग्यहीन चिमाजीअप्पा, तो बंडखोर नानासाहेब, तो बंडखोर रावसाहेब, तो बंडखोर तात्या टोपे व त्यांच्या बायका, त्यांच्या मुली, त्यांच्या सुना ह्यांचा उडालेला हलकल्लोळ, किर्लोस्कर थिएटरमधील ह्या व्यक्तीने स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलेला होता. ही आमची व्यक्ति म्हणजे दुःखपर्यवसायी नाटकांतील शेवटचा आकांत, करुण-कहाणींतील शेवटची किंकाळी, अपशकुनी भवितव्यतेची शेवटची गांजणूक होती. अशा ह्या व्यक्तीपुढे त्या दिवशीं, त्या ‘ तोतयाचें बंड ’ चे दिवशीं सर्व मराठी इतिहास पुन्हा जिवंत होऊन पुन्हा पुन्हा थडग्यांतून उठून, पुन्हा चितेवरून खडबडून उभा राहिला असेल व त्या व्यक्तीला त्या दिवशीं त्याने किती भेडसावलें असेल ह्याची वाचकांनीच कल्पना करावी!

ही व्यक्ति कोण, हें आता वाचकांना सांगण्याची गरजच राहिली नाही. कारण ज्याने महाराष्ट्राचा स्वराज्यसूर्य लोपविला, ज्याने श्रीशिवाजीमहाराजांच्या कीर्तीला, कृतीला व उपकारांना हरताळ फासला, त्या परम दुर्दैवी, परम अमंगळ, परम सुतकी अशा शेवटल्या बाजीरावाची ही कन्या होय! ज्याप्रमाणे श्रीशिवाजीमहाराजांनी मराठी राज्य कमाविलें ही

गोष्ट आम्ही कधीहि विसरणार नाही त्याप्रमाणे आमचें मराठी राज्य घालवावयास दुसरा बाजीराव कारणीभूत झाला, ही गोष्टहि आमच्या स्मरणांतून कधीहि जाणार नाही. मराठी राज्याचा इतिहास प्रतापवंत शिवाजीमहाराजांपासून सुरू झाला व प्रतापहीन बाजीरावापाशीं तो संपला. मराठी इतिहासाचें पहिलें कव्हर शिवाजी आहे व शेवटचें दुसरा बाजीराव आहे. तेव्हा कोणी कितीहि आळशी वाचक असला तरी निदान पहिलें व शेवटचें कव्हर हें त्याच्या लक्षांत राहिल्यावाचून कधीहि रहाणार नाही. हीं दोन्हीं कव्हरें तांबड्या लालभडक रंगांत आहेत. पहिलें कव्हर पुण्यश्लोक शिवाजीच्या प्रतापांनीं खुललेलें आहे, व शेवटचें कव्हर रावबाजींनी उधळलेल्या विलासरंगांनी रंगविलेलें आहे. दुर्दैव इतकेंच, दुःख इतकेंच, विलापाची शोकाची गोष्ट इतकीच की, रावबाजीशीं "शेवटचा" हें उपपद कायमचें चिकटलें गेलें व हाय ! हाय ! ह्या उपपदाबरोबर स्मृतीचा बाण त्या व्यक्तीच्या हृदयांत कायमचा रोवला गेला !

त्या दिवशीं किर्लोस्कर थिएटरमध्ये "तोतयाचें बंड" पहात बसलेली ही व्यक्ति त्या बाजीरावाची मुलगी होय. हिचें नाव कुसुमाबाई व हें कुसुम ब्रह्मावर्ताच्या भाग्यहीन बागेंत उगवलें, भाग्यहीन बगीच्यांत राहिलें व नुकतेंच भाग्यहीन रीतीनें भाग्यहीनपणांतच काशी येथें म्लान झालें. ज्या शेवटच्या बाजीरावानें मराठी राज्याचा शेवट केला त्याची कन्या कोणत्याहि खऱ्या रक्ताच्या मराठ्याचें स्मरणांतून कधीहि नाहीशा न होणाऱ्या इ. स. १८१८ सालचा पहिला शेकडा ऐन संपण्याच्या वेळींच म्हणजे १९१७ सालीं मृत्यु पावावी हा योगायोग खरोखर फार विलक्षण दिसतो. बाजीराव गादीवर आला तेव्हा तो ऐन पंचविशीत होता. तेव्हा ज्यानें सतराव्या शतकाचीं पंचवीस तीस वर्षें उत्तम तऱ्हेनें पाहिलीं, त्यानें व त्याच्या कन्येनें मिळून सन अठराशेंचें सबंध शतक मध्यें गडप करून शिवाय सन एकोणीसशेच्या शतकाचीं पहिलीं सतरा वर्षें पहावीं, ही गोष्ट फारच लक्षांत ठेवण्यासारखी आहे. बाजीराव जर आपल्या परम प्रतापी पंचम जॉर्ज बादशाहाप्रमाणे भाग्यवंत असता व त्याची कन्या कुसुमाबाई ही जर भाग्यवंतपणांत व्हिक्टोरिया चक्रवर्तिनी असती, तर ह्या दोन व्यक्तींत–बापांत व कन्येंत मिळून मराठ्यांच्या इतिहासाचीं दीडशे वर्षें कधीच निघून गेलीं असतीं. परंतु

मराठी इतिहासाला तें भाग्य कधीहि लाभलें नाही. मराठी इतिहासाच्या अल्पावधींत ग्रीक थर्मापिलीचे प्रसंग आहेत, रोमन इतिहासाच्या हॅनिबॉलच्या स्वाऱ्या आहेत, मराठी इतिहासांत ट्यूडर-स्टुअर्टच्या घराण्याची जोड आहे, ह्या दृष्टीनें, जगांतील कोणत्याहि इतिहासापेक्षा मराठी इतिहास जास्त उद्दीपक, जास्त भरगच्च, जास्त देशभक्तिप्रवण व जास्त पराक्रमी आहे. पण दुर्दैव एकसारखें हात धुऊन मागे लागल्यामुळे मराठी इतिहासाला त्यानें कधी उसंतच पडूं दिली नाही. अकबर, अवरंगजेब, व्हिक्टोरिया राणी, तिसरा जॉर्ज, चवदावा लुई, राणी कॅथराईन ह्याप्रमाणे शिवाजी, राजाराम, बाजी-राव, पहिला माधवराव, महादजी शिंदे ह्यांपैकी मराठी इतिहासांत एक जरी "सेंचुरी बॅट्स्मन" निघता तरी मराठी इतिहास ज्या वर्षी संपला त्या वर्षी संपला नसता. पण भगवंताने मराठी राज्यांतलीं सर्व रत्नें व माणकें अत्यंत अल्पायुषी केलीं व पुढील भाग्यहीन व्यक्तींना एवढालीं आयुष्यें दिलीं की, त्यांपैकी फक्त दोघामध्ये दीडशे वर्षे आटून गेलीं !

असो, पेशवाई संपल्यानंतर पेशवे घराण्यांतल्या व्यक्तींचे काय काय घिडवडे निघाले, ह्यासंबंधीं खुद्द कुसुमबाईच्या तोंडून निघालेलें वृत्त आम्हीं आज दुसरीकडे दिलें आहे. कुसुमबाईचें निधनवृत्त दोन-चार दिवसांपूर्वी संदेशमध्ये प्रसिद्ध झालेंच आहे. हें निधनवृत्त १९१७ मध्ये म्हणजे १८१८ चें शतक पूर्ण करणाऱ्या सालांतच घडावें व पेशवाई घालविणाऱ्या पुरुषाच्या वंशांतील शेवटची व्यक्ति पेशवाई बुडाल्यापासून बरोबर शंभराव्या वर्षी नाहीशी व्हावी, हा योगायोग आम्हांस फार विलक्षण वाटतो, व त्याचा पुन्हा पुन्हा उच्चार केल्यावाचून आम्हांस राहावत नाही. पेशव्यांनी पुणें सोडल्यापासून पेशव्यांच्या एकाहि वंशजाचे पाय पुन्हां पुण्याला लागले नाहींत, फक्त १९१३ मध्यें ह्या कुसुमबाई—हें त्यांचे माहेरचें म्हणजे पेशव्यांच्या घरचें नांव. त्यांचे सासरचें नांव बयाबाई आपटे असें होतें—पुणें येथे आल्या व विशेष संस्मरणीय योग असा की, त्या वर्षी "तोतयाचें बंड" हें नाटक प्रथमच रंगभूमीवर येऊन ग्रंथकाराच्या विनंतीवरून त्यांनी नाटक पाहण्यास येण्याचें उदारपणें कबूल केलें. मराठी राज्य नामशेष झाल्यानंतर नाना फडणीसांच्या वाड्याची शाळा बनावी, माणकेश्वरांच्या वाड्यांत थिएटर यावें, आणि पदभ्रष्ट पेशव्याची कन्या तेथे पार्वतीबाईचें

नाटक पहाण्यास बसावी ही करुणप्रसंगाची जुळणी इतकी कल्पनातीत आहे आहे की, प्रत्यक्ष शूद्रक अवतरला तरी त्याला इतके चमत्कारिक प्रसंग जमवितां यावयाचे नाहीत. पण नियति ही करुण काव्यापेक्षाहि ज्यास्त विचित्र घटनांची घटक आहे आणि परमेश्वर हा कोणत्याहि कल्पनाबाज नाटककारापेक्षा जास्त कल्पक नाटककार आहे, म्हणून त्याच्या दरबारीं असले प्रसग उद्भवलेले पाहिले म्हणजे आश्चर्य करणें, स्तिमित होणें, थक्क होऊन जाणें ह्यापेक्षा आपणांसारख्या मर्त्य जीवांच्या हातांत काय आहे?

परंतु आपण कितीहि थक्क झालों तरी ज्या दुर्दैवग्रस्त स्त्रीचें, ज्या कुसुमबाईचें, ज्या भाग्यवान् पेशवे घराण्यांतल्या अभागी कुसुमचें आयुष्य गेल्या आठवड्यांत संपलें, त्यांचेवद्दल मनमुराद अश्रु ढाळल्याशिवाय आपल्या स्वदेशभक्तीचें ऋण आपण बरोबर रीतीने फेडलें असें म्हणतां येणार नाही. कुसुमबाई अप्रसिद्ध होत्या, कुसुमबाईचा पिता हतभागी होता, चांडाळ होता, हें सर्व जरी खरें आहे, तथापि त्या श्रीशिवरायांच्या स्वराज्यांतील शेवटचा दुवा असल्यामुळे त्यांचें महत्त्व, त्यांची किंमत व त्यांच्या विषयीची आदरबुद्धि हीं तिळमात्र कमी होत नाहीत. आज कुसुमबाईचें चरित्र आपण आठवलें नाही म्हणून आपल्याला कोणीहि शासन करणार नाही, कारण राज्य घालविलेल्या बापाची ती राज्यावर नसणारी कन्या होती! ज्ञानप्रकाशने तसेंच केलें! रावबाजी ब्रह्मावर्तास वारले तेव्हा त्यांचें निधनवृत्त ज्ञानप्रकाशने तीन चार ओळींतच दिलें. पण तेच रावबाजी जर पेशवाईवर असतांना वारते, व त्यावेळीं जर ज्ञानप्रकाश हयात असता, तर त्यांच्याकरितां हुंदके देतां देतां ज्ञानप्रकाशला पंधरा दिवस सुद्धा पुरले नसते! पण आम्ही असें म्हणतों की, भाग्यहीनपणांत कुसुमबाई वारली, ह्यामुळे तर त्यांच्या संबंधाने दुःख करण्याचें दुप्पट कर्तव्य आपल्यावर येऊन पडलेलें आहे आणि हें कर्तव्य जर आपण बजावणार नाही, तर आपल्या देशभक्तींत ती एक विलक्षण उणीव राहून जाईल!

मराठी इतिहास म्हणजे काय? महाराष्ट्रीय मनुष्य म्हणजे काय? मराठा म्हणजे तरी काय? मराठा म्हणजे शिवाजी, मराठा म्हणजे राजाराम,

मराठा म्हणजे बाजीराव, मराठा म्हणजे पानपतचा विश्वासराव! स्वतःला मराठा म्हणवून घेणारा मनुष्य असला, तरी ह्यांचें जर त्याला पदोपदीं स्मरण न होईल, ह्यांच्या स्मरणाने अवगुंठित असें जर त्याचें आयुष्य न जाईल, तर तो मराठा कसला? शिवाजीने महाराष्ट्र उत्पन्न केला, शिवाजीने मराठी इतिहास बनविला, शिवाजीने 'मराठा'-चैतन्य उत्पन्न केलें, तेव्हा जो शिवाजीला व शिवाजीपासून बाजीरावापर्यंत झालेल्या इतिहास-प्रवाहाला विसरेल तो हाडाचा मराठाच नव्हे! ती शक्ति, ती स्फूर्ति, तो देशाभिमान, तें शौर्य जर आमच्या महाराष्ट्रीयांच्या अंगीं सळसळलें तर तें 'मराठा' ह्या नांवाला योग्य, नाहीतर ह्या महाराष्ट्रांत त्यांनी राहूं नये, कृष्णेच्या पाण्याला शिवूं नये, सह्याद्रीकडे पाहूं नये, विष्णुशास्त्र्यांनी नटविलेल्या मराठी भाषेचा उच्चार करूं नये! ज्याची स्मृति, ज्याची भावना, ज्याचा शब्द सारंगीवरील काठीप्रमाणे तिकडून इकडे व इकडून तिकडे हालत न राहील, व त्यांतून देशभक्तीचीं मधुर गीतें न निघतील तर त्याने नांव बदलून ठेवावें—'मराठा' हें नांव कधीहि विटाळूं नये.

किर्लोस्कर थिएटरमध्ये आपण जरी नाटक पहात बसलों तरी कुसुम-बाईप्रमाणे आपल्या स्मरणाला स्फुरण भरलें पाहिजे, आपल्या डोळ्यांपुढे खरे सीन आले पाहिजेत, आपण हातरुमालाने तोंड दडवून आपल्या अंतः-करणाच्या रंगपटावर तो शिवाजी, तो संभाजी, ती येसूबाई, तो राम-शास्त्री, तो चाफाजी, तो महादजी, ह्यांनाच नाचावयास बोलाविलें पाहिजे. —थिएटरच्या बाहेरील पाटीवर शनवार-बुधवारचा कोणताहि खेळ लागलेला असो, आपल्याला त्यांत माणकेश्वराचा वाडाच दिसला पाहिजे. जातांना, येतांना, कार्य करतांना, विश्रांति घेतांना जर आपलें मराठी सत्य, आपलें मराठी देशप्रेम व आपलें मराठी वैभव आपणांस आठवलें, तरच आपण आपल्या आईच्या पोटीं जन्मलों! जो मनुष्य पुण्यांत पाय ठेवील आणि शिवाजीच्या स्मरणाने मुदित होणार नाही, जो मनुष्य बोलाईच्या पटां-गणावर उभा राहील आणि आपल्यापुढे दुसरा उभा करणार नाही, जो मनुष्य पेशव्यांच्या शनवारवाड्यावरून जाईल व अंतःकरणांत पूज्य बुद्धीने थरारणार नाही, तो मनुष्य कसला? ताजमहालापुढे उभे राहून ओरडणारें गाढव व असला मनुष्य ही उभयतां सारखींच!

अनुक्रम 37723 वि: 17.9.54
क्रमांक 9325 नों दि: 23/9/54

आणि म्हणून पेशवे कुळांतली ही शेवटची स्त्री मृत झालेली पाहून, पेशवे कुळांतली ही शेवटची पताका खाली पडलेली पाहून, पेशवे वंशवृक्षाची ही पालवी सुकून गेलेली पाहून आपण दुःखी झालें पाहिजे, शोक केला पाहिजे, अश्रूंनी ही महाराष्ट्रभूमि नाहविली पाहिजे. आज आपण शिवाजीच्या राजवटींत नाही, दयाळू पंजम जॉर्जच्या राजवटींत आहोंत! आज आपण भगव्या झेंड्याखालीं नाही, युनियनजॅकखाली आहोंत! आज आपण शिवाजीपासून बाजीरावापर्यंत नाही, तर क्लाइव्ह, वॉरन हेस्टिंग्जपासून मॉंटेग्यूच्या तीरातीराने पुढे चाललेले आहोंत. काळ बदलला आहे, कर्तव्यांत पालट पडला आहे, भविष्यकाल निराळ्या स्वरूपाचा झालेला आहे. तरी पण कुसुमाबाईप्रमाणे लक्षांत ठेवलेंच पाहिजे की आपण श्रीमंतांचे आहोंत, राजघराण्यांतले आहोंत, मराठा परंपरेंतले आहोंत. फेरोजशहा मेथा, सुरेंद्रनाथ बानर्जी, चिंतामणी, जिना ह्यांच्या परंपरेंतले आपण नाही. त्यांना ज्या गोष्टी पाहून तोंडाला पाणी सुटत असेल त्या आपल्यालाहि मिळाल्या तर उत्तमच,—कारण आपण कांही त्यांचे वैरी नाही, ते आपले देशबंधूच आहेत.—पण जें पाहिलें असतां जिना जिन्यावरून दुडदुड धावत येतील, जिचें वर्णन करतां करता ना. वॉच्छांना शेक्सपीअरची इंग्रजी वाचामुद्रा अपुरीच वाटेल, त्याकरितां तसल्या प्रकारची सुरेंद्रनाथची धिसाडधाई आपल्याला कधीच करायला नको. आपण राजनिष्ठ, शांत, गंभीर, व धीराचे बनले पाहिजे देशभक्ति, सत्यनिष्ठा, राष्ट्रीयपणा हाच काय तो आपला बाणा, व तोच आपण चोवीस तास वाढवीत गेले पाहिजे. हेंच, हेंच आपलें कर्तव्य महाराष्ट्रीयाला दुसरें कर्तव्य नाही. कॉंग्रेस, प्रांतिक कमिट्या, एकोणीसांचा मसुदा, गोखल्यांची स्कीम, जिनांची योजना—हूं—चालू द्या, चालू द्या हें सारें! वॉच्छा व सुरेंद्रनाथ त्यांत पटाईत आहेत, त्यांना त्यांत चोवीस तास गुन्तू द्या, आम्हां महाराष्ट्रीयांना त्यांत कांही समजत नाही. कोणत्या बैठकींत, कोणी निवडलेले, किती मेंबर घ्यावेत—छे:, आम्ही महाराष्ट्रीयांनी असले उखाणे कधी सोडविलेलेच नाहीत! आम्हांला एकच समजतें, तें काय? तर देशभक्ति! चोवीस तास शिवाजी—रामदासांचें स्मरण करून व चोवीस तास इंग्रज सरकारशीं राजनिष्ठ राहून, चोवीस तास सत्य व चोवीस तास

कायदा पुढ्यांत ठेवून, चोवीस तास राष्ट्रीय कर्तव्यें व चोवीस तास सनदशीर कर्तव्यें ह्यांचें पालन करून आम्हीं महाराष्ट्रीय सत्यत्वाच्या श्रीमंतींत झुलत रहाणार. जर आम्हां महाराष्ट्रीयांना कोणी असें म्हणालें की, 'जरा आमचेकडे लक्ष देऊन, येथे आठच मेंबर ठेवावे की नववा मेंबर आणखी घ्यावा एवढें सांगा,' तर आम्ही त्यास वंदन करून एवढें सांगू की, "भाई! ह्या महाराष्ट्राच्या इतिहाससिंधूंत आम्ही यावेळीं डोकें खुपसून बसलों आहोंत. ज्या वेळीं त्यांत आम्हांला कुसुमावाई सुद्धा दिसेनाशी होईल, त्यावेळीं मी तुला मेंबरांची फोड करून देईन, तोपर्यंत मी स्वतःशीं संतुष्ट आहें की, मी 'महाराष्ट्रीय' आहें!"

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 11843


१४

# सौ. वत्सलावहिनींचें पत्र

[ 'सौ. वत्सलावहिनींचीं पत्रें' हें 'संदेश'चें अतिशय लोकप्रिय सदर. अच्युतरावांनी तें इतक्या चतुराइने चालविलें की, त्याची नक्कल करणाऱ्या कोणालाहि त्यांची सर येऊं शकली नाही. उपहासाच्या आधारें स्वातंत्र्याचा संदेश वत्सलावहिनींनी मोठ्या खुबीने पेरला आहे.]

* * *

॥श्री॥

रा. रा.' सन्देश' भावजी यांस :—

भावजी, काय सागूं तुम्हांला ? अलीकडे ज्याच्या त्याच्या तोंडीं पहावं, तो आपला बायकांचा प्रश्न ! हरविलास शारदा ह्यांचा कायदा बायकांच्याकरिता. डॉ. गौर ह्यांचें बिल बायकांच्या करिता. श्री. जयकरांची भाषणें बायकांच्या करिता. मुंबईतली परिषद् बायकांच्या करिता. बाई, बाई, बाई ! काय ही पुरुषांना आम्हां बायकांची काळजी ! खरोखर भावजी, इतकी काळजी पाहून जीव कसा गुदमरून जातो. एवढे महात्मा गांधी ना ? पण तेसुद्धा आमच्या बायकांच्या काळजींत सापडलेले !

इतके दिवस बायका कधी स्वयंसेवकांच्या पलटणींत शिरलेल्या ऐकल्या होत्या का तुम्हीं ? आम्हीं बाई कधी ऐकल्या नव्हत्या. आमच्या वेळीं, भावजी, हें नव्हतंच ! पण गांधींच्या चळवळींत स्वयंसेवकांच्या पलटणीमध्ये बायकांचा पहिला नंबर. परवा कॉंग्रेस भरली त्यावेळीं जितकी पुरुषांची पलटणं, तितकींच बायकांचीं पलटणं ! भावजी, ह्या कायदेभंगाकरिता महात्मा गान्धींनी स्वयंसेवकांचीं सैन्यें उभारलेलीं आहेत ना ? त्यांतहि पुरुषांच्या बरोबरीनं बायकांना शिरायचा उपदेश चाललाय. आणि बायकाहि झपाट्यानं

ह्यांत शिरताहेत. आतां तुम्ही म्हणाल की, बायका म्हणजे अमुक एका गोष्टींत मागे आहेत-- तर तसं नाही हो भावजी. त्या अगदी पुरुषांच्या पावलांवर पावलं ठेवून चालल्या आहेत. मी तर म्हणतें की, सध्या कोणतीहि गोष्ट घ्या, त्यांत आपला बायकांचा पाय पुढं. पूर्वी बायका वरातींत पुढे होत्या व कथा पुराणांत मागे बसत होत्या; पण आतां बायका चोहोंकडे पुढेच. त्या सभातनं पुढे, कथापुराणांतनं पुढे, नाटकांत पुढे, एवढी सरकारची ट्रामगाडी ना? पण ट्रामगाडींत सुद्धा, त्या पुरुषांच्या पुढे.

एक काळ भावजी! असा होता की, बायकांच्या संबंधानं एखाददुसऱ्या पुरुषालाच काय ती कळकळ असे, बाकीच्या पुरुषांच्या ध्यानींमनींहि बायका म्हणून कुणी आहेत असं नसे. मला पक्कें आठवतें भावजी, आमच्या वेळीं बायकांच्या संबंधाने विशेष लिहायचं म्हणजे कोणी? तर आगरकरांनी; पण आपल्यांतले अगदी शहाणेसुरते लोकसुद्धां त्यांना हसत. म्हणे त्यांनीं आपल्या शहाणपणाचा टेंभा काय पाजळला? तर बायकांना शिक्षण कां देत नाहीं? बायकांना शिक्षण कां देत नाही? जणू कांही ह्याशिवाय त्यांना ल्याहायला विषयच नाहीत. अहो, तुम्हांला ल्याहायची हौस आहे, तर नाण्यांच्या प्रश्नांवर लिहा, "औद्योगिक प्रगति-"-(बाई, बाई, बाई, केवढा तरी हा अगडबंब शब्द!) वर लिहा. जमीन-महसुलाच्या धोरणावर लिहा. स्वदेशी कापडाच्या करारावर लिहा व लिहितांना ग्रीस, रोम, स्पेन्सर, मिल्ल, शेक्सपिअर, सिसरो, तुर्कस्थान, रशिया असे मोठमोठे शब्द तुमच्या लिखाणांत आणा. बायकांचं शिक्षण -इश्श मेल्लं, ह्याच्यावर कसलं लिहितां? म्हणतात ना-बायकांत पुरुष लांबोडा, त्यांतलीच गत ही!

आगरकरांना-हो-विसरलेंच-त्यांच्या पूर्वी विष्णुशास्त्री पण्डित म्हणून होते-फार प्रसिद्ध होते हो त्यावेळीं-म्हणजे हल्ली जसे चिंतामणराव वैद्य प्रसिद्ध आहेत, किंवा देव तुमचं भलं करो. डॉ. मुंजे प्रसिद्ध आहेत, तसे एके वेळीं ते प्रसिद्ध होते-तेहि बायकांच्या संबन्धाने पुष्कळ लिहीत असत! पण त्यांना किंवा आगरकरांना लोक काय म्हणत? बायकी लेखक! नेहमी हे बायकांच्या संबंधाने लिहायचे किंवा बोलावयाचे. आगरकरांचे सगळे विषय-आणि मी म्हणतें भावजी की सगळे नसले, तरी निम्याहून अधिक विषय तरी बायकांच्या संबंधाने होते हो! बायकांनी अनवाणी चालावं

की पायांत जोडा घालून चालावं, ह्यावर सुद्धा त्यांनी लिहिलं. आणि मग लोक जे हसायला लागले म्हणतां, की विचारूं नका. किती मजा झाली भावजी त्यावेळीं. मी देखील भावजी, त्या दिवशीं खूप हसलें. आतां कित्ती मला त्याचं वाईट वाटतं. आणि मला चांगलं आठवतं की ह्याबद्दल माझ्या-वर त्या दिवशीं रागावणं देखील झालं. तिकडचा स्वभाव तुम्हांला माहीतच आहे भावजी. थोरामोठ्यांची थट्टा केलेली एवढी देखील खपायची नाही. त्यांतनं आगरकर म्हणजे काय? तिकडे अगदी देव! त्यांना हसलेलं तिकडे कुठे खपायला ?

कर्व्यांनी तर कमालच केली. आगरकरांनी नुसतं बायकांच्यासाठी लिहिलं. त्याकरितां एखादी संस्था वगैरे कांही त्यांनी काढिली नाही. बाकी संस्था काढण्याइतकं त्यांना आयुष्य कुठं होतं म्हणा! अगोदर महा-राष्ट्रांतल्या लोकांना आयुष्य कमी आणि त्यांतनं विष्णुशास्त्री चिपळूणकर, वामनराव आपटे, आगरकर, गडकरी, जनार्दन विनायक ओक, बालकवि, कुळकर्णी वगैरे मंडळींना फारच थोडं आयुष्य. म्हणजे लोकांनी यांना कुठं पाहिलं न पाहिलं, तोच ते मावळले! अन् भावजी, लोकांची हौस फिटली एखादा सण जसा येतो की नाही? आणि जरा कुठं जेवणं खाणं होतात न होतात तोच तो मावळतो–संक्रान्तीचंच घ्या ना. अगदी अस्संच होतं.–शाळू दिवस, तो मुळी पुरतच नाही,–तर मी म्हणतें की आज देखील ह्या सगळ्या मंडळीला–तसंच मी म्हणतें की, लो. टिळक, ना. जोशी, वासुदेवशास्त्री खरे, भाऊशास्त्री लेले, गजाननराव वैद्य, राज-वाडे, नाथमाधव, सीताराम केशव दामले वगैरे मंडळींना असायला काय हरकत होती? तस्सं ह्या मंडळीचं झालं! लेडबीटर म्हणे ८२ वर्षं वयाचे आहेत–आणि तस्संच जर बघितलं, तर चांगलीं टुणटणीत आहेत हीं सारीं. आमच्यांत आगरकर, टिळक, गोखले असते, तर कदा-चित् ह्यांच्याहिपेक्षा लहानच असते; पण म्हातारें माणूस टिकतें आहे कुठे आपल्या देशांत? आपल्या देशांत लगीनघाई आणि मरणाची पण घाईच. मी तर म्हणतें की, आपल्या ह्या महाराष्ट्रांत लगीनघाईपेक्षा मरणघाईच जास्ती. किती दुःखाची गोष्ट बरं ही! मला किनई हें 'अस्सं'

आठवलं, म्हणजे रडूं कोसळतं भावजी. पण करायचं काय ? अल्पायुष्याचा रोग आपल्या देशाच्या मागचा सुटेल तेव्हा ना ?

हो, खरेंच काय लिहीत होतें मी ? हां ! आगरकरांच्या मागें कर्वे झाले आणि त्यांनी बायकांच्या प्रश्नाला आपलें सारें आयुष्य वाहिलें. कर्व्यांचें हें चरित्र म्हणजे किती पुण्यवान् आहे भावजी ! हजारों मुली त्यांच्यामुळे सन्मार्गास लागल्या 'अन्' त्या सगळ्या सुखानें नांदताहेत. ह्या सगळ्यांचे आशीर्वाद मिळाले असतील त्यांना. खरोखर कर्व्यांना पाहिलं म्हणजे मला पूर्वीच्या वसिष्ठ–वाल्मीकींची आठवण होते. आणि पूर्वीचे ऋषि हिन्दुस्थानांतून अजूनहि कांही नाहीसे झाले नाहीत, असें वाटतें. शिवाय, भावजी ! वसिष्ठ वाल्मीकींच्या प्रमाणे कर्व्यांनी अलीकडे दाढीहि वाढविलेली आहे, त्यांचा फोटो मी त्यांच्या चिरंजीवांच्या जवळ पाहिला ! 'इश्श ! अण्णांना ही दाढी कधी आली ?' मीं मनांत म्हटलें, आणि अण्णांनी ही दाढी कशासाठी वाढविली ? पण कांही म्हणा भावजी, ही दाढीदेखील त्यांना त्यांच्या "आश्रमा" प्रमाणेच शोभते हो ! आता किनई, हे आपले वाल्मीकि चीन, जपान, कोरिया, अमेरिका वगैरे नवखंड पृथ्वी फिरून, तिथून आपल्या आश्रमाला मदत आणणार आहेत ! किती अचाट उद्योग हा ! आणि केवढ्या मोठ्या वयांत ?

पण आता कर्वे देखील मागे पडतील, इतकी बायकांच्या विषयींची काळजी सर्वांना लागलेली आहे. अहो जवाहरलाल नेहरू म्हणजे सर्वांत नवतर आणि लहान ! पण त्यांच्याहि भाषणांतनं बायकांची काळजी दिसून येते ! परवा ते मुम्बईत आले ना ? त्या वेळीं मला वाटतें की प्रत्येक भाषणांत ते बायकांच्या विषयीं बोलले. त्यांनी त्या दिवशी कॉंग्रेस हाऊसमध्ये किती उत्तम उपदेश केला म्हणता ? तो ऐकतांना आमच्यापैकी प्रत्येकजणीला गहिंवर आला व असं वाटलं की, घर, संसार सर्व सोडावा आणि स्वातंत्र्य-सैन्यांत जाऊन उभें राहावें !

भावजी, मला किनई ह्यासंबंधानं पुष्कळ बोलायचं आहे. अलीकडे बायकांच्या विषयी प्रत्येकाला आलेला उमाळा हा कांही चांगला नाही ! आणि कांही कांही पुरुषांचं आणि बायकांचं वागणं–इश्श ! चांगलं का तें ? मला तर तें अगदी नापसंत आहे ! तरी पण भावजी, बायकांच्या

कळकळीची आलेली एवढी लाट, ही कांही सामान्य आहे असं समजूं नका व ही कारणाशिवाय आली आहे, असंहि पण नाही बरं का! परमेश्वराचा दरबार भावजी, अगदी न्यायाचा असतो. त्यांत कोणतीहि गोष्ट विनाकारण घडत नाही. जी जी गोष्ट घडते, त्यांत सृष्टीचा कांही तरी हेतु असतो! मी तर म्हणतें की पुढं कांहीतरी चांगलं व्हायचं असेल, म्हणून बायकांच्या विषयींच्या कळकळीची ही लाट आलेली आहे! जसा पुढं श्रीकृष्ण व्हायचा म्हणून अगोदर माया उत्पन्न झाली, अथवा श्रीशिवाजीमहाराज जन्माला यायचे, त्याच्या अगोदर श्रीभवानी अवतरली त्याप्रमाणं भावजी, लौकरच हिंदुस्थानला स्वराज्य लाभणार, ह्याची ही शुभ शकुनवंती' आहे! मी तर भावजी, बायकांच्या प्रश्नाच्या ह्या लाटेला 'जयभवानी' च समजतें, व भवानीमातेला हळदकुंकूं वाहून असं विनवितें की, 'जय भवानी! आमचे अपराध पोटांत घाल, आमच्यावर कृपा कर, आणि जसे अमेरिकन, जपानी, इटालियन, इंग्रज हे आपापल्या देशांत स्वतंत्र आहेत, तसे जय भवानी! आम्हांलाहि आमच्या देशांत स्वतंत्र कर! तूं असें करशील तर आम्ही हिंदुस्थानांतल्या सर्व बायका तुझा नवरात्राचा उत्सव करूं व देवी भवानी! खणांनारळांनी तुझी ओटी भरून तुझा कीर्ति-नगारा वाजवूं!'

आपली,
सौ. वत्सला वहिनी.

१५

# सत्तेशिवाय जीवित शून्य आहे!

[ १९२२ सालचें सरकारी बजेट बाहेर पडल्यानंतर अच्युतरावांनी मवाळांवर हें बोचक शस्त्र उपसलें आहे. मवाळाग्रणींना नांवनिशीवार हास्यास्पद करण्याच्या त्यांच्या पद्धतीचा हा एक नमुना.]

* * *

एकदा बादशहानें बिरबलाला विचारलें की, सत्ताविसांतून नऊ गेले तर बाकी किती राहिले? बिरबलालाच हा प्रश्न विचारण्याचें कारण इतकेंच की, हा प्रश्न यापूर्वी बादशहानें दरबारांत विचारलेला होता, व त्यावेळीं सर्व दरबारी लोकांनी सत्ताविसांतून नऊ गेले तर बाकी १८ रहातात, असें उत्तर दिलेलें होतें. आणि असें खरेंच आहे. २७ तून ९ गेले तर बाकी १८ च राहणार हें कोणीहि सांगेल. शाळेंतलें कोणतेंहि अंकगणित घ्या, पोरांना बडविणाऱ्या कोणत्याहि शाळामास्तराला पकडा, कॉलेजांतली खुर्ची अडविणाऱ्या कोणत्याहि प्रोफेसराला विचारा, अर्थशास्त्रावर अर्थशून्य बाडें खरडणाऱ्या कोणत्याहि स्वार्थसाधू आकडेमोड्या "तज्ज्ञा"ला प्रश्न करा, किंवा गणितविद्येबद्दल जगद्विख्यात सीनियर रँगलरपणाची पदवी कमावून येणाऱ्या आमच्या रघुनाथराव परांजप्यांपुढे हा सवाल टाका — प्रत्येक त्याचें हेंच उत्तर देईल की, २७ तून ९ गेले म्हणजे बाकी १८ राहतात!

आणि हें खरेच आहे. गणिती लोक ह्यापेक्षा निराळें काय म्हणणार? गणिती लोकांची अक्कल ती किती? 'धनगरांनी २७ मेंढ्या पावणे चारशे रुपयांना विकत घेतल्या, त्यांतल्या सात मेंढ्या पटकीनें मेल्या, तीन

मेंढ्या ड्यूक ऑफ कॅनॉटचे आगमनाप्रीत्यर्थ कापल्या, पांच मेंढ्या लांडग्याने नेल्या व बाकीच्या मेंढ्या देऊन चार इराणी गद्धे मोबदल्यांत घेतले, तर प्रत्येक धनगराने किती रुपयांकरिता शंख करीत बसावें, इथपर्यंतच ह्या शंखांची अक्कल ! ह्यापेक्षा त्यांना राष्ट्राच्या भवितव्यतेचा अंदाज असता, ह्यांना देशाच्या स्वातंत्र्याची चाड रहाती किंवा ह्यांना परिस्थितीची जाचणूक लागती, तर हे शंख सत्तावीस मेंढ्यांत आणि चार इराणी गद्धयांत कशाला घुटमळत बसते ? ह्यांना कसली अक्कल ? ह्यांनी जे आहात्ते दोहोंत दोन मिळविले म्हणजे चार होतात असें पोपटासारखें सांगावें, किंवा पृथ्वीचा आकार जे आहात्ते नारिंगासारखा असतो असें शेंदरी आंब्यासारखें तोंड करून विव्हळत सुटावें, राजकारणाची त्यांना काय अक्कल ?

राजकारणाची अक्कल फार निराळी असते. राजकारणाचे आकडे निराळे, राजकारणाचे हिशोब निराळे, राजकारणाच्या बेरजा आणि वजावाक्या निराळ्याच। , एकावर शून्य ठेवलें म्हणजे दहा होतात, असें हे बेवकूब गणिती सांगतील; पण एकावर शून्य ठेवल्याने त्यांचा देव आला तरी राजकारणांत दहा व्हायचे नाहीत. उलट त्या शून्याचें त्या एकाला इतकें ओझें होईल की, एकाचीच किंमत शून्य व्हायची पाळी येईल. रँगलर पराजप्यांचेंच उदाहरण घ्या. रँगलर परांजपे म्हणजे एवढें मोठें शून्य आहे, एवढें मोठें प्रचंड शून्य आहे, एवढें जंगी वर्तुळ आहे, एवढें अगडबंब "वाटोळें" आहे, एवढें मिशाळ "नारिंग" आहे, एवढा "आकडेदार झीरो" आहे, की त्याला कुणाच्याहि पाठुंगळीवर बसवा, त्याला त्यामुळे काही दसपट अवसान चढणार नाही, उलट हें पगडीदार पूज्य आपण कुणीकडून जवळ बाळगलें असें त्यास होऊन जाईल. पूर्वी कै. गोखले हयात असतां त्यांच्या पाठीवर हें पगडबंद शून्य बसलेलें होतें, पण त्यामुळे काय गोखल्यांना दसपट सामर्थ्य आलें ? छे: ! दसपट सामर्थ्य कुठून येणार ? उलट त्यांच्या राजकारणाचे बारा वाजायची वेळ आली. गोखल्यांनंतर हें शून्य तिथून सरकून मग नॉन-ब्राह्मण पक्षाच्या उरावर बसले. नॉन-ब्राह्मण पक्ष त्यावेळी नवीन व बिन-अनुभवी होता. "एकावर शून्य दा– हा– !" असें जें त्यांनी शाळेंत घोकलें असेल तेवढेंच ! कदाचित् तें त्यांनी रँगलर परांजपे यांच्याजवळच घोकलें असेल— कदाचित तें त्यांनी गोखल्यांचे अॅरिथमेटिकमध्येच घोकलें असेल.

नॉन-ब्राह्मणपक्षाच्या उरावर ज्यावेळीं हें चतुःशृंगी शून्य जाऊन बसलें, त्यावेळीं त्यांना पहिल्यांदा मोठा आनंद झाला. त्यांना वाटलें की, "एकावर शून्य दा–हा–"च्या सूत्राप्रमाणें आता आपल्यापैकी प्रत्येक मनुष्याच्या अंगांत दहा वीरांचें सामर्थ्य येणार! पण कुठलें सामर्थ्य न् कुठलें काय? हें शून्य छातीवर बसलें मात्र आणि कोल्हापूरचे महाराज एवढे खंबीर गडी, पण त्यांचाहि जीव कावराबावरा झाला, भास्करराव जाधव भीतीनें पिवळे दिसायला लागले, श्रीपतराव शिंदे बुचकळ्यांत पडले, कोठाऱ्यांचे पाय लटपटले, आणि सर्वांनी मिळून विचार केला की, ही व्याद उरावरून काढा व ह्याला दिवाणा–नाही नाही दिवाण–करा. रँग्लर परांजपे त्या-वेळीं दिवाणा--नाही नाही दिवाण झाले, आणि हें फर्ग्युसनी पूज्य त्या नंतर सर जॉर्ज लॉईड यांच्या बोकांडीं बसलें! "एकावर पूज्य दहा" ह्या गणिती ठोकळ्याचें तेथेंहि कांही प्रत्यंतर येत आहे असें दिसत नाही. कारण हे दिवाणे—नाही नाही दिवाण–नेमले जाण्यापूर्वी मुंबई सरकारचा राज्य-कारभार जसा चालत होता तसाच आजहि आहे. मुंबई इलाख्यांतील प्रजा त्यामुळे दसपट सुखी झालेली आहे, असें मुळीच दिसत नाही; उलट एवढें मात्र झालें की, शाळांची फी सर्वत्र वाढलेली आहे, व सक्तीचें आणि मोफत शिक्षण—पण तें जाऊं द्या—हें शून्य उरावर बसल्यापासून काय काय हाल झाले तें सर जॉर्ज लॉईड हे "रिटायर" झाल्यानंतर आपोआपच सांगतील व त्या वेळीं ती त्याची ऑटोबायॉग्रफी राजकारणांत सामान्य गणितें कांहीएक उपयोगाचीं नाहीत हें स्पष्ट कळवील.

२७ तून ९ गेले तर बाकी किती रहातात, हें एक राजकारणांतील गणित आहे, पण बादशाहाच्या दरबारी लोकांना त्याच्या दरबारांतील नालायक दिवाणांना— त्याचें मुळीच उत्तर देतां आलें नाही. सामान्य गणितावर विश्वास ठेवून ते म्हणाले की, २७ तून ९ गेले तर बाकी १८ राहतील! पण बिरबल हुषार होता. तो उत्तम राजकारणी होता, तो उत्कृष्ट मुत्सद्दी होता. तो म्हणाला की, "वर्षांतल्या एकंदर सत्तावीस नक्षत्रांपैकी पावसाळ्याचीं नऊ नक्षत्रें जर कोरीं गेलीं तर बाकी काय? बाकी शून्यच. सत्ताविसांत ९ नक्षत्रें वजा करा–बाकी शून्यच राहणार!"

सध्यां हिंदुस्थान सरकारच्या बजेटवर जो वादविवाद चालला आहे,

तोहि अशाच मासल्याचा आहे. ह्या बजेटचें स्थूल स्वरूप आम्हीं दुसरीकडे दिलेलेंच आहे. त्यावरूनच असें दिसून येईल की, हिंदुस्थानच्या जमाखर्चांत यंदा तीसपस्तीस कोटींची तूट आलेली आहे. ह्या तुटीमुळे कोणी हिंदुस्थान सरकारवर बोटें मोडीत आहेत, कोणी नवीन सुधारणांना शिव्या देत आहेत, कोणी हिंदी मेंबरांवर आग पाखडीत आहेत व कोणी परिस्थितीला दोष देत आहेत; पण आमचे मताने त्यांतील मुख्य गणिताकडे कुणाचेंहि लक्ष नाही. एक अब्ज तीस कोटि उत्पन्नांतून वीस कोटि कमी उत्पन्न झालें व खर्चाच्या बाजूला १४ कोटींचा खर्च जास्त वाढला, हें यांतलें खरें गणित नव्हे. हें अंकगणिती गणित झालें. हें सामान्य गणित झालें. हें शाळामास्तरी किंवा सिनीयर रँगलरी गणित झालें, खरें गणित हें नव्हे. राजकारणी गणित हें नव्हे की, ज्या दिवशीं हिंदुस्थानचें स्वातंत्र्य गेलें त्याच दिवशीं हिंदुस्थानचा जमाखर्च तोटयांत निघाला, त्याच दिवशीं जमेपेक्षा तोटयाची वाढ जास्त झाली, त्याच दिवशीं जमाखर्चाच्या वह्या विघडून हिंदुस्थानची नाचक्की ठरली.

आज हिंदुस्थानांत ३४ कोटींची तूट आली म्हणून वेडे लोक ऊर पिटीत आहेत, पण अरे वेडयांनो, ३४ कोटींची तूट आली म्हणून ऊर पिटूं नका. त्यांत ऊर पिटण्याजोगे काय आहे? स्वातंत्र्य मिळत असेल तर ३४ कोटीं-ऐवजीं ४३ कोटींची तूट सोसायला आम्ही तयार आहोंत. स्वातंत्र्य मिळत असेल तर असेच ३४ काय पण ३४० कोटि रुपयांची तूट सोसायला आम्ही तयार आहोंत. अरे, ३४ कोटि रुपयांची तूट आली म्हणून काय रडतां? स्वातंत्र्य गेलें म्हणून रडा!

हिंदुस्थानचा जो तोटा झालेला आहे तो पैशांचा तोटा झालेला नाही, स्वातंत्र्याचा तोटा झालेला आहे. पारतंत्र्याच्या स्थितींत सर मालकम हेले ह्यांनी ३४ कोटि तोटयाचेऐवजीं ३४ कोटि नफा झालेला दाखविला तर तुम्ही हसाल काय? दात काढाल? मग तुमच्यासारखे निर्लज्ज तुम्हीच! कारण देश परतंत्र असतांना कोणालाहि हसायचा अधिकार नाही. देश परतंत्र असतांना कोणालाहि खुषींत असण्याचा अधिकार नाही. देश परतंत्र असतांना कुणालाहि आनंद व्यक्त करायचा अधिकार नाही.

सर मालकम हेले ह्यांनीं ह्या वर्षी "बजेट" सादर केलें. हेले

फडणीस होण्यापूर्वी सर उइल्यम् मायर्स हे हिंदुस्थान सरकारचे फडणीस होते. ते फडणीस होण्यापूर्वी सध्यां इस्पितळांत डोळयांच्या विकाराने आजारी असलेले सर उइल्यम् मेस्टन् हे हिंदुस्थान सरकारचे फडणीस होते. पण ह्या फडणिसांचा आपणांस काय उपयोग? ते हसले म्हणून आपल्याला हसायचें नाही. ते रडलें म्हणूनहि आपल्याला रडयाचें नाही. ते कां न हसतील? ज्या दिल्लीच्या सिंहासनावर आज युधिष्ठिराचे वंशज कोणीतरी विराजमान व्हावयाचे, ज्या दिल्लीच्या सिंहासनावर पृथ्वीराज ह्याच्या कुलांतील कोणी विख्यात पुरुष असावयाचा, ज्या दिल्लीच्या सिंहासनावर अकबराच्या पुत्रांपैकी कोणाचें तरी आसन अधिष्ठित असायचें, ज्या दिल्लीचे सिंहासनावर सदाशिवराव भाऊंच्या वीरांपैकी कोणी तरी वीर दृश्यमान व्हायचा, ज्या दिल्लीचे सिंहासनावर महादजी शिंद्यांच्या वीर बच्चांपैकी एखादा वीराचा बच्चा विद्यमान व्हायचा, त्या सिंहासनावर–होय–होय–होय–त्या युधिष्ठिराच्या, त्या पृथ्वीराजाच्या, त्या अकबराच्या, त्या अवरंगजेबाच्या, ( अश्रूंनो, थांबा, थांबा, गडबड करूं नका. पुढील सर्व हतभागी सत्य आम्हांस लिहूं द्या. )त्या सदाशिवराव भाऊंच्या, त्या आमच्या विश्वविजयी महादजी शिंद्याच्या राजसत्तेवर आरूढ होऊन––दिल्ली शहरांत हकीम अजमलखां, स्वामी श्रद्धानंद वगैरे हिंदुस्थानचे लाल हयात असतांहि त्यांचे हातीं रज्यकारभार न पडतां जर पांच हजार मैलांवर घर असलेल्या सर मालकम् हेले यांना विजयी मुद्रेने जमाखर्चाचा खर्डा वाचायला मिळाला तर ते कां हसणार नाहीत?

उद्या एखादा लेले अथवा बापट जर अमेरिकेचा फिनॅन्स मेंबर होईल, एखादा सावंत किंवा राणे ह्यास जर स्पेनचा फिनॅन्स मेंबर व्हायला सापडेल, उद्या एखादा सुब्रह्मण्य ऐयर जर ग्रीसचा फिनॅन्स मेंबर होऊं शकेल अथवा एखादा छोटानी जर पॅराग्वेचा फडणीस बनेल तर आपणासहि आनंद कां नाही होणार? सर मालकम् हेले ह्यांना जर रडूं येत असेल तर तें एवढ्याकरितां की, येथे जेवढी रक्कम आपल्या सत्तेखाली येईल असें त्यांना वाटलें होतें तेवढी आली नाही. पण एवढ्यामुळे ते रडलेले नाहीत. काडयाच्या पेटीवर कर बसवून, एका पैशाचें कार्ड दोन पैशाला

करून, गरिबांचें मीठ महाग करून त्यांना जेवढी रक्कम राज्यकारभाराकरितां आवश्यक वाटते तेवढी ते जमा करणारच आहेत!

पण हा त्यांचा प्रश्न आहे. तो आपला नव्हे. बादशहाच्या गोष्टींतील २७ तून ९ गेले म्हणजे जसें शून्य राहिलें त्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारच्या १३० कोटि रुपयांतून जर स्वातंत्र्य तेवढें गेलें तर आपल्याला बाकी शून्यच राहिलें! स्वातंत्र्य नसलें आणि नफा झाला तरी तो शून्यच! स्वातंत्र्य नसलें आणि १४० कोट उत्पन्न झालें तरी तें शून्य! स्वातंत्र्य नसलें आणि इंद्राचें नंदनवन मिळालें तरी तें शून्य! स्वातंत्र्य नसलें आणि ऐरावत बसायला मिळाला तरी तो शून्य! स्वातंत्र्य नसलें आणि कुबेराची संपत्ति मिळाली तरी ती शून्य! स्वातंत्र्याशिवाय सौख्य शून्य! स्वातंत्र्याशिवाय आनंद शून्य! स्वातंत्र्याशिवाय संसार शून्य; स्वातंत्र्याशिवाय जीवितहि शून्य! स्वातंत्र्य हें आमचें अस्तित्व आहे. स्वातंत्र्य हें आमचें धन आहे, स्वातंत्र्य हें आमचें बजेट आहे. ह्या बजेटांत स्वातंत्र्य घाला आणि कोटयवधि रुपयांचा तोटा दाखवा—अहाहा! तें आम्हीं आमचें परमभाग्य समजूं—आमच्या बजेटांत स्वातंत्र्य नसूं द्या—मग आम्हांला हेले शून्य, कौन्सिलें शून्य, सर्व शून्य! ज्या बजेटांत स्वातंत्र्य नाही तें आम्हांला शून्य नको.

• • •

अनुक्रम ........................ दिं ..........
क्रमांक ........................ नों. दिं ..........

१६

# पुणेरी जोडे

[अच्युतरावांच्या कल्पकतेनें पुणेरी जोड्यांची केलेली एक चिकित्सक शोधाशोध.]

★ ★ ★

इतिहासांतील प्रसिद्ध असा पहिला पुणेरी जोडा म्हणजे राजे शहाजी आणि दादोजी कोंडदेव ह्यांचा होय. एके बाजूला स्वाभिमान, एके बाजूला मुत्सद्दीपणा, एके बाजूला कर्तृत्व, एके बाजूला सुव्यवस्थितपणाची आवड, एके बाजूला धाडस, एके बाजूला दूरदृष्टि अशा ह्या दोन पुरुषांचा महाराष्ट्रांत इतका सुंदर जोड जमलेला होता की, ह्या जोड्याचे हातून महाराष्ट्राच्या भाग्योदयाचीं बीजें पेरलीं गेलीं. महाराष्ट्राचा अर्वाचीन इतिहास श्रीशिवाजीमहाराज ह्यांचे हातून सुरू झाला अशी जर कल्पना केली, तर ह्या इतिहासाची पूर्वतयारी शहाजी राजे आणि दादोजी कोंडदेव ह्यांचे हातून झाली असें म्हणावयास हरकत नाही. कित्येक इतिहासकार तर स्वराज्यस्थापनेचें सर्व श्रेय श्रीशिवाजीमहाराजांपेक्षा, शहाजीराजे व त्याचे विश्वासू कारभारी दादोजी कोंडदेव ह्याच जोडीकडे देतात. ही कल्पना कदाचित् खरी असेल, कदाचित् अतिशयोक्तीची असेल, पण एवढें खरें की, शहाजी व दादोजी कोंडदेव ह्या दोघांनी महाराष्ट्रांत जें स्वराज्याचें बीज पेरलें त्यालाच श्रीशिवाजीमहाराजांच्या कारकीर्दीत सुंदर फळें आलीं. पुणें शहरांतील ह्या जोड्यावरून ब्राह्मण–अब्राह्मण हा प्रश्न किंवा हीं भांडणें किती अप्रयोजकपणाची आहेत हें पूर्णपणे सिद्ध होतें. शहाजीराजे मराठे होते, दादोजी कोंडदेव ब्राह्मण होता; परंतु शहाजीचा दादोजीवर पूर्ण विश्वास होता व दादोजीची शहाजीविषयीं अत्यंत स्वामिभक्ति होती. हे दोघे पुरुष ब्राह्मण-अब्राह्मण, एका विचारानें चालले. त्यांच्यांत कधीहि भेदभाव उत्पन्न झाला नाही, म्हणून महाराष्ट्राच्या भावी इतिहासाचा नकाशा आखला गेला!

जोडा असावा तर असा असावा. जोडा असावा तर त्याच्या हातून अद्वितीय राष्ट्रोत्कर्ष व्हावा! शहाजी व दादोजी कोंडदेव हा त्या दृष्टीनें अपूर्व जोडा आहे, आणि सर्व पुणरी जोडयांत ह्यालाच पहिला नंबर दिला पाहिजे

ह्यापुढील पुणेरी जोडा म्हणजे, श्रीशिवाजी महाराज आणि तानाजी मालुसरे ह्यांचा अद्वितीय जोडा होय. आजपर्यंत मित्र मित्रांना मिळाले असतील, स्नेह्यांनी स्नेह्यांशीं सहकार्य केलें असेल, आजपर्यंत एकाच कार्याला वाहिलेल्या व एकाच ध्येयांत गुंग असलेल्या दोन व्यक्तींनी एकमेकांना साह्य केलेलें असेल, पण ह्या सर्वांत श्रीशिवाजीमहाराज आणि तानाजी मालुसरे ह्यांचा जोडा जसा शोभला, तसा कोणाचाहि जोडा शोभला नसेल.शिवाजीला तानाजीची जोड मिळाल्यापासून पराक्रमाला जें स्वरूप आलें, देशभक्तीला जो पूर आला, उत्साहाला जो भर चढला, आशांना जें स्फुरण आलें, आणि यशाला जी चढती कमान चढली, तिच्यामुळे महाराष्ट्राच्या मांगल्याचा दीप प्रज्वलित होऊन त्यांत गुलामगिरीचा लज्जास्पद कलंक पार दिसेनासा झाला. मालुसरे पडला तेव्हां आपल्या गोटांतला सिंहच हरपला, अशी खुद्द शिवाजी-महाराजांनी साक्ष दिली. एवढेंच केवळ नव्हे तर तानाजीच्या मुलाचें सांत्वन करतांना शिवाजी मेला, तानाजी जिवन्त आहे असे उद्गार श्रीशिवाजी-महाराजांनी काढले. शिवाजीला तानाजीची जोड मिळल्यामुळे शिवाजीमहा-राजांना किती अमोलिक मदत झाली असेल ह्याचा हा धडधडीत पुरावा आहे. शिवाजीमहाराज आणि तानाजी मालुसरे ह्यांचा हा अद्वितीय जोडा जमला म्हणून ह्या महाराष्ट्रभूमीचें गुलामगिरीचें जोखड नाहीसें झालें, हिला वैभवाचा टिळा लागला, हिच्यावर स्वराज्याचीं छत्रचामरें उडालीं, हिची कीर्तीच्या सिंहासनावर प्रस्थापना झाली. असला योग, असला मुहूर्त, असल्या भाग्याचा जोडा इतिहासांत दुसरा कोणता असणार? महाराष्ट्राच्या सगळ्या सुखद प्रसगांत श्रीशिवाजीमहाराज आणि तानाजी मालुसरे ह्यांच्या ऐक्याचा प्रसंग आम्ही अत्यत महत्त्वाचा समजतों, आणि म्हणून सगळ्या पुणेरी जोडयांत आम्ही शिवाजी-तानाजीच्या जोडयाला अग्रस्थान देतों. हें अग्रस्थान अयोग्य आहे असें कोण म्हणेल आणि ह्यापुढील जोडयांचा निर्देश करण्याचेपूर्वी

शिवाजी-तानाजीच्या जोडयाला पुनःपुन्हा, कोणता महाराष्ट्रीय वंदन करणार नाही ? ह्यापुढील जोडा अर्थातच धनाजीराव जाधव आणि संताजीराव घोरपडे ह्यांचा होय. ह्या जोडयाचें महाराष्ट्राच्या इतिहासांत अत्यंत महत्त्व आहे, किंबहुना धनाजी-संताजीचा हा जोडा जर निर्माण झाला नसता तर शिवाजी-तानाजींनी कमावलेल्या सर्व भाग्यावर पाणी पडलें असतें ह्यांत संशय नाही. ह्या जोडयाची आणखी दुसरी विशेष गोष्ट म्हणजे ह्या दोघांना कार्य करतांना भोगाव्या लागलेल्या कमालीच्या अडचणी ह्या होत. शहाजी-दादाजीची परिस्थिति निराळी, शिवाजी-तानाजीची परिस्थिति ही एकप्रकारें सोपीच म्हणतां येईल; पण ज्या परिस्थितींत धनाजी-संताजींनी कार्य केलें तितकी बिकट परिस्थिति महाराष्ट्राच्या इतिहासांत तर नाहीच; पण जगाच्या इतिहासांतहि फारच थोडकी असेल असें खात्रीनें म्हणतां येईल. शिवाजीमहाराजांच्या नंतर संभाजीनें काय ठेवलें होतें ? काय सैन्य कायम ठेवलें होतें, की शिस्त कायम ठेवली होती, की प्रजेचीं मनें संतुष्ट ठेवलीं होतीं ? पण सहाय्य नाही, खजिना नाही, सैन्य नाही, अनुयायी नाहीत, एवढेंच काय पण ज्या घोडयावर बसायचें त्या घोडयाचें जीनहि धड नाही, अशा निरुत्साहकारक व सर्वतोपरि प्रतिकूल परिस्थितींत ज्या बहाद्दरांनी स्वराज्याचा अभिमान धरला आणि अवरंगजेबासारख्या मी मी म्हणणाऱ्या लढवय्याला हात टेकायला लावून दख्खनचे घोडे गंगा नदीच्या पात्रांत नेऊन नाहविले त्या शूरांची, त्या वीरांची, त्या हिंमतबहाद्दरांची स्तुति किती गावी? शत्रूचे घोडे पाणी पिईनातसे झाले म्हणजे "अरे, तुला ह्यांत धनाजी दिसत आहे की काय ?" असें ज्या पराक्रमी पुरुषांनी स्वतःविषयीं म्हणविलें, त्यांच्या नांवानें जर महाराष्ट्रांतील तरुणांना स्फूर्ति न चढेल तर कृष्णा-गोदेच्या पाण्यांत कांही पाणीच नाही असें म्हणावें लागेल.

पण त्या जोडयावर एक आक्षेप असा आहे की, शहाजी-दादाजी, अथवा शिवाजी-तानाजी ह्याप्रमाणे हा जोडा अस्सल पुणेरी नव्हे. ह्या आक्षेपांत अर्थातच कांहीएक अर्थ नाही. कारण अवरंगजेबाशीं ह्या दोघांनी खेळलेल्या धावत्या लढाईंत जिंजीपासून पुण्यापर्यंत असें एकहि महत्त्वाचें ठिकाण उरलें नव्हतें की, जें किंचित्कालपर्यंत तरी त्यांच्या पराक्रमाचें विषय झालें नव्हतें. तथापि आकुंचितपणाच्या भरी पडून जर असें म्हणावयाचेंच असेल तर खास

पुण्याचा असा बाजीराव आणि चिमाजीअप्पा यांचा जोडा पहा. ह्यांतल्या बाजीरावानें मराठी समशेर दिल्लीपर्यंत चमकावली, छत्रसाल राजाला संकटमुक्त केलें, निजाम-उल्मुल्काचा नक्शा उतरला, आणि नादिरशहाच्या पोटांत धडकी उत्पन्न केली. चिमाजीअप्पांचा पराक्रम तर ह्यापेक्षाहि थोर! बाजीरावाचे पराक्रम एशियाटिक लोकांविरुद्ध तरी होते; पण चिमाजीने, त्या वीरविख्यात चिमाजीअप्पाने, पोर्तुगीजांसारख्या एका युरोपियन राष्ट्राचा धुव्वा उडवून, ख्रिस्ती चर्चमध्यें घणघण करणाऱ्या घंटेच्या मुखांतून, मराठी भालाइतांच्या कीर्तीचें गाणें बाहेर काढलें! धन्य! धन्य तें पुणें! धन्य तो बाजी! धन्य तो शाहू नृपति आणि धन्य धन्य तें महाराष्ट्र की ज्याला असले अवर्णनीय चमत्कार प्रत्यक्ष डोळ्यांनी पहायला सापडले!

बाजी-चिमाजीनंतरचा प्रख्यात जोडा म्हणजे अर्थात् नाना फडणीस आणि हरिपंत तात्यांचा होय! पानिपतच्यानंतर पहिल्या माधवरावाच्या मृत्यूनंतर, नारायणरावाच्या खुनानंतर, आणि मराठे-इंग्रज ह्यांच्यांतील युद्धानंतर जें मराठी राज्य डळमळायला लागलेलें होतें, तें खूब शर्तीने ज्याने राखलें, त्या नाना फडणीसाला धिम्या पण यशस्वी हरिपंत तात्यासारख्या रणधुरंधराची जोड जर मिळाली नसती, तर कितीसें यश कमावतां आलें असतें, हाहि एक प्रश्नच आहे. पण हा प्रश्न उपस्थित झाला नाही ह्याचें कारणच नाना फडणीसांना हरिपंत तात्यांच्या तलवारीचा प्रबळ आधार मिळाला हें होय. आणि हरिपंत फडके कोण तर महाराष्ट्रराज्याचें नाक, स्वराज्याचें भूषण, पराक्रमाचा अभिमान, वीरांचा रणोत्साह आणि देशभक्तांचें मूर्तिमंत राष्ट्रप्रेमच असा जो सर्वविजयी जरीपटका तो ज्याच्या स्वाधीन केलेला होता असा इमानी शिपाई गडी! हा शिपाई गडी जोपर्यंत हयात होता तोपर्यंत मराठ्यांचा जरीपटका कधी मळला नाही, कधी हलला नाही, कधी लपला नाही! हरिपंत गेले आणि जरीपटक्याचे लगेच धिंडवडे निघाले. पण असो, ती दुःखदायक कहाणी तूर्त बाजूला ठेवू. इथें सांगायचें तात्पर्य म्हणजे एवढेंच की, जरी स्वराज्यांतला हा शेवटचा जोडा असला तरी तो कमी महत्त्वाचा नाही. ह्या जोड्याने कांही काळ महाराष्ट्र हालवून

सोडला, दणागून सोडला, स्तंभित आणि विस्मयचकित केला. ह्या जोड्यापुढे आम्ही असे आश्चर्यचकित झालों ह्यांत कांहीएक नवल नाही. तेव्हापासून आतापर्यंत नाना-हरीपंतांचा हा जोडा शत्रु-मित्रांना असाच आश्चर्यचकित करीत आलेला आहे. आपण तरी या नियमाला अपवाद कसे ठरूं ?

ह्या पुढील पुणेरी जोडा म्हणजे— अरे पण इथपासून इंग्रजी सत्तेला सुरुवात झाली. आता पुणेरी जोडा शोधायचा म्हणजे रणमैदान, जरीपटका, भवानी तलवार हें सारें विसरलें पाहिजे, आणि इंग्रजी शिकलेल्यांत हे जोडे शोधायला लागले पाहिजे. पण हें केव्हांतरी ! आजच रण आणि अरण, संग्राम आणि असंग्राम, समशेर आणि असमशेर ह्या सर्वांची खिचडी नको आपण शहाजी राजांच्या तरवारबहाद्दरीपासून ह्या जोड्यांना सुरुवात केली—राहूं द्यात, हे जोडे. ह्या जोड्या, हे गडी, इथेच राहूं द्या ! तरवारबहादुरी आणि लेखणीबहादुरी ह्यांचा आज तरी घोटाळा व्हायला नको.

पण त्यांतलें जें महत्त्वाचें तात्पर्य तें मात्र आपण लक्षांत ठेवलें पाहिजे पुणें म्हणजे मराठी मुलखांतलें एक शहर आहे अशी ज्यांची कल्पना असेल त्यांना खरोखरी इतिहासहि कळला नाही व भूगोलहि कळला नाही. पुणें म्हणजे मराठी मुलखांतलें एक शहर नव्हे, पुणें म्हणजे महाराष्ट्रांतील थोर पुरुषांचें पुण्य आहे, त्यांचें यश आहे, त्यांचें विजयशालित्व आहे. हें महाराष्ट्राचें पुण्य जितकें जास्त वर्धमान होईल, जितकें जास्त साचेल, जितकें जास्त शिलकेंत पडेल, तितका महाराष्ट्राचा गौरव आहे. हें पुण्य ज्या प्रमाणांत खलास होईल तितका महाराष्ट्र रसातळाला जाईल. पण ह्या पुण्याईची जर जोड करावयाची असेल, तर सत्कार्यासाठीं सर्वत्र एकजीव झाले पाहिजेत. ज्याप्रमाणे शहाजीला दादोजीने मदत केली, ज्याप्रमाणे तानाजीने शिवाजीकरितां आपले प्राण गहाण ठेवले, ज्याप्रमाणे धनाजी संताजीमय झाला, आणि संताजी धनाजीमय झाला, असलीं ऐक्यें, असल्या जोड्या, असले जोडे, जर महाराष्ट्रांत निर्माण होतील तर महाराष्ट्राच्या पुण्याईला काय कमती आहे ? पण हींच जर अंतःकरणें फाटतील, हृदयें फुटतील, मनें बिचकतील, प्रेमें विसकटतील, तर मग पुण्यांत अर्थ कोणता ? महाराष्ट्राचें ऐक्य हीच खरी महा-

राष्ट्राची जोडी, व हेच खरे महाराष्ट्राच्या शत्रूंना खरोखरीच पुणेरी जोडे. हे पुणेरीं जोडे सध्याच्या तरुणांतून निर्माण झाले पाहिजेत, सध्याच्या पीळदार मर्दांतून निघाले पाहिजेत, देशाकरितां ज्यांचें रक्त सळसळतें त्यांच्यांतून हे पुणेरी जोडे निर्माण झाले पाहिजेत! काय? तरुणांच्या अंतःकरणाची अशी जोडणी खरोखरच महाराष्ट्रांत चालली आहे काय?

• • •

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम.......................... वि: ..........
क्रमांक .......................... नों दि ..........

१७

# नवरा-बायकोमधील नोटीस

[ नोटिसीचा खर्च न घेतां ' संदेश 'मध्यें छापलेली एक और नोटीस.]

* * *

रा. रा. मोहनदास करमचंद गांधी, राहणार दुनिया, हल्ली मुक्काम मुरादाबाद, संयुक्त प्रान्त, प्रॉव्हिन्शियल कॉन्फरन्सचा मंडप, डेलीगेट कॅम्प, यू.पी., इंडिया ह्यांस

खाली सही करणार इंडियन होमरूल लीग, भ्रतार मोहनदास करमचंद गांधी, राहणार फोर्ट, मुंबई (हिंदुस्थान) इजकडून नोटीस देण्यात येते की, तुम्ही माझे लग्नाचे नवरे असून तुम्ही गेल्या दोन महिन्यांपासून मला आपले घरीं नांदणेस नेत नाही. मला माझे भाऊ महंमदअल्ली जिना वगैरे माझ्या माहेरच्या माणसांनी लोकाचें कर्ज काढून पन्नास हजार रुपये खावयास घातलेले आहेत. माझे वडील दादाभाई नवरोजी आणि माझी आई कलकत्याची १९०५ ची काँग्रेस, ह्या दोघांची मी सुस्थळीं पडावें अशी इच्छा होती. माझी आई सुरत येथे वारली. तेव्हा तिने मला माझे बाबा दादाभाई नवरोजी ह्यांच्या स्वाधीन केलें व त्यांनीहि मरणाचे वेळी माझे वडील बंधु महंमदअल्ली जिना वगैरे मायाळू आप्तांना माझ्या लग्नाची काळजी करण्यास सांगितलें. महंमदअल्ली जिना यानी माझ्याकरिता पुष्कळ खर्च केला व पुष्कळ स्थळें पाहिलीं. एकदा तर त्यांनीं माझें लग्न

ॲनीबेझण्ट नांवाच्या व्यक्तीशींच लावून दिलें; पण पुढे ही व्यक्ति स्त्री आहे. पुरुष नव्हे अशी शाबिदी झाल्यावरून तें माझें लग्न रद्द ठरलें. पुढें त्यांनी तुमचें कुलशील व तुमची कीर्ति ऐकून माझें तुमच्याशीं लग्न लावून दिलें; परंतु करीब दोन महिने झाले तुम्ही मला नांदणेस नेत नाही व स्वराज्य-सभा नांवाच्या एका दुसऱ्या औरतेच्या नादीं तुम्ही लागलां आहां असें माझ्या भावास खात्रीपूर्वक कळलेलें आहे. ह्या औरतेचा नाद सोडून द्या, असें त्यांनी तुम्हाला नाना प्रकारांनी सांगितलें, पण तुम्ही तो नाद सोडून देत नाहीं. तुम्ही ब्रिटिश राज्यछत्राखालीसुद्धा राहण्यास तयार नाही, असें माझे भाऊ मला सांगत आहेत. हें खरें असेल तर तो तुमच्या नांवाला बट्टा आहे. निदान मला तरी तुम्ही ब्रिटिश राज्यछत्राबाहेर रंगढंग करीत असतांना तुमच्या बरोबर एकटीला रहाणें शक्य नाही. शिवाय तुमची दुसरी औरत स्वराज्यसभा हिला तुम्ही सोडायला कबूल नसाल तर मला तुमचेबरोबर रहाणें अशक्य आहे. कारण ती म्होतुराची असल्यामुळे माझ्यापेक्षा तिचा दर्जा कमी आहे व तिचीं लुगडीं धुऊन राहण्याचा तुम्ही मला हुकूम करणार आहांत, असे माझे दूधभाऊ जमनादास द्वारकादास, भावजी गोविन्दजी वगैर मण्डळी मला सांगत आहेत. परंतु तिचीं लुगडीं धुऊन तुमच्याजवळ राहयला मी कबूल नाही. मी आतां वयांत आलेली आहें व संसार करून दोन मुलेंबाळें व्हावीं, असें मला वाटणें साहाजिक आहे. माझे भाऊ महंमद अल्ली जिना ह्यांनी आजवर माझ्याकरिता फार खर्च सोसलेला आहे. आता ह्यापुढे माझ्याकरिता तसदी सोसण्याची त्यांची ऐपत नाही. व मलाहि आता यापुढे त्याना तकलीफ द्यायची इच्छा नाही. मला कोणी स्वतंत्रपणानेहि कर्ज देत नाही. ह्यासाठी मला दुसरा संबंध करून माझ्या जन्माचें सार्थक करणें भाग आहे. तरी ही नोटीस पोचल्यापासून आठ दिवसांचे आत वरील रक्कम पन्नास हजार रु. देऊन मला नांदविणेस घेऊन जावें. शिवाय तुम्ही ठेवलेली दुसरी औरत स्वराज्यसभा हिला ह्यापुढे घरांत ठेवणार नाही व ब्रिटिश साम्राज्याचे बाहेर रहायला जाणार नाही अशाबद्दल पंडित मदन मोहन मालवीय व बाबू बिपिनचंद्र पाल असे दोन लायक जामीनहि द्यावे. तुमच्याजवळ अलीकडे मौलाना महंमदअल्ली व मौलाना शौकतअल्ली असे दोघे इसम रहात असतात असेंहि मला

कळलें आहे, आणि विशेषत: त्यांच्याच नादाने तुम्ही बिघडलेले आहां. नाहीतर पूर्वी तुमचें माझ्याशीं व जगाशीं वर्तन चांगलें होतें. ह्या दोघाशिवाय दुसरी जामिनगिरी तुम्ही द्याल तर मी ती कबूल करणार नाही. तुम्ही जामीन द्याल तर ते मदनमोहन मालवीय व बिपिनचंद्रपाल हे दोघेच दिले पाहिजेत. तसें न कराल तर हीच सोडचिठ्ठी समजून मी दुसरा नवरा करीन. मग मजवर तुमचा नवरेपणाचा कोणताहि हक्क चालणार नाही. कळावे, ता. ४– १०– १९२० इ.

निशाणी बांगडी इंडियन होमरूल लीग
भ्रतार मोहनदास करमचंद गांधी इची असे.
दस्तुर बॅरिस्टर आझाद, मुंबई.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 39723 दि: 18.1.5
क्रमांक 9378 नों: दि: 23/20.7
REFBK-0011482